श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.११/२०२० **दिनांक ११.१२.२०२०**

स्थळ- web based Microsoft team या ॲपव्दारे **वेळ- दु. १२.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दि.५.१२.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२३६१/२०२०, दि.२७.११.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. तथापी सदरची सभा मा.अध्यक्ष महोदय यांचे सुचनेनुसार दि.११.१२.२०२० रोजी web based Microsoft team या ॲपव्दारे दुपारी १२ ते ४ यावेळेत आयोजित करण्यात आली होती.

या सभेस web based Microsoft team या ॲपव्दारे खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. न्या. श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.

१. मा.श्री. कान्हूराज बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.

२. मा. श्रीमती गितांजली बाविस्कर, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक. तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

३. मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

विषय नं.०१ **दि.२८.०८.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.४५४ **दिनांक २८.०८.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. दिनांक २८.०८.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्तामध्ये सदस्य सचिव /मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मते अंतर्भूत करणेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचिका नं.१२०/२०१९ मध्ये दिनांक ०४/११/२०२० रोजी आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार सदर इतिवृत्तामध्ये सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मते अंतर्भूत करण्यात आली.

---

२. **निर्णय क्र.४२४-** महाराष्ट्र शासनाने पत्र क्र.माआअ-1019/प्र.क्र.13/का-16, दि.09 जुलै 2020 चे पत्रान्वये उपदानाची रक्कम 20 लक्ष पर्यंत वाढविण्याचा संस्थानने महाराष्ट्र शासनाला पाठविलेला प्रस्ताव अमान्य केलेला असल्याने सदरहु शासन निर्णयाचे विरोधात जावून उपदानाच्या रकमेत अशी वाढ करता येणार नाही असे समितीने एकमताने ठरवले सबब, सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. सदरचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन करुन मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग /विधी विभाग)

त्याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली, समितीचे असे निदर्शनास आणून देण्यात आले की, संस्थानमधील कायम कर्मचा-यांना कोर्ट रिसिव्हरच्या काळापासून म्हणजे दि.१६.०४.१९६६ पासून पेमेंट ऑफ ग्रॅज्युईटी ॲक्ट मधील तरतुदीनुसार उपदान अदा करण्यात येते. संस्थानने त्यासाठी एल.आय.सी.सोबत एक योजना तयार करुन त्यामध्ये दरवर्षी अंशदान जमा करण्यात येते. जमा रकमेवर एल.आय.सी.व्याजही देते. मयत कर्मचा-यांचे वारसांना कर्मचा-यांची उर्वरीत सेवा गृहीत धरुन उपदान

अदा करण्यात येते. संस्थान कर्मचारी हे राज्य शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्यांना राज्य शासनाने कळविल्यानुसार शासन निर्णय क्र.सेनिवे-२०१९ प्र.क्र.५८/सेवा-४, दि.१.३.२०१९ मधील परिच्छेद ६ प्रमाणे रु.१४.०० लक्ष पर्यंत उपदान लागु करणे ही बाब शासनाच्या व मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणणे गरजेचे वाटते. त्यामुळे संस्थान कर्मचा-यांना फायदेशीर असल्याने पेमेंट ऑफ ग्रॅज्युईटी ॲक्ट, १९७२ नुसार रु.२०.०० लक्ष पर्यंत उपदान अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे व विधी व न्याय विभागाकडे समितीचे निर्णयानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

तसेच या प्रक्रियेस कालावधी लागणार असल्याने दरम्यानचे काळात सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना राज्य शासनाने कळविल्यानुसार शासन निर्णय क्र.सेनिवे-२०१९ प्र.क्र.५८/सेवा-४, दि.१.३.२०१९ मधील परिच्छेद ६ प्रमाणे रु.१४.०० लक्ष पर्यंत उपदान अदा करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग /विधी विभाग)

विषय नं.०२ **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

१. **श्री साईबाबा महाविद्यालयाकरीता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील (Ad-hoc) प्राध्यापक भरतीबाबत अहवाल.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या व्यवस्थापनास मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रमांकमान्यता-२०१८ /(३०/१८)/ मशि -४, दि. २८ फेब्रुवारी २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देणेबाबत मान्यता दिलेली आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी-२०१८(१००/१८) मशि-४, दि.१५ जुन, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालय या नामाभिधानाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालयाचे कामकाज सुरु करणेत आलेले असून, नैसर्गिक वाढीनुसार सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये द्वितीय वर्षाचे वर्ग व सन २०२०-२१ मध्ये तृतीय वर्षाचे वर्गांकरीता मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.ससं/उशि/पुवि/कायम विना अनु. कार्यभार/महावि/२०२०/१४२८ दि.३०.०७.२०२० अन्वये सन २०१९-२० मधील विद्यार्थी संख्या विचारात घेता, प्रथम व द्वितीय वर्षाकरिता अनुज्ञेय शिक्षक व शिक्षकेतर पदांना मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेनुसार सन २०२०-२१ मध्ये नैसर्गिक वाढीनुसार वर्ग, व्दितीय वर्षाचे वर्ग तसेच नव्याने सुरु करावयाचे तृतीय वर्षाचे वर्ग या करीता श्री साईबाबा महाविद्यालयाकडे आवश्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक पदभरतीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, Walk In Interview घेऊन सर्व कार्यवाही करणेस मा. तदर्थ समितीचेसभेत दिनांक ११.०८.२०२० रोजी चक्रिय पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यता मिळालेली आहे. तसेच जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/८७४/२०२० दि.१२.०८.२०२० रोजीचे पत्रान्वये, दिनांक २४ व २५ ऑगस्ट, २०२० रोजी सहाय्यक प्राध्यापक (Assistant Professor) , ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक या पदावरील नियुक्ती कामी Walk in Interview ची जाहिरात महाराष्ट्रातील प्रमुख वर्तमान पत्रातुन व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल आयुक्त, नाशिक विभाग तथा सदस्य तदर्थ समिती यांना जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/१०४२/२०२० दि.१४.०८.२०२० अन्वयेमुलाखतीचे कामकाजासाठी उपस्थित राहणेसाठी विनंती करण्यात आली होती.तसेच श्रीमती गिता बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्य तदर्थ समिती यांचा मुलाखतीकामी गठीत केलेल्या निवड समितीमध्ये समावेश करण्यास श्री साईबाबा महाविद्यालयाकडील दि.१५.०८.२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मा.अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/२४/२०२० दि.१६.०८.२०२० अन्वये पत्र देऊन, श्रीमती गिता बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्य तदर्थ समिती यांचा प्राध्यापक भरतीकामी गठीत केलेल्या निवड समितीमध्ये समावेश करणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा महाविद्यालयाकडील दि.१९.०८.२०२० रोजीचे मंजूर टिपणीनुसार, वार सोमवार,दिनांक २४ ऑगस्ट, २०२० व मंगळवार दि.२५ ऑगस्ट, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता श्री साईबाबा संस्थानचे

साई सभागृह येथे इच्छुक उमेदवारांचे मुलाखतीचे कामकाज सुरु करण्यात आले. या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीच्या कामकाजासाठी खालील मा.तदर्थ समितीचे सदस्य व इतर वरिष्ठ अधिकारी हजर होते.

अ.क्र.	उपस्थितांची नांवे	पदनाम
०१.	मा.श्री.कान्हूराज बगाटे	मुख्य कार्यकारी अधिकारी
०२.	मा.श्री.दिलीप स्वामी	अपर महसुल आयुक्त, नाशिक विभाग
०३.	श्रीमती गिता बनकर	सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

तसेच श्री साईबाबा महाविद्यालयाकडील जा.क्र.एसएसएस / श्री साईबाबा महाविद्यालय/४०४३-४०४६/२०२० दि.१४ ऑगस्ट, २०२० अन्वये, इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेणे कामी विषयतज्ञ म्हणुन वरिष्ठ व जेष्ठ प्राध्यापकांना नेमणेकामी अनुक्रमे डॉ.अमरजा रेखी, प्राचार्य, पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर, डॉ.बी.एस.झावरे, प्राचार्य, न्यु आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर, डॉ.भाऊसाहेब कराळे, प्राचार्य, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर व डॉ.आर.जे.बार्नबस, प्राचार्य,अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर यांना विनंती करणेत आलेली होती. त्यानुसार संबंधित महाविद्यालयाचे मा.प्राचार्यांनी खाली नमूद केलेप्रमाणे विषयतज्ञ यांची नेमणूक केलेली होती व ते मुलाखती घेणेकामी हजर होते.

अ.क्र.	विषय	विषयतज्ञांचे नावे	विषयतज्ञांचे नावे
०१	मराठी	डॉ.प्रकाश सुर्यवंशी	डॉ.लक्ष्मीकांत येलवंडे
०२.	इंग्रजी	डॉ.एम.बी.कारंडे	प्रा.एन.डी.मोहिते
०३.	हिंदी	डॉ.एच.डी.जगताप	प्रा.ए.एम.घोरपडे
०४.	अर्थशास्त्र	डॉ.एम.एच.शिंदे	डॉ.आर.जी.कोल्हे
०५.	इतिहास	डॉ.के.एम.अबांडे	प्रा.एस.डी.मोरे
०६.	भूगोल	डॉ.ए.पी.पंडीत	प्रा. डी.एम. नलगे
०७.	राज्यशास्त्र	प्रा.एस.एस.कातोरे	प्रा.व्ही.बी.नाबदे
०८.	वाणिज्य	डॉ.बी.के.मोटे	प्रा.पी.बी.परदेशी
०९.	वनस्पतीशास्त्र	डॉ.चांगदेव आरसुळे	प्रा.एस.व्ही.लहारे
१०.	रसायनशास्त्र	डॉ.अनिल आठरे	डॉ.विठ्ठल कवाडे
११.	गणित	प्रा.शिवाजी तरटे	प्रा.नसीर सय्यद
१२.	प्राणीशास्त्र	डॉ.सुनिल पोकळे	प्रा.मोहम्मद खान
१३.	भौतिकशास्त्र	डॉ.अविनाश मंचरकर	प्रा.दीपक शेलार
१४.	इलेक्ट्रॉनिक्स	डॉ.अविनाश मंचरकर	प्रा.दीपक शेलार
१५.	संगणकशास्त्र	डॉ.अविनाश मंचरकर	प्रा.दीपक शेलार
१६.	ग्रंथपाल	श्रीमती संगिता निमसे-सुरोशी	श्री.राजेंद्र मारवाडे
१७.	शारिरीक शिक्षण संचालक	डॉ.शरद मगर	प्रा.संजय धोपावकर

मुलाखतीसाठी प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे, मुलाखतीचे प्रथम दिवशी म्हणजेच दिनांक २४ ऑगस्ट, २०२० रोजी सकाळी ८.३० वाजेपासून सकाळी ११.०० वाजेपर्यन्तचे कालावधीत उपरोक्त अ.क्र.०१ ते ०८ विषयांचे पदांसाठी उपस्थित असणारे ६२ इच्छुक उमेदवारांची नाव नोंदणी व त्यांनी आणलेल्या कागदपत्राची पडताळणी करण्यात आली.

तसेच मुलाखतीचे व्दितीय दिवशी म्हणजेच दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी सकाळी ८.३० वाजेपासून सकाळी ११.०० वाजेपर्यन्तचे कालावधीत उपरोक्त अ.क्र.०९ ते १७ विषयांचे पदांसाठी उपस्थित असणारे ५३ इच्छुक उमेदवारांची नाव नोंदणी व त्यांनी आणलेल्या कागदपत्राची पडताळणी करण्यात आली.

त्यानंतर इच्छुक उमेदवारांचे नांव, गाव व इतर माहितीसह विहित नमुन्यातील तक्ते तयार करुन, मुलाखती घेणेकामी हजर असलेल्या मा. वरिष्ठ अधिकारी यांचेकडेस सादर करणेत येऊन, दोन्ही दिवशी दुपारी १२ वाजेपासुन मुलाखतीचे कामकाज सुरु होऊन, ते पूर्ण करणेत आले. मुलाखती घेणेसाठी हजर असलेले मा. वरिष्ठ अधिकारी व विषयतज्ञ यांनी दिलेले गुण, शैक्षणिक अर्हता व अनुभव या निकषास अनुसरुन प्राप्त

एकुण गुणांनुसार उच्च ते निम्नतम गुणानुक्रमांनुसार पात्र उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली. त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

परिशिष्ट अ

अ.क्र.	विषयाचे नाव व भरावयाची पदे	प्राधान्य क्रमांक	गुणानुक्रमांनुसार निवड झालेल्या उमेदवारांची नावे
१.	मराठी - ०१ पद (Marathi – 01 Post)	१	वडीतके सुनिता सकाहरी, साईनगर, राहाता, जि.अ.नगर
		२	चौधरी गणेश निवृत्ती, मु.पो.घोडेगांव, ता.नेवासा, जि.अ.नगर
		३	अत्रे सुनिता गेनुजी, मु.पो.राहाता, जि.अ.नगर
२.	इंग्रजी – ०१ पद (English – 01 Post)	१	जगताप कमलेश रावसाहेब, मु.निमगांव, पो.शिर्डी, ता.राहाता
		२	रोहोम विठ्ठल नारायण, मु.बोलकी, पो.करंजी बु. ता.कोपरगांव
		३	ताकटे शिवनाथ अशोक, मु.पो.आश्वी खुर्द , ता. संगमनेर, जि.अ.नगर
३.	हिंदी - ०१ पद (Hindi – 01 Post)	१	हरदास सोनाली रामदास, मु.पो.अस्तगांव, ता.राहाता, जि.अ.नगर
		२	भुजाडे बाबासाहेब सखाराम, मु.कनकसागज, पो.चिचंडगांव, ता.वैजापूर, जि.अ.नगर
		३	घोडके ललिता भाऊसाहेब, मु.पो.ढोकरी, ता.अकाले, जि.अ.नगर
४.	अर्थशास्त्र - ०१ पद (Economics – 01 Post)	१	खांडरे स्वप्नाली रमेश, मु.पो. साकुरी, ता. राहाता, जि.अ.नगर
		२	वामन नितीन गोरक्षनाथ, मु.पो.तळेगाव दिघे, ता.संगमनेर, जि.अ.नगर
		३	कोळपे हरीभाऊ भाऊराव, मु.पो.धामोरी, ता.कोपरगांव, जि.अ.नगर
५.	इतिहास - ०१ पद (History – 01 Post)	१	धरम शितल अरविंद, कोपरगांव, जि.अ.नगर
		२	काळे राजेंद्र रामभाऊ, मु.पो.वरूर खुर्द, ता.शेवगांव, जि.अ.नगर
		३	चौधरी ज्ञानेश्वर उत्तम, मु.पो.को-हाळे, ता.राहाता, जि.अ.नगर
६.	भुगोल - ०१ पद (Geography–01 Post)	१	कचरे अमोल झुंबर, सावेडी, अहमदनगर
		२	खेमनर म्हतू तात्याबा, मु.पो.साकुर, ता.संगमनेर, जि.अ.नगर
		३	सोनवणे सचिन सुभाष, मु.पिंपळस ता.राहाता, जि.अ.नगर
७.	राज्यशास्त्र -०१ पद (Politics – 01 Post)	१	ढोकणे शिवाजी गोरक्षनाथ, मु.पो.श्रीरामपूर, जि.अ.नगर.
		२	मढवई दिपक सुभाष, मु.पो.चिंचोडीखु., ता.येवला, जि.नाशिक
		३	सोनवणे संतोष मारूती, मु.काकडी, पो.केलवड, ता.कोपरगांव, जि.अ.नगर
८.	कॉमर्स - ०२ पदे (Commerce – 02 Post)	१	कोपटे योगिता अरूण, कोपरगांव, जि.अ.नगर
		२	औताडे संतोष भिमराज, मु.पो.जळगांव, ता.राहाता
		३	सुपेकर मनोज राजाराम, मु.पो.सावळीविहीर, ता.राहाता
		४	जाधव पुजा बाळासाहेब, मु.पो.वाकडी, ता.राहाता
९.	वनस्पतीशास्त्र – ०२ पदे (Botany – 02 Post)	१	पटारे दिपक बाबासाहेब, मु.पो.भोकर, ता.श्रीरामपूर, जि.अ.नगर
		२	गुंजाळ नानासाहेब त्रिबंक, मु.पो.निमगांव टेंभी, ता.संगमनेर, जि.अ.नगर
		३	जोंधळे वृषाली अशोकराव, मु.पो.शिरसगांव, ता.श्रीरामपूर, जि.अ.नगर
		४	जाधव प्रेरणा धनंजय, मु.पो.श्रीरामपूर, जि.अ.नगर
१०.	रसायनशास्त्र – ०३ पदे (Chemistry – 03 Post)	१	पावसे नितीन रावसाहेब, मु.पो.हिंगणगांव पावसा, ता.संगमनेर, जि.अ.नगर
		२	भालेराव धनंजय नंदकुमार, लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अ.नगर
		३	पानसंबाळ श्रेयस संभाजीराव, मु.पो.राहुरी, जि.अ.नगर
		४	दिवटे चंचल कृष्णा, कोपरगांव, जि.अ.नगर

		५	मोरे नामदेव रामनाथ, उंबरे, ता.राहुरी, जि.अ.नगर
		६	शेलार प्रदीप सोमनाथ, रूई, ता.राहाता, जि.अ.नगर
११.	गणित – ०२ पदे (Mathematics- 02 Post)	१	बावके विकास भानुदास, साकुरी, ता.राहाता, जि.अ.नगर
		२	मगर गणेश भानुदास, मु.कौठा, पो.चांदा, ता.नैवासा, जि.अ.नगर
		३	हासे प्रशांत ज्ञानेश्वर, मु.महालदेवी, पो.रुंम्भोडी, ता.अकोले, जि.अ.नगर
		४	भवर गिताली भाऊसाहेब, लोणी बु.ता.राहाता, जि.अ.नगर
१२.	प्राणीशास्त्र -०२ पदे (Zoology – 02 Post)	१	भांड विकास सुर्यभान, मु.पो.वेल्हाळे, ता.संगमनेर, जि.अ.नगर
		२	शेख मोबीन मोहम्मदसलीम, श्रीरामनगर, शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर
		३	कुडनर संदीप शिवाजी, मु.शिंदोडी पो.मांडवे बु. ता.संगमनेर, जि.अ.नगर
१३.	पदार्थविज्ञान - ०२ पदे (Physics – 02 Post)	१	भांड गणेश रामचंद्र, मु.पो.शिलेगांव, ता.राहुरी, जि.अ.नगर
		२	ठोसर सागर संभाजी, नांदुर्खी, ता.राहाता, जि.अ.नगर
		३	वाबळे रोहीनी कचरू, रुई, ता.राहाता, जि.अ.नगर
		४	कवडे सुनिल बाळासाहेब, मु.पो.घोसपुरी, अहमदनगर
१४.	इलेक्ट्रॉनिक्स - ०१ पद (Electronics – 01 Post)	१	पठारे सुनिल रामनाथ, मु.पो.चिंचोली, ता.राहुरी, जि.अ.नगर
१५.	संगणकशास्त्र – ०१ पद (Comp. Science- 02 Post)	१	सदाफळ नानासाहेब भानुदास, राहाता, जि.अ.नगर
		२	कुंजीर गणेश मच्छिंद, बाभुळगांव गंगा, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद
		३	माचे सुहास राजाराम, गेवराई, जि.बीड
१६.	ग्रंथपाल - ०१ पद (Librarian - 01 Post)	१	सांगळे संदिप नानासाहेब, जोगश्वरी आखाडा, राहुरी, जि.अ.नगर
		२	शिंदे सचिन कमलाकर, तीन लकडी, इगतपुरी, जि.नाशिक
		३	तुवर सचिन शिवाजी, खेडले परमानंद, ता.नेवासा, जि.अहमदनगर
१७.	शारिरीक शिक्षणसंचालक – ०१ पद (Physical Director - 01 Post)	१	निंबाळकर महेश शरदराव, मु.गोखलेवाडी, पो.सुभाषवाडी, ता.श्रीरामपूर, जि.अ.नगर
		२	साळवे विवेक जयंत, तारकपूर, अहमदनगर
		३	आव्हाड योगेश कैलास, मोहीनीराज नगर, कोपरगांव

उपरोक्त **परिशिष्ट अ** मध्ये नमुद केलेल्या **यादीतील गुणानुक्रमांकांनुसार** पात्र उमेदवारांना,श्री साईबाबा महाविद्यालयाकडील **सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक** या पदावर प्राधान्य / निवड क्रमाने खालील अटी-शर्तीस अधिन राहून नेमणूक / नियुक्ती देणेत यावी –

०१. सदरची नियुक्ती पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची म्हणजेच चालू शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता (सेवेत हजर दिनांक ते ३१ मे, २०२१ पर्यन्त) राहील, मुदतीनंतर त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

०२. सदरची नियुक्ती तात्पुरत्या(Ad-hoc) स्वरुपातएकत्रित मानधन तत्वावर करणेत यावी.

०३. या नियुक्तीचे कालावधीत संबंधित सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांना मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णयानुसार एकत्रित मासिक मानधन आदा करणेत यावे. देय रक्कमेतून प्रचलित पध्दतीने नियमानुसार शासकीय करांची कपात करणेत यावी.

०४. नियुक्त करणेत येणारे सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांचा तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात एकत्रित मानधन तत्वावरील कार्यभार श्रीसाईबाबा महाविद्यालय यांचेकडून निश्चित करणेत येऊन,त्यांचे दैनंदिन शैक्षणिक व इतर कामकाजाचे वेळापत्रक तयार करणेत येईल.

०५. संबंधित सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांची मानधन बिलेश्री साईबाबा महाविद्यालयामार्फत तयार करुन, विहित पध्दतीने लेखाशाखेमार्फत आदा करणेत येईल तसेच मानधनाची देय्य रक्कम संबंधितांचे बॅंक खात्यात जमा करणेत येईल.

०६. निवड झालेल्या पात्र उमेदवाराना सेवेत रुजू होणेसाठी दि.१२ सप्टेंबर, २०२० ही अंतिम तारिख देण्यात यावी. सदर तारखेपर्यंत निवड झालेल्या पात्र उमेदवारांनी रुजू होणे अपेक्षित आहे.

०७. उपरोक्त यादीतील निवड करणेतआलेले पात्र उमेदवार अंतिम तारखेपर्यंत हजर झाले नाहीतर, त्यांचा नेमणूक आदेश आपोआप संपुष्टात येईल. त्यानंतर गुणानुक्रमांनुसार निवड झालेल्या पात्र उमेदवारांना उचीत प्रशासकीय मान्यतेने नेमणूक / नियुक्ती आदेश देणेत येईल. तसेच अपवादात्मक स्थितीत प्रथम पात्र उमेदवार हजर झाले नाहीतर गुणतालिकेतील गुणानूक्रमांनुसार निवड झालेल्या पात्र उमेदवारांना उचित प्रशासकीय मान्यतेने नेमणूक / नियुक्ती आदेश देण्यात यावेत.

०८. नियुक्त होणारे सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांनी महाविद्यालयाचे कार्यस्थळावर / महाविद्यालयात पुर्णवेळ उपस्थित राहणेबाबतची अट नियुक्ती पत्रात नमुद करणेत यावी.

०९. नियुक्ती करणेत आलेल्या / हजर झालेल्या उमेदवारांना सेवा सोडून जावयाची असल्यास त्यांना एक महिना पूर्वनोटीस द्यावी लागेल किंवा एक महिन्याचे वेतन नोटीस पे म्हणून संस्थानकडे जमा करण्याची अट नियुक्ती पत्रात नमुद करण्यात यावी.

१०. उपरोक्त निवड झालेल्या उमेदवारांना त्वरीत नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करण्यात यावी.
उपरोक्त अहवाल चक्रीय पद्धतीने मा.तदर्थ समितीचे समक्ष सादर करुन त्यास मान्यता घेऊन, यथोचित कार्यवाही करणेत यावी, असे प्रस्तावित करणेत येत आहे.

निर्णय क्र.४५५/१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालयाकरीता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील (Ad-hoc) प्राध्यापक भरतीबाबतचे अहवालास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

---

२. **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी भक्तमंडळाच्या सदस्यांना श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका पाठविण्याचे ठरलेस निमंत्रणपत्रिका व पाकीटे छपाईकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

४) अधिनियम कलम १९ (१) समारंभ,उत्सव, पूजा इत्यादींची शिफारस करण्यासाठी आश्रयदाते, आजीव सदस्य, सर्वसामान्य सदस्य, सन्मान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल, सदस्यत्वाच्या प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात, धर्म अथवा लिंग कोणतेही असले तरी, भक्तमंडळाचे सदस्यत्व देण्यात येईल. परंतु, अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्ष पूर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.

(३) भक्तमंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्ये विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील.समिती, भक्तमंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने पूर्ण करावयाच्या इतर अटी व शर्ती देखील विनियमांव्दारे निर्धारित करुन देईल.

उपरोक्त अधिनियमास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनाने तयार केलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्तमंडळ विनियम सन २०१३ मध्ये शासनाने मान्य केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

१) भक्तमंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे म्हणजेच रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर कोणत्याही पध्दतीने पाठविण्यात येईल.

२) वर उल्लेख केलेल्या तीन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने **'उदीप्रसाद'** प्राप्त होण्यास पात्र असेल.

३) हे विनियम लागू होण्यापूर्वीचे आश्रयदाते आणि आजीव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालु रहातील

मा. तदर्थ समितीचे दि.०६.०२.२०२० चे सभेतील निर्णय क्र.७१

वरील नियमांचे अवलोकन करण्यात येऊन, तसेच भक्तमंडळाच्या सभासदत्वापोटी(कायम निधी-Permanent Fund) दि.३१.०३.२०१९ अखेर रक्कम रुपये २८,०३,१८,२७३/- एवढी व्याजासह जमा आहे. साईभक्त सभासदांना उत्सवाच्या ज्या निमंत्रण पत्रिका पाठवल्या जातात त्यांचा छपाईपासून त्या पोस्टात पडेपर्यंतचा सर्व खर्च या व्याजातूनच वळता होत असल्याने त्यासाठी संस्थानच्या तिजोरीतून कुठलीही वेगळी किंवा जास्तीची रक्कम खर्च होत नाही. तसेच या निमंत्रण पत्रिकेच्या पाकीटातूनच 'उदीप्रसाद' पाठविला जातो कारण तशी तरतुद आहे व 'उदीप्रसादाशी' भक्तांच्या धार्मिक भावना जोडलेल्या आहेत. त्यामुळे पाकीट व्यवस्थित असणे आवश्यक आहे, असे समितीचे मत झाले. याकरीता संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२० मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्रमांक १ प्रमाणे छपाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.११,५५,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे असे ठरले.

मा. तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० चे सभेतील निर्णय क्र.२६९

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० चे निमंत्रण भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना, मान्यवरांना ई-मेल/SMS व्दारे देण्यात यावे व नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात यावी. तसेच उदी प्रसाद पोस्टाव्दारे पाठविण्यात यावा,असे ठरले. यासाठी किती खर्च अपेक्षीत आहे, याचा अभ्यास करुन चक्रिय पद्ध्तीने मान्यता घ्यावी, असे ठरले.

सध्या संपूर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने शनिवार, दि.०४.०७.२०२० ते सोमवार, दि.०६.०७.२०२० याकालावधीत साजरा करावयाच्या श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० बाबत अभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.

मा.तदर्थ समितीचे दि.१३.०७.२०२० चे सभेतील निर्णय क्र.४०२ –सदरचा विषय स्थिगत ठेवण्यात आला.

प्रस्तावना:– मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१ अन्वये सन २०२० मध्ये संस्थानमार्फत साज-या करण्यात येणा-या प्रत्येक उत्सवाच्या १,८०,००० निमंत्रणपत्रिका व पाकिटे छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई- निवीदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ११,५५,६००/- (रुपये अकरा लाख पंच्चावन्न हजार सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली तसेच याकामी मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे असे ठरले होते.

त्यास अनुसरुन संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२० मधील तीन उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका छपाई करणेबाबतचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आला असता उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.११,५५,६००/- मात्रचे खर्चास मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ०९/०३/२०२० रोजी मान्यता दिली आहे

मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेनूसार श्री रामनवमी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी ई-निविदा मागविणेकामी जाहिरात देणे, ई-निविदा मागविणे, ई-निविदा उघडणे व याबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस, इतिवृत्त प्राप्त होणे, छपाईधारकास छपाई कामाचा कार्यादेश देणे, पत्रिकेचे नमुने तयार करणे, मान्य होणे, प्रुफ तपासणे अशा कामांसाठी अंदाजे २५ ते ३० दिवसांचा कालावधी लागणार असल्याने, उत्सवापूर्वी भक्तमंडळाच्या सभासदांना निमंत्रण पत्रिका वेळेत पाठविता येणे शक्य नसल्याने तातडीची बाब म्हणून शासन खरेदी नियमावलीतील प्रकरण क्र.४.५ मधील (पान नं.६८) तातडीची खरेदी आदेश

प्रक्रियातील तरतुदीचा आधार घेण्यात येऊन सोहेल एंटरप्रायेजस, मुंबई यांनी देवू केलेल्या निम्नतम दरात (दर रु.२.११६८ एकूण रक्कम ३,८१,०२४/-) निमंत्रणपत्रिका छापून घेण्यात आल्या.

त्यानंतर श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका,पाकीटे छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन दि.३०.०४.२०२० ते दि. ०८.०५.२०२० अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या.याकामी एकूण ७ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदरच्या ई-निविदेतील तांत्रिक (Technical Bid) बीड दि.२०.०५.२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात येऊन, निविदेतील कागदपत्रांची तपासणी केली असता,खालील नमुद केलेप्रमाणे सर्व निविदाधारक पात्र ठरले आहेत.

अ.नं.	**निविदाधारकांचे नाव**	**पात्र/ अपात्र**
१	अभियांकित प्रिंटर्स, नाशिक	पात्र
२	गणेश आर्ट प्रिन्टर्स,अहमदनगर	पात्र
३	मधुरा प्रिंट सोलूशन, नाशिक	पात्र
४	निट प्रिंटर्स, अहमदनगर	पात्र
५	प्रदीप पॅकेजींग, दौंड पुणे	पात्र
६	प्रवरा ऑफसेट, लोणी	पात्र
७	श्री गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	पात्र

त्यानंतर दि. १५.०६.२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये पात्र असलेल्या ७ निविदाकारांचे व्यावसायिक (Commercial) बीड उघडण्यात आले, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

अ.नं	**निविदा धारकाचे नांव**	**सादर केलेलेदर प्रती नग रु.**	**जीएसटी**	**एकूण दर**
१	अभियांकित प्रिंटर्स, नाशिक	२.०७	०.२५	२.३२
२	गणेश आर्ट प्रिन्टर्स,अहमदनगर	३.१५	०.३८	३.५३
३	मधुरा प्रिंट सोलूशन, नाशिक	१.८५	०.३३	२.१८
४	निट प्रिंटर्स, अहमदनगर	२.६८	०.३२	३.००
५	प्रदीप पॅकेजींग, दौंड पुणे	१.९०	०.२३	२.१३
६	**प्रवरा ऑफसेट, लोणी**	१.८४	०.२२	२.०६
७	श्री गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	२.०७	०.३७	२.४४

विभागाचा अभिप्राय:- मा. तदर्थ समितीचे दि.११/०५/२०२० चे सभेतील निर्णय क्र.२६९ ला अनुसरुन श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० चे निमंत्रण भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना, मान्यवरांना फक्त ई-मेल/SMS व्दारे देण्यात आले व नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेसनोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात आली व फक्त उदी प्रसाद पोस्टाव्दारे पाठविण्यात आला.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका व पाकीटे छपाईकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबतचा विषय मा. तदर्थ समितीचे दि.१३.०७.२०२० चे सभेत सादर करण्यात आला असता त्यावर सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला असा निर्णय झाला आहे.

त्यानंतर श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका व पाकीटे छपाईकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत परत मा. तदर्थ समितीचे दि.२८.०८.२०२०चे सभेत तातडीची बाब म्हणून आयत्या वेळेचा विषय म्हणून सादर करण्यात आला होता.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव शनिवार, दि.२४ /१०/२०२० ते सोमवार, दि.२६ /१०/२०२० (अश्विन शु ८/९|| शके १९४२ ते अश्विन शु १०|| शके १९४२) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छपाई करण्याचे निश्चित झाल्यास प्रेसधारकास कार्यादेश द्यावा लागेल कार्यादेश दिल्यानंतर साधारणतः १५ दिवसात निमंत्रणपत्रिका प्राप्त होतील त्यानंतर भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना पत्रिका व उदीप्रसाद पाठविण्यास साधारणतः १० दिवसांचा कालावधी लागेल. उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करुन भक्तमंडळाचे

सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना पत्रिका व उदीप्रसाद ८ ते १० दिवस अगोदर मिळेल अशा पध्दतीने पाठविण्याची कार्यवाही केली जाते.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० च्या निमंत्रणपत्रिका भक्तमंडळाचे सभासदांना पाठविण्याचा निर्णय झाल्यास आता फक्त श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाच्या पत्रिका छापून घ्याव्या लागतील **ई-निविदेतील मागणीप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छापून घेण्यात आलेल्या नाहीत.** प्रेसधारकाने(न्युनतम प्रेसधारक प्रवरा ऑफसेट, लोणी) दोन्ही उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छपाई करणेकामी प्रती नग रु.२.०६ पैसे असा दर देऊ केलेला आहे. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता निमंत्रणपत्रिका पाठविण्याचे ठरल्यास उपरोक्त नमुद केलेल्या तक्त्यातील अ.नं.६ चे न्युनतम प्रेसधारक प्रवरा ऑफसेट, लोणी यांचेकडून प्रती नग रु.२.०६ पैसे या दरात छपाई करुन घेता येतील असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- तरी विभागाचे अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे निमंत्रणपत्रिका पाठविण्याचे ठरल्यास श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० च्या निमंत्रणपत्रिका व पाकीटे न्युनतम प्रेसधारक प्रवरा ऑफसेट, लोणी यांचेकडून प्रती नग रु.२.०६ पैसे या दरात छपाई करणेस चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी भक्तमंडळाच्या सदस्यांना श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका पाठविण्याचे ठरलेस निमंत्रणपत्रिका व पाकीटे छपाईकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेसाठी चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेला प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-शताब्दी कक्ष)

---

३. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२० साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-** अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८.०८.२०२० रोजीचे सभेतील निर्णय – सध्या संपूर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने श्री पुण्यतिथी उत्सव साजरा करणे व त्याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकाबाबत सर्वंकष अभ्यास करुन प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.

प्रस्तावना:- उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत. यंदाचा श्री पुण्यतिथी उत्सव शनिवार, दि.२४ /१०/२०२० ते सोमवार, दि.२६ /१०/२०२० (अश्विन शु ८/९|| शके १९४२ ते अश्विन शु १०|| शके १९४२) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे. सदरची अधिसूचना दि.३०.०९.२०२० पर्यंत लागु आहे. ती पुढे कधीपर्यंत वाढिवली जाईल, हे आज सांगता येणार नाही. तरी साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० साजरा करता येईल.

विभागाचा अभिप्राय– सन-२०२० मध्ये साजरा करावयाचे श्री पुण्यतिथी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

अ.नं.	तपशिल	उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे
०१	उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद	अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंणपत्रिका व उदीप्रसाद पाठवावा लागतो. मा. उच्च न्यायालय मुंबई , खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०९/०३/२०२० रोजी सन २०२० मधील तीनही उत्सवांचे निमंत्रण सामान्य,आजीव,आश्रयदाते सभासद यांना देणेकामी निमंत्रण पत्रिका छपाई व त्याकामी येणा-या रक्कम रुपये ११,५५,६००/- च्या खर्चास (प्रत्येक उत्सवास रुपये ३,८५,२००/-) मान्यता दिली आहे. तथापि कोरोनाच्या पार्श्वभुमीवर भक्तमंडळांचे सदस्यांना श्री रामनवमी उत्सवाच्या फक्त ६९,००० निमंत्रणपत्रिका पाठविण्यात आल्या होत्या तर मा. तदर्थ समितीचे निर्देशाप्रमाणे श्री. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका न छापता फक्त उदीप्रसाद पाठविण्यात आला आहे . श्रींचे दर्शन सुरु झाले तरी सुरुवातीस मोजक्याच साईभक्तांना दर्शनासाठी परवानगी देण्यात येणार आहे. त्यामुळे भक्तमंडळाच्या १,८०,००० सभासदांना निमंत्रण पत्रिका पाठविणे उचित ठरणार नाही. त्यामुळे श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका न छापता भक्तमंडळांचे सदस्यांना श्री गुरुपौर्णिमा उत्सवाप्रमाणे फक्त उदीप्रसाद पाठविणे संयुक्तिक ठरेल फक्त उदीप्रसाद पाठविणेकामी पाकीटे तयार करुन घेणेकामी साधारणतः रक्कम रुपये १,५०,०००/- खर्च अपेक्षित आहे. निमंत्रणपत्रिका व पाकीटे छपाईकामी यापूर्वी मान्यता मिळालेली असल्याने त्यामुळे आता या खर्चासाठी नव्याने मान्यता घेण्याची आवश्यता नाही. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात येईल.
	सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी	श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्री साईंचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे. श्री साईसच्चरित साईबाबा महासंत | धीर उदार आणि दान्त | यात्रेकरुंसी कृपावंत | पैसे अत्यंत वांटिती||४|| दिडक्या चवल्या हाताचा कीस | अधेल्या-पावल्यांचा पाऊस | रुपये दहा कोणास वीस | कोणास पन्नास ते देत ||५|| हें काय सणासुदा दिसी | कार्यविशेषीं कां पर्वकाळासी | प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं | संतोषेंसीं अर्पीत ||६|| पहूड येती भवय्ये नाचती | गवय्ये गाती भाट वानिती | तमासगीर मुजरे देती | भजनीं रंगती हरिभक्त ||७|| ऐसे महाराज उदारवृत्ती | दानधर्मी सढळ स्थिती | ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति | इच्छा धरिती दर्शनाची ||८|| कधीं आलिया बाबांचे चित्तीं | पांथस्थांतेंही पैसे वांटिती | दीनदुबळयांचा परामर्ष घेती | कृपामुर्ति साईनाथ ||९||
		श्री साईंचे सत्य चरित्र साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी किंमतीची नाणी.४ पैसे = १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत.कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या दिवशी काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानाच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये (तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळयांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची

		सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत. थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा–चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वतः सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे. साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास ह्या उत्सवासाठी, मा. तदर्थ समितीव्दारा श्री रामनवमी उत्सवासाठी निश्चित करण्यात आलेल्या परंतु प्रत्यक्षात त्यांचे कार्यक्रम न झालेल्या कलाकारांना संधी देता येईल व पूर्वी ठरल्याप्रमाणे मानधनही देता येईल. सदरहू कलाकार या उत्सवासाठी उपलब्ध न झाल्यास श्री रामनवमी उत्सवापासून आजतागायत संस्थानकडे सादर केलेल्या विनामुल्य सेवा देणा-या कलाकारांना संधी देण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही करता येईल. कलाकार कार्यक्रमासाठी त्यावेळेच्या अधिसुचनेस अधिन राहून कार्यक्रमासाठी मोजक्याच प्रेक्षकांना शताब्दी मंडपात प्रवेश देण्याची कार्यवाही संरक्षण विभागामार्फत करण्यात येईल. दर्शन सुरु न झाल्यास तीनही दिवसांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार नाहीत.
०२	**सांस्कृतिक कार्यक्रम**	**संस्थानमार्फत**
	प्रारंभ दिवस, शनिवार, दि.२४/१०/२०२० आश्विन शु ८/९ ‖ शके १९४२	मागील श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवातील (२०१९) कलाकार कार्यक्रम साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुठें) याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत श्री राम उध्दवराव कोठेकर, हिवरा आश्रम (विवेकानंद आश्रम) बुलढाणा यांचा भक्तीसंगीताचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल त्यांना पूर्वी ठरलेप्रमाणे मानधन रु.१५,०००/- अदा करता येईल.
	मुख्य दिवस रविवार, दि.२५/१०/२०२० आश्विनशु ९/१०‖ शके १९४२	१) दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत एन. पांडूरंग नाथम, अमृता संगीत पाठशाळा, आंध्रप्रदेश यांचा साई भजनाचा विनामुल्य कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. २) दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून कलाकार हजेरी कार्यक्रमात रात्रौ. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यत (दि.२६/१०/२०२०) इच्छुक कलाकारांच्या साईभजनांचा कार्यक्रम श्री .
		साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. साईभक्तासाठी दर्शन सुरु झाल्यास मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल.
	सांगता दिवस सोमवार, दि.२६/१०/२०२० आश्विन शु.१० शके १९४२	दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यत निनाद ग्रुप, पुणे (सौ. पद्मावती पारेकर व सौ. विदुला फणसळकर) यांचा भक्ती संगीताचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल व त्यांना पूर्वी ठरल्याप्रमाणे मानधन रु.२५,०००/- अदा करता येईल.
०३		**कीर्तन कार्यक्रम**
	शनिवार, दि.२४/१०/२०२० (सायं. ४ ते ६) रविवार, दि.२५/१०/२०२० (सकाळी. १० ते १२) सोमवार, दि.२६/१०/२०२० (सकाळी १० ते	कीर्तन कार्यक्रम विजयादशमीचा दिवस हा श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीचा दिवस आहे स्वाभाविकच संस्थानच्या तीन उत्सवांमध्ये श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाचे महत्व अनन्यसाधारण आहे. या उत्सवाला १०० वर्षांची परंपरा आहे. या उत्सवाचे महत्व आणि गांभिर्य लक्षात घेता "कीर्तन" हाच ज्यांचा पेशा (profession) आहे, अशा कीर्तनकाराचे कीर्तन आयोजित करणे उचित ठरेल. गेल्या काही वर्षांपासून संस्थानमधील 'गवई' हे पद रिक्त आहे. त्यामुळे मंदिरात काम करणा-या कर्मचा-यांकडून (जुजबी ज्ञान असलेले) स्थानिक उत्सव प्रसंगी कीर्तन करण्यात येते. पुण्यतिथी उत्सव हा संस्थान व साईभक्त या दोघांसाठीही महत्व असलेला उत्सव असल्यामुळे त्याप्रसंगी निमंत्रित कीर्तनकार म्हणून, मा. तदर्थ समितीव्दारा श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी निश्चित करण्यात आलेल्या परंतु प्रत्यक्षात कीर्तन न झालेल्या श्री प्रभंजन भगत (श्री साईबाबांचे

	१२)	समकालीन भक्त बाळा काशिराम शिंपी यांचे वंशज) यांना संधी देता येईल. त्यांना पूर्वीचे निर्णयाप्रमाणे मानधन म्हणून रक्कम रु.१५००१/- देता येईल. निमंत्रीत कीर्तनकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल. श्रीरामनवमी व श्रीगुरुपौर्णिमा या दोन्ही उत्सवातही निमंत्रित कीर्तनकाराचे कीर्तन ठेवण्याची प्रथा आहे तथापि, त्या काळात लॉकडाऊनमुळे प्रवासी वाहतूक पूर्णपणे बंद असल्यामुळे कीर्तनकार निमंत्रित करता आले नाही. आता वाहतूक सुरु झाली आहे. त्यामुळे या पुण्यतिथी उत्सवासाठी कीर्तनकार निमंत्रित करता येतील व त्यांचे कीर्तन ठेवता येईल. उत्सव कालावधीत फुलांची सजावट तसेच विद्युत रोषणाई करणा-या साईभक्ताना मागील दोन उत्सवात (लॉकडाऊनच्या कालावधीत) मंदिरात आणि मंदिर परिसरात प्रवेश देण्यात आला आहे. त्याच धर्तीवर निमंत्रित कीर्तनकार व त्यांच्या साथीदारांस प्रवेश देऊन त्यांच कीर्तन आयोजित करता येईल असे वाटते. साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून ह्या उत्सवासाठी नेहमीच्या प्रथेप्रमाणे कीर्तनकार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेल्या जागेत स्टेज उभारुन करता येईल.
०४		**विविध मिरवणूका**
	शनिवार, दि.२४/१०/२०२० ते सोमवार, दि.२६/१०/२०२०	साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास अधिसुचनेस अधिन राहून पोथी-फोटो-वीणा, पालखी, रथ, भिक्षाझोळी,सिमोल्लंघन मिरवणूक प्रथेप्रमाणे करण्यात येतील.उत्सवाचे प्रथम व मुख्य दिवशी सकाळी ५.३० वा पोथी फोटो-वीणा मिरवणूक निघेल. सकाळी ९ वा.भिक्षाझोळी, सायं. ५ वा. सिमोल्लंघन तसेच उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.२४/१०/२०२० रोजी श्रींचे पालखीची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल व दुस-या (मुख्य) दिवशी दि.२५.१०.२०२० रोजी श्रींचे रथाची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल. पालखी, रथ, भिक्षाझोळी व सिमोल्लंघन मिरवणूकीबाबत परिस्थितीनुरुप स्थानिक शासकीय अधिका-यांची चर्चा करुन निर्णय घेता येईल.
		भिक्षाझोळी कार्यक्रम – दर्शन सुरु न झाल्यास उपरोक्त नमुद केलेल्या मिरवणूका काढण्यात येणार नाहीत. तथापि दरवर्षी श्रींच्या पुण्यतिथी उत्सवात भिक्षाझोळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते तथापि सध्याच्या कोरोना साथीमुळे उदभवलेली परिस्थिती व त्यादृष्टीने अंमलात आणलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना पहाता दरवर्षीप्रमाणे भिक्षाझोळी मिरवणूक आयोजित न करता, मंदीर अधिक्षक व मंदिरातील अन्य कर्मचा-यांनी शिर्डीतील काही घरांमधून प्रातिनिधीक स्वरुपात भिक्षा मागून आणण्याची कार्यवाही करता येईल व ज्या ग्रामस्थांना श्रींना भिक्षारुपी धान्य द्यायचे आहे त्यांनी संस्थानच्या भांडार विभागात आपले धान्य जमा करावे असे आयोजन तथा आवाहन करता येईल. सिमोल्लंघन कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून सध्या श्रींचे मंदीर तथा अन्य कार्यक्रम बंद ठेवण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर श्रींच्या पुण्यतिथी उत्सवामधील खंडोबा मंदीरातील सिमोल्लंघनाची प्रथा (पुजा) मंदीर अधिक्षक, पुजारी व अन्य तीन-चार कर्मचारी यांच्यासह दरवर्षीच्या शिरस्त्याप्रमाणे करता येईल जेणेकरुन गेल्या अनेक वर्षापासून अखंड चालत आलेली प्रथा खंडीत होणार नाही व नियमांचे पालनही केले जाईल. सिमोल्लंघन व भिक्षा झोळी हे दोन्ही कार्यक्रम प्रातिनिधीक स्वरुपात आयोजित केल्यास अनेक वर्षांची असलेली परंपरा अबाधित राहिल असे मत आहे.
०५	रविवार दि.२५/१०/२०२०	आराधना विधी श्रींचे समाधी मंदिर व अन्य सुविधा आतासारख्याच उत्सवकालावधीत बंद राहिल्या तर श्रीसाईप्रसादालयात दरसाल दिला जाणारा आराधना विधीचा प्रसाद देता येणार नाही. तथापि, आराधना विधी हे श्राध्द असते. परंतु संत सत्पुरुष यांच्या पुण्यतिथी दिनी केल्या जाणा-

		या विधीस श्राध्द असे न म्हणता आराधना विधी असे संबोधले जाते व अन्नदान आणि वस्त्रदान केल्याशिवाय हा विधी पूर्ण होत नाही. त्याला परिपूर्णता येत नाही. म्हणून आराधना विधीप्रसंगी ब्राह्मण (संस्थान पुजारी) व सुवासिनी यांना सामाजिक अंतर (Social Distansing) राखुन अन्नदान करणे आवश्यक आहे. जेणेकरुन गेल्या अनेक वर्षांची परंपरा अबाधित राहील. आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर करण्यात येईल. सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live telecast) संस्थांनचे फेसबुक लाईव्ह कव्हरेजपेजवर करण्यात येईल त्यामुळे संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल तसेच हे प्रक्षेपण समाधी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीवर करण्यात येईल. समाधी मंदिराचे वास्तुस (बुटी वाडयास) १०० वर्ष झाल्याने गावकरी व इतर साईभक्त यांची वर्दळ पहिल्या मजल्यावर बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत येईल. आराधना विधीकरीता यजमानाची (पतीपत्नी) प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉलमध्ये करणेत येईल, त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश दिला जाणार नाही. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते, तेच भोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाईप्रसादालयाच्या व्ही.आय.पी. च्या दोन हॉलमध्ये ठराविक वेळेत सामाजिक अंतर ठेवून देण्याची व्यवस्था करण्यात येईल. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थानतर्फे सामाजिक अंतर ठेवून देण्यात येईल.
०६	अखंड पारायण व्यवस्था	उत्सव काळात शनिवार, दि.२४/१०/२०२० रोजी पहाटे ५.३० वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. मा.तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास उर्वरित राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.२३/१०/२०२० रोजी नोंदविली जातील. त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. दि.२५/१०/२०२० रोजी पहाटे ५.०० वा पारायण समाप्ती होईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. साईभक्तांसाठी दर्शन सुरु न झाल्यास श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थानचे अधिकारी व कर्मचा-यांकडून श्री साईसच्चरिताचे पारायण केले जाईल. श्री पुण्यतिथी उत्सवात पोथी-वीणा प्रतीमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपुजा या कार्यक्रमांकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नावे निश्चित करणे आहे. याबाबतची टिपणी मा. तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.
०७	श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाले तरी उत्सव काळात शनिवार, दि.२४/१०/२०२० ते सोमवार, दि.२६/१०/२०२० अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा बंद ठेवता येईल (पुजेसाठी बसणा-या साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवणे शक्य होणार नाही)
०८	विद्युत रोषणाई	श्री पुण्यतिथी उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल.
०९	प्रसाद-भोजन, चहा, कॉफी, दुध, बिस्कीट , लाडु व्यवस्था	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन देण्याची कार्यवाही सामाजिक अंतर ठेवून केली जाईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था सामाजिक अंतर ठेवून केली जाईल. साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवून चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सामाजिक अंतर ठेवून सुरु करणेत येईल. याकामी सबंधित

		विभागाकडुन नियोजन करणेत येईल. सन २०२० चे श्री पुण्यतिथी उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. साईभक्तांसाठी दर्शन सुरु न झाल्यास वरील सर्व सुविधा बंद राहतील.
१०	संरक्षण विभाग	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात संरक्षण विभागामार्फत बंदोबस्त ठेवण्यात येईल. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल.
११	लेखाशाखा (देणगी काऊंटर)	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवून नेहमीचे प्रथेप्रमाणे देणगी काऊंटर्स सुरु ठेवण्यात येतील. उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यत करण्यात येईल. सध्या गेट नं. ४ चे बाहेर साईभक्तांसाठी देणगी काऊंटर चालू करण्यात आलेले आहे. दर्शन सुरु झाले नाही तरी सदरच्या देणगी काऊंटरचा उपयोग साईभक्तांना देणगी देण्यासाठी होऊ शकेल.
१२	बांधकाम	उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी मंडप/शामियाने इ.व्यवस्था केली जाईल.
१३	जादा कंत्राटी कर्मचारी	आवश्यकता भासल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल.
१४	प्रथमोपचार	साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास संस्थानमार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शन रांग व श्री साई प्रसादालय या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात येईल.
१५	पालखी व्यवस्था	श्री पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात, उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. तथापि या वर्षी कोरोनाचा पादुर्भाव असल्याने संरक्षण विभागामार्फत संबंधित पालखी मंडळांना पालखी न आणणेबाबत विनंती करण्यात येईल. तसेच संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फतही याकामी प्रेसनोट प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
१६	पाणी पुरवठा	पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल.
१७	फोटो व्हीडीओ शुटींगबाबत	उत्सवाचे कार्यक्रमाचे फोटो व व्हीडीओ शुटींगची क्लीप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्रेसला देण्यात येईल
१८	खर्चाचे अंदाजपत्रक	श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०१९साठी रु.७५,५८,८९८ /- मात्र इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ४९,७२,७७४/- मात्र इतका खर्च झालेला आहे. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेस अधिन राहून कार्यवाही करावी लागणार असून सुरवातीस मोजक्याच साईभक्तांना मंदिरात प्रवेश दिला जाणार असल्याने पूर्वी सादर केलेल्या अंदाजपत्रकाऐवजी आता नव्याने दोन सुधारित अंदाजपत्रक (१. दर्शन सुरू झाल्यास व २. दर्शन सुरू न झाल्यास) सादर करण्यात आली आहेत.

श्री पुण्यतिथी उत्सव -२०१९ करीता झालेला खर्च व अपेक्षित खर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

श्री पुण्यतिथी उत्सव -२०२० अंदाजपत्रक

अ. क्र	खर्च तपशिल	श्री पुण्यतिथी उत्सव -२०१९		श्री पुण्यतिथी उत्सव-२०२० अंदाजे खर्च	
		अंदाजे खर्च	प्रत्यक्ष खर्च	दर्शन सुरु झाल्यास	दर्शन सुरु न झाल्यास
१	मंडप, कमानी, स्टेज, व इतर	१४,८२,१७६	१२,७८,२१४.८८	६,७८,८६०	-
२	कलाकार बिदागी (वाजंत्री, किर्तनकार, निमंत्रीत कलाकार) व मंदिराकडील शिराप्रसाद , दहीहंडी, कलाकार निवास, इतर खर्च	१०,००,०००	४,९५,९५९.००	२,००,०००	६०,०००
३	भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च (श्रम परिहार मजुरीसह)	११,०७,८८०	९,७२,४४६.१०	६,००,०००	--
४	विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च)	१५,००,०००	७,७१,२११.२४	९,५०,०००	५०,०००
५	निमंत्रण पत्रिका, उदीप्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह)	१३,९५,०००	१३,११,५४३.००	९,६०,०००	९,६०,०००
६	जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन	७,०८,८४२	१,४३,४००.००	१,००,०००	-
७	पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था	३,५०,०००	-	-	
८	सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी	-	-	२५,०००	-
९	मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन	-	-	-	-
१०	इतर खर्च फर्निचर व भांडी खर्च	१५,०००	-	२,१००	-
	एकुण रुपये	**७५,५८,८९८**	**४९,७२,७७४.२२**	**३५,१५,९६०**	**१०,७०,०००**

विभागाचा अभिप्राय– संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्यापासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नियमित खर्चाचाच भाग आहे. सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन/तदर्थ समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर त्या त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने उत्सवाच्या नियमीत खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

श्री पुण्यतिथी उत्सव २०२० साजरा करणेसाठी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे साथरोग प्रतिबंधात्मक कायद्याच्या अधिसुचनेच्या अधिन राहून श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० चे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी दर्शन सुरु झाल्यास रक्कम रुपये ३५,१५,९६०/- (रुपये पस्तीस लाख,पंधरा हजार, नऊशे साठ) व दर्शन सुरु न झाल्यास रक्कम रुपये १०,७०,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख सत्तर हजार) मात्रचे खर्चास चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर .

निर्णय क्र.४५५/३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव - २०२० साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-शताब्दी कक्ष)

---

४. श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्सिंग पध्दतीने पुरविणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेकामी मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने कामावर घेवून प्रसादालयातील कामे करुन घेण्यात येत आहेत. त्यानूसार श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम व दररोज १०० वाढपी कामगार कामास लावणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानूसार, जा.एसएसएस/वशी/२३४१/२०१९ दि.१४/०९/२०१९ अन्वये, मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१५/०९/२०१९ ते १४/०९/२०२० या कालावधीकरीता **GST** वगळून दरमहा कामाची मजूरी रक्कम रु.३४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु.चौतीस लाख पन्नास हजार मात्र) याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहे.

श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम करुन घेणेकामी तसेच साईबाबा भक्तनिवास्थान (५०० रुम), साईआश्रम भाग-०१ व व्दारावती भक्तनिवासस्थान येथील स्वयंसेवी प्रसादभोजन व जनरल हॉलमधील प्रसादभोजन वितरीत करणेकामी कायम/कंत्राटी कर्मचारी अपुरे पडत असल्याने १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने कामास घेण्यात येवून प्रसादभोजन व्यवस्था करण्यात येते.

करीता श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल कामासाठी तसेच गर्दीचे प्रमाणात आवश्यकतेनूसार प्रसादभोजन वितरीत करणेकामी दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

मागणी :- प्रास्तविक नूसार,

अ) उपरोक्त हाऊसकिपींग कामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी अखेर संपुष्टात येत असल्याने, श्री साई प्रसादालयातील स्वच्छता व हाऊसकिपींग, पेस्टकंट्रोल कामाअभावी भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी इकडील विभागामार्फत मा.तदर्थ (**Ad-hoc**) समिती दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. परंतू संदर्भिय क्रं.२ चे निर्णयान्वये, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नाही. तसेच सदरचे ई-निविदा प्रक्रियेस मा.तदर्थ (**Ad-hoc**) समितीची मान्यता झाल्यांनतर सदरहु विषयाचा निर्णय प्राप्त होणे, वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे, प्री बीड मिटींग घेणे, शासन निर्णयानूसार प्राप्त झालेल्या निविदांची संख्या जर तीन पेक्षा कमी असेल तर निविदा प्राप्त होणेसाठी पहिल्यांदा मुदतवाढ देणे, त्यानंतरही निविदांची संख्या जर ०३ पेक्षा कमी असेल तरी देखील दुस-यांदा मुदतवाढ देणे, तदनंतर प्राप्त झालेल्या निविदांचे टेक्नीकल बीड व प्राईस बीड मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणे, लेखाशाखा विभागामार्फत तपासून घेणे, निम्नतम दरधारक ठेकेदारास कार्यादेश देणेकामी प्रस्तुत विषयाची टिपणी मा.व्यवस्थापन समिती सभेत सादर करणे. तदनंतर संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देणे. या कामासाठी बराच कालावधी निघून जातो. करीता सदरहु ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो यापुर्वीचे ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना तीन महिने (दि.१४/०९/२०२० पासून पुढे) अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या लावधीकरीता आहे त्याच दरात व अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ दयावी लागेल. त्याकामी प्रती महा अंदाजे रक्कम रु.२३,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तेवीस लाख मात्र) (कोरोना-१९ कालावधीतील

बीलानूसार) इतका खर्च अपेक्षीत आहे. त्यानूसार मुदतवाढ कालावधीसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचे प्रस्तावास मा.तदर्थ (**Ad-hoc**) समिती सभेपुढे निर्णय होणे गरजेचे आहे.

ब) श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम व दररोज १०० वाढपी कामगार कामास लावणेकामी मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१५/०९/२०१९ ते १४/०९/२०२० या कालावधीकरीता **GST** वगळून दरमहा कामाची मजूरी रक्कम रु.३४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु.चौतीस लाख पन्नास हजार मात्र) याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहे. याकामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी अखेर संपुष्टात येत आहे. करीता हाऊसकिपींग व प्रसादभोजन अभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता सन-२०२० चे वार्षिक मजुरीची रक्कम रु.४,१४,००,०००/- + **GST** इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे १०% वाढ गृहीत धरल्यास पुढील सन २०२०-२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.४,५५,४०,०००/-+**GST** (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी पंचावन्न लाख चाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. करीता सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी पुढील एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज आवश्यकतेप्रमाणे १०० वाढपी कामगार आऊटसोर्सींग पध्दतीने संस्थानला पुरविणेबाबत संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (**Ad-hoc**) समिती सभेपुढे निर्णय होणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- वरील प्रास्ताविकचा विचार करता, अ) सध्याचे हाऊसकिपींग कामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी अखेर संपुष्टात येत असल्याने, श्री साई प्रसादालयातील स्वच्छता व हाऊसकिपींग, पेस्टकंट्रोल कामाअभावी भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता पुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचेच ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना तीन महिने (दि.१४/०९/२०२० पासून पुढे) अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता आहे त्याच दरात व अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ दयावी लागेल. त्याकामी प्रती महा अंदाजे रक्कम रु.२३,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. तेवीस लाख मात्र) (कोरोना-१९ कालावधीतील बीलानूसार) इतका खर्च अपेक्षीत आहे. त्यानूसार मुदतवाढ कालावधीसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (**Ad-hoc**) समिती सभेपुढे निर्णय होणेस विनंती.

ब) सध्याचे हाऊसकिपींग कामाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी सन-२०२०-२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.४,५५,४०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी पंचावन्न लाख चाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. करीता सदरचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथे **CA** दाखल करणेस तसेच मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (**Ad-hoc**) समिती सभेपुढे निर्णय होणेस विनंती.

तरी वरील अ) व ब) बाबत निर्णय होणेकामीचा प्रस्ताव दि.०९/०६/२०२० रोजीचे बैठकीत मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करणेत आला होता. तथापी या बैठकीत सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला होता. तदनंतर दि. २८/०८/२०२० रोजी सदरहु प्रस्ताव आयत्या वेळच्या विषयामध्ये फेर सादर करुन ठेवण्यात आला, परंतु वेळेअभावी सदर विषयावर निर्णय झाला नाही. सदरहु विषयावर दोन वेळेस निर्णय न झाल्यामुळे व प्रस्तावित कामाच्या कार्यादेशाची मुदत दि.१४/०९/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने याबाबत कामाची अडचण होवू नये म्हणून तातडीने निर्णय होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदर प्रस्तावावर चक्रीय पध्ततीने निर्णय होणेस सविनय सादर.

निर्णय क्र.४५५/४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्सिंग पध्दतीने पुरविणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)

---

५. सन २०२०-२१ वर्षाकरीता किराणामाल खरेदीकामी केलेली निविदा प्रक्रिया रद्द करणे व नव्याने फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांकरीता किराणामाल व इतर अनुषंगीक साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेकामी भांडार विभागाकडुन प्रस्ताव दि.१७.०२.२०२० रोजी खरेदी विभागाकडे प्राप्त झालेला होता. सदर प्रस्तावास मा.तदर्थ समितीचे दि.१४.०१.२०२० चे सभेतील निर्णय क्रं.४१ नुसार ई-निविदा पध्दतीने खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.४२,१८,८२,४१७/- (अक्षरी रु.बेचाळीस कोटी आठरा लाख ब्याऐंशी हजार चारशे सतरा) मात्रचे खर्चास भांडार विभागाने मान्यता घेतलेली होती.

तसेच भांडार विभागाने सदर खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेसाठी विधी विभागाकडे प्रस्ताव दिला होता. विधी विभागामार्फत एकत्रित सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले होते त्यात किराणा माल, धान्य, कडधान्य व अनुषंगिक साहित्य खरेदीचा समावेश होता. एकत्रित सिव्हील ॲप्लीकेशनमधील किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदी खर्चासाठी मा.उच्च न्यायालयाने दि.१३.०२.२०२० रोजी मान्यता दिलेली होती. तथापि यामध्ये मे.न्यायालयाने गहू, तांदुळ, ज्वारी व साखर FCI कडून घेणेबाबत सूचित केले होते. त्याबाबत FCI कडे पत्रव्यवहार केलेनंतर फक्त गहू उपलब्ध होऊ शकतो मात्र तो FCI ने नेमलेले एका खाजगी संस्थेकडून ई-ऑक्शनव्दारे खरेदी करावा लागणार असल्याने याबाबत मा.तदर्थ समितीचे दि.२४.०२.२०२० चे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्रं.१६० अन्वये गहू,तांदुळ, साखर व ज्वारी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत निर्णय झालेला होता.

वरील मा.तदर्थ समितीचे निर्णयास व मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेस अनुसरून, संस्थानकडून सन २०२०-२१ करीता प्रसादालय,लाडु निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्याची ई-निविदा पध्दतीने वार्षिक खरेदी करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

१. किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुटस, वनस्पती तूप व इतर वस्तू , २. मसाले, ३ खादयतेल, ४.गहू, तांदुळ, हरबरा डाळ व साखर, ५.बिस्कीटे, ६.चहा पावडर व कॉफी, ७.पेपर पिशवी, ८.पेपर कप, ९.टोण्ड गाय दुध, १०.पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, ११.पत्रावळ.

वरील १ ते ३ व ५ ते ११ या १० ई-निविदांची अंतिम मुदत दि.१७.०३.२०२० अखेर होती. तर अ.नं.४ चे ई-निविदेची अंतिम मुदत दि.२३.०३.२०२० अखेर होती. त्यानंतर नमुने जमा करणेसाठी २ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. दि.१८.०३.२०२० पासून कोरोना प्रादुर्भावामुळे मंदिर व संस्थानच्या भक्तांसाठीच्या प्रसादालय, लाडू व बुंदी प्रसाद व कॅन्टीन या सेवा बंद आहेत. तसेच संपूर्ण राज्यात व देशभरात लॉकडाऊन झाले होते. त्यामुळे वरील निविदांचे काही राहिलेले नमुने प्राप्त होणेसाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती.

दरम्यान सन २०२०-२१ वर्षाकरीता किराणामाल खरेदीकामी नमुने निवडीबाबत दि.०२.०४.२०२० रोजी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर "१.यापुर्वी नमुने निवडीचे काम कोणासमोर केले गेले आहे याबाबत टिपणीत नमूद करावे. २.सदयस्थितीत लॉकडाऊन मुळे मालाचे नमुने प्राप्त नाही तरी लॉकडाऊन कालावधी संपल्यानंतर लगेचच कार्यवाही करावी." असे निर्देश होते. त्यामुळे सदर प्रस्ताव प्रलंबित होता.

वरील निविदांतील अ.नं. ११ पत्रावळसाठी कोरोना प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन असल्यामुळे ३ मुदतवाढी देऊनही फक्त एकच निविदा प्राप्ती झाली होती. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे यासाठी फेर ई-निविदा प्रक्रिया करावी लागेल.

वरील अ.नं. ७ पेपर कप व ८ पेपर पिशवीच्या कमर्शिअल निविदा उघडून निविदाधारकाशी चर्चा-वाटाघाटी करणेसाठी सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेत सादर करणेसाठी सभा कामकाज विभागाकडे दि.२१.०७.२०२० रोजी देण्यात आलेला आहे. तथापि त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही तोही तातडीने होणे गरजेचे आहे.

केंद्र सरकारने ८ जून पासून अनलॉक १ कालावधी सुरू केला होता, त्याअंतर्गत महाराष्ट्र शासनानेही ३० जून अखेरपर्यंत लॉकडाऊन कालावधी वाढविला होता व कंन्टेनमेन्ट झोन वगळता इतरत्र कामकाजास परवानगी दिली होती. त्यामुळे सन २०२०-२१ करीता संस्थानला खरेदी करावयाच्या किराणा मालाचे नमुने निवडीचे कामासाठी महात्मा फुले कृषी विदयापीठ, राहुरी येथील तज्ञांना बोलविणेबाबत दि.०९.०६.२०२० रोजी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर "सदर बाब समिती (Adhoc) समक्ष सादर करून सर्व समिती सदस्य किंवा समितीने नियुक्त केलेले सदस्य (CEO) सोडून यांच्या समक्ष उपरोक्त बाब करण्यास व उपरोक्त प्रस्ताव Adhoc

समितीसमोर सादर करावा" असे निर्देश दि.२४/६/२०२० रोजी प्राप्त झाले होते.

सदर निर्देशास अनुसरून "किराणा माल नमुने कोणासमोर निवडावयाचे" या प्रस्तावावर लवकर निर्णय होण्यासाठी, सदर प्रस्तावास चक्रिय पध्दतीने सादर करणेबाबत मंजुरी मिळणेकरीता दि.२५/६/२०२० रोजीच याबाबतची टिपणी सादर करण्यात आली होती. तथापि त्यावेळी लॉकडाऊन असल्यामुळे संस्थानच्या सर्व सेवा बंद आहेत. त्यामुळे सदर प्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करण्याऐवजी मा.तदर्थ समिती सभेतच सादर करण्याच्या समक्ष सूचना प्राप्त झाल्या होत्या. म्हणून "किराणा माल नमुने निवड कोणासमोर करावयाची" याबाबतचा नेहमीप्रमाणे सभेसमोर सादर करावयाचा प्रस्ताव दि.२८.०६.२०२० रोजी सभा कामकाज विभागाकडे सादर केला होता. त्यावर सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.१३.०७.२०२० चे सभेत सादर होऊन "सदरचे किराणा माल नमूने निवडीचे कामकाज मा.श्री.दिलीप स्वामी साहेब, सदस्य मा.तदर्थ समिती यांचे समक्ष" करण्याचा निर्णय झाला होता. त्यास अनुसरून दि.१८.०७.२०२० रोजी किराणा माल नमुने निवडीचे कामकाज राहुरी कृषी विदयापीठातील तज्ञ व संस्थान आचारी यांचे मार्फत पूर्ण करण्यात येऊन दि.२०.०७.२०२० रोजी सदर ई-निविदांचे कमर्शिअल बीड उघडणेचा प्रस्ताव सभा कामकाज विभागाकडे सादर करण्यात आला होता.

सभा कामकाज विभागाकडून वरील अ.नं. १ ते ६ व अ.नं. ९ व १० साहित्याचे कमर्शिअल बीड उघडणेसाठी खरेदी समितीची सभा दि.०७.०९.२०२० रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उपस्थित राहणेसाठी किराणामाल व अनुषंगिक साहित्याचे नमुने निवडलेल्या ३४ निविदाधारकांना मोबाईल फोनवरून याकामी उपस्थित राहणेबाबत निरोप देण्यात आला होता. त्यातील खालील ४ निविदाधारकांनी संस्थानकडून कमर्शियल बीड उघडण्याचा निरोप मोबाईल/दूरध्वनीवरुन दिलेनंतर संस्थानला मेल केले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे:-

अ.नं.	निविदाधारकाचे नाव	निविदाधारकाचे म्हणणे
I	मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक	Supply of goods in this condition are very hard to fulfill and so we request to cancel our tender and refund our EMD & Tender Fee.
II	मे.हिरालाल चुनीलाल भराडिया, नांदेड	निविदा भरुन ७ महिने उलटले आहे.आजपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही. महामारीमुळे आवक/ जावक ठप्प झाली आहे. यामुळे पुढील निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास असमर्थ आहे. तरी बयाणा रक्कम व निविदा फी परत करावी.
III	मे.संतोष ट्रेडिंग कंपनी, जळगाव	We request you to cancel the tender and Return our EMD and Tender fee.
IV	मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक	Supply chain shall be difficult for supplying of the material so we request you to cancel the tender & return our EMD amount and Tender Fee.

सदर प्राप्त मेलमध्ये निविदाधारकांनी कळविलेले म्हणणे बाबत खरेदी समितीचे सभेत सर्व प्रथम निविदांच्या Validity बाबत चर्चा झाली. यामध्ये गहू, तांदुळ, हरबराडाळ व साखर या निविदेची Validity दि.२६.०७.२०२० रोजी व त्या व्यतिरिक्त उर्वरीत ७ निविदांची Validity दि.२०.०७.२०२० रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे खरेदी समितीचे दि.०७.०९.२०२० चे सभेत निविदांची Validity संपल्यामुळे उर्वरीत वार्षिक निविदा भरलेल्या निविदाधारकांना ते संस्थानला निविदेत भरलेल्या दराने माल/साहित्य पुरविण्यास तयार आहेत किंवा कसे? याबाबत विचारणा करून त्यांचे तसे मेल घेण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे सर्व ३४ निविदाधारकांना दूरध्वनीवरुन कळविण्यात आले होते. त्यानुसार सर्व निविदाधारकांचे मेल दि.१२.०९.२०२० अखेर प्राप्त झाले आहेत. निविदाधारकांनी त्यांचे मेलव्दारे कळविलेले म्हणणेचा गोषवारा तयार केला आहे.

निविदाधारकांच्या मेलमधील मागण्यांचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

३४ निविदाधारकांपैकी २० निविदाधारकांनी ई-निविदेत भरलेल्या दरांमध्ये माल पुरविणेस तयार असल्याचे कळविले आहे. यामध्ये दूधासाठीचे सर्व ४ निविदाधारक व पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसाठीचे सर्व ६ निविदाधारक यांचा समावेश आहे तर बिस्कीटांसाठी एकुण ४ निविदाधारकांपैकी २ निविदाधारक बिस्कीटे पुरविणेस तयार आहेत. १ निविदाधारकाने नकार दिलेला आहे. उर्वरीत ८ निविदाधारकच किराणा, मसाले व

डाळीसाठी भरलेल्या दरात माल पुरविणेस तयार आहेत.

१३ निविदाधारकांनी ई-निविदेत भरलेल्या दरांमध्ये माल पुरविणेस तयार नसल्याचे कळविले आहे. त्यापैकी ७ निविदाधारकांनी निविदेसाठी भरलेली निविदा फी परत करणेची मागणी केलेली आहे. तर काहींनी निविदा प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

बिस्कीटासाठीच्या १ निविदाधारकाने ८-१० दिवसांचा वेळ मागितलेला आहे.

कोरोना व्हायरस प्रादुर्भावामुळे किराणा माल व अनुषंगिक साहित्याच्या मार्केटच्या स्थितीमध्ये मोठया प्रमाणावर बदल झालेमुळे, त्याचा परिणाम होऊन मालाचे दर, मालाची उपलब्धता वगैरे बाबींमुळे काही निविदाधारक माल देण्यास तयार आहेत तर काही तयार नाहीत. यावरून काही साहित्याचे दर वाढले असण्याची, काही साहित्याचे दर कमी झाल्याची तर काही साहित्याचे दर स्थिर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर निविदांचा वैधता कालावधीही संपलेला आहे त्यामुळे निविदाधारकावर काही कारवाई करता येणार नाही.

वरील सर्व बाबींबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, खरेदी विभाग व प्र.अधिक्षक, खरेदी यांची चर्चा होऊन १.गहु, तांदुळ, हरबराडाळ व साखर, २.धान्य, कडधान्य, डाळी व ड्रायफ्रुट्स, ३.खादयतेल, ४.चहापावडर व कॉफी, ५.बिस्कीटे, ६.मसाले या आयटेम्ससाठीची सध्याची निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने वार्षिक फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणे साईभक्तांना सेवा सुविधा देण्याच्या संस्थानच्या दृष्टीकोनातून उचित होईल म्हणून सदर निविदा प्रक्रिया रद्द करणे व त्यासाठी नवीन वार्षिक ई-निविदा प्रक्रिया करणेसाठी चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

टोन्ड गाय दूध व पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसाठीचे सर्व निविदाधारक ई-निविदेत दिलेल्या दराने माल पुरविणेस तयार असल्यामुळे या दोन ई-निविदांचे कमर्शिअल बीड उघडता येतील.

सुधारीत खरेदी नियमावलीतील क्रं.५.५ खरेदी प्रक्रिया रद्द करणे शिर्षाअंतर्गत खालील तरतूदी आहेत.

खरेदी कार्यालय त्याने सुरू केलेली खरेदी प्रक्रिया, यशस्वी निविदा स्पीकारण्याच्या पूर्वी किंवा यशस्वी निविदा स्वीकारण्यात आल्यानंतर देखील कोणत्याही वेळी, लेखी नमूद करावयाच्या कारणामुळे, रद्द करू शकेल.

ब. खरेदी कार्यालय खरेदी रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर कोणतीही निविदा किंवा प्रस्ताव उघडणार नाही आणि अशा न उघलेल्या निविदा किंवा प्रस्ताव परत करील.

खरेदी कार्यालयाचा खरेदी रद्द करण्याचा निर्णय आणि त्याची कारणे खरेदी प्रक्रियेत भाग घेणा-या सर्व निविदाकारांना ताबडतोब कळविण्यात येतील.

वरील तरतुदी अतंर्गत उपरोक्त नमूद ६ निविदा रद्द करता येतील व तसे सर्व निविदाधारकांना लेखी कळविता येईल. फक्त यामध्ये ७ निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम परत मागितली आहे. त्यापैकी बयाणा रक्कम परत देता येईल. मात्र निविदा फी ही केवळ कोव्हीड-१९ लॉकडाऊनमुळे या निविदांबाबत वैधता कालावधीमध्ये कार्यवाही पुर्ण झाली नाही म्हणून निविदा रद्द करावी लागली आहे. ही एक अपवादात्मक बाब आहे. म्हणून ज्या निविदा रद्द करावयाच्या आहेत त्या निविदाधारकांची निविदा फी ही एक अपवादात्मक बाब म्हणून परत करावी असे मत आहे.

प्रथम निविदेत खालील आयटेमसाठी म्हणावा तसा प्रतिसाद न मिळालेमुळे नवीन वार्षिक ई-निविदा मागवितांना सदर आयटेम्सच्या स्पेसिफिकेशनच्या बाबतीत सुधारणा करणे गरजेचे आहे.

अ.नं	आयटेमचे नांव	जुने स्पेसिफिकेशन	सुधारीत स्पेसिफिकेशन
१	हिंग खडा	हिंग खडा- ॲगमार्क, नागछाप	हिंग खडा- ॲगमार्क/FSSAI
२	हिंग पावडर	हिंग पावडर - ॲगमार्क, नागछाप	हिंग पावडर - ॲगमार्क/FSSAI
३	जिलेबी रंग	जिलेबी रंग- I.S.I मार्क- मॉर्सन	जिलेबी रंग-(Lemon Yellow) FSSAI
४	चहा पावडर	चहा पावडर- डस्ट- ब्रुकबॉन्ड- Taaza, Sapat-Sahyadri, Tata- Agni	चहा पावडर- डस्ट- ब्रुकबॉन्ड- Taaza, Sapat-Sahyadri, Tata- Agni किंवा तत्सम, FSSAI
६	कॉफी	कॉफी- फिल्टर, ब्रॅण्डेड	कॉफी- फिल्टर- FSSAI

वरील सुधारणा केल्यास सदर आयटेम्ससाठी फेर ई-निविदेमध्ये प्रतिसाद वाढेल असे वाटते. त्यामुळे

सदर ६ आयटेम्ससाठी सुधारीत स्पेसिफिकेशनप्रमाणे फेर ई-निविदा मागवाव्यात असे मत आहे.

प्रस्ताव- वरील सविस्तर नमूद वस्तुस्थिती विचारात घेता या प्रकरणी,

A. पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व टोन्ड गाय दूध पुरविणेसाठी पात्र सर्व निविदाधारकांनी ई-निविदेत भरलेल्या दरामध्ये पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व टोन्ड गाय दूध पुरविणेस तयार असल्याचे कळविलेमुळे पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व टोन्ड गाय दूध कमर्शिअल ई-निविदा उघडणेस,

B. बिस्कीटे पुरविणेसाठी पात्र ४ निविदाधारकांपैकी २ निविदाधारकांनी ई-निविदेत भरलेल्या दरामध्ये बिस्कीटे पुरविणेस तयार असल्याचे कळविले आहे. तर मे.एक्सलंट एंटरप्रायजेस, पुणे यांनी सदर दरांमध्ये बिस्कीटे पुरविण्यास असमर्थता दर्शविली आहे. तसेच मे.भक्ती एंटरप्रायजेस, पुणे यांनी त्यांना याबाबत विचार करणेसाठी ८-१० दिवसांचा वेळ मागितलेला आहे. तथापि त्यांनी पुन्हा नकारात्मक कळविल्यास संस्थानची अडचण होईल म्हणून बिस्कीटांसाठी नव्याने फेर ई-निविदा प्रक्रिया करणेस,

C. चहापावडर पुरविणेसाठी ३ निविदाधारक पात्र होते त्यातील १ नमुनाधारक नमुना निवडीमध्ये अपात्र ठरला आहे. त्यामुळे दोन निविदाधारक बाकी राहिले होते. तथापि दोन्हीही निविदाधारकांनी ई-निविदेत भरलेल्या दरामध्ये चहा पावडर पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे व फिल्टर कॉफी पुरविणेसाठी नमुने प्राप्त झालेले नसल्यामुळे चहा व फिल्टर कॉफी खरेदीकामी एकत्रित फेर ई-निविदा प्रक्रिया करणेस,

D. खादयतेल पुरविणेसाठी पात्र ३ निविदाधारकांनी ई-निविदेत भरलेल्या दरामध्ये खादयतेल पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे खादयतेलासाठी फेर ई-निविदा प्रक्रिया करणेस,

E. गहु, तांदुळ, हरबराडाळ व साखर आणि धान्य, कडधान्य, डाळी व ड्रायफ्रुट्स पुरविणेसाठी बहुतांशी निविदाधारकांनी ई-निविदेत भरलेल्या दरामध्ये सदर आयटेम्स पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे सदर दोन्हीही निविदांसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया करणेस,

F. मसाले निविदेतील ८ निविदाधारकांपैकी ४ निविदाधारक माल पुरविणेस तयार नाही. तसेच २० आयटेम्सपैकी १० आयटेम्ससाठी ३ पेक्षा कमी निविदाधारक आहे व १० आयटेम्ससाठी ३ किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारक आहे. त्यामुळे मसाले पुरविणेकामीही फेर ई-निविदा प्रक्रिया करणेस,

G. रद्द करावयाच्या निविदाधारकांची बयाणा रक्कम परत करणेस व त्यांना तसे कळविणेस,

H. रद्द करावयाच्या निविदाधारकांची निविदा फी अपवादात्मक बाब म्हणून परत करणेस,

I. वरील प्रमाणे ६ आयटेमसाठी सुधारीत स्पेसिफिकेशनचा फेर ई-निविदेत समावेश करणेस,

J. पत्रावळ खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस,

वरील प्रस्तावित A ते J बाबत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.४५५/५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ वर्षाकरीता किराणामाल खरेदीकामी केलेली निविदा प्रक्रिया रद्द करणे व नव्याने फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

६. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE Kit, Short notice E-Tender प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- दि.०१/०९/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE Kit, Short notice E-Tender प्रक्रिया राबवून खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदी करणेस तसेच PPE Kit खरेदीकामी येणा-या रक्कम रु.४४,९०,०००/- चे खर्चास मा.तदर्थ समिती सभेची चक्रिय पध्दतीने मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन तांत्रिकदृष्टया मसुदा अंतिम करणेकामी संस्थान अंतर्गत बनविण्यात आलेल्या तज्ञ समितीकडून दि.२८/०९/२०२० रोजी उपरोक्त खरेदीकामीचा मसुदा तपासून घेण्यात आलेला असून त्यांनी सुचविलेल्या आवश्यक त्या बदलानुसार दुरुस्ती करुन सदरहू मसुदा अंतिम करण्यात आला व नियमानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०६/१०/२०२० पासुन दि.१३/१०/२०२० पर्यंत संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात ठेवण्यात आलेली होती व www.mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा

प्रसिध्द करणेत आलेली होती, तसेच पुरवठाधारक/ अधिकृत विक्रेते यांना जाहिरातीबाबत ई-मेलव्दारे देखील कळविण्यात आले होते, त्यास अनुसरुन PPE Kit, खरेदीकामी २३ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

प्राप्त २३ ऑनलाईन ई-निविदांचे टेक्नीकल बीड दि.१५/१०/२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असता, त्यामध्ये सर्व २३ ई-निविदाधारक पात्र ठरले होते. त्यास अनुसरुन दि.०३/११/२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा उघडण्यात आलेल्या असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्यामध्ये M/s. Pharmdeal, Pune यांचे प्रती नग रु.२००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहे. या दरामध्ये आणखी काही सुट मिळणेकामी त्यांना विचारणा केली असता, त्यांनी दिनांक १६.११.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे ई-निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये आणखी सुट देणेस असहमती दर्शविली.

M/s.Pharmdeal, Pune यांना पुरवठा आदेश देणेपुर्वी ई-निविदेतील अटी/ शर्तीनुसार ते पुरवठा करणार असलेल्या PPE Kit च्या नमुन्याची वापरकर्ते डॉक्टर्स/ कर्मचारी यांनी पाहणी केली असता, सदरहू PPE Kit वापरण्यास योग्य असलेबाबत त्यांनी लेखी अभिप्राय दिलेला आहे.

तरी M/s. Pharmdeal, Pune यांचे ई-निविदेमधील प्रती नग रु.२००/- मात्र निम्नत्तम दर स्विकारणेत येऊन, या दराने त्यांना १०००० नग PPE Kit पुरविणेकामीचा पुरवठा आदेश देणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

निर्णय क्र.४५५/६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE Kit, Short notice E-Tender प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

७. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे N-95 Face Mask, Short notice E-Tender प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- सध्या देशासह जगभरामध्ये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य कोरोना विषाणूने थैमान घातलेले आहे. या पार्श्वभूमीवर कोरोना विषाणूने बाधीत झालेल्या रुग्णांवर उपचार करणेसाठी संस्थानचे साईआश्रम धर्मशाळा येथे शासनामार्फत कोव्हीड केअर सेंटर (CCC) व डेडिकेटेड कोवीड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करण्यात आलेले असून आजपर्यंत कोरोना सेंटरमधून एकुण १५५० रुग्ण उपचार घेऊन सोडण्यात आलेले आहेत व सध्या १७८ रुग्ण उपचार घेत आहेत तसेच दिवसेंदिवस यामध्ये वाढ होत आहे.

आज अखेर दानशुर साईभक्तांनी ५७२९ नग N-95 Face Mask खरेदी करुन संस्थानला देणगी दाखल दिलेले आहेत. तसेच यापुर्वी दि.१८/०५/२०२० रोजीचे टिपणीन्वये, शासकीय खरेदी नियमावली मुद्दा क्र. ४.५ च्या अधीन राहून प्रत्येक मटेरीयलकरीता स्वतंत्ररित्या तातडीने वैद्यकिय संचालक यांचे स्वाक्षरीने कोटेशनमागणीपत्र संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन ई-मेल कोटेशनप्रक्रियाद्वारे आवश्यकतेनुसार PPE kit खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची कार्योत्तर मान्यता घेणेस मंजुरी मिळालेली होती. त्यास अनुसरुन विहीत कार्यपध्दतीने ५००० नग N-95 Face Mask खरेदी केलेले असून त्याचा वापर देखील चालू झालेला असल्यामुळे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर या केलेल्या कार्यवाहीस व आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार औषध भांडार विभागामध्ये देणगी व खरेदीसह प्राप्त झालेल्या N-95 Face Mask पैकी सध्या ४३९७ नग N-95 Face Mask चा साठा शिल्लक आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील कार्यरत डॉक्टर्स व इतर अनुशंगीक कर्मचारी, ज्यांचा संबंध रुग्णांच्या एकदम निकट ते रुग्णावर उपचार करणारे आहेत, त्याचेसाठी प्रतिमाह अंदाजे जवळपास १६०० ते १७०० नग N-95 Face Mask चा वापर होत आहे.

उपरोक्त नमुद N-95 Face Mask चा दैनंदिन वापर पहाता, उपलब्ध साठयामधील N-95 Face Mask अंदाजे अडीच ते तीन महिने पुरतील. सदरचा N-95 Face Mask चा अंदाज हा सध्याच्या परिस्थितीनुसार असून सध्या दोन्ही रुग्णालयामध्ये रुग्णसंख्या कमी आहे व ऑपरेशन थिएटर्स देखील कमी

क्षमतेने चालू आहेत. भविष्यामध्ये दोन्ही रुग्णालये पुर्ण क्षमतेने चालू झाल्यानंतर तसेच शिर्डी येथे ५० खाटांचे कोविड रुग्णालय सुरु करावयाचे झाल्यास N-95 Face Mask चा वापरही त्याप्रमाणात वाढणार आहे.

उपरोक्त परिस्थितीचा विचार करता उपलब्ध साठयामधील N-95 Face Mask अंदाजे अडीच ते तीन महिने पुरतील. त्यामुळे पुढील कालावधीसाठी आवश्यक असणारे N-95 Face Mask विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करावे लागणार असून भांडार विभागात आवश्यक साठा खरेदी करुन ठेवावा लागणार आहे. कारण कोरोना बाधीत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे सध्या असलेला N-95 Face Mask चा साठा अपुरा पडणार असल्याने संस्थान रुग्णालयांना आणखी अंदाजे २५००० नग N-95 Face Mask ची आवश्यकता भासणार आहे. त्यानुसार याकामी यापुर्वीच्या पुरवठा आदेशातील मंजुर दरानुसार अंदाजे प्रती नग रु.८२/- याप्रमाणे एकुण रक्कम रु.२०,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून पुरवठा आदेश दिल्यानंतर रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार N-95 Face Mask खरेदी करता येतील.

विभागाचा अभिप्राय- सध्या औषध भांडार विभागात देणगी स्वरुपात व खरेदी प्रक्रिया राबवून प्राप्त झालेल्या साठयापैकी आजअखेर ४३९७ N-95 Face Mask शिल्लक असून सदरहू साठा आणखी अडीच ते तीन महिने पुरेल. तसेच कोरोना बाधीत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे सध्या असलेले N-95 Face Mask कमी पडणार असून अंदाजे २५,००० नग N-95 Face Mask खरेदी करणे अपेक्षित आहे. त्यासाठी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये व आय.टी. विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात देऊन, महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Short Notice E-Tender प्रसिध्द करुन, आवश्यकतेनुसार N-95 Face Mask खरेदी करता येईल. तसेच सदरहू Short Notice E-Tender प्रक्रिया पुर्ण होऊन, निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश निर्गमित होणेपुर्वी सध्या असलेला N-95 Face Mask चा साठा संपुष्टात आल्यास, यापुर्वीच्या मंजुर दराने आवश्यकतेनसुार N-95 Face Mask ची खरेदी करणेस मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

तरी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये व आय.टी. विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात देऊन, महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Short Notice E-Tender प्रसिध्द करुन विहीत कार्यपध्दतीने २५,००० नग N-95 Face Mask खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२०,५०,०००/- मात्रचे खर्चास तसेच सदरहू Short Notice E-Tender प्रक्रिया पुर्ण होऊन, निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश निर्गमित होणेपुर्वी सध्या असलेला N-95 Face Mask चा साठा संपुष्टात आल्यास, यापुर्वीच्या मंजुर दराने आवश्यकतेनसुार N-95 Face Mask ची खरेदी करणेस मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४५५/७ **यावर सविस्तर चर्चा होऊन,Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे N-95 Face Mask, Short notice E-Tender प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

८. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE Kit व N-95 Face Mask खरेदीस व याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- सध्या जागतिक स्तरावर Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा झपाटयाने प्रादुर्भाव होत असून, भारतामध्ये सुध्दा सदरहू आजाराचे रुग्ण आढळून आलेले आहेत, हे पाहता भारत सरकारमार्फत Corona Virus (Covid-19) चा होणारा प्रादुर्भाव लक्षात घेता अतिदक्षतेचे आदेश देण्यात येऊन दि.२४/०३/२०२० ते ०३/०५/२०२० पर्यंत संपूर्ण भारतात संचारबंदी (लॉकडाऊन) लागू करण्यात आलेली होती व यापुढेही दि.३१.०५.२०२० पर्यंत संचारबंदी (लॉकडाऊन) लागू ठेवलेली आहे. कोरोना व्हायरस संबंधित प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत शासनामार्फत संस्थानचे रुग्णालय अधिगृहीत करणेबाबत दि.१५/०४/२०२० रोजी आदेश देण्यात आलेला असून त्यान्वये संस्थानच्या साईआश्रम धर्मशाळा नं – २ मध्ये भविष्यात होणा-या जंतु संसर्गाच्या प्रादुर्भावाची दक्षता घेणेकामी २५० बेडचे विलगीकरण कक्ष (क्वारंटाईन) कक्ष उभारण्यात आलेले असून त्यामध्ये प्रथमतः ५६ संशयीत रुग्ण ठेवण्यात येऊन आजपर्यंत १०० पेक्षा जास्त रुग्ण बरे होऊन घरी परतलेले आहेत. सध्या १० रुग्ण विलगीकरण कक्षात उपचार घेत असून पुढील काळात रुग्ण वाढण्याची शक्यता आहे, तसेच ज्या रुग्णांना Corona Virus (Covid-19) प्रादुर्भाव झालेला आहे अशा रुग्णांना ठेवण्याकरीता २०० बेडचे आयसोलेशन ICU वार्ड बनविण्यात आलेले आहे.

सदर रुग्णांची तपासणी करतेवेळी डॉक्टर, नर्सेस व इतर स्टाफ स्वतःच्या सुरक्षेकरीता N -95 मास्क व PPE kit (Personal Protection Equipment) चा वापर करत असतात. सदर किटच्या वापरामुळे या रोगाचा संसर्ग टाळण्यास मदत होत आहे. तसेच सदर N-95 मास्क व PPE Kit (Personal Protection Equipment) उपलब्ध नसल्यास डॉक्टर, नर्सेस व इतर स्टाफ त्याठिकाणी काम करण्यास तयार होत नाहीत.

याकामी शिलधी प्रतीष्ठाण, शिर्डी यांनी मे. अनसुया सर्जिकल, नालासोपारा (पालघर) या कंपनीकडून १०० नग, एका साईभक्ताने मे.श्रध्दा ड्रग्ज हाऊस, पुणे या कंपनीकडून १०० नग व एका साईभक्ताने M/s. Axenic Lab., Nashik यांचेकडून ४०० नग PPE kit (Personal Protection Equipment) खरेदी करुन संस्थानला देणगीदाखल दिलेले आहेत. तसेच N-95 मास्क देखील वेळोवेळी संस्थानला देणगीदाखल प्राप्त झालेले आहेत व खरेदी देखील करण्यात आले आहेत. परंतु प्राप्त झालेले मटेरीयलचा साठा वापरात आल्यामुळे सध्या भांडार विभागात आवश्यक साठा खरेदी करुन ठेवावा लागणार आहे, कारण कोरोना बाधीत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे सध्या असलेले PPE kit व N-95 Mask कमी पडणार असून, कोरोना व्हायरसचा जगभरातील प्रादुर्भाव पहाता राज्यात PPE kit व N-95 Mask चा तुटवडा भासत आहे. सध्या दैनंदिन ५० नग PPE Kit व ३०० नग N-95 Mask चा वापर होत असून भविष्यात यापेक्षा जास्त मटेरीयल लागणार असल्याने संस्थान रुग्णालयांना आणखी अंदाजे २००० नग PPE kit व ५००० नग N-95 Mask ची आवश्यकता भासणार आहे.

तेंव्हा वरील सर्व परिस्थितीचे अवलोकन करता, नैसर्गिक आपत्ती कारणास्तव तातडीची गरज पाहता, कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव टाळणेकामी आवश्यक असणारे PPE Kit व N95 Face Mask खरेदीकामी शासकिय खरेदी नियमावली ४.५ तातडीनुसार खरेदी प्रक्रियाव्दारे खरेदी करता येईल.

त्यानुसार देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या PPE kit ची अंदाजित किंमत खालीलप्रमाणे घेता येईल –

अ.नं.	पुरवठाधारकाचे नाव	दर प्रति नग रु.	खरेदी नग संख्या	एकुण अंदाजे खर्च
१	मे. अनसुया सर्जिकल, नालासोपारा (पालघर)	१०००/-		
२	मे.श्रध्दा ड्रग्ज हाऊस, पुणे	१०८९/-		
३	मे.एक्झॅनिक लॅब, नाशिक	९८०/-		
	एकुण रु.-	३०६९/-		
	सरासरी प्रती नग दर रु.-	१०२३/-	**२०००**	**२०४६०००/-**

वरीलप्रमाणे दरानुसार २००० नग PPE Kit खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२०,४६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच N95 Face Mask (Without Vent) खरेदीकामी ई- मेलव्दारे व दुरध्वनीव्दारे पुरवठाधारकांकडून दरपत्रक मागविण्यात आलेले असून त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत –

अ.नं.	पुरवठाधारकाचे नाव	दर प्रति नग रु.	खरेदी नग संख्या	एकुण अंदाजे खर्च
१	मे. ओम साई एजन्सीज, नाशिक	१०३.००		
२	मे. अवधुत फार्मा, नाशिक	१६०.००		
३	मे. मेडीकीट प्रॉडक्ट, नवघर-वसई पु.	११९.७०		
	एकुण रु.-	३८२.७०		
	सरासरी प्रती नग दर रु.-	१२७.५६	**५०००**	**६३७८००/-**

वरीलप्रमाणे दरानुसार ५००० नग N95 Face Mask खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.६,३७,८००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे सर्जिकल साहित्य खरेदीकामी वरील नमुद केल्याप्रमाणे अंदाजे खर्च रु.२६,८३,८००/- अपेक्षित असून सदर खर्च पाहता खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार ई निविदा प्रक्रिया राबवावी लागणार होती. परंतू सदरची तातडीची गरज पाहता व वेळेचा अभाव लक्षात घेता खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र. ४.५ मधील तरतुदीनुसार सदरहू खरेदीकामी कंपनीचे अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांना दयावयाचे कोटेशन मागणीपत्र

वैद्यकिय संचालक यांचे स्वाक्षरीने संस्थानचे संकेतस्थळावर देऊन तसेच आपणाकडे उपलब्ध असलेल्या पुरवठाधारकांना ई-मेल व दुरध्वनीव्दारे अवगत करुन ७ दिवसांत त्यांचेकडून तातडीने स्वतंत्ररित्या ई-मेल व्दारे कोटेशन मागवून खरेदी करावे लागणार असून दर निश्चित झालेनंतर रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार उपरोक्त PPE Kit व N-95 Mask खरेदी करता येईल.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ०१ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद– ४.५ तातडी आदेश खरेदी प्रक्रिया – खरेदी मुल्य कितीही असले तरी तातडीच्या खरेदी आदेशाच्या प्रक्रियेत दरपत्रकासाठी विनंती (आर एफ क्यु) या पध्दतीचा स्विकार, देकार मागविण्यासाठी करता येईल. या प्रकारात, स्पर्धेच्या प्रकारासंबंधी कोणत्याही विशिष्ट आवश्यकता (राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय) नाहीत, परंतु खरेदी कर्मचा-यांनी स्पर्धा होण्यासाठी कमीत कमी तीन (३) दरपत्रके मागविण्याची काळजी घ्यावी.

त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव टाळणेकामी आवश्यक असणारे PPE Kit व N95 Face Mask खरेदीकामी शासकीय खरेदी नियमावली मुद्दा क्र. ४.५ नुसार विहित पध्दतीने प्रत्येक मटेरीयलकरीता स्वतंत्ररित्या तातडीने वैद्यकिय संचालक यांचे स्वाक्षरीने कोटेशनमागणीपत्र संस्थानचे संकेतस्थळावर देऊन ई-मेलव्दारे कोटेशनप्रक्रिया राबवून खरेदी आदेश देण्यात येऊन आवश्यकतेनुसार खरेदी करणेस व त्यानंतर मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेण्यास दि.१८/०५/२०२० रोजीचे टिपणीन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार –

(०१) PPE Kit- खरेदीकामी इकडील पत्र क्र.१७५ दि.२५/०५/२०२० रोजीचे पत्रान्वये दि.०२/०६/२०२० अखेर ईमेल द्वारे कोटेशन मागविण्यात आलेले होते. सदर कोटेशन सोबत DRDO व SITRA Certificate ची मागणी केलेली होती. त्यास अनूसरुन PPE Kit खरेदीकामी एकूण ८४ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांचे ई मेलद्वारे कोटेशन प्राप्त झाले असून M/s. S.K.International Export Ltd., Mumbai यांचे Hard Copy व्दारे कोटेशन प्राप्त झाले असून स्पर्धात्मक दर मिळणेकामी ते सुध्दा विचारात घेण्यात आलेले आहे म्हणजे एकुण ८५ कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत. सदर कोटेशनच्या तांत्रिक बाबींचा विचार करता ५९ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांचे कोटेशन हे DRDO / SITRA Certificate न दिल्यामुळे अपात्र झालेले असून उर्वरीत तांत्रिकदृष्ट्या DRDO व SITRA Certificate पात्र २६ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

सदर तुलनात्मक तक्त्याच्या विचार करता M/s.Siddhtech Healthcare Service (P) Ltd., Pune व M/s.S.K.International, Mumbai या दोन्ही पुरवठाधारकांचे DRDO व SITRA Certificate असलेले दर हे निम्नतम आलेले आहेत, त्यामुळे एकुण २००० नग संख्या दोन्ही पुरवठाधारकांमध्ये विभागून पुरवठा आदेश दयावा लागणार आहे. त्यानुसार पुरवठाधारकांना देण्यात येणा-या पुरवठा आदेशाचा तपशील खालीलप्रमाणे –

Sr. No.	Name of Supplier	Description	Qty.	Rate per in Rs.	Total Amt. in Rs.
1	M/s. Siddhtech Healthcare Service (P) Ltd., Pune	PPE Kit	1000	449.00	449000.00
2	M/s. S.K.International, Mumbai	PPE Kit	1000	449.00	449000.00
		Total Amt. in Rs.			**898000.00**

वरीलप्रमाणे एकुण २००० नग PPE Kit खरेदीकामी रक्कम रु.८,९८,०००/- इतका खर्च येणार असून सदर खर्च पाहता मंजूर रक्कम रु.२०,४६,०००/- पेक्षा ही कमी येत असून त्यामुळे संस्थानचा नक्कीच आर्थिक फायदा झाल्याचे दिसून येते. त्यानुसार सदरहू खरेदीकामी M/s. Siddhtech Healthcare Service (P) Ltd., Pune यांना प्राप्त निम्नतम दराने १००० नगांसाठी रक्कम रु.४,४९,०००/- इतक्या रक्कमेचा व M/s.

S.K.International, Mumbai यांना प्राप्त निम्नतम दराने १००० नगांसाठी रक्कम रु.४,४९,०००/- इतक्या रक्कमेचा असा एकुण रक्कम रु.८,९८,०००/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यास दि. १७/०६/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये मान्यता मिळालेली असून M/s. Siddhtech Healthcare Service (P) Ltd., Pune यांना इकडील पत्र क्र.३९९ दि. २६/०६/२०२० व M/s. S.K.International, Mumbai यांना इकडील पत्र क्र.४०३ दि.२६/०६/२०२० अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेले असून मटेरीयल सुध्दा मागणीनुसार प्राप्त होत आहे.

(०२) N95 Face Mask - खरेदीकामी इकडील पत्र क्र. १७६ दि.२५/०५/२०२० रोजीचे पत्रान्वये दि.०२/०६/२०२० अखेर ईमेल द्वारे कोटेशन मागविण्यात आलेले होते. सदर कोटेशन सोबत Niosh Certificate ची मागणी केलेली होती. त्यास अनूसरुन N95 Face Mask खरेदीकामी एकूण ५८ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांचे ई मेलद्वारे कोटेशन प्राप्त झालेले होते.

सदर प्राप्त कोटेशनच्या तांत्रिक बाबींचा विचार करता २८ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांचे कोटेशन हे Niosh Certificate न दिल्यामुळे अपात्र झालेले असून उर्वरीत तांत्रिकदृष्ट्या Niosh Certificate पात्र ३० अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सदर तुलनात्मक तक्त्याच्या विचार करता M/s.Deva Distributors, Shrirampur यांचे Niosh Certificate असलेले Venus कंपनीचे दर हे निम्नतम आलेले आहे. त्यानुसार त्यांना देण्यात येणा-या पुरवठा आदेशाचा तपशील खालीलप्रमाणे-

Sr. No.	Description	Qty.	Make	Rate per in Rs.	Total Amt. in Rs.
1	N95 Face Mask	5000	Venus	82.00	410000.00
	Total Amt. in Rs.				**410000.00**

N95 Face Mask खरेदीकामी प्रती नग रु.८४/- याप्रमाणे निम्नतम दर प्राप्त झालेले असून त्यानूसार ५००० नग खरेदीकामी रक्कम रु.४,२०,०००/- इतका खर्च येणार होता, परंतु दि.१८/०६/२०२० रोजी मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दूरध्वनीद्वारे झालेले चर्चा / वाटाघाटीमध्ये M/s. Deva Distributors, Shrirampur यांनी मुळ दरामध्ये प्रती नग २/- रुपये इतकी सूट दिलेली असल्यामुळे सदर N95 Face Mask प्रती नग रक्कम रु.८२/- याप्रमाणे ५००० नग N95 Face Mask खरेदीकामी रक्कम रु.४,१०,०००/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्च पाहता मंजूर रक्कम रु.६,३७,८००/- पेक्षा ही कमी येत असून त्यामुळे संस्थानचा नक्कीच आर्थिक फायदा झाल्याचे दिसून येते. त्यानुसार सदरहू खरेदीकामी M/s. Deva Distributors, Shrirampur यांना प्राप्त निम्नतम दराने रक्कम रु.४,१०,०००/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यास दि.१८/०६/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये मान्यता मिळालेली असून M/s. Deva Distributors, Shrirampur यांना इकडील पत्र क्र.४०१ दि.२६/०६/२०२० अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला असून मटेरीयल सुध्दा मागणीनुसार प्राप्त होत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे PPE Kit- २००० नग खरेदीकामी आलेल्या रक्कम रु.८,९८,०००/- व N95 Face Mask - ५००० नग खरेदीकामी आलेल्या रक्कम रु.४,१०,०००/- अशी एकुण रक्कम रु.१३,०८,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दिनांक २८.०८.२०२० रोजीचे सभेसमोर सादर केला असता, वेळेअभावी त्यावर चर्चा होऊ शकली नाही. तरी सदरहू प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४५५/८ यावर सविस्तर चर्चा होऊन, Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE Kit व N-95 Face Mask खरेदीस व याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता चक्रिय पध्दतीने देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

९. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणा-या रुग्णांकरीता तसेच दोन्ही रुग्णालयातील दैनंदिन रुग्णांचे वापराकरीता औषधे, सर्जिकल साहित्य तथा लॅब मटेरीयल पुरेशा स्वरुपात उपलब्ध ठेवणेबाबत.

प्रस्ताव- दि.१२/०३/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणा-या रुग्णांकरीता औषधे, सर्जिकल साहित्य तथा लॅब मटेरीयल पुरेश्या प्रमाणात उपलब्ध ठेवणेकामी मागील खरेदीमधील मंजुर दराने वार्षिक नगसंख्या संपलेल्या तथा अपु-या पडणा-या औषधे, सर्जिकल साहित्यांची अतिरीक्त नगसंख्या खरेदी करण्यास व सदरकामी मटेरीयल खरेदी करुन कार्योत्तर मान्यता घेण्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार कोरोना या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव पाहता व रुग्णालयातील रुग्णांची गरज पाहता आवश्यकतेनुसार मागील खरेदीतील मंजुर दराने लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येत असून सोबतच्या परिशिष्ट "A" मध्ये पुढील काळात लागणा-या मटेरीयलची यादी सोबत सादर केली असून त्यामध्ये दाखविण्यात आलेल्या एकुण रक्कम रु.३,५२,५१,९५८/- पैकी रक्कम रु.६६,६४,९४६/- इतक्या रक्कमेचे मटेरीयल आजअखेर खरेदी करण्यात आलेले असून उर्वरीत रक्कम रु.२,८५,८७,०१२/- पैकी प्रस्ताव मंजुर होईपर्यंत आणखी मटेरीयल खरेदी करावे लागणार आहे, त्यामुळे रु.२,८५,८७,०१२/- इतक्या रक्कमेचे मटेरीयल आवश्यकतेनुसार खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

सोबतच्या तक्त्यात कॉलम "P" मध्ये दर्शविल्यानुसार सद्यस्थितीच्या साठयाचा विचार करता एकुण २५० औषधे / सर्जिकल साहित्यांपैकी १४१ प्रकारचे औषधे/साहित्यांचा साठा औषध भांडाराकडे शिल्लक नसल्याने त्याकामी संबंधित पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आले असून कोरोना प्रादुर्भावामुळे ट्रान्सपोर्ट सेवा बंद असल्यामुळे जशी जशी संचार बंदी शिथिल होईल त्यानंतर ट्रान्सपोर्ट सेवा चालू झाल्यानंतर पुरवठाधारक मटेरिअल पाठविणार आहे व ४१ प्रकारचे औषधे / सर्जिकल साहित्यांचा साठा व त्यांचा होणारा खप पाहता जास्तीत जास्त १० ते १५ दिवस पुरू शकेल आणि उर्वरीत ६८ प्रकारचे औषधे / सर्जिकल साहित्यांचा साठा पाहता तो जास्तीत जास्त १ महिना पुरेल म्हणजेच वापरकर्त्यांमार्फत मागणी आल्यास ते मटेरिअलसुध्दा खरेदी करावे लागणार असून पुढील काळात पेशंटची व रूग्णालयाची होणारी गैरसोय टाळता येईल.

सन २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक औषधे खरेदीकामी मंजूर रक्कम रु.५५,९१,९१,८३६.०० पैकी रक्कम रु.४८,०४,७०,५३९.०० (रु.४४,०८,५७,०२८/- ही देण्यात आलल्या पुरवठा आदेशाची रक्कम + ३,९६,१३,५०३/- अतिरिक्त नग संख्या खरेदी केलेली रक्कम) वजा जाता शिल्लक रक्कम रु.७,८७,२१,२९७/- मधून व सन २०१९-२० मधील मंजुर रक्कम रू. ५७,६२,०२,५१७/- पैकी रक्कम रु.२४,७९,९५,२०५/- (रू.२१,८४,०८,७७१/- ही देण्यात आलेल्या पुरवठा आदेश रक्कम + रु.२,९५,८६,४३४/- अतिरीक्त नग संख्या ही दि.२४/०२/२०२० रोजीचे मा.तदर्थ समिती सभेतील निर्णय क्र.१५७ अन्वये खरेदी केलेली रक्कम) वजा जाता शिल्लक रक्कम रू.३२,८२,०७,३१२/- म्हणजेच सन २०१७-१८ व सन २०१९-२० मधील शिल्लक रक्कमेमधून सोबतच्या तक्त्यातील औषधे तातडीने मंजूर दराने अतिरिक्त (मंजूर नग संख्येपेक्षा जास्त नग) खरेदी करता येतील व याकामी रक्कम रु.३,५२,५१,९५८/- इतका खर्च येणार आहे.

कोरोना काळात पुरवठाधारकांच्या माहितीनुसार कच्च्या मालांचे भाव वाढणार असल्याने तातडीचे कारणास्तव व रुग्णांची गैरसोय टाळणेकामी काही मटेरीयल हे अगोदर खरेदी करण्यात आलेले आहे, सध्याची परिस्थिती बघता पुरवठाधारकांनी दिलेल्या माहितीनुसार खरोखरच कच्च्या मालांचे दर वाढल्याने ब-याच औषधे, सर्जिकल साहित्याच्या किंमती जगभरात वाढल्याचे दिसून आलेले आहे, यामुळे आपण अगोदर खरेदी केल्याने नक्कीच अर्थिक बाबतीत संस्थानचा फायदाच झालेला आहे. तसेच औषधे, सर्जिकल साहित्य उपलब्ध असल्याने रुग्णांची गैरसोय टाळता आलेली आहे.

सद्यस्थितीत कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता आपणाकडील Covid Centre साठी लागणा-या औषधे/ सर्जिकल साहित्याची तातडीची गरज पाहता तसेच संचारबंदी काळात रूग्णालयात येणा-या पेशंटची संख्या मंदावली होती परंतु संचारबंदी शिथिल केल्यामुळे सध्याची दैनंदिन वाढती रूग्णसंख्या पाहता त्यांचेसाठी लागणारे औषधे/सर्जिकल साहित्य नसल्यास पेशंटची गैरसोय होईल म्हणून रूग्णालयात लागणारे दैनंदिन औषधे/सर्जिकल साहित्य उपलब्ध करणे फारच गरजेचे आहे.

सध्या सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीकामीची कार्यवाही चालु असून दि.२४/०२/२०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेत निर्णय क्र.१५६ व दि.०४/०३/२०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेत निर्णय क्र.१७९ अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्याचे दर निश्चित करणे (Rate Contract) तसेच On Consignment Basis वरील Material खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे एकुण रक्कम

रु.६९,४७,९९,४२२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली असून तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले आहे. त्यानुसार विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आलेले असून मान्यतेस्तव औरंगाबाद खंडपीठाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे त्यास मान्यता मिळाल्यानंतर विहित पध्दतीने ई-निविदा/ कोटेशन प्रक्रिया राबवून मटेरीयल उपलब्ध होण्यास आणखी ४-५ महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

त्यामुळे सध्या रुग्णालयांची दैनंदिन गरज पाहता व औषधाविना रुग्णांची हेळसांड होऊ नये आणि सदयस्थितीला शिर्डी तथा परिसरात कोरोना या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव पाहता सन २०२०-२१ च्या वार्षिक औषधे खरेदीस मान्यता प्राप्त होईपर्यंत पुढील ४-५ महिन्यांसाठी मागील मंजुर दराने अतिरीक्त नगसंख्या खरेदी केल्यास त्या कालावधीत रुग्णांची गरज भागविता येईल.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्तप्रमाणे सन २०१७-१८ व सन २०१९-२० च्या मंजुर रक्कमेतील शिल्लक रक्कमेतून मागील मंजुर दराने अतिरीक्त नगसंख्या खरेदी केल्यास रुग्णांची गैरसोय टाळता येईल व मुख्यतः कोरोना या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होईल, तसेच सदरची अतिरीक्त नगसंख्या खरेदी ही सन २०१७-१८ व सन २०१९-२० च्या वार्षिक खरेदीतील उर्वरीत मंजुर रक्कमेतून करण्यात येत असून यापुर्वी दि.२४/०२/२०२० रोजीचे मा.तदर्थ समिती सभेतील निर्णय क्र.१५७ अन्वये रु.२,९५,८६,४३४/- इतक्या रक्कमेची औषधे अतिरीक्त खरेदी करण्यात आलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे सोबतच्या तक्त्यातील मटेरीयल सन २०१७-१८ व सन २०१९-२० च्या वार्षिक खरेदीतील शिल्लक मंजुर रक्कमेतून मंजुर दराने खरेदी करण्यात येत असलेल्या एकुण रक्कम रु.३,५२,५१,९५८/- पैकी रक्कम रु.६६,६४,९४६/- इतक्या रक्कमेचे मटेरीयल हे आजअखेर खरेदी करण्यात आलेले असून त्यास कार्योत्तर मान्यता असावी, तसेच उर्वरीत शिल्लक असलेल्या रु.२,८५,८७,०१२/- मात्र रक्कमेमधून नविन प्रस्ताव मंजुर होऊन पुरवठा आदेश जाईपर्यंत आवश्यकता भासल्यास आणखी मटेरीयल खरेदी करावे लागणार असल्याने, सदरहू रक्कमेस मा.तदर्थ समिती सभेच्या मंजुरीनंतर मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सिव्हील अर्ज दाखल करणे अपेक्षित आहे, याबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दिनांक २८.०८.२०२० रोजीचे सभेसमोर सादर केला असता, वेळेअभावी त्यावर चर्चा होऊ शकली नाही. तरी तातडीची बाब असल्यामुळे सदरहू प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४५५/९ यावर सविस्तर चर्चा होऊन, Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणा-या रुग्णांकरीता तसेच दोन्ही रुग्णालयातील दैनंदिन रुग्णांचे वापराकरीता औषधे, सर्जिकल साहित्य तथा लॅब मटेरीयल पुरेशा स्वरुपात उपलब्ध ठेवणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

१०. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करुन घेणेकामी मुदतवाढ देणेबाबत.

प्रस्ताव- दि.०४ मार्च २०१९ रोजीचे मा.स्थानिक उपसमितीचे सभेतील निर्णय क्र.०३ अन्वये, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य / सामुग्रीसहचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रकियेतील निम्नतम निविदाधारक मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांचे निम्नतम वार्षिक दर रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र स्विकारणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६ फेब्रुवारी २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६९ अन्वये त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झाला होता.

सदर निर्णयान्वये मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/पीआरओ/६६३/२०१९, दि.२९ मे २०१९ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य / सामुग्रीसहचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी दि.०१ जून २०१९ ते दि.३१ मे २०२० या १ वर्ष कालावधीचा कार्यादेश देण्यात आलेला होता. दि.३१ मे २०२० रोजी त्यांची सदर कामाची मुदत संपुष्टात येणार असल्याने सन २०२०-२१ ह्या वर्षासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेकामी दि.२७ मार्च २०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेत विषय सादर केला असता निर्णय क्रं.२२९ नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन सन २०२०-२१ या वर्षाकरीता संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ

रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अदांजे रक्कम रु.२,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

सदर निर्णयाची दि.२४ एप्रिल २०२० रोजी कामापुरती नक्कल सभाकामकाज विभागाकडून प्राप्त होताच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता मिळविणेकामी संस्थानचे विधी विभागाकडे त्वरीत जमा केलेली होती. त्यानुसार विधी विभागाने आवश्यक पुर्तता करुन दि.१४ मे २०२० रोजी संस्थानचे पॅनलवरील वकीलांकडे मसुदा नोटरी करुन सिव्हील ॲप्लीकेशन मा.उच्च न्यायालयात ऑनलाईन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी दिलेले आहे. सदर परवानगी मिळणेसाठी तसेच ई-निविदा प्रक्रिया राबवुण नविन ठेकेदाराची नेमणुक होणेस काही कालावधी लागणार असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक हाईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात मुदतवाढ देणेबाबत दि.११ मे २०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेत विषय सादर केला असता, विषय नं.६२ व निर्णय क्र.२९६ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम करणारे सध्याचे ठेकेदार मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.२६ मे २०२० रोजीचे पत्रान्वये अवगत करुन कामकाज सुरु ठेवले आहे.

तथापी उपरोक्त निर्णयान्वये दिलेली मुदतवाढ दि.३१ ऑगस्ट २०२० रोजी संपुष्टात येणार आहे. नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.उच्च न्यायालयाची परवाणगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर दि.०८ जूलै २०२० रोजी सिव्हील ॲप्लीकेशन (CA/4409/2020) सादर झालेला असून त्यास मा.उच्च न्यायालयाची अद्याप मान्यता मिळाली नसल्याची माहिती विधी विभागाने दिली आहे. त्यामुळे मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना देण्यात आलेली मुदतवाढ पुन्हा नव्याने वाढवावी लागणार आहे.

<u>सद्यस्थिती</u>– मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दोन्ही रुग्णालयांसाठी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/ स्वच्छताकामी कामाचे स्वरुपानुसार लागणारे मनुष्यबळ, मशिनरी/ साहीत्य तसेच उपकरणे व केमिकल या साहित्यासह प्रती महिना रक्कम रु.१९,३३,३८२/- (अक्षरी एकोनावीस लाख तेहेत्तीस हजार तीनशे ब्याऐंशी रुपये मात्र) प्रमाणे (वार्षीक रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र) कामाचा दि.०१ जून २०१९ ते दि.३१ मे २०२० या १ वर्ष कालावधीचा ठेका देण्यात आलेला होता. सदर कामाची मुदत दि.३१ मे २०२० रोजी संपुष्टात येणार असल्याने दि.११ मे २०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील विषय नं.६२ व निर्णय क्र.२९६ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम करणारे सध्याचे ठेकेदार मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ देणेबाबत निर्णय झाल्याने त्यांचेकडून कामकाज सुरु ठेवले आहे.

<u>विभागाचा अभिप्राय</u> – श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१ मे २०२० रोजी संपुष्टात येत होती. नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळाले नंतर काही कालावधी लागणार असल्याने, दि.११ मे २०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेत सदर ठेकेदारास मुदतवाढ देऊन कामकाज करुन घेणेबाबत विषय सादर केला असता, निर्णय क्र.२९६ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम करणारे सध्याचे ठेकेदार मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तीन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मे. फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.२६ मे २०२० रोजीचे पत्रान्वये मुदतवाढबाबत अवगत करुन कामकाज सुरु ठेवले आहे.

मात्र सदर दिलेल्या मुदतवाढीची मुदत दि.३१ ऑगस्ट २०२० रोजी संपुष्टात येणार आहे. तसेच नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.उच्च न्यायालयाची अद्याप परवाणगी मिळाली नसल्याने मे.फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांना आणखी काही कालावधीकरीता मुदतवाढ देऊन कामकाज करुन घ्यावे लागणार आहे, असे नम्र मत आहे. कारण मा.उच्च न्यायालची मान्यता मिळालेनंतरही ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, प्री-बिड, तांत्रिक व व्यावसायीक बिड प्रक्रिया पुर्ण करुन मा.तदर्थ समीतीचे मान्यतेने कार्यादेश देणे याकामी साधारणत: तीन महिन्याचा वाढीव कालावधी लागणार आहे.

मागणी– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेकामास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाले नंतर ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, प्रीबिड, तांत्रिक व व्यवसायीक बिड प्रक्रिया पुर्ण करुन मा.तदर्थ समीतीचे मान्यतेने कार्यादेश देणे याकामी साधारणत: तीन महिन्याचा वाढीव कालावधी लागणार असल्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास निविदा, कार्यादेश व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात पुन्हा मुदतवाढ देऊन कामकाज करुन घेणेबाबत मान्यता मिळणेस सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/१० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करुन घेणेकामी मुदतवाढ देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

११. श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डीश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत याकामी M/s Tata Communications Ltd., Mumbai यांना देणेत आलेल्या कार्यादेशास मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- ०१. दि.२८.०४.२०१७ निर्णय क्र.३२२ (१३)
०२. दि.११.०५.२०२० निर्णय क्र.२६१, २६२.
०३. दि.०९.०६.२०२० नि.क्र.३०६ (०२),३२९.
०४. दि.२८.०८.२०२० निर्णय क्र. --

प्रास्ताविक :- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१३) अन्वये, M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. Pvt Ltd, Hyd यांनी देऊ केलेले पुढीलप्रमाणे उच्चत्तम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२० या कालावधीकरीता याकामी कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली होती.

१. DTH (डिश टिव्ही) साठी M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

Platform	1st Year	2nd Year	3rd Year	Total
DTH	1,96,00,000	1,97,00,000	1,98,00,000	5,91,00,000
Total-				5,91,00,000

२. इंटरनेट व मोबाईल प्लॅटफॉर्मसाठी M/s Tata Comm. यांनी देऊ केलेले Exclusive दर.

Platform	1st Year	2nd Year	3rd Year	Total
Mobile & Internet	19,00,000	21,00,000	23,00,000	63,00,000

३. T.V. चॅनलसाठी M/s Tata व M/s Associated यांनी देऊ केलेले Non Exclusive दर.

Platform	1st Year	2nd Year	3rd Year	Total
M/s Tata Communications Ltd., Mumbai	3,00,000	4,00,000	5,00,000	12,00,000
M/s Associated Broadcasting Co Pvt Ltd.,	25,30,000	25,30,000	25,30,000	75,90,000
Total-				87,00,000

उपरोक्त तक्त्याप्रमाणे, M/s Tata Comm व M/s Associated यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१०५९ ते १०६१/२०१७ दि.३० मे, २०१७ अन्वये, व जा.नं.एसएसएसटी/आयटी/५६७६/२०१८ दि.२४.०१.२०१८ अन्वये, तीन वर्षांकरीता (दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२०) कार्यादेश देणेत आलेले होते.

M/s Tata Comm व M/s Associated यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने याकामी नविन पुरवठाधारकांची नेमणूक करणेसाठी प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा राबविणेस मान्यता मिळणेकामी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६१ अन्वये देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे याकामी सुधारीत प्रस्ताव इकडील विभागाचे दि.३० मे, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.३२९ अन्वये श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देणेत आली. सदर निर्णयाची प्रत पुढील कार्यवाहीकरिता दि.०१.०७.२०२० रोजी इकडील विभागास प्राप्त झालेली आहे.

दरम्यानचे कालावधीमध्ये याकामी प्रचलीत पद्धतीने नविन पुरवठाधारकाची नेमणूक होईपर्यंत ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा सुरळीत सुरू राहणेकामी M/s Tata Comm यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामधील दरामध्ये नमुद वार्षिक वाढीप्रमाणे तसेच M/s Associated Broadcasting यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये नमुद वार्षिक दर व अटी/शर्तीप्रमाणे तीन महिने मुदतवाढ देणेस मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३०६ (०२) अन्वये मान्यता देणेत आली. सदर मान्यतेन्वये इकडील विभागाचे दि.०८.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, M/s Tata Comm यांना पुढील वार्षिक दराप्रमाणे जा.न.एसएसएसटी/वशी-आयटी/६७६ ते ६७८/२०२०, दि.१३ जुलै, २०२० ने तीन महिने कालावधी (दि.०१.०६.२०२० ते दि.३१.०८.२०२०) साठी मुदतवाढ देणेत आलेली आहे.

Platform	**Annual Charges**	**Charges for Extension (3 Months)**
DTH (Exclusive)	1,99,00,000	49,75,000
Mobile & Internet (Exclusive)	25,00,000	6,25,000
TV Channel (Non- Exclusive)	6,00,000	1,50,000

तसेच M/s Associated Broadcasting (TV1 TV Channel) यांना याकामी दि.०१.०६.२०२० पासून तीन महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी इकडील विभागाचे दि.०८.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, जा.न.एसएसएसटी/वशी-आयटी/६७५/२०२०, दि.१३ जुलै, २०२० ने मुदतवाढ देणेत आलेली होती. याबाबत M/s Associated यांना दि.११.०७.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे सदर सुविधेचे मुदतवाढीबाबत अवगत केले असता, त्यांनी सदर ई-मेलचे उत्तरादाखल सदरची सुविधा त्यांचेमार्फत याअगोदरच बंद करणेत आलेली असून त्यांना याकामी मुदतवाढ देणेत येऊ नये, असे कळविलेले आहे. सबब, M/s Associated यांनी सदरची मुदतवाढ घेणेस असमर्थता दर्शविल्याने त्यांना याकामी देणे प्रस्तावीत असलेला कार्यादेश रद्द होणेस, इकडील विभागाचे दि.२६ ऑगष्ट, २०२० रोजीचे टिपणीअन्वये मान्यता घेणेत आलेली आहे.

मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२९ अन्वये, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस देणेत आलेल्या मान्यतेप्रमाणे ई–निविदा प्रक्रिया राबविणेकामी इकडील विभागाचे दि.३१ जुलै, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार याकामी दि.१७.०८.२०२० ते

दि.०७.०९.२०२० या कालावधीत ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली होती. ई-निविदा विषयक जाहिरात दिल्ली, बैंगलौर, हैद्राबाद, चेन्नई व मुंबई या शहरांशी निगडीत इंग्रजी वृत्तपत्रामध्ये एक दिवस प्रसिद्ध करणेत आली होती. तसेच इकडील विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार एकूण ३४ विविध टिव्ही चॅनेल्सला ई-निविदा विषयक ई-मेलद्वारे कळविणेत आलेले होते. परंतू, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा सादर करणेच्या अंतीम तारखेपर्यंत (दि.०७.०९.२०२०) फक्त एकाच निविदाधारकाने ई-निविदा अपलोड केलेली असल्याचे mahatenders.gov.in या वेबसाईटवरील रिपोर्टवरुन आढळून आलेले आहे. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत ई-निविदा सादर करणेचे कालावधीत आवश्यक निविदा प्राप्त न झाल्याने, खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ – (निविदा कालावधीस मुदतवाढ) यास अधिन राहून सदर ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा सादर करणेस प्रथम वेळेस कामाचे ०७ दिवस (दि.०८.०९.२०२० ते दि.१५.०९.२०२०) इकडील विभागाचे दि.०७.०९.२०२० रोजीचे पत्रान्वये मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यानुसार निविदा सादर करणेची अंतीम दिनांक हि १५.०९.२०२० असून तांत्रिक ई-निविदा उघडण्याची दिनांक १७.०९.२०२० हि आहे.

दरम्यानचे कालावधीमध्ये ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठाधारकांना कार्यादेश देणेची कार्यवाही M/s Tata Comm यांना याकामी दिलेल्या मुदतवाढीचे कालावधीत (ऑगष्ट-२०२०) अखेर पुर्ण होणे शक्य होणार नसल्याने M/s Tata Comm यांचेमार्फत सुरू असलेली सदरची सुविधा सुरळीत सुरू राहून साईभक्तांना लॉकडाऊनचे कालावधीमध्ये श्रींचे ऑनलाईन दर्शन उपलब्ध व्हावे, याकरीता M/s Tata Comm यांना याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.०५ ऑगष्ट, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीसमोर सादर करणेत आला होता. मा.तदर्थ समितीचे दि.२८.०८.२०२० रोजीचे सभेमध्ये सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती M/s Tata Comm यांना याकामी एक महिना (सप्टेबर-२०२०) मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली. तसेच, सदर कालावधीत निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देणे शक्य होणार नसल्याचे आढळून आल्यास मुदतवाढीसाठी मा.तदर्थ समितीची चक्रिय पद्धतीने मान्यता घेणेत यावी, असेही निर्देश यावेळी देणेत आले. सदर निर्णयाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी आजपावेतो इकडील विभागास प्राप्त झालेली नाही.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे याकामी सुरू असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा सादर करणेच्या अंतीम दिनांकास पुरेशा ई-निविदा प्राप्त न झाल्यास खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ अन्वये निविदा सादर करणेस द्वितीय वेळेस किमान एक आठवडा मुदतवाढ देणे क्रमप्राप्त ठरणार आहे. निविदा प्रक्रियेअंतर्गत पुढील कार्यवाहीचा विचार करता, तांत्रिक ई-निविदा उघडणे, तांत्रिक निविदांचे अवलोकन करुन निकाल प्रसिद्ध करणे व पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा उघडणे, तद्नंतर येणारे मा.तदर्थ समितीचे सभेसमोर याबाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव सादर करणे व सदर निर्णयानुसार मान्यता मिळणेस्तव मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणे इ. कार्यवाही सप्टेबर-२०२० अखेर पुर्ण होणे शक्य होणार नाही. श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधेस जगभरातील साईभक्तांकडून मिळणारा प्रतिसाद व सद्यस्थितीत साईभक्तांना प्रत्यक्ष दर्शन सुविधा बंद असल्याने श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा M/s Tata Comm यांचेमार्फत सुरळीत सुरू ठेवणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे. सबब, नमुद केलेप्रमाणे याकामी चालू असलेली ई-निविदा पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देणेची कार्यवाही माहे-सप्टेबर-२०२० अखेर पुर्ण होणार नसल्याने M/s Tata Comm यांना याकामी दि.०१.१०.२०२० पासून नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ मिळणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रीय पद्धतीने सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी :- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेसाठी, M/s Tata Comm यांना याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.०५ ऑगष्ट, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीसमोर सादर करणेत आला होता. मा.तदर्थ समितीचे दि.२८.०८.२०२० रोजीचे सभेमध्ये सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती M/s Tata Comm यांना याकामी एक महिना (सप्टेबर-२०२०) मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली. तसेच, सदर कालावधीत निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देणे शक्य होणार नसल्याचे आढळून आल्यास मुदतवाढीसाठी मा.तदर्थ समितीची चक्रिय पद्धतीने मान्यता घेणेत यावी, असेही निर्देश यावेळी देणेत आले. सदर निर्णयाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी आजपावेतो इकडील

विभागास प्राप्त झालेली नाही. सदर निर्देशान्वये, सदरची ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकास कार्यादेश देणेची कार्यवाही सप्टेबर-२०२० अखेर पुर्ण होणे शक्य होणार नाही. त्यामुळे M/s Tata Comm यांचेमार्फत सुरू असलेली सदरची सुविधा सुरळीत सुरू राहून साईभक्तांना लॉकडाऊनचे कालावधीमध्ये श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) उपलब्ध व्हावे, याकरीता याकामी चालू असलेली ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देणेची कार्यवाही माहे-सप्टेबर-२०२० अखेर पुर्ण होणार नसल्याने M/s Tata Comm यांना याकामी दि.०१.१०.२०२० पासून नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ मिळणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रीय पद्धतीने सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेसाठी, मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२९ अन्वये, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस देणेत आलेल्या मान्यतेप्रमाणे ई –निविदा प्रक्रिया राबविणेकामी इकडील विभागाचे दि.३१ जुलै, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार याकामी दि.१७.०८.२०२० ते दि.०७.०९.२०२० या कालावधीत ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली होती. ई-निविदा विषयक जाहिरात दिल्ली, बैंगलौर, हैद्राबाद, चेन्नई व मुंबई या शहरांशी निगडीत इंग्रजी वृत्तपत्रामध्ये एक दिवस प्रसिद्ध करणेत आली होती. तसेच इकडील विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार एकूण ३४ विविध टिव्ही चॅनेल्सला ई-निविदा विषयक ई-मेलद्वारे कळविणेत आलेले होते. परंतू, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा सादर करणेच्या अंतीम तारखेपर्यंत (दि.०७.०९.२०२०) फक्त एकाच निविदाधारकाने ई-निविदा अपलोड केलेली असल्याचे mahatenders.gov.in या वेबसाईटवरील रिपोर्टवरुन आढळून आलेले आहे. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत ई-निविदा सादर करणेचे कालावधीत आवश्यक निविदा प्राप्त न झाल्याने, खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ – (निविदा कालावधीस मुदतवाढ) यास अधिन राहून सदर ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा सादर करणेस प्रथम वेळेस कामाचे ०७ दिवस (दि.०८.०९.२०२० ते दि.१५.०९.२०२०) इकडील विभागाचे दि.०७.०९.२०२० रोजीचे पत्रान्वये मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यानुसार निविदा सादर करणेची अंतीम दिनांक हि १५.०९.२०२० असून तांत्रिक ई-निविदा उघडण्याची दिनांक १७.०९.२०२० हि आहे.

दरम्यानचे कालावधीमध्ये ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठाधारकांना कार्यादेश देणेची कार्यवाही M/s Tata Comm यांना याकामी दिलेल्या मुदतवाढीचे कालावधीत (ऑगष्ट-२०२०) अखेर पुर्ण होणे शक्य होणार नसल्याने M/s Tata Comm यांचेमार्फत सुरू असलेली सदरची सुविधा सुरळीत सुरू राहून साईभक्तांना लॉकडाऊनचे कालावधीमध्ये श्रींचे ऑनलाईन दर्शन उपलब्ध व्हावे, याकरीता M/s Tata Comm यांना याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.०५ ऑगष्ट, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीसमोर सादर करणेत आला होता. मा.तदर्थ समितीचे दि.२८.०८.२०२० रोजीचे सभेमध्ये सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती M/s Tata Comm यांना याकामी एक महिना (सप्टेबर-२०२०) मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली. तसेच, सदर कालावधीत निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देणे शक्य होणार नसल्याचे आढळून आल्यास मुदतवाढीसाठी मा.तदर्थ समितीची चक्रिय पद्धतीने मान्यता घेणेत यावी, असेही निर्देश यावेळी देणेत आले. सदर निर्णयाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी आजपावेतो इकडील विभागास प्राप्त झालेली नाही.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे याकामी सुरू असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा सादर करणेच्या अंतीम दिनांकास पुरेशा ई-निविदा प्राप्त न झाल्यास खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ अन्वये निविदा सादर करणेस द्वितीय वेळेस किमान एक आठवडा मुदतवाढ देणे क्रमप्राप्त ठरणार आहे. निविदा प्रक्रियेअंतर्गत पुढील कार्यवाहीचा विचार करता, तांत्रिक ई-निविदा उघडणे, तांत्रिक निविदांचे अवलोकन करुन निकाल प्रसिद्ध करणे व पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा उघडणे, तद्नंतर येणारे मा.तदर्थ समितीचे सभेसमोर याबाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव सादर करणे व सदर निर्णयानुसार मान्यता मिळणेस्तव मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणे इ. कार्यवाही सप्टेबर-२०२० अखेर पुर्ण होणे शक्य होणार नाही. श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधेस जगभरातील साईभक्तांकडून मिळणारा प्रतिसाद व सद्यस्थितीत साईभक्तांना प्रत्यक्ष दर्शन सुविधा बंद असल्याने श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा M/s Tata Comm

यांचेमार्फत सुरळीत सुरू ठेवणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे. सबब, नमुद केलेप्रमाणे याकामी चालू असलेली ई-निविदा पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देणेची कार्यवाही माहे-सप्टेबर-२०२० अखेर पुर्ण होणार नसल्याने M/s Tata Comm यांना याकामी दि.०१.१०.२०२० पासून नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे व पुढील वार्षिक दरांप्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रीय पद्धतीने सविनय सादर.

Tata Communication Ltd, Mumbai (Tata Sky)

Platform	**1st year**	**2nd year**	**3rd year**	**4th year (Extension)**
DTH (Exclusive)	1,96,00,000/-	1,97,00,000/-	1,98,00,000/-	**1,99,00,000/-**
Mobile & Internet (Exclusive)	19,00,000/-	21,00,000/-	23,00,000/-	**25,00,000/-**
TV Channel (Non-Exclusive)	3,00,000/-	4,00,000/-	5,00,000/-	**6,00,000/-**

निर्णय क्र.४५५/११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डीश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकांना कार्यादेश देईपर्यंत याकामी M/s Tata Communications Ltd., Mumbai यांना देणेत आलेल्या कार्यादेशास मुदतवाढ देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

१२. माहे जानेवारी,२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगस्ट-२०२० चे वेतन आदा करणेबाबत.

प्रस्ताव- विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) काही अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेली आहे. तसेच त्यानंतर काही वाढीव पदांची मान्यता लक्षात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-२) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

(अ-३) या प्रस्तावाचे अनुषंगाने, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये **" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत "** या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

*" .. .. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे **सन २००१ ते २००४** या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या **६३५** कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन **किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन** शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन **निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*

*उपरोक्तप्रमाणे **एकत्रित मासिक वेतन** मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा **संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी** म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

(अ-४) उपरोक्त मा. शासन निर्णयानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन, एकूण ६०१ कंत्राटी कर्मचा-याना नियुक्ती आदेश देणेत आलेले होते, त्यापैकी सेवेत हजर झालेल्या ५९८ कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेले आहेत.

(ब) मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा सदस्य, मा. तदर्थ समिती (सध्या अध्यक्ष, मा. तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी) यांनी दिनांक ०६ जानेवारी, २०२० अन्वये उपरोक्त परिच्छेदांत नमूद केलेल्या कार्यवाहीबाबतची वस्तुःस्थिती मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत कळविलेले होते.

तसेच, मा. तदर्थ समितीचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०० अन्वये परिच्छेदांत नमुद केलेल्या कार्यवाहीबाबत मा. तदर्थ समितीपुढे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी, असा निर्णय घेणेत आलेला होता.

त्यानुसार, उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनानुसार, मा. तदर्थ समितीने खाली नमूद केलेप्रमाणे वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत -

०१. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० / निर्णय क्रमांक १५८

०२. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ०४ मार्च, २०२० / निर्णय क्रमांक १६४

०३. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २७ मार्च, २०२० / निर्णय क्रमांक २०३

०४. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ११ मे, २०२० / निर्णय क्रमांक २३५ व २३६

०५. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ०९ जून, २०२० / निर्णय क्रमांक ३०९

०६. मा. तदर्थ समिती सभा दिनांक १३ जुलै, २०२० / निर्णय क्रमांक ३६०

०७. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २८ ऑगष्ट, २०२० (अद्याप निर्णय प्राप्त कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला नाही)

(क) उपरोक्त निर्णयांपैकी, मा. तदर्थ समितीचे **दिनांक १३ जुलै, २०२०** रोजीचे सभेतील **निर्णय क्रमांक ३६०** मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे –

" .. .. समितीचे सदस्य १) मा. श्री. श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा. श्री. दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक ३) मा. श्रीमती गीता बनकर, सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.

This subject was discussed in detail and each member has expressed views.

This committee, while deciding Subject 1, 2, 43 and 63 on the agenda of the Ad-hoc Committee Meeting dt. 11.05.2020, has thoroughly examined the entire record of the Trust, the scheme of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 and the powers of the Chief Executive Officer to appoint employees.

This Committee has already found that the then Chief Executive Officer could not have appointed employees directly on the Sansthan on contract basis because such power is vested with the Committee constituted under section 13(4) of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004. Since such appointment on contract basis is a policy decision, it ought to have been presented before the Ad-hoc Committee, constituted by Hon'ble High Court.

This Committee has also found that the Sansthan has failed to follow the Government Resolution dt. 07.08.2009, more particularly the terms and conditions under which the said staffing pattern (आकृतीबंध) was approved. The Committee has also found that while issuing Government Resolution dt. 17.09.2019, the Government has called upon

the SAnsthan to follow Government Resolution dt.07.08.2009 of which the reference is found at serial no. 2 under the caption " वाचा."

It is not the case of Sansthan before this Committee that Committee has followed Government Resolution dt. 07.08.2009 by preparing service rules, qualification of entry, promotion etc. In fact Committee has been constituted for preparation of such rules and even this Ad-hoc Committee has given extention to the said Committee to complete the remaining work. ***In the above background, therefore, the appointment orders issued by the then Chief Executive Officer (Shri. Deepak Muglikar) is a piece of paper and cannot be termed as an order under the authority of the Committee as invisaged under section 13(4) of the Act.***

Some of the members of this Committee tried to suggest that ex-post facto approval could be granted to the said order. However, on thorough examination of this proposal, the Committee is unanimous in refusing to grant such ex-post facto approval, more particularly when Government Resolution dt. 07.08.2009 has not been followed by the Trust. In addition to it, giving such ex-post facto sanction for such acts would be protecting the illegality and therefore, should not be approved at the hands of Ad-hoc Committee.

Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020. *This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.*

The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government.

समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.

राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकुण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्यस्थितीत पात्र ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूक ही शासन निर्णयाचे निर्देशानुसार करण्यात आली आहे. तरी सदर आदेशांना कार्योत्तर मान्यता देणे योग्य राहील. "

विषयाची सद्य:स्थिती -

(ड) उपरोक्त मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णयाची प्रत सामान्य प्रशासन विभागास दिनांक ०७ ऑगष्ट, २०२० रोजी सभा कामकाज विभागाकडून प्राप्त झाली. त्यामुळे मा. तदर्थ समितीचे निर्णयात नमुद केलेप्रमाणे, विषयांकित प्रस्तावातील ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना देणेत आलेले नियुक्ती आदेश दिनांक ३१ जुलै, २०२० अखेरपासून रद्द करण्याची कार्यवाही करता आली नाही.

तसेच मा. तदर्थ समितीने प्रशासनास विषयांकित प्रस्तावाबाबत पुनःश्च सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत स्वातंत्र्य दिलेले असल्याने, विषयांकित प्रस्ताव दिनांक २४ जुलै, २०२० रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता, परंतु सभा तहकूब झाल्याने या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. *(याची कारणमीमांसा अशी की, वरील निर्णयाचे अनुषंगाने सभा कामकाज विभागाकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी ४ / ७१६ /२०२०, दिनांक १६ जुलै, २०२० अन्वये मा. तदर्थ समितीचे सदस्यांना विषयसूची पाठवून, समितीची सभा दिनांक २४ जुलै, २०२० रोजी अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत कळविणेत आलेले होते. या सभेच्या विषयसूचीमध्ये विषयांकित प्रस्तावाचा समावेश करणेत आलेला होता.तथापि, मा. तदर्थ समितीचे सदस्य श्री. दिलीप स्वामी,*

अपर आयुक्त, नाशिक यांनी त्यांचेकडील दिनांक २३ जुलै, २०२० रोजीचे पत्राने, उपरोक्त बैठकीस (सभेस) हजर राहणेपासून सवलत मिळणेबाबत विनंती पत्र दिलेले होते. तसेच मा. तदर्थ समितीचे अन्य ०३ सदस्यांपैकी, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे श्री. अरुण डोंगरे (भाप्रसे) यांची बदली मा. शासनाने दिनांक २३ जुलै, २०२० रोजी मुंबई येथे केल्याने आणि त्यांना बदलीचे जागी दिनांक २४ जुलै, २०२० त्वरीत हजर व्हावे लागले. या कारणास्तव मा. तदर्थ समितीची नियोजित दिनांक २४ जुलै, २०२० रोजीची सभा तहकूब करणेत आली असलेबाबत सभाकामकाज विभागामार्फत संबंधितांना कळविणेत आले.)

तसेच, दरम्यानचे कालावधीत, विषयांकित नियुक्ती दिलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांपैकी श्री. भाऊसाहेब आनंदराव थोरात व इतर ०८ यांनी, सर्व कायम कंत्राटी कर्मचारी यांचे वतीने दिनांक २८ जुलै, २०२० रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांना अग्रेषित केलेल्या अर्जाव्दारे, संस्थान प्रशासनाने दिलेल्या नेमणूक आदेशास सहानुभूतीपूर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून संरक्षण देऊन, संस्थान सेवेत नियमित / कायम नेमणूक आदेश मिळणेबाबत विनंती केलेली होती.

उपरोक्त सर्व बाबींस अनुसरुन आणि नमूद केलेल्या कारणांस्तव, मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० अन्वये विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर करावयाचे कार्यवाहीचे अंमलबजावणीसाठी सदर विषयास अंतिम निर्णय होईपर्यन्त मुदतवाढ मिळणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेपुढे विचारार्थ / निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता, तथापि याबाबतचा निर्णय अद्यापपावेतो सामान्य प्रशासन विभागास कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला नाही.

(इ) याव्यतिरिक्त, मा. तदर्थ समितीचे दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेत, कोव्हीड १९ या संसर्गजन्य रोगाचे प्रादुर्भावामुळे मा. शासनाने दिनांक ३१ ऑगष्ट, २०२० अखेर सुरु / सलग ठेवलेली लॉकडाऊनची स्थिती विचारात घेऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कर्मचारी, बाह्यस्त्रोत पध्दतीने / उक्त्या व ठोक पध्दतीने कार्यरत असणारे कंत्राटदाराकडील कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करणेबाबत मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

मा. तदर्थ समितीने या प्रस्तावावरील चर्चेचे वेळेस समक्ष निर्देशीत केलेनुसार, संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत समितीने घेतलेल्या निर्णयावरील कार्यवाही प्रलंबित असल्याने, त्यांचे माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन स्थगित ठेवणेबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजी आदेशित करणेत आलेले आहे.

(ई-१) आता, संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे वतीने, श्री अनिल कचरु कोते व इतर ०३ यांनी दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या व माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन मिळणेबाबत या विषयांतर्गत केलेल्या विनंती अर्जात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

" .. उपरोक्त विषयांस अनुसरुन विनंतीपूर्वक अर्ज करतो की, आमची ५९८ कर्मचा-यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे आस्थापनेवर दिनांक ०२ जानेवारी, २०२० रोजीचे आदेशान्वये कुशल / अकुशल कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिने कालावधीसाठी किमान वेतन दराने नियुक्ती झालेली आहे व त्यानुसार आम्हांस माहे जानेवारी, २०२० ते माहे जुलै, २०२० पर्यन्त प्रत्येक महिन्याला वेतन मिळालेले आहे.

तथापि, आता सामान्य प्रशासन विभाग जा. क्र. एसएसएस / साप्रशा / आस्था / १०३३ / २०२०, दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजीचे आदेशान्वये माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे ऑगष्ट, २०२० चे वेतनाची कार्यवाही स्थगित करणेत आलेली असल्याने आम्हाला माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन अद्यापपर्यन्त मिळालेले नाही. त्यामुळे आम्ही सर्व ५९८ कर्मचारी आर्थिक संकटात सापडलेलो असून आमचे कुंटूंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

तरी मे. साहेबांनी आमच्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करुन आम्हांला माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करावे, ही नम्र विनंती. ५९८ कर्मचारी यांचे वतीने. "

(ई-२) तसेच, मा. तदर्थ समितीने दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० बाबत ५९८ कंत्राटी कर्मचा-यांपैकी १६ कायम कंत्राटी कर्मचारी यांनी सर्व ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांचे वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दिवाणी दावा दाखल केला असलेबाबत, संबंधित कायम कंत्राटी

कर्मचा-यांचे वतीने ॲड. अश्विन व्ही.होन, औरंगाबाद यांनी दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० रोजीचे ई-मेल पत्राने कळविले आहे. त्यात खालीलप्रमाणे नमूद आहे –

".. .. Subject : Writ Petition filed on behalf of Anil s/o Kacharu Kote and Ors. In the Bombay High Court, Bench At Aurangabad.

.. .. Please take note that I have filed a writ petition challenging the resolution passed by Ad-hoc Committee in its meeting dated 13.07.2020 whereby the Ad-hoc Committee has reserved the resolution passed by the regular committee of the Sansthan in discontinuing the services of the petitioners and similarly placed 582 employees before the Hon'ble Bombay Hight Court, Bench At Aurangabad.

The Copy of the petition alongwith all exhibits is served on you as you have been made party respondent No.2. The petition will be taken up for hearing in due course accordingly, attend the same. "

ॲड. होन, औरंगाबाद यांचेकडून दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० रोजी ई-मेलने प्राप्त झालेल्या उपरोक्त पत्रानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजीचे मंजूर टिपणीन्वये आणि पत्र जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/१३७६/२०२०, दिनांक ११ सप्टेंबर, २०२० अन्वये विधीज्ञ ॲड. संजय चौकीदार, औरंगाबाद यांना वकीलपत्र देणेत आलेले आहे.

तसेच, श्री. अनिल कचरु कोते व इतर यांचे वतीने ॲड. होन यांनी दाखल केलेल्या सदरहू दिवाणी दाव्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे अधिकृत संकेतस्थळावरुन माहिती घेणेत आली आहे. त्यानुसार सदर दिवाणी दाव्याचा क्रमांक Stamp No. **WPST/14010/2020** / Reg. No. **WP/6224/2020** / Filing & Reg. **Date 11-09-2020** असा आहे. तसेच सदरहू दिवाणी दाव्याची पुढील सुनावणीची तारीख १४ सप्टेंबर, २०२० अशी दर्शविणेत आलेली आहे. या सुनावणीचे तारखेस झालेल्या कामकाजाबाबतचा कुठलाही आदेश मा. न्यायालयाचे संकेतस्थळावर उपलब्ध झालेला नाही.

तथापि, संस्थान विधीज्ञ ॲड. संजय चौकीदार यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजी पाठविलेल्या ई-मेल पत्राव्दारे असे कळविले आहे की, दिवाणी दावा क्र. ६२२४/२० मध्ये आज रोजी झालेल्या सुनावणीत मा. न्यायालयाने संस्थानचे म्हणणे दाखल करणेसाठी ०३ आठवडयांची मुदत दिलेली असून, दिनांक २८ सप्टेंबर, २०२० अखेर संस्थानचे म्हणणे दाखल करावयाचे आहे. याबाबत संस्थान प्रशासन स्तरावर कार्यवाही सुरु करणेत आली आहे.

(ई-३) मा. शासनाने कोव्हीड १९ या संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी जारी / सलग ठेवलेल्या लॉकडाऊन कालावधीतील माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन, संस्थान आस्थापनेवरील प्रतिनियुक्तीवरील अधिकारी, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी, सुरक्षारक्षक, बाह्यस्त्रोत / उक्त्या व ठोक पध्दतीने कार्यरत असणारे कंत्राटदाराकडील कर्मचारी व इतर यांना आदा करणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

(ई-४) मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० नुसार संस्थान प्रशासनामार्फत अलाहिदा कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

विभागाचा प्रस्ताव– उपरोक्त **परिच्छेद अ** ते **परिच्छेद ई** मध्ये नमुद केलेल्या वस्तुस्थितीस अनुसरुन, तसेच सभा कामकाज विभागाकडील पत्र जा. क्र. १४३२ / दिनांक १५ सप्टेंबर, २०२० अन्वये, ५९८ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत दिनांक १३ जुलै, २०२० रोजी घेतलेल्या निर्णयाचे अंमलबजावणीकामी मार्गदर्शनपर आदेश व्हावेत अशी विनंती करणेत आलेली आहे. विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने संस्थान सेवेत कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेतलेल्या ५९८ कर्मचा-यांचे नियुक्तीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दिवाणी दावा दाखल झाल्याने, सदरची बाब आता न्यायप्रविष्ठ झालेली आहे. सदरहू ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी हे माहे ऑगष्ट, २०२० मध्ये विविध विभागात आवश्यकतेनुसार व गरजेनुसार सेवेत हजर होते. त्यामुळे या कालावधीचे नैसर्गिक न्याय तत्वानुसार वेतन आदा करणे उचित राहील आहे, असे मत आहे.

या सर्व बाबींचा विचार करतां, सदर ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना **माहे ऑगष्ट, २०२०** चे वेतन *(माहे सप्टेंबर, २०२० मध्ये आदा करावयाचे)* विहीत व निश्चित करणेत आलेल्या कार्यपध्दतीनुसार आदा करणेस मान्यता मिळणेकामी, विषयांकित प्रस्ताव चक्रीय पध्दतीने मा. तदर्थ समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी,२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगस्ट-२०२० चे वेतन आदा करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

१३. रुग्णालये विभाग (श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय) कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी व इतर यांचे वाढीव (40%) कपातीबाबत.

प्रस्ताव- **विषयाची पूर्वपीठीका -**

(अ) संस्थान आस्थापनेवर सध्या कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत / ठेकेदारामार्फत कार्यरत असणारे कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांना आदा करावयाचे वेतनाबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे **दिनांक २५ फेब्रुवारी, २०१७** रोजीचे सभेतील **निर्णय क्रमांक १४१** नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे -

".. ..सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतन दरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासून कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहे व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रति दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधित कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचा-यांचा रु. १० लाख पर्यन्तचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना फक्त किमान वेतन देणे बंधनकारक आहे. महागाई निर्देशांकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते, ती कर्मचा-यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चीत करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करुन किमान वेतन निश्चीत केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे ४०% वेतनवाढ भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजूर करणेत आली. "

तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, दिनांक ०१ एप्रिल, २०१७ पासून विहित पध्दतीने काही अटी-शर्तीसह कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेले कुशल, अकुशल, सुरक्षारक्षक आदि कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतनकायद्यानुसार देय्य असणारे किमान वेतन + ४०% वाढीव वेतन आदा करणेत येत आहे.

(ब) मा. तदर्थ समितीचे **दिनांक ११ मे, २०२०** रोजीचे सभेत विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ संदर्भात जो **एकत्रित निर्णय क्रमांक २३५** घेणेत आलेला आहे, **त्यामध्ये कर्मचा-यांचे वेतनाच्या अनुषंगाने प्रामुख्याने खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेले आहेत** –

*" .. .. **34.** The Committee was informed that the employees working with the Trust were awarded incentive 40% to 200% of their salary, apart from minimum wages payable to them. This Committee was informed that such payment of incentive (ranging from 40% to 200%) is pursuant to the decision taken by erstwhile Committee on 25.02.2017.*

***35.** The Chief Executive Officer of the Trust has pointed out that because the temple is closed since 17th March, there is virtually no income to the Trust. He submitted that payment of incentive to such employees including Doctors and paramedical services is not justified because even the O.P.D. in both hospitals as well as admission in the hospital is drastically reduced and has come down to about 1/4th of the regular flow of the patients.*

36.** In the above background, in the peculiar circumstance i.e. lockdown declared by the Central / State Government in view of **Covid-19** and due to huge reduction of the income of the Trust, the Committee is unanimous in taking a decision, **that until further

orders (of the Committee), no incentive be paid to any of the employees of the Trust. *(This be taken as Decision A for clarity)"*

उपरोक्त निर्णयानुसार कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी, कंत्राटी सुरक्षारक्षक व इतर यांना माहे एप्रिल, २०२० पासून **परिच्छेद अ** मध्ये नमुद केलेप्रमाणे तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने लागू केलेली ४० टक्के वेतनवाढ लागू करणेत आलेली नाही, किंबहुना संबंधित कर्मचा-यांना ४० टक्के वेतनवाढीची रक्कम आदा करणेत आलेली नाही, म्हणणे संयुक्तिक ठरेल.
तसेच, रुग्णालये विभागाकडे कार्यरत असणारे वैद्यकिय अधिकारी व इतर यांना विहित नियमानुसार देय्य असणारे प्रोत्साहन भत्ता आदा करणेत आलेला नाही.

विषयाची सद्य:स्थिती -

(क) सोबत, मनुष्यबळ विभाग, रुग्णालये यांनी श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकडे लेबर ठेकेदारामार्फत कार्यरत मेडिकल / पॅरामेडिकल व ॲन्सिलरी कर्मचा-यांचे ४० टक्के वेतन कपातीबाबत दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजी सादर केलेली टिपणी माहितीस्तव व अवलोकनार्थ जोडली आहे.
रुग्णालये विभागाकडील दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजीचे टिपणी खालीलप्रमाणे महत्वाच्या बाबी समाविष्ठ केलेल्या आहेत –

०१. कोव्हीड १९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी, महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार, श्री साईबाबा संस्थानमार्फत संस्थात्मक विलगीकरणे, कोव्हीड सेंटर, डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर हे दिनांक ०४ जून, २०२० पासून सुरु करणेत आलेले आहे.

०२. रुग्णालये विभागामार्फत सध्या खाली नमूद केलेप्रमाणे कोव्हीड १९ ने बाधीत रुग्णांकरीता खालीलप्रमाणे बेडस् (कॉटस्) राखीव ठेवणेत आलेले आहेत –

अ.नं.	**बिल्डींगचे नांव / सेवेचा तपशील**	**सुरु केलेची तारीख**	**उपलब्ध बेडची संख्या**
०१	श्री साई धर्मशाळा A बिल्डींग – संस्थात्मक विलगीकरण	०५/०४/२०२०	२५६ बेडस्
०२	श्री साई धर्मशाळा E बिल्डींग – संस्थात्मक विलगीकरण	३०/०५/२०२०	२५६ बेडस्
०३	श्री साई धर्मशाळा B बिल्डींग – डेडिकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर	०४/०६/२०२०	११४ बेडस्
०४	श्री साई धर्मशाळा F बिल्डींग – कोव्हीड केअर सेंटर	०४/०६/२०२०	११४ बेडस्

०३. रुग्णालये विभागाकडून सध्या उपरोक्त कोव्हीड १९ बाधीत रुग्णांकरीता खालीलप्रमाणे उपचार, औषधे व इतर सुविधा पुरविणेत येत आहेत –

अ.नं.	**तपशील**	**उपलब्धता / सुविधा**
०१	मनुष्यबळ	फिजीशियन (ऑन कॉल) – १ प्रति दिन, भुलतज्ञ (ऑन कॉल) – १ प्रति दिन, ईएनटी सर्जन (ऑन कॉल) -१ प्रति दिन, एक्स–रे टेक्नीशियन (ऑन कॉल) -१ प्रति दिन, लॅब टेक्नीशियन (ऑन कॉल)-१ प्रति दिन, इनचार्ज सिस्टर्स -२ प्रति दिन, स्टाफ नर्स -३६ प्रति दिन, वॉर्ड बॉय- ३६ प्रति दिन, वॉर्ड आया-३६ प्रति दिन, स्वच्छता कर्मचारी -१६ प्रति दिन.
०२	लॅब व इतर तपासण्या	CBC, RFT, RBS, LFT, ABG, ESR, CRP, Sr.Triglisrid, BloodC/S, ECG, CXR, HRTC, CHEST ETC.
०३	औषधे	Tab.Vit C, Tab.Zinc with multivitamin, Tab Cefiximen 200 mlg, Tab. Amaxoclav 625 mlg. Inj. Ceftrixazole 1 gm, Tazobactum / Piperacilln, Inj. MPS.

०४. सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत खालीलप्रमाणे कर्मचारी कार्यरत आहेत -

अ.नं.	**कामाचे स्वरुप**	**श्री साईबाबा हॉस्पिटल संख्या**	**श्री साईनाथ रुग्णालय संख्या**
१	कुशल स्टाफनर्स	७४	५९
२	आऊटसोर्स स्टाफनर्स	०९	३२
३	अकुशल कर्मचारी (वॉर्डबॉय/ वॉर्डआया)	१००	३६
४	कुशल टेक्निशियन (एमआरआय,डायलेसिस, फिजीओथेरपीस्ट)	०४	००
५	कुशल टेक्निशियन	२४	१९
६	कुशल लिपीक	६९	०८
७	कार्यालयीन मदतनीस	२९	०३
एकूण -		**३०९**	**१५७**
श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडील एकत्रित कंत्राटी कर्मचारी संख्या			**४६६**

०५. **रुग्णालय विभागाकडील** दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजीचे **टिपणीमध्ये** खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केलेला आहे -

" .. .. रुग्णालयातील कार्यरत मेडीकल, पॅरामेडीकल व एन्सीलरी कर्मचा-यांनी वेळोवेळी ४०% वेतन कपात न करणेबाबत मागणी केलेली आहे. अशा प्रकारची मागणी इतरही कर्मचारी करु शकतात.

सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात पूर्वीप्रमाणे रुगणांवर वैद्यकीय उपचार करणेत येत आहेत. तसेच कोव्हीड-१९ ने बाधीत रुग्णांवर इलाज करणेकरीता साईधर्मशाळा येथे DCHC व CCC सुरु करणेत आले असुन तेथे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील कर्मचारी पुरविणेत येत असुन इतर विभागातुनही त्या ठिकाणी सेवा घेणेत येत आहे. आता नव्याने DCH सुरु करणेत येत असुन त्या ठिकाणी शासनाकडुन कर्मचारी उपलब्ध न झाल्यास श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील कर्मचा-यांकडून कामकाज करुन घ्यावे लागले.

रुग्णालयांकडील कार्यरत कुशल, अकुशल, मेडीकल, पॅरामेडीकल व ॲन्सीलरी कर्मचा-यांना लॉकडाऊनपुर्वी माहे मार्च पर्यंत ४०% वाढीव वेतन देण्यात येत होते. तरी सध्यास्थितीत प्रामुख्यांने सदर कर्मचा-यांचे कामाचे स्वरुप विचारत घेता त्यांना पुर्वीप्रमाणे ४०% वाढीव वेतन आदा करणे योग्य होईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त विषयावर पुढील कार्यवाही संस्थानचे सध्याची आर्थिक स्थिती विचारात घेऊन आस्थापना विभागामार्फत करणेस मान्यता असावी."

विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव -

(ड) मा. तदर्थ समितीचे **दिनांक ११ मे, २०२०** रोजीचे सभेत विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ संदर्भात जो **एकत्रित निर्णय क्रमांक २३५** घेणेत आलेला आहे, त्यातील **उपनिर्णय क्रमांक २३५(३४)(३५)(३६)** अन्वये कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे सर्वच विभागातील कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी, कंत्राटी सुरक्षा रक्षक व इतर कंत्राटी कर्मचारी यांना तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने मंजूर केलेले ४० टक्के वाढीव वेतन आदा करणेत आलेले नाही. या संबंधित सर्व कंत्राटी कर्मचा-यांना (रुग्णालये विभागाकडील कर्मचारी वगळतां) किमान वेतन दरानुसार, मा. तदर्थ समितीने विहित व निहीत केलेल्या पध्दतीने माहे एप्रिल, २०२० पासून वेतन आदा करणेत येत आहे. यामध्ये रुग्णालये विभागाकडे कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना त्यांचे कामावरील हजर / गैरहजर दिवस विचारात न घेतां, किमान वेतन दरानुसार संपूर्ण ३० / ३१ दिवसांचे वेतन आदा करणेत आलेले आहे / येत आहे.

कोव्हीड १९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. केंद्र व राज्य शासन यांचे स्तरावरुन विविध आरोग्यविषयक उपाययोजना करणेत येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित रुग्णालये विभाग (श्री साईबाबा व श्री साईनाथ) यांचेमार्फत कोव्हीड १९ या संसर्गजन्य रोगाने बाधीत रुग्णांसाठी वैद्यकिय उपचाराचे जोखमीचे काम जबाबदारीने पार पाडणेत येत आहे.

आता, रुग्णालय विभागाकडे कार्यरत असणारे कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी **(परिच्छेद क–०४) मध्ये नमुद एकूण ४६६ (३०९+१५७) कंत्राटी कर्मचारी यांना वाढीव ४० टक्के वाढीव वेतन पूर्वीप्रमाणेच** (म्हणजेच लॉकडाऊनचे कालावधीपूर्वी माहे जानेवारी / फेब्रुवारी / मार्च, २०२० प्रमाणे ज्या कंत्राटी कर्मचा-यांना लागू होते त्याच संबंधित कंत्राटी कर्मचा-यांना) **लागू करणेत यावे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेणेपूर्वी, या निर्णयाचा परिणाम इतर विभागात कार्यरत असणारे कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी, कंत्राटी सुरक्षारक्षक व इतर यांचेवर होणार असल्याने त्याबाबतीत सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे.**

रुग्णालये विभागाकडील **(परिच्छेद क - ०४)** मध्ये नमुद केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांपैकी खालील तक्त्यात नमूद केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांचा कोव्हीड १९ यासह इतर संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे वैद्यकीय उपचारादरम्यान थेट रुग्णांशी संबंध येत असतो –

अ.नं.	**कामाचे स्वरुप**	**श्री साईबाबा हॉस्पिटल संख्या**	**श्री साईनाथ रुग्णालय संख्या**
१	कुशल स्टाफनर्स	७४	५९
२	आऊटसोर्स स्टाफनर्स	०९	३२
३	अकुशल कर्मचारी (वॉर्डबॉय/ वॉर्डआया)	१००	३६
४	कुशल टेक्निशियन (एमआरआय,डायलेसिस, फिजीओथेरपीस्ट)	०४	००
५	कुशल टेक्निशियन	२४	१९
एकूण -		**२११**	**१४६**
श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडील एकत्रित कंत्राटी कर्मचारी संख्या			**३५७**

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे, रुग्णालये विभागाकडील कोव्हीड – १९ या संसर्गजन्य रोगाने बाधीत रुग्णांवर उपचार करतांना, ज्यांचा अशा रुग्णांशी थेट संबंध येतो अशा एकूण ३५७ (२११+१४६) कंत्राटी कर्मचारी यांना ४० टक्के वाढीव वेतन पूर्वीप्रमाणेच (म्हणजेच लॉकडाऊनचे कालावधीपूर्वी माहे जानेवारी / फेब्रुवारी / मार्च, २०२० प्रमाणे रुग्णालये विभागाकडील ज्या कंत्राटी कर्मचा-यांना लागू होते त्याच संबंधित कंत्राटी कर्मचा-यांना) लागू करणेबाबतचा निर्णय धोरणात्मक असल्याने, सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समक्ष चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.४५५/१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालये विभाग (श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय) कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी व इतर यांचे वाढीव (40%) वाढ देण्याबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

१४. कोरोना विषाणूचे (covid-19) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील शिल्लक असलेला (कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवणेत आलेला) बसेन आटयाची विल्हेवाट (Dispose) लावणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)** - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रस्तावना - कोरोना व्हायरस विषाणुंच्या संसर्गामुळे जगभरामध्ये थैमान घातले असुन, भारतामध्येही त्याचा प्रार्दुभाव सुरु झालेला असल्याने सदर आजाराने बाधीत व संशयीत रुग्ण आढळुन आले असुन महाराष्ट्र राज्यामध्ये संबंधित रुग्णाची संख्या जास्त असल्याचे प्रसारमाध्यमांकडील वृत्तावरुन लक्षात येत आहे. सदरचे कारणास्तव महाराष्ट्र शासनाने दि.१७/०३/२०२० रोजीपासुन महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापिठे व धार्मिक स्थळे बंद करणेबाबतच्या सुचना केल्या होत्या. त्याच धर्तीवर शिर्डीमध्येही गर्दी होऊ नये, सदर विषाणुंचा प्रार्दुभाव फैलावु नये यासाठी येणा-या सर्व साईभक्तांना शिर्डीमध्ये न येणेबाबत संस्थान प्रशासनामार्फत आवाहन करण्यात आले होते. त्यासअनुसरुन दि.१७/०३/२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजेपासुन

दर्शनासाठी मंदिर पुर्णतः बंद करण्यात आले होते. त्यावेळी श्रींचे साईभक्तांना दर्शन बंद झाल्यामुळे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील तयार करुन ठेवण्यात आलेले लाडु व बुंदी प्रसाद पाकीटे संस्थानचे कर्मचारी वृंद, शिर्डी पोलीस स्टेशनचे कर्मचारी वृंद, नगरपंचायत शिर्डी चे कर्मचारी वृंद, शिर्डी विमानतळ व रेल्वे स्टेशन कर्मचारी, एसटी कर्मचारी, अहमदनगर पोलीस वृंद, शिर्डी येथील अनाथाश्रम, वृध्दाश्रम, बालसुधारगृह, शिर्डी येथील स्वातंत्र्य संग्राम सैनिक, मिलिटरी, शासकीय कार्यालयीन कर्मचारी व इतरयांना मोफत वाटप करुन, दि.२७/०३/२०२० रोजीचेमा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र. २२० अन्वये, कार्योत्तर मान्यता घेणेत आली होती.

मागील वर्षी श्रींचा श्री रामनवमी उत्सव दि.१२/०४/२०१९ ते दि.१४/०४/२०१९या कालावधी साजरा करणेत आला होता, त्यावेळी दैनंदिन व श्रीरामनवमी उत्सव २०१९ साठी मोतीचुर लाडुसाठी ७६.२० क्विंटल व मोफत बुंदी प्रसादासाठी २९.५६ क्विंटल असे **एकुण १०५.७६ क्विंटल** बेसन आटा तयार करुन त्याचा वापर मोतीचुर लाडु व मोफत बुंदी प्रसाद पाकीटे तयार करणेसाठी करण्यात आला होता.

सन २०२० चा श्री रामनवमी उत्सव दि.०२/०४/२०२० ते दि.०४/०४/२०२० अखेर ०३ दिवस श्रींचा रामनवमी उत्सवाची व उत्सवाचे आगोदर व नंतर साईभक्तांची प्रचंड गर्दी होत असलेने उत्सवाची पुर्वतयारी व दैनंदिन वापरासाठी (बुंदी व लाडु प्रसाद तयार करणेसाठी) जास्तीचे (२१५ गोणी X प्रती गोणी ४० किलो= ८६०० किलो) प्रमाणात दाळ दळुन त्याचे बेसन तयार करुन ठेवण्यात आलेले होते.

श्रींचे साई समाधी मंदिर भक्तांना दर्शनासाठी बंद करणेत आल्याने लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे लाडु व बुंदी प्रसाद तयार करण्याचे काम दि.१७/०३/२०२० रोजीपासुन बंद करण्यात आल्याने सदरचा बेसन आटा (२१५ गोणी X प्रती गोणी ४० किलो = ८६०० किलो) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे शिल्लक होता.

सदर शिल्लक आटयाबाबत दि.०३/०७/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबयांचे कक्षात मा.मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्र.खरेदी अधिक्षक, प्र. अधिक्षक – प्रसादालय विभाग व प्र.अधिक्षक – लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांनी समक्ष चर्चा केली असता, त्यामध्ये सदरचा बेसन आटयाचा शिल्लक साठा हा शितगृहामध्ये ठेवल्यास साधारणतः ०४ महिने कालावधीसाठी सुरक्षित राहु शकतो. सदरच्या कामी शितगृहाचे मालक (औरंगाबाद, अहमदनगर) यांचेकडुन माहिती घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी अशा सुचना करण्यात आल्या.

उपरोक्तप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात झालेल्या चर्चेनुसार सदरचा बेसन आटा अहमदनगर येथील नवकार कोल्ड स्टोरेज, अहमदनगर यांचेकडे ठेवणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ (Adhoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णयझाला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन,कोरोना विषाणूंचे (Covid-19) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे शिल्लक बेसन आटा कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवणेकामी नवकार कोल्ड स्टोरेज, अहमदनगर यांचेकडे पाठविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.१५,१००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

सदरचे निर्णयानुसार लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे शिल्लक असलेला बेसन आटा एकुण ८६.०० क्विंटल (५० कि.ग्रॅ वजनाची एक गोणी येणेप्रमाणे) १७२ नग गोणी चाळुन व ५० Micron ची जिलिटीन बॅगमध्ये भरुन दि.१७/०७/२०२० रोजी संस्थानचे माल वाहतुक वाहन क्र.MH-17, BD-2552 या गाडीमध्ये दुपारी १२.३० वाजता शिर्डी येथुन गेट पास क्र.६८६७, दि.१७/०७/२०२० ने अहमदनगर येथे मे.नवकार कोल्ड स्टोरेज, MIDC अहमदनगर येथे कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवण्यात आलेले असुन, आतापर्यंत सदर बेसन आटयास दळुन ०४ महिने व सदर कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवुन दोन महिने असा एकुण ०६ महिन्यांचा कालावधी झालेला आहे.

दि.०५/०९/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मे.नवकार कोल्ड स्टोरेज, MIDC अहमदनगर येथे जाऊन, बेसन आटयाची समक्ष पाहणी केली असता, सदरचा बेसन आटा व्यवस्थीत ठेवण्यात आलेला असुन, चांगल्या स्थितीमध्ये असल्याचे दिसुन आले. सदरबाबत मे.नवकार कोल्ड स्टोरेज, MIDC अहमदनगर यांचे मालक यांचेशी चर्चा केली असता, सदर माल ज्या स्थितीमध्ये आपण कोल्ड स्टोरेजमध्ये आणुन ठेवलेला आहे, त्याच स्थितीमध्ये तो बरेच दिवस आहे त्याच स्थितीमध्ये राहु शकतो. तसेच सदर बाबत बेसन आटा टिकाऊ क्षमतेबाबत बेसन आटा मिल मालकाकडे चौकशी केली असता, सदर बेसन आटा तयार करुन त्याला ०६ महिने होत आलेले आहेत. त्यामुळे सदर बेसन आटा पुढील काही दिवसांमध्ये खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे सांगितले आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय - सदर बेसन आटयाची ५० कि.ग्रॅ. ची ०१ गोणी कोल्ड स्टोरेजमधुन घेऊन येवुन ते खाण्यायोग्य आहे किंवा नाही याची तपासणी प्रसादालयाचे प्रयोगशाळेमध्ये करुन घेण्यात आली असुन, सदरचा आटा खाण्यायोग्य असलेबाबत अहवाल त्यांनी दिला आहे. त्यानुसार साधारणतः ०५ किलो बेसनाची बुंदी तयार करुन त्याची टेस्ट घेतली असता, सदर आटयापासुन तयार केलेली बुंदी खाण्यायोग्य आहे. तथापि, कोरोना विषाणुंच्या वाढत्या प्राद्रुर्भावामुळे श्रींचे मंदिर भक्तांसाठी यापुढे कधी खुले होईल याबाबत निश्चीती नाही व भविष्यात जरी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी खुले झाल्यास सदरच्या शिल्लक बेसन आटयाची (८५.५० क्विंटल) लाडु व बुंदी प्रसाद तयार करुन दैनंदिन अंदाजे ५००० साईभक्तांना बुंदी व लाडु प्रसाद वाटप करावयाचा ठरल्यास प्रतीदिनी सरासरी ०२ क्विंटल याप्रमाणे वापर करावा लागेल, त्यानुसार सदर बेसन आटा संपविण्यासाठी किमान दिड ते दोन महिन्यांचा अथवा त्यापेक्षाही जास्तीचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बेसन आटयाचे दराबाबत चौकशी केली असता, प्रती क्विंटल रु.७०००/- असे आहे. त्यानुसार लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे शिल्लक असलेल्या ८५.५० क्विंटल बेसन आटयाची आजच्या बाजारभावाने किंमत प्रती क्विंटल रु.७०००/- याप्रमाणे एकुण रुपये ५,९८,५००/- इतकी होत आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे (सध्या कोल्ड स्टोरेज, अ.नगर येथे ठेवणेत आलेला) शिल्लक असलेला ८५.५० क्विंटल बेसन आटयाची लवकरात लवकर योग्य विल्हेवाट (Dispose) लावणेकरीता स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, व्यापारी/बेसन आटा मिलधारक यांचेकडुन कोटेशन मागवुन त्याचीउच्चतमदराने विक्री करता येईल, त्यास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोरोना विषाणूचे (covid-19) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडू व बर्फी प्रसादर निर्मिती विभागाकडील शिल्लक असलेला (कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवणेत आलेला) बसेन आटयाची विल्हेवाट (Dispose) लावणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लाडू बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

१५. अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी ०२ एजन्सींची नेमणूक करण्यात आलेली असून, त्यात मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना संस्थानचे विविध विभागांना कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी ०.०००००००००१% या सर्व्हीस चार्जेस दराने कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

संबंधित लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजूर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

अ. नं.	एजन्सीचे नांव व आदेश	विभागांना दिलेल्या मंजूरी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या			हजेरी पटावरील कंत्राटी कर्मचारी संख्या			प्रति महिना वेतन बिल खर्च
		अकुशल	कुशल	एकूण	अकुशल	कुशल	एकूण	एकूण
१	**मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे.** जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ २३०४ /२०१९, दि.१३.०९.२०१९	६६९	२२३	८९२	३९६	१५३	५४९	१,०९,२३,७५०/-
२	**मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट लि.पुणे** जा.नं.एसएसएस/वशी७ए २३०५/२०१९,दि.१३.०९.२०१९	४०४	४८८	८९२	३००	३९७	६९७	१,४९,३५,१४५/-
एकूण (१ + २) -		१०७३	७११	१७८४	६९६	५५०	१२४६	२,५८,५८,८९५/-

प्रस्तावना:- उपरोक्तप्रमाणे पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.- ०३ (मुंबई, सिकंदराबाद कार्यालयासाठी झोन नं. ०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर व वेतनदरावर ४०% वेतनवाढ धरुन येणारे वेतनदर अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेसह (मालकाचा हिस्सा – १३%) अधिक कंत्राटी अकुशल व कुशल कर्मचा-यांचे वेतनदराचे रक्कमेवर ०.०१% सर्व्हिस चार्ज अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर CGST ९ % + SGST ९ % (एकूण GST १८%) अधिक सानुग्रह अनुदान ८.३३ % , अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रृप इन्शुरन्स प्रिमियम (अंशदान) रक्कम संस्थानकडून देण्यात येते. तसेच दि.०१.१२.२०१८ पासून कंत्राटी अकुशल, कुशल व सरक्षा कर्मचा-यांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगाराचे विनियमन व सेवेच्या शर्ती) कायदा २०१७, दि.०७.०९.२०१७ रोजीचे नोटीफिकेशननुसार साप्ताहिक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यात येत आहेत.

सध्याचे लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची मुदत दि.३०.०९.२०२० अखेर संपूष्टात येत असल्याने, पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थानला दि.०१.१०.२०२० पासून ते दि.३०.०९.२०२१ अखेर या कालावधीसाठी अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदाराची / कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी दि.२८.०८.२०२० रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त संदर्भक्र.०२ अन्वये अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत संस्थानचे www.shrisaibabasansthan.org.in/www.sai.org.in व महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द केलेली आहे, तसेच वर्तमान पत्रातही जाहीरात प्रसिध्द करणेस देण्यात आलेली होती. सदरची जाहीरात दि.०४.०९.२०२० रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली आहे. सदर जाहीरातमध्ये ई-निविदेसंबंधी कागदपत्रे डाऊनलोडींगसाठी दि.०४.०९.२०२० रोजी सकाळी ११.०० वा. पासून उपलब्ध करण्यात आलेले होते. निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम तारीख दि.२४.०९.२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत देण्यात आलेली होती.

तसेच दि.२५.०९.२०२० रोजी सायं. ०५ .०० वाजता तांत्रीक ई-निविदा उघडण्यात आल्या असुन, यामध्ये एकूण ११ निविदाधारकांनी निविदा भरलेल्या असून, सोबत (परिशिष्ठ – अ) जोडले आहे. प्राप्त झालेल्या तांत्रीक ई-निविदा सोबत जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्याचे काम चालू आहे. तदनंतर वाणिज्यीक ई-निविदा उघडणे, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणे, यासाठी काही आणखी कालावधी लागणार असल्याने सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारांना मुदतवाढ द्यावी लागेल असे मत आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- दि.२५.०९.२०२० अखेर तांत्रीक निविदा उघडलेनंतर प्राप्त निविदा धारकांचे कागदपत्रे तपासून, वाणिज्यीक निविदा उघडणे, तुलनात्मक तक्ता सादर करून प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर करुन निर्णय होणे तसेच मा.उच्च न्यायलय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन त्यास मान्यता मिळणे इ. प्रक्रिया पूर्ण करणेस विलंब लागणार आहे. त्यामुळे सदरची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्या आहे तेच ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना आहे त्याच अटी-शर्तीवर व सेवाशुल्कावर (०.०००००००००१%) या दराने अकुशल, कुशल व इतर कंत्राटी कर्मचारी पुरविण्यासाठी मुदतवाढ देता येईल असे मत आहे. त्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.४५५/१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-कामगार विभाग)

---

१६. सन २०२१ या वर्षाकरीता गाईचे शुध्द तुप खरेदी करणेकामी व याकामी येणा-या अंदाजित खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- श्री समाधी मंदिरात साईभक्तांनी दर्शन केलेनंतर संस्थानमार्फत प्रत्येक साईभक्तास मोफत बुंदीप्रसादाचे वाटप केले जाते व लाडू काऊंटरवर लाडू प्रसादही उपलब्ध करुन दिला जातो. तसेच जे साईभक्त श्री साई सत्यव्रत पूजेसाठी उपस्थित असतात त्यांनाही शिरा प्रसाद वाटप केले जाते. यासाठी आवश्यक असणारे शुद्ध तुपाची वार्षीक खरेदी दरवर्षी खरेदी विभागामार्फत ई-निविदा पद्धतीने केली जाते.

सन २०२० वर्षासाठी शुद्ध तुप खरेदीसाठी दि. ३१ डिसेंबर, २०२० अखेरपर्यंत ८,४०० क्विंटल शुद्ध तुप मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर, हरीद्वार, यांचेकडून खरेदीचा निर्णय झालेला आहे. तथापि, माहे एप्रिल, २०२० ते ३१ जुलै, २०२० या कालावधीसाठी कोविड १९ मुळे लॉकडाऊन होते व त्यानंतरही ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत कंटेनमेंट झोनमध्ये लॉकडाऊन आहे. तसेच मंदिरेही भक्तांसाठी बंद ठेवण्यात आलेली आहेत. त्यामुळे संस्थानची लाडू व बुंदी प्रसाद व श्री साई सत्यव्रत पूजा या सेवाही बंद असल्याने शुद्ध तुपाचा माहे एप्रिल ते सप्टेंबर २०२० या कालावधीचा पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मात्र सध्याचे शुद्ध तुप पुरवठादाराची पुरवठा करण्याची मुदत दि.३१ डिसेंबर, २०२० पर्यंत आहे.

सन २०२१ ची शुध्द तूपाची खरेदीची ई-निविदा प्रक्रिया वेळेत होण्याच्या दृष्टीने, संस्थानचे शुद्ध तुपाचे वापर करणारे प्रसादालय, लाडू निर्मिती व मंदीर या विभागांकडून इकडील परिपत्रक क्रं..४४३/२०२०, दि.०६.०७.२०२० अन्वये सन २०२१ साठीची शुद्ध तुपाची मागणी दि.२०.०७.२०२० पर्यंत नोंदविणेबाबत कळविणेत आलेले होते.

प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदीर या विभागांनी विहित मुदतीत शुद्ध तुपाची वार्षीक मागणी खालीलप्रमाणे कळविलेली आहे.

अ.नं.	**विभागांचे नांव**	**सन २०२१ ची वार्षीक मागणी (क्विंटलमध्ये)**
०१	लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग	८,४३०.०००
०२	श्री साई प्रसादालय विभाग	१०.०००
०३	मंदिर विभाग	१३०.०००
	एकूण	८,५७०.०००
	पुर्णांकीत एकुण मागणी	**८,६००.०००**

वरील मागणीचा विचार करता, सन २०२१ या वर्षासाठी शुद्ध तुपाची अंदाजे वार्षीक मागणी ८,६०० क्विंटल निश्चित करावी लागेल.

माहे जानेवारी, २०२० ते ३० जून, २०२० या कालावधीत वरील तीनही विभागांकडून १,९२५ क्विंटल शुद्ध तुपाचा वापर करणेत आलेला आहे, असे त्यांनी कळविले आहे. तथापि, दि. १८ मार्च, २०२० ते दि.३१ ऑगस्ट, २०२० या कालावधीत लॉकडाऊन असल्यामुळे श्री साई सत्यव्रत शिरा प्रसाद, लाडू- बुंदी प्रसाद या सेवा पूर्णतः बंद आहेत. तर प्रसाद भोजन सेवा अंशतः पण अगदी थोड्या प्रमाणात सुरु आहे. त्यामुळे शुद्ध तुपाचा वापर होऊ शकलेला नाही. तथापि, त्यामुळे पुढील वर्षाची शुध्द तूपाची मागणी कमी करता येणार नाही.

सन २०२१ या वर्षासाठी वार्षीक खरेदी करावयाचे ८,६०० क्विंटल शुद्ध तूप खरेदीकामी Estimated Cost काढणेकामी, शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील तरतुद क्र. ३.१.२.२ – खरेदी करावयाच्या वस्तुच्या किंमतीचा अंदाज खालील बाबींच्या आधारे काढण्यात यावा. यामध्ये एकूण विविध ५ बाबी नमूद केलेल्या आहेत. तथापि त्यापैकी अंदाजे किंमत काढणेसाठी अ.नं.३ वर "एक किंवा अधिक संभाव्य विक्रेत्यांकडून घेण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील भाव/किंमत" अशी तरतुद आहे. ती आपल्याला सोईस्कर असल्यामुळे या तरतुदीनुसार विविध उत्पादकांकडून अंदाजे दर मागविणेत येतात व त्या दरांची सरासरी काढून शुद्ध तुपाची Estimated Cost निश्चित केली जाते.

सदर तरतुदीनुसार सन २०२१ साठी संस्थानला ८,६०० क्विंटल गाईचे शुद्ध तुप ४ टप्प्यात तिमाही दर मागवून ई-निविदा पद्धतीने खरेदी करणेसाठी Estimated Cost काढणेसाठी अंदाजे दर कळविणेबाबत एकूण १६ उत्पादकांना ई-मेलद्वारे विनंती करणेत आली होती. त्यास अनुसरुन ४ उत्पादकांनी प्रतिसाद देवून ई-मेल व दुरध्वनीद्वारे कळविलेले अंदाजे दर व त्यांची सरासरी काढून त्याप्रमाणे Estimated Cost निश्चित केली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.नं.	**उत्पादकांचे नांव**	**सरासरी दर (प्रती क्विंटल) रु/पैसे**
०१	हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिद्वार	३१,२७५/-
०२	एस.डी.पी. इंडस्ट्रीज प्रा.लि., दमण	३८,२५०/-
०३	व्ही.एस.पी. डेअरी इंडस्ट्रीज, उमरगांव	३२,०००/-
०४	वास्तु प्युअर घी, सुरत, गुजरात	३७,७२५/-
Estimated Cost **प्रती क्विंटल दर रुपये-**		**३४,८१२/-**

वरील प्राप्त दरांची सरासरी काढता सन २०२१ वर्षाकरीता शुद्ध तुप खरेदीसाठी Estimated Cost रुपये ३४,८१२/- प्रती क्विंटल अशी येत आहे.

विभागाचा अभिप्राय:- सन २०२१ या वर्षाकरीता (माहे जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१) संस्थानला एकुण अंदाजे ८,६०० क्विंटल शुद्ध तुप वार्षिक खरेदी करणेची आवश्यकता आहे. सदर शुद्ध तुप खरेदीसाठी वरील Estimated Cost रु. ३४,८१२/- प्रती क्विंटल दराप्रमाणे अंदाजे रु. २९,९३,८३,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मा. तदर्थ समितीची तसेच त्यानंतर मा.उच्च न्यायालयाचीही मान्यता घ्यावी लागेल. तसेच शुध्द तूप खरेदीसाठी येणारे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामीचा कालावधी, ई-निविदा प्रक्रिया करणेसाठीचा कालावधी,व्हेंडर ऑडीट, चर्चा-वाटाघाटी, शुध्द तुपाची लॅब तपासणी व अंतिम निर्णय या विविध टप्प्यांसाठी आवश्यक असणारा कालावधी याचा सर्वांगीण विचार करता प्रत्येक टप्प्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सदर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे तातडीने सादर होऊन याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे, असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी सन २०२१ करीता (माहे जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१) संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदिर या विभागांसाठी वार्षिक ८,६०० क्विंटल गाईचे शुद्ध तुपाची खरेदी संस्थानचे खरेदी विभागामार्फत ई-निविदा पध्दतीने करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम **रु. २९,९३,८३,२००/-** (अक्षरी एकोणतीस कोटी त्र्यान्नव लाख त्र्याऐंशी हजार दोनशे मात्र) पर्यंतचे अंदाजे खर्चास चक्रीय पध्दतीने मंजुरी मिळणेकामी सविनय सादर.

निर्णय क्र.४५५/१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१ या वर्षाकरीता गाईचे शुध्द तुप खरेदी करणेकामी व याकामी येणा-या अंदाजित खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

१७. भांडार विभागाकडे शिल्लक असलेली चहा पावडर वापर कमी होत असलेमुळे विक्री/परत करणेबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीतर्फे साईभक्तांसाठी संस्थानचे विविध इमारतीमध्ये माफक दरात कॅन्टीन सेवा पुरविली जाते. यामध्ये चहा, कॉफी व दूधाचा समावेश आहे. तसेच कॅन्टीन विभागाकडून दर्शन रांगेत मोफत चहाचे वाटप केले जाते. याकामी आवश्यक असणारे चहा पावडरची खरेदी विभागामार्फत वार्षिक ई-निविदा पद्धतीने खरेदी प्रक्रिया करुन मासिक खरेदी केली जाते. त्याचा साठा भांडार विभागाकडे असतो.

सन २०१९-२० या वर्षांत मे. सोमनाथ काशीनाथ मालपुरे, कळवण, यांचेकडून चहा पावडरची खरेदी करणेत आली होती. तथापि, महाराष्ट्रासह संपूर्ण देशात दि. १८ मार्च २०२० पासून अचानक लॉकडाऊन झाल्यामुळे संस्थानची कॅन्टीन सेवा आज अखेर बंद आहे, त्यामुळे कॅन्टीन विभागासाठी खरेदी करणेत आलेल्या सपट सहयाद्री ब्रॅंडचे चहा पावडरचा खालील तपशिलाप्रमाणे साठा भांडार विभागाकडे सध्या शिल्लक आहे.

अ.नं.	तपशिल	एकूण किलो	प्रती किलो दर	एकूण किंमत	वापराची अंतिम तारीख
०१	सपट सहयाद्री ब्रॅंड चहा पावडर (५ किलो पॅकिंग)	१,५७०	१५९.५१	२,५०,४३०.७०	३१.१२.२०२०
०२		१,२४०	१५९.५१	१,९७,७९२.४०	३१.०१.२०२१
	एकूण-	२,८१०	१५९.५१	४,४८,२२३.१०	-

महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे भक्तांना दर्शनासाठी अदयापपर्यंत खुली करणेत आलेले नाहीत, त्यामुळे श्री साई मंदिरही साईभक्तांना दर्शनासाठी बंद आहे व साईभक्त शिर्डीला येत नसल्यामुळे कॅन्टीन सेवाही बंद आहे. तसेच मंदिर साईभक्तांसाठी खुले झाले तरी भक्तांची संख्या सुरुवातीला काही प्रमाणात मर्यादीत राहील, त्यामुळे कॅन्टीन सेवा सुरू झाली तरीही पूर्वीप्रमाणे पूर्ण क्षमतेने कॅन्टीन सेवा चालू होईल, असे वाटत नाही.

सदर परिस्थिती विचारात घेता, कॅन्टीन विभागाला दि.१७.०९.२०२० रोजीचे पत्रान्वये त्यांना दि.३१.०१.२०२१ पर्यंत किती चहा पावडर लागेल? याची माहिती घेण्यात आली. कॅन्टीन विभागाने त्यांचेकडील शिल्लक चहा पावडर विचारात घेवून दि.३१.०१.२०२१ पर्यंत लॉकडाऊनची परिस्थिती कायम राहील्यास त्यांचेकडील चहा पावडरचा साठा सोडुन अंदाजे ४४० किलो चहा पावडर कॅन्टीन विभागास आवश्यक

असल्याचे कळविले आहे. याबाबत प्र.अधीक्षक, कॅन्टीन विभाग यांचेशी दूरध्वनीवरुन पुन्हा खात्री केली आहे.

प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग, यांचेशी याबाबत चर्चा केली असता, सध्याचे परिस्थितीत दररोज सरासरी ३ ते ४ किलो चहा पावडर वापरली जाते, म्हणजे मासिक १०० किलोचे दरम्यान चहा पावडरची गरज आहे असे दिसते. त्यामुळे भांडार विभागाकडे असलेले एकूण २,८१० किलो चहा पावडर पैकी कॅन्टीन विभागाने लेखी कळविलेले मागणीप्रमाणे ४४० किलो चहा पावडर वजा जाता उर्वरित २,३७० किलो चहा पावडर परत करावी, असे मत आहे. दरम्यान खरेदी विभागाकडून चहा पावडर खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. या प्रक्रियेचा अंतिम निर्णय या महिनाअखेर अगर पुढील महिन्याचे १५ तारखेपर्यंत होईल, अशी अपेक्षा वाटते. त्यामुळे कॅन्टीन सेवा खुली जरी झाली तरी शिल्लक ठेवलेली ४४० किलो चहा पावडर, भक्तांचे मर्यादित संख्येमुळे पुढील वर्षाचे चहा पावडर खरेदीचा अंतिम निर्णय होईपर्यंत पुरेल असे वाटते. इत:पर चहा पावडरची गरज पडल्यास गरजेप्रमाणे परिस्थितीनुरूप खरेदीचा तातडीने प्रस्ताव सादर करुन निर्णय घेता येईल, कारण चहा पावडरचा जादा साठा शिल्लक ठेवला व तो वापरला गेला नाही तर संस्थानचे आर्थिक नुकसान होईल.

दरम्यान पुरवठाधारक मे. सोमनाथ मालपुरे,कळवण, यांना दि.१९.०९.२०२० रोजीचे ई-मेल अन्वये साधारण २,४०० ते २,५०० किलो चहा पावडर संस्थानला बदलून पुढील मुदतीची किंवा बदलून देणे शक्य नसल्यास संस्थानने खरेदी केलेल्या दराने ही चहा पावडर परत घेवून संस्थानला त्याची रक्कम परत करणेबाबत विचारणा केली होती. त्यांनी यासंदर्भात संस्थानला खालीलप्रमाणे २ ई-मेल केले आहेत.

- e-mail dt.23.09.2020:-

Regarding to the above concerned mail

We fell very regret that we cannot further continue the ongoing tender due to the death of the receiver of the tender order Girish Malpure as on 14/5/2020.

Heartily sorry for that

- e-mail dt.25.09.2020:-

Due to the death of Girish Malpure we cannot change and replace the above given contents nor we can take the items back. We kindly request you to return back our deposit with in quick time. Sorry for the inconvenience.

वरील ई-मेल वरुन संस्थानला चहा पावडर पुरवणारे पुरवठाधारक मे. सोमनाथ मालपुरे, कळवण, या फर्मचे प्रोप्रायटर श्री. गिरिश मालपुरे, यांचे दि.१४.०५.२०२० रोजी निधन झाल्याचे समजले व त्यामुळे त्यांचेकडून चहा पावडर परत घेणे अगर बदलून देणे शक्य नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

सदर पुरवठाधारक चहापावडर बदलून अगर परत घेवू शकत नसल्यामुळे पूर्वी संस्थानला सपट चहा पावडर पुरविलेले पुरवठाधारक मे. कुणाल टी सेंटर, यांचेशी संपर्क साधून त्यांना दूरध्वनीवरुन सदर चहा पावडर बदलून देणेची अगर परत घेणेची विनंती केली असता, त्यांनी याकामी २-३ दिवसांनंतर कळवतो असे सांगितले होते. त्यानुसार त्यांचेशी पुन्हा संपर्क केला असता त्यांनी दि.२९.०९.२०२० रोजीचे पत्रान्वये संस्थानला खालीलप्रमाणे कळविले आहे.

"महोदय, मी सपट इन्टरनॅशनल प्रा.लि. मुंबई, यांचे सपट चहा पावडरची तालुका विक्रेती असून मागील गेल्या काही वर्ष संस्थानला टेंडर पद्धतीने चहा पावडरचा पुरवठा केलेला आहे. माझ्याकडे राहाता तालुका व कोपरगांव ग्रामीण शहराची सपट चहाची एजन्सी आहे. संस्थानकडे लॉकडाऊनमुळे डिसेंबर २०२० व जानेवारी २०२१ अखेर मुदत असणारी सपट सह्याद्री चहा पावडर ५ किलो पॅकिंग शिल्लक आहे व ती संस्थानची कॅन्टीन सध्या बंद असल्यामुळे परत करावयाची आहे ती आपण घेणार काय? अशी विचारणा भांडार विभागाकडून दुरध्वनीवरून करण्यात आली होती. वरील विचारणा केल्यानुसार संस्थानकडे असलेली चहा पावडर मी संस्थान टेंडर दराने खरेदी केलेला भावाने खरेदी करण्यास तयार आहे. याकामी जी रक्कम संस्थानला अदा करावयाची आहे ती मी अगोदर भरील मग संस्थानचा माल घेवून जाईल, संस्थानला मला माल द्यावयाचा असल्यास तो लवकर द्यावा म्हणजे मलाही तो मुदत संपण्याच्या आत विकला येईल,कळावे."

शासनाचे कोव्हीड प्रादुर्भावामुळे केलेले लॉकडाऊननंतर अनलॉक-५ झाले तरी धार्मिक स्थळे भक्तांसाठी खुली करण्यात आलेली नाहीत. तसेच धार्मिक स्थळे दर्शनासाठी खुले करण्याचा निर्णय शासन स्तरावर होणार असलेमुळे याकामी किती कालावधी लागेल, याची खात्री देता येणार नाही, त्यामुळे सदर चहा पावडरचे वापराची मुदत संपण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर चहा पावडर त्वरित परत करणे आवश्यक आहे.

संस्थानने ज्या पुरवठादाराकडून चहा पावडरची खरेदी केली तो पुरवठादार सदर चहा पावडर परत घेणेस तयार नसल्यामुळे पुर्वीचे पुरवठादार में. कुणाल टी सेंटर, शिर्डी, यांना चहा पावडर विक्री करता येईल किंवा कसे? याबाबत संस्थानचे जीएसटी कन्सलटंट्, चार्टर्ड अकाऊंटंट श्री.अंदानी, अहमदनगर, यांचेशी याबाबत मोबाईल फोनवर चर्चा केली असता, संस्थानने ज्या दराने चहा पावडर खरेदी केली, त्याच दराने सदर चहा पावडर दुस-या पार्टीला विक्री करणेस हरकत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

विभागाचा अभिप्राय:- वरील शिल्लक २,३७० किलो चहा पावडर परत घेणेबाबत अथवा बदलून घेणेबाबत पुरवठादार मे. सोमनाथ मालपुरे, कळवण, यांचेशी उपलब्ध असलेले त्यांचे मोबाईल नंबरवर संपर्क केला असता, कै.मालपुरे यांची पत्नी यांनी सदर फर्मचे प्रोप्रायटर श्री.गिरिश मालपुरे यांचे दि.१४.०५.२०२० रोजी निधन झाल्यामुळे चहा पावडर परत घेणेबाबत अथवा बदलून देणेबाबत असमर्थता दर्शविलेली आहे. त्यांचेशी पुन्हा दूरध्वनीवरुन चर्चाही केली, मात्र त्यांनी चहा पावडर बदलून देणे अगर पैसे परत करणे या बाबी त्या करु शकत नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सदर २,३७० किलो चहा पावडर संस्थानला पूर्वी चहा पुरविलेले पुरवठादार व सपट चहाचे अधिकृत वितरक मे. कुणाल टी सेंटर, शिर्डी, यांना संस्थानने खरेदी केलेल्या दरात एकूण चहाची किंमत आगाऊ रक्कम स्वीकारुन सदर चहा पावडरची त्वरित विक्री करावी, असे मत आहे. ते स्थानिक असलेमुळे चहा पावडरही ते स्वत: घेऊन जाणेस तयार आहेत.

प्रस्ताव - वरील नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, भांडार विभागाकडे कॅन्टीन विभागाची ४४० किलोची चहा पावडरची मागणी वजा जाता शिल्लक असलेली २,३७० किलो चहा पावडर यासाठीची एकूण किंमत रु. ३,७८,०३८.७० पूर्णांकित रु.३,७८,०३९/- (अक्षरी रुपये तीन लाख अठ्ठयाहत्तर हजार एकोणचाळीस) मात्र पूर्वीचे पुरवठाधारक मे. कुणाल टी सेंटर, शिर्डी, यांचेकडून आगाऊ स्वीकारुन मगच त्यांना चहा पावडर विक्री/ परत करणेस मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने सादर.

निर्णय क्र.४५५/१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागाकडे शिल्लक असलेली चहा पावडर वापर कमी होत असलेमुळे विक्री/परत करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

१८. कोव्हीड १९ चे पार्श्वभुमीवर अहमदनगर जिल्हयाकरीता शिर्डी येथे संस्थानचे निधीतुन गॅस क्रिमॅटोरीयम उभारणेबाबत.

प्रस्ताव- मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक १.१०.२०२० रोजीचे पत्रान्वये " अहमदनगर जिल्हामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असून दैनंदिनरित्या मोठया प्रमाणावर नागरिकांना कोरोनाची बाधा होत असल्याने आढळून येत आहे. जिल्हयामध्ये तालुकास्तरावर, नगरपालिका व महानगरपालिक तसेच अहमदनगर छावणी मंडळामध्ये CCC. DCHC व कोविड हॉस्पीटल कार्यारत आहेत. कोविडची लक्षणे नसलेल्या व सौम्य लक्षणे असलेल्या रुग्णांवर अहमदनगर व इतर कोविड हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी हलविण्यात येते. तसेच कोविड-१९ मार्गदर्शक तत्वानुसार कोरोना मृत व्यक्तींचे अंतिमसंस्कार इलेक्ट्रीक क्रिमॅटोयिम मध्ये करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत जिल्हयात अहमदनगर महानगरपालीका यांचेकडेच इलेक्ट्रीक क्रिमॅटोरियम उपलब्ध आहे. अहमदनगर जिल्हयासाठी एका गॅस क्रिमॅटोरियमची आवश्यकता आहे. जेणेकरुन अहमदनगर महानगरपालिकेवर येणारा कामाचा भार कमी होईल आणि आजूबाजूचे नागरीकांची सोय होईल आणि त्यांची तक्रार राहणार नाही. तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे जिल्हासाठी एक गॅस क्रिमॅटोरियम श्री साई संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे निधीतून शिर्डी मध्ये उपलब्ध करुन देऊन ते शिर्डी संस्थान यांचे मार्फत कार्यरत ठेवणेत यावे." असे कळविलेले आहे.

मागणी:- उपरोक्त मा. जिल्हाधिकारी यांचे सुचने नुसार गॅस क्रिमॅटोरियम उभारणी करीता इंटरनेटद्वारे माहीती घेऊन गॅस क्रिमॅटोरियम उभारणी करणारे पुरवठादार धारक / उत्पादक कॉन्ट्रक्टर यांचेकडून खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेली आहेत.

गॅस क्रिमॅटोरियम **(Gas fired Cremation Furnace) करीता**

अ) **प्राप्त दर**

अ.नं.	पुरवठादारधारकाचे नाव	दिलेले दर	शेरा
१	मे. मेहता ओव्हरसिस, मुंबई	४०,७१,०००/-	सर्व सिव्हिल वर्क केबलींग वर्क, ट्रान्सपोर्ट वगळता.
२	मे. इंडो डायनामिक्स इंडस्ट्री, पुणे	४०,१२,०००/-	सर्व सिव्हिल वर्क केबलींग वर्क, ट्रान्सपोर्ट वगळता.
३	मे. व्हीजन इंटरप्राईजेस, पुणे	३८,७८,६६०/-	सर्व सिव्हिल वर्क वगळता.

४	मे. मनीष इंटरप्राईजेस, ठाणे	२९,६४,०००/-	सर्व सिव्हिल वर्क, ट्रान्सपोर्ट वगळता.
५	मे. कल्याणी इंटरप्राईजेस, पुणे	७२,१६,०००/-	सर्व सिव्हिल वर्क, वगळता
६	मे. वृदांवन फरनेस, सुरेंद्रनगर (गुजरात)	३९,४८,४००/-	सर्व सिव्हिल वर्क, ट्रान्सपोर्ट वगळता
७.	राधिका इंजिनिअर्स, अंबाला (हरीयाना)	३८,२३,१९९/-	सर्व सिव्हिल वर्क, ट्रान्सपोर्ट वगळता
	सरासरी	**४२,७३,३२२/-**	

(उपरोक्त पुरवठाधारकांनी दिलेल्या स्पेशिफिकेशन पाहता सर्वांचे स्पेसिफिकेशन मध्ये थोडे फार बदल आहेत.) उपरोक्त प्राप्त दर सरासरी नुसार गॅस क्रिमॅटोरियमकरीता रक्कम रु. ४२,७३,३२२/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

ब) गॅस क्रिमॅटोरियम (Gas Cremation Furnace) वजन अंदाजे १० ते १२ टन असलेने ते ठेवणेकरीता भक्कम फांऊडेशन तयार करावे लागणार आहे. तसेच १०० फुट उंचीची चिमणी उभरणी करावयाची असलेने त्याकरीताही फांउडेशनची आवश्यकता आहे. त्याकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

अ.नं.	**तपिशल**	**रक्कम रु.**
१	गॅस क्रिमॅटोरियम फर्नेस व चिमणी करीता फांउडेशन व इतर सिव्हील काम	४,००,०००/-

क) गॅस क्रिमॅटोरियम (Gas Fired Cremation Furnace) युनिटमध्ये कंट्रोल पॅनल, सिलींडर, गॅस मिनीफोल्ड, फर्नेस, स्क्रबर, सायक्लॉन, चिमणी असलेने सर्वांचे ऊन, वारा, पाऊस यापासुन संरक्षण होणेकरीता सुमारे ४५ x ३५ x २० फुट साईजचे लोखंडी पत्रा शेडची उभारणी करणे आवश्यक आहे. शेडची उभारणी करणे व तयास फ्लोरींग याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.नं.	तपशिल	रक्कम रु.
१.	गॅस क्रिमॅटोरियम करीता लोखंडी पत्राशेड उभारणी साईज- ४५ x ३५ x २० फुट	११,००,०००/-
	एकुण रक्कम रु.	**११,००,०००/-**

उपरोक्त अ, ब व क यानुसार गॅस क्रिमॅटोरियम (Gas Fired Cremation Furnace) उभारणी कामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.नं.	**तपशिल**	**रक्कम रु.**
१	गॅस क्रिमॅटोरियम (क्रिमेशन, फर्नेस, चेंबर, बर्नर, क्रिमेशन ट्रॉली, ॲश / फर्नेस डोर,ब्रिक्स, कंट्रोल पॅनल, वेट स्क्रबर, चिमणी, गॅस पाईप लाईन, गॅस मेनीफोल्ड, कॉमन हेडर इ. सह)	४२,७३,३२२/-
२	गॅस क्रिमॅटोरियमफर्नेस व चिमणी करीता फांउडेशन व इतर सिव्हील	४,००,०००/-
३	गॅस क्रिमॅटोरियम करीता लोखंडी पत्राशेड उभारणी साईज- ४५ x ३५ x २० फुट या साईजचे पत्रा शेड (फ्लोरींग सह)	११,००,०००/-
	उभारणी करणे एकुण	**५७,७३,३२२/-**

उपरोक्त तक्तानुसार गॅस क्रिमॅटोरियम उभारणी करणे व त्या संबंधीत इतर कामे करणे याकामी एकत्रित रक्कम रु. ५७,७३,३२२/- मात्रचे खर्च अपेक्षीत आहे.

विभागाचा अभिप्राय –

१. उपरोक्त प्रस्तावीत गॅस क्रिमॅटोरियम शिर्डी नगरपंचायतीचे समंतीने नगरपंचायतीचे अमरधाम मधील उपलब्ध जागेवर उभारणी करता येईल.

२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१(२) (दोन) नुसार छाननी समितीचे शिफारशीनुसार व राज्य शासनाचे पुर्व मान्यतेने स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचे मध्ये सुधारणा व वाढ होणेसाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होणेसाठी शिर्डी नगरपंचायतला सहाय्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग करता येईल अशी तरतुद आहे. त्यामुळे सदरची विद्युत शव दाहीनी उभारणीचे कामी येणा-या खर्चास मा. तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करता येईल.

३. सदरचे खर्चास मा. तदर्थ समीतीची मान्यता घेऊन सदर कामाकरीता रक्कम रु. ५० लाखापेक्षा जास्त खर्च अपेक्षीत असलेने याकामी पी. आय. एल. नं. १२०/२०१९ मध्ये सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेता येईल.

४. तसेच सदरची गॅस क्रिमॅटोरियम शिर्डी नगरपंचायती कडे हस्तांतरीत करावयाची असलेने शासन मान्यतेकरीता प्रस्ताव पाठवावा लागेल.

५. गॅस क्रिमॅटोरियम उभारणी तातडीचे असलेने गॅस क्रिमॅटोरियम व त्या अनुषंगीक इतर कामाकरीता ई निविदा न बोलविता तातडीची बाब म्हणून मा. तदर्थ समिती व मा. उच्च न्यायालय यांचे मान्यतेनंतर शासन मंजूरीस अधिन राहून महाराष्ट्र शासनाची शासकिय विभागांनी करावयाचे खरेदीचे कार्यपध्दती नियमावली पुस्तिका मधील तरतुद क्र. ४.५ (तातडीचा आदेश खरेदी प्रक्रिया) नुसार गॅस क्रिमॅटोरियम उभारणी करणा-या कॉन्ट्रक्टर / उत्पादक / पुरवटा धारक यांचेकडून दरपत्रके मागविता येतील.

तरी –

१. उत्तर अहमदनगर जिल्हातील कोवीड १९ या आजाराने मृत पावणारे रुग्णाचे अंत्यविधी करीता शिर्डी नगरपंचायतीचे जागेत गॅस क्रिमॅटोरियम खरेदी करुन उभारणी करणेस तसेच त्याकामी येणा-या खर्चास व याकामी दरपत्रके मागविणेस

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस

३. विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणेस

उपरोक्त अ. नं. १, २, ३ चे कार्यावाहीस चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोव्हीड १९ चे पार्श्वभुमीवर अहमदनगर जिल्हयाकरीता शिर्डी येथे संस्थानचे निधीतुन गॅस क्रिमॅटोरीयम उभारणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

१९. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करुन तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद-

कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-

१) मा व्यवस्थान समिती दि. ०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३६८.

श्री साईनाथ रूग्णालयातील फिजिशियन या महत्वाच्या पदावर अकरा महिने अथवा व्हिजीटींग पध्दतीने इच्छुक उमेदवार आल्यास सेवाप्रवेश नियम, मानधन व प्रोत्साहन भत्ता बाबतचा नियम शिथील करून फक्त फिजिशियन या पदाकरीताच डॉक्टर मिळत नसलेमुळे विशेष बाब म्हणून एकुण रक्कम रू.२,०१,०००/- अक्षरी रू. दोन लाख एक हजार रूपये मात्र इतके मानधन देऊन नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती दि. १४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र ४०.

यावर सविस्तर चर्चा झाली तसेच समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की सदरची पदे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता आवश्यक आहेत. त्याकरीता वैद्यकीय अधिका-यांची खालील प्रमाणे रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करून तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने भरणेस मान्यता देण्यात आली.

श्री साईबाबा हॉस्पिटल		
अ.नं.	पदाचे नाव	भरावयाची पदे
०१	Paedatrician बालरोग तज्ञ	०३
०२	Senior Anesthesiologist वरीष्ठ भुलतज्ञ	०२
०३	Junior Radiologist कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ	०१
०४	Casualty Medical Officer अपघात कक्ष	०४
०५	R.M.O. निवासी वैद्यकीय अधिकारी	१४
श्री साईनाथ रूग्णालय		
०१	मेडिकल ऑफिसर (फिजिशियन) Medical Officer (Physician)	०१
०२	Medical Officer(Anesthesia) मेडिकल ऑफिसर (भुलतज्ञ)	०१
०३	Medical Officer (Sonologist) मेडिकल ऑफिसर (सोनोलॉजिस्ट)	०१
०४	Casualty Medical Officer (CMO) कॅज्युअल्टी मेडिकल ऑफीसर	०२
०५	Resident Medical Officer (RMO) रेसिडेंट मेडिकल ऑफीसर	०५

प्रस्तावना- मा तदर्थ (Ad-hoc) दि. १४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र ४० नुसार, यावर सविस्तर चर्चा श्री साईबाबा रूग्णालयाकडील २४ व श्री साईनाथ रूग्णालयाकडील १० वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करून तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने भरणेस मान्यता देण्यात आली.

तथापि, राज्यशासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३, ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केल्याने करोना विषाणूचा (कोव्हीड१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी, मा तदर्थ (Ad-hoc) दि. १४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र ४० नुसार, रूग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांचे आवश्यक रिक्त पदे भरणेकरीता निश्चित करणेत आलेली दि. २७/०३/२०२० रोजीची वॉक इन इंन्टरव्युव्ह पुढील आदेश होईपावेतो स्थगित करणेत आली आहे.

राज्यशासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३, ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमिमत केलेली आहे. त्याअन्वये तहसीलदार राहाता यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० अन्वये साई आश्रम फेज २ मौजे निमगाव तालुका राहाता येथे दि.०४/०६/२०२० रोजी संस्थात्मक विलगीकरण, कोविड केअर सेंटर, डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर सुरू करण्यात आलेले आहे व दि.११/०९/२०२० पासून डेडीकेटेड कोवीड हॉस्पिटलदेखील सुरू करणेत आले आहे. सदर हॉस्पिटलमध्ये ५५ बेड ऑक्सीजन व ५ बेड व्हेंटीलेटर सुविधा पुरविणेत आलेली आहे. याकरिता श्री साईबाबा संस्थानची इमारत श्रीसाईधर्मशाळा येथे एकुण ४ हॉल राखीव ठेवणेत आलेले आहेत.

कोरोना सेंटर सुरु झालेपासून कोविड रुग्णालयामध्ये खालीलप्रमाणे रुग्णांवर उपचार करणेत आलेले आहे.

माहे	**सी.सी.सी.**	**डी.सी.एच.सी.**	**डी.सी.एच.**
दि.०४/०६/२०२० ते दि. २२/०९/२०२०	१८५३	**१००६**	-
दि.११/०९/२०२० ते दि. २२/०९/२०२०	-	-	**३२**

याबरोबरच पुर्वीपासुन चालत आलेली दोन्ही रुग्णालये (श्री साईनाथ व श्री साईबाबा) नॉन कोविड रुग्णांकरिता २४X ७ कार्यरत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयामध्ये एकुण ३०० बेड कार्यरत असुन यामध्ये ८ आयसीयु बेड, ५ ऑपरेशन थिएटर्स तसेच अत्यावश्यक अशा स्त्रीरोग व बालरोग विभागातील सेवा सुरु आहेत.तसेच श्री साईबाबा रुग्णालयामध्ये एकुण २५० बेड असुन यामध्ये ६० बेड आयसीयु बेड, ८ ऑपरेशन थिएटर्स तसेच अत्यावश्यक अशा कार्डियाक, कार्डिओथोरॅसीक, न्युरो व डायलेसिस विभागातील सेवा सुरु आहेत. सदर दोनही रुग्णालयात दैनंदिन रुग्णांची तपासणी व उपचाराबरोबरच सर्पदंश, विषबाधा, ह्दयविकाराचा झटका, डायलेसिस, अपघात, स्त्रीरोग व बालरोग विभागातील अत्यावश्यक सेवा आजअखेर सुरु आहेत.

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव सुरु झालेपासुन दोनही रुग्णालयामध्ये खालीलप्रमाणे रुग्णांवर उपचार करणेत आले.

श्री साईनाथ रुग्णालय

महिना	**ओपीडी**	**आयपीडी**	**शस्त्रक्रिया**	**तपासण्या (एक्स-रे)**
एप्रिल -२०२०	७४००	१९०	३६	८८९
मे -२०२०	९९४५	२३६	१४७	५५२
जुन-२०२०	९९३८	३३६	२७३	६२३
जुलै-२०२०	१०७५४	३८६	३३५	८६२
ऑगस्ट-२०२०	११६०६	४८०	३३९	९८०
एकुण	**४९६४३**	**१६२८**	**११३०**	**३९०६**

श्री साईबाबा हॉस्पिटल

महिना	**ओपीडी**	**आयपीडी**	**शस्त्रक्रिया**	**तपासण्या (एक्स-रे)**	**सीटी स्कॅन**	**डायलेसिस**
एप्रिल-२०२०	३८८३	३१७	१३७	७१८	२७३	२१२
मे -२०२०	५५८१	४५०	२३२	९७३	४९८	१७०
जुन-२०२०	६१८१	५४०	३०५	११०४	६०७	२०७
जुलै-२०२०	५९२३	४६९	२९२	११५२	९५८	२१६
ऑगस्ट-२०२०	६६२८	५५१	३०६	१०५९	१५७६	१७३
एकुण	**२८१९६**	**२३२७**	**१२७२**	**५००६**	**३९१२**	**९७८**

श्री साईबाबा रुग्णालयामध्ये भरती होणा-या एकुण रुग्णांपैकी ५० % रुग्ण हे आयसीयु विभागातील रुग्ण असुन ते अत्यावश्यक सेवेत मोडत आहेत.तसेच दैनंदिन दोनही रुग्णालयाकडे येणारे रुग्णांपैकी आजपर्यंत एकुण २२५ रुग्ण कोवीड करिता संशयीत म्हणुन आढळुन आलेले आहेत.या रुग्णांना पुढील उपचारा करीता संस्थानच्या CCC व DCHC तसेच अत्यावश्यक रुग्णांना सिव्हील हॉस्पीटल,अहमदनगर येथे पाठविणेत आलेले आहे. सदरचे CCC, DCHC व DCH चालविणेकामी तसेच श्री साईनाथ व श्री साईबाबा रूग्णालयाकरीता आरएमओ, सीएमओ तसेच तज्ञ डॉक्टरांची नितांत गरज भासत आहे.

यादरम्यान श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ०१ न्युरोसर्जन, ०२ सीएमओ, ०३ आरएमओ व तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील ०२ आरएमओ यांनी राजीनामा दिल्याने त्यांच्या जागी वैद्यकीय अधिका-यांची अत्यंत आवश्यकता आहे.

मा तदर्थ (Ad-hoc) दि. १४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र ४० नुसार भरावयाची रिक्त पदे व दरम्यानचे कालावधीत राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदांपैकी आवश्यक भरावयाची पदे असे एकुण आवश्यक भरावयाची पदे खालीलप्रमाणे आहे.

अ नं	पदाचे नाव	मंजुर पदे	भरलेली पदे		एकुण	रिक्त पदे	व्य स समिती दि. १४/०१/२०२० रोजीचे सभेतील मंजुरी	राजीनाम्या मुळे रिक्त झालेली भरावयाची आवश्यक पदे	एकुण भरावयाची पदे	द्यावयाचे मासिक मानधन + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता
			स्थायी	कंञाटी						
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
	श्री साईबाबा हॉस्पिटल									
१	Paedatrician बालरोग तज	३	०	०	०	३	३	०	३	६९००० + नियमानुसार ५०७०० फिक्स प्रोत्साहन भत्ता
२	Neurosurgeon मेंदूविकार तज्ञ	२	०	१	१	१	०	१	१	६९००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता
३	Senior Anesthesiologist वरीष्ठ भुलतज्ञ	६	१	०	१	५	२	०	२	६९००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता
४	Junior Radiologist कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ	२	०	०	०	२	१	०	१	५७००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता
५	Casualty Medical Officer अपघात कक्ष अधिकारी	६	०	०	०	६	४	२	६	५७०००
६	R.M.O निवासी वैद्यकीय अधिकारी	४०	१८	५	२३	१७	१४	३	१७	५७०००
	एकूण (A)						२४	०६	३०	
	श्री साईनाथ रूग्णालय									
१	Medical Officer (Physician) मेडीकल ऑफीसर (फिजिशियन)	२	०	१	१	१	१	०	१	२०१०००

२	Medical Officer (Anesthesia) मेडीकल ऑफीसर (भूलतज्ञ)	१	०	०	०	१	१	०	१	**६९००० + नियमानुसार ५०७०० फिक्स प्रोत्साहन भत्ता**
३	Medical Officer (Sonologist) मेडीकल ऑफीसर (सोनोलॉजीस्ट)	१	०	०	१	१	१	०	१	**५७००० + नियमानुसार ४२००० फिक्स प्रोत्साहन भत्ता**
४	Casualty Medical Officer (CMO) कॅज्युअल्टी मेडीकल ऑफिसर	६	४	०	४	२	२	०	२	**५७०००**
५	Resident Medical Officer (RMO) रेसिडेंट मेडीकल ऑफिसर	१६	८	१	९	७	५	२	७	**५७०००**
	एकुण (B)						**१०**	**०२**	**१२**	
	एकुण (A+B)						**३४**	**०८**	**४२**	

मा व्यवस्थान समिती दि. १४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र ४० श्री साईबाबा रूग्णालयाकडील २४ व श्री साईनाथ रूग्णालयाकडील १० वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करून तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने भरणेस मान्यता देण्यात आली. त्यात श्री साईबाबा रूग्णालयाकडील ०१ न्युरोसर्जन, ०२ सीएमओ, ०३ आरएमओ व श्री साईनाथ रूग्णालयाकडील ०२ आरएमओ पदांचा समावेश करून उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल २४+०६=३० व श्री साईनाथ रूग्णालय १०+०२=१२ अशी एकुण ४२ रिक्त पदे जाहीरातीद्वारे भरणेची अत्यंत आवश्यकता आहे.

तरी तातडीची बाब असल्यामुळे सदरहू प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.४५५/१९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करुन तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

२०. श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५मे.वॅटx२) पवनचक्की यंत्रणेचे वीजविक्री करणेकरीता चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) याठिकाणी सन-**2007** मध्ये अपारंपारिक उर्जा श्रोतापासून विद्युत निर्मिती करणेसाठी मे.सुझलॉन एनर्जी लि. यांचेमार्फत **2.5** मेगावॅट **(1.25**मे.वॅटx **2)** चा पवनचक्की प्रकल्प उभारलेला आहे.

दिनांक 14 ऑगस्ट 2007 रोजी दुपारी 16.00 वाजता प्रकल्प चालू करून कार्यान्वित केलेला आहे. सदर प्रकल्प उभारणीकरीता एकुण रक्कम रुपये 15,39,64,800/-**इतका खर्च आला आहे. आतापर्यंत या प्रकल्पातून जुलै 2020 पर्यंत रु.26,17,18,394/- इतके उत्पन्न प्राप्त झालेले आहे.**

या प्रकल्पापासून निर्माण होणारी वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पुरविली जाते. याकामी श्री साईबाबा संस्थान व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमध्ये वीज विक्रीबाबत दि.**19-04-2008** रोजी करारनामा (**PPA)** करणेत आलेला होता.

सदरच्या जुन्या करारनाम्याची मुदत दि. **14-08-2007** या तारखेपासून पुढे **13** वर्ष होती. त्यानुसार सदर करारनाम्याची मुदत ही दि.**13-08-2020** रोजी संपत असलेबाबत मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी दिनांक **04-05-2020** रोजी ई-मेलद्वारे कळविलेले होते. तसेच त्यांनी पुढील पर्याय उपलब्ध असल्याचे कळविलेले होते.

01). पर्याय क्र. 01:- 3rd party-With this option the generator can sell the power to the consumer having contract demand of 1 MW & above.

02**).** पर्याय क्र. 02:- Captive - It is highly recommended that generator having power consumption requirements with contract demand of 1 MW and above should consider switching to self-use of the generated power.

03). पर्याय क्र.03:- Sale to MSEDCL -You can sale Power to MSEDCL for short term i.e. period from 03 Months to 12 Months.

उपरोक्त प्रमाणे मे. सुझलॉन एनर्जी लि. यांनी तीन पर्याय असल्याचे कळविले होते.

01). पर्याय क्र.01- 3rd Party हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. परंतु संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. त्यामुळे हा पर्याय आपणांस लागू होत नाही.

02). पर्याय क्र.02 – Captive हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता ग्राहकाचा कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. तेव्हा आपण ती विज स्वत:साठी वापरु शकतो. परंतु संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. **त्यामुळे हा पर्याय सध्या आपणांस लागू होत नाही. (परंतू हा पर्याय आपणासाठी मंदिर परिसरातील नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्स मधील सबस्टेशन चालू झाल्यानंतर उपलब्ध होऊ शकतो.)**

03). पर्याय क्र.03 - Sale to MSEDCL सध्या आपणास लागू होऊ शकतो.

त्यामुळे पर्याय क्र. **03 -** Sale to MSEDCL **03** महिने ते **12** महिनेकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारणेस व त्याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन ॲप्लिकेशन करणेस व सध्याचा दर हा रुपये **2.52** प्रति युनिट इतका असून तो स्विकारणेस तसेच **2.5** मेगावॅट **(1.25** मे.वॅट **x 2**) पवनचक्की यंत्रणेचा वीज विक्रीचा (पीपीए) करारनामा करणेस मान्यता मिळणेकामी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचा चक्रीय पध्दतीचा ठराव दि.१०-०८-२०२० रोजी विद्युत विभागास प्राप्त झालेला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

DECISION :

1. The concerned head of the department shall supply the entire record in this regard to the Advocate on Panel of sansthan within 15 days form today for his opinion to achieve financial interest of the Sansthan, Concerned head of the department of the Sansthan shall report the compliance to the committee.

2. The Sansthan is allowed to the into contract with MSEDCL for a period of three months as proposed in the office note.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०२ नुसार दि.१२-०८-२०२० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने करारनामा करण्यात आला आहे. सदर करारनामा करतेवेळेस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेतस्थळावर पुढील प्रत्येक महिन्याची १ तारीख स्विकारत असल्यामुळे करारनामा दि.०१-०९-२०२० ते दि.३०-११-२०२० असा तीन महिने करण्यात आला आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०१ नुसार संस्थान पॅनेल वरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांना वीज विक्रीचे उत्पन्नात संस्थानचे आर्थिक हित साधण्याच्या दृष्टीने दि.२०-०८-२०२० रोजी वींडमिल संबंधीचे कागदपत्र ई-मेल व पत्राव्दारे अवलोकनार्थ पाठविण्यात येऊन त्याबाबतचा अभिप्राय कळविणेबाबत सांगण्यात आलेला होता. त्यानुसार ॲडव्होकेट-श्री.संजय आर.चौकीदार यांनी संस्थानला दि.२८-०८-२०२० रोजी ई-मेल पाठवून पुढीलप्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे.

I HAVE GONE THROUGH THE PAPERS MADE AVAILABLE TO ME VIA E-MAIL. IN MY OPINION, SANSTHAN SHOULD ACCEPT THE RECOMMENDATION OF SUZLON COMPANY STATED IN OPINION DATED MAY 4 2020 WHICH READS THUS

"" 2. CAPTIVE; IT IS HIGHLY RECOMMENDED THAT GENERATOR HAVING POWER CONSUMPTION REQUIREMENTS WITH CONTRACT DEMAND OF 1 MW AND ABOVE SHOULD CONSIDER SWITCHING TO SELF -USE OF THE GENERATED POWER.""

IT IS ADVISABLE TO APPOINT CONSULTANT TO EXERCISE THE ABOVE OPTION WHICH WOULD SAVE LOT OF REVENUE AS SANSTHAN IN NEWLY EXECUTED AGREEMENT SELLING POWER AT RATE LESS THAN 2.50 PAISE PER UNIT WHEREAS PURCHASING POWER AT A RATE OF RS 11 PER UNIT. CONSIDERING ABOVE, IT IS RECOMMENDED TO EXPLORE THE POSSIBILITY OF SELF USE IF IT IS ECONOMICALLY VIABLE BY SOLICITING OPINION OF TECHNICAL EXPERT IN THE FIELD.

AS REGARDS RECOVERY OF OUTSTANDING DUES,AN AGREEMENT OR PROPOSAL SHOULD BE SUBMITTED TO MSEDL FOR ADJUSTMENT OF DUES PAYABLE TO SANSTHAN AS AGAINST BILLS RAISED BY MSEDL. IN THE EVENT IN A SPECIFIED TIME , PROPOSAL SUBMITTED IS EITHER NOT RESPONDED OR REJECTED THEN FURTHER COURSE OF RECOVERY MAY BE RESORTED THROUGH COURT PROCESS.

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे पॅनेलवरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. ॲडव्होकेट श्री.चौकीदार यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाची माहिती मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करणेसाठी विद्युत विभागामार्फत दि.२८-०८-२०२० रोजीच्या टिपणी अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच याबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीच्या दि.२८-०८-२०२० रोजीच्या सभेत चर्चा झालेली आहे. सदर प्रस्तावावर निर्णय होणे बाकी आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०२ नुसार दि.१२-०८-२०२० रोजी दिनांक **01-09-2020** ते दिनांक **30-11-2020** या **03** महिन्याचे कालावधीकरीता **(**Short Term Power Purchase Agreement) नव्याने करारनामा करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा मागील वर्षी दि.**14-08-2019** ते दि.**13-08-2020** या कालावधीकरिता रु. **5.30** प्रति युनिट याप्रमाणे वीज खरेदीचा दर होता.

परंतू आता नव्याने करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा दर हा अत्यल्प म्हणजेच रु**.2.52** प्रति युनिट इतका असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होणार असल्याने सदरचे आर्थिक नुकसान होऊ नये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी दिनांक **12-08-2020** रोजी श्री. मेश्राम**,** अधिक्षक अभियंता**, PPA Section** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि**.,** मुंबई यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली.

त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये श्री. मेश्राम यांनी संगितले की, विंडमीलपासून निर्माण होणारी वीज ही Captive Open Access पध्दतीने संस्थानकरीता वापर करावयाचा ठरल्यास विंडमीलपासून निर्माण होणा-या एकुण वीजेचे युनिट हे श्री साईबाबा संस्थान वापरात असलेल्या एकुण वीज युनिटमधून वजावट होऊन उर्वरीत युनिटचे बील संस्थानला सादर होतील. परंतू वजा होणा-या प्रत्येक युनिटकरीता ट्रान्समिशन चार्जेस, व्हीलींग चार्जेस व इतर अनुषंगिक चार्जेसची आकारणी संस्थानला येणा-या बीलामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत करण्यात येईल.

तसेच संस्थानला विंडमीलपासून निर्माण होणारी वीज Captive Open Access पध्दतीने वापर करावयाचा झाल्यास **संस्थानमार्फत या क्षेत्रातील सल्लागाराची नेमणूक करणे योग्य राहील.** तसेच सध्या चालू असलेल्या करारनाम्याची मुदत संपत असल्याने त्वरीत ऑनलाईन पध्दतीने करारनामा करुन घ्यावा.असे सांगितले.

त्यानुसार दिनांक **01-09-2020** ते दिनांक **30-11-2020** या **03** महिन्याचे कालावधीकरीता **(**Short Term Power Purchase Agreement) नव्याने करारनामा करण्यात आलेला आहे.

तसेच श्री.मेश्राम, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., मुंबई यांचेशी दूरध्वनीवरुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या झालेल्या चर्चेनुसार तसेच मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०१ नुसार संस्थान पॅनेल वरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार संस्थानला विंडमीलपासून निर्माण होणारी वीज Captive Open Access पध्दतीने **संस्थानला थेट वापर करणेकरीता या क्षेत्रातील सल्लागाराची नेमणूक करणेकरीता विद्युत विभागामार्फत मा. तदर्थ (**Ad-hoc) **समितीची मान्यता घेणेकरीता दि.28-08-2020 रोजीच्या टिपणी अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावावर निर्णय होणे बाकी आहे.**

(1). मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी सुचविलेल्या तीन पर्यायापैकी पर्याय क्र. 01 अन्वये 3rd Party हा स्विकारण्याचे झाल्यास किंवा पर्याय क्र. 02 अन्वये Captive Open Access हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता ग्राहकाचा कोणत्याही एक कनेक्शनचा contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. तेव्हा आपण ती विज स्वत:साठी वापरु शकतो अथवा 3rd Party ला सदरची विज विकू शकतो.

परंतू संस्थानचे एकूण **09** नग एच. टी. कनेक्शन्स असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र.	एच.टी.सप्लाय सबस्टेशन	ग्राहक क्रमांक	कॉन्ट्रॅक्ट डिमांड
०१)	मंदिर परीसर सबस्टेशन	१६४८१९००४१३०	५०० केव्हीए
०२)	श्री साई प्रसादालय सबस्टेशन	१६५१८९००६५४०	४५० केव्हीए
०३)	रुग्णालय + साईनगर सबस्टेशन	१६५१८९००४४२६	५८५ केव्हीए
०४)	साई धर्मशाळा सबस्टेशन	१६४५५९००९५२०	३०० केव्हीए
०५)	नविन स्टाफ क्वार्टर सबस्टेशन	१६५१८९००६५३०	७५ केव्हीए
०६)	नविन धर्मशाळा सबस्टेशन	१६५१८९००५४४०	२०० केव्हीए
०७)	साईबाबा भक्तनिवासस्थान सबस्टेशन	१६५१८९००४३७०	२०० केव्हीए
०८)	साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन	१६४५५९००९५१०	३७५ केव्हीए
०९)	साईआश्रम भक्तनिवास ए.सी. सबस्टेशन	१६५१८९०१०११०	५७६ केव्हीए

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे एकुण ०९ एच.टी.सबस्टेशन असून त्यापैकी कोणत्याही एक कनेक्शनचा contract demand हा **1** मेगावॅट होत नाही. त्याकरीता सर्वप्रथम **09** नग एच. टी. कनेक्शनपैकी जे एच. टी. कनेक्शन जवळ जवळ आहेत आणि ते जर एकत्रित केले तर त्यांचा contract demand हा **1** मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त होत असेल तर असे एच. टी. कनेक्शन एकत्रीकरण करावे लागणार आहे. त्याबाबत पाहणी केली असता जवळजवळ असणा-या **01).**साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन याचा contract demand हा **375** के. व्ही.ए. आहे. **02).**साईआश्रम भक्तनिवास ए. सी. याचा contract demand हा **576** के.व्ही.ए. आहे.तसेच **03).**साईबाबा भक्तनिवासस्थान **(500** रुम) याचा contract demand हा **200** के.व्ही.ए. आहे.

सदरचे तिन्ही कनेक्शन जवळ जवळ आहेत. तसेच जर तिन्ही कनेक्शन एकत्रीकरण केले तर त्यांचा एकूण contract demand हा **1151** के. व्ही. ए. इतका होत आहे.

या तीनही कनेक्शनचे एकत्रिकरणाकरीता पुढीलप्रमाणे **(A)** व **(B)** मध्ये नमूद खर्च अपेक्षित आहे.

(A). **(**01).साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन. (02).साईआश्रम भक्तनिवास ए. सी. सबस्टेशन. तसेच (03).साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) सबस्टेशन एकत्रीकरण करणेकरीता आत्ताचे असणारे एच. टी. क्युबिकल मिटर**,** एच. टी. पॅनेल आणि ट्रान्सफॉर्मर बदलून जादा क्षमतेचे एच. टी. क्युबिकल मिटर**,** एच. टी. पॅनेल आणि 1500 के. व्ही. ए. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवावे लागणार आहे. तसेच सदरच्या ट्रान्सफॉर्मरपासून इतर दोन्ही सबस्टेशनला जोडणेकरीता परीसरात खोदाई करुन आर. सी. सी. ह्युम पाईप टाकून त्यामधून केबल्स टाकाव्या लागतील.

उपरोक्तप्रमाणे **01).** साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन. **02).**साईआश्रम भक्तनिवास ए. सी. सबस्टेशन. तसेच **03).**साईबाबा भक्तनिवासस्थान **(500** रुम) सबस्टेशन एकत्रीकरणाकरीता कराव्या लागणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

Sr. No.	**C.S.R. No.**	**Description**	**Qty.**	**Rate**	**Amount**
01)	7-3-12	Supplying & erecting 3 x 185 sq.mm 11 kV, XLPE(E) armoured cable on wall/ceiling or laid in provided trench / pipe in an approved manner as per specification No. CB-HT.	50 Mtrs.	2426.09	01,21,304.50
02)	7-5-2	Providing and erecting Heat shrinkable indoor termination kit for 11 kV (E) XLPE HT cable 3x150 to 185 sq. mm. with necessary material as per specification No. CB-JT/HT	10 Nos.	10459.34	01,04,593.40
03)	6-4-2	Supplying, erecting, testing, commissioning 11 KV H.T. metering cubical (Compact Type) approved by MSEDCL/Licensee fabricated with 2mm.(14 SWG) M.S.sheets with supporting angle and channel, painted with powder coating / epoxy paint of required shade copper bus bar size 25x6 mm electronic security lock and heavy duty mechanical lock, with counter meter for measuring no of times the opening of doors, top side cover (C.T.P.T COVER) interlock with meter doors, epoxy coated 3 nos C.T having required ratio between 5/5A to 100/5A burden 10 VA class 0.5 I.L.12/28/75 KVP epoxy terminal block suitable for	01 No.	1,61,251.94	01,61,251.94

		provided trivector meter, and provision for incoming and outgoing cables etc complete duly tested by Licensee with necessary Test Certificates and erected on provided plinth/ C.C foundation			
04)	5-9-8	Supplying and erecting 11kV, 630A, vacuum circuit breaker of required rating, on provided MS channels / trench / foundation as per specification no SW-HTS / VCB	01 No.	5,99,280 .19	05,99,280.19
05)	Non C. S. R.	Supplying, installation, testing and commissioning 3 phase, 11/0.433kV, 50 Hz., 1500 kVA, indoor type, vaccum cast coil (VCC) dry type cast resin transformer, copper wound , Dyn11 vector group, delta/star connection with additional neutral brought out on load side, for indoor use continuous duty, average temp rise of winding (at Principal Tap) 115°C at ambient temp max 50°C & min -5°C at full load rating, with tapping (with off circuit tap links type tap changer) for off load +5 to -5% @ 2.5% in +2/-2 steps, HV variation, class of insulation H/H, method of cooling AN, no load loss at rated voltage & frequency (+15% IS Tol) 2.20 KW, full load loss at rated current 9.25 kW, with 98.87 % efficiency at full load & 99.11 % at 1/2 full load, with 75 kV peak full wave lightning impulse withstand voltage with complete enclosure having IP 21 Degree of protection, cable box arrangement at HV side & bus duct at LV side ,with rating & diagram plate, base channel,	01 No.	15,00,00 0.00	15,00,000.00

		earthling terminals & WTI scanner with 3 PT-100 sensors, etc. standard accessories complete with test certificate (as per IS:11171 & IS 2026) with necessary permissions of Electrical Inspector as per specification no. SS- TR.			
06)	7-6-7	Supplying & laying (including excavation) 25 cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to 90 cms. below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet).	425 Mtrs.	727.944	03,03,376.20
संस्थानचे कॅन्टीन विभागाचे मागणीप्रमाणे पेपर कप खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेमध्ये ०९ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमंध्ये पात्र ठरलेल्या ०९ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.१५.०७.२०२० रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे.पायल एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचे दर न्युनतम आले आहेत.

पेपर कप खरेदी प्रस्तावाचे कमर्शिअल बीड उघडून सदर विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सभा कामकाज विभागाला दि.२१/७/२०२० रोजी दिलेला आहे. दि.२८.०८.२०२० रोजी झालेल्या सभेत हा विषय अजेंडयावर नव्हता. सदर विषय मा.तदर्थ समितीच्या दि.२७.१०.२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेत अ.नं.१३ वर होता. सदर सभेसाठी पेपर कपचे न्युनतम दरधारक मे.पायल एंटरप्रायजेस, अहमदनगर हे चर्चा वाटाघाटीसाठी दि.२७.१०.२०२० रोजी उपस्थित होते. मात्र काही अपरिहार्य कारणामुळे सदर सभा रद्द झाल्याने यावर निर्णय होऊ शकला नाही. सदर निविदाधारकाने याबाबत खालीलप्रमाणे मेल केलेला आहे.

As meeting held on 27.10.2020 I had come to discuss but due to some reason meeting get cancelled and our discussion is pending. As discussed with Avinash sir we are not able to reduce the cost for paper cup as material rate is on higher side kindly consider the same.

वरील मेलनुसार पेपर कपचे न्यूनतम दरधारक मे.पायल एंटरप्रायजेस, अहमदनगर यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दरामध्ये अजून दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे.

विभागाचा अभिप्राय- पेपर कप खरेदी निविदांचे कमर्शिअल बीड उघडून जवळपास ३ महिन्यांचा कालावधी उलटला आहे. सदर निविदेचा वैधता कालावधी संपलेला आहे. परंतु न्यूनतम दरधारक पेपर कप पुरविणेस तयार आहेत. त्यामुळे सध्या संस्थानला गरज नसली, तरीसुध्दा भविष्यकाळात कॅन्टीन पूर्ववत चालू झालेनंतर साईभक्तांना कॅन्टीन सेवा सुविधा पुरविण्यासाठी याबाबतचा निर्णय त्वरीत होऊन सदर पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणे व करारनामा करुन घेणे ही कार्यवाही लवकर होणे गरजेचे आहे. सदर निविदा १ वर्षांसाठी होती. तथापि लॉकडाऊनमध्ये बराच कालावधी गेल्यामुळे उर्वरीत कालावधीसाठी आवश्यक असलेले परिमाण विचारात घेऊन न्यूनतम दरधारकाला मार्च २०२१ पर्यंतचे कालावधीसाठी पुरवठा आदेश देता येईल.

प्रस्ताव:- मे.पायल एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचा सदर ई-निविदेत पेपर कपसाठी सर्वात कमी म्हणजेच रू.०.३६ पैसे प्रती नग असा आहे. त्यांनी दि.२९.१०.२०२० रोजी दर कमी करणेबाबत मेलव्दारे असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे मे.पायल एंटरप्रायजेस, अहमदनगर यांना पेपर कप प्रती नग रू.०.३६ पैसे दराने पुरवठा आदेश देणेबाबत अंतिम निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी सादर.

निर्णय क्र.४५५/२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता पेपर कप खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

२५. संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी सन २०२०-२१ वर्षाकरीता पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

०१	खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल	पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर
०२	मागणी	१ लिटर व ५०० मिली बॉटल
०३	ई-निविदा प्रसिद्धी	दि.२६.०२.२०२० ते १७.०३.२०२०
०४	वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते?	www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे.
०५	तर तसे, कोणाला पाठविले?	संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ०७ ई-मेल आय डी वर
०६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	दिनांक – २६.०२.२०२० टेक्निकल बीड – २०.०३.२०२० कमर्शियल बीड – २९.०९.२०२०
०७	प्राप्त निविदाकारांची संख्या	०६
०८	पात्र निविदाकारांची संख्या	०६
०९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का.	होय
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का?	होय
११	जर नमुने दिले नाही, तर का.	----

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

Sl.No	Description of Work / Item(s)	No.of Qty	Units	SAI AGRO INDUSTRY	**VEER SAI AGRO INDUSTRIES**	Shri Swami Samarth Distributers	Mundada Foods	RM Foods and Beverages	Neha Beverages
				Rate	**Rate**	Rate	Rate	Rate	Rate
1	1 Litre Bottle (I.S.I.)	21,00,000	Nos.	5.16	**4.90**	5.16	5.39	5.59	5.25
2	500 Ml. Bottle (I.S.I.)	2,70,000	Nos.	3.90	**3.85**	3.90	4.09	4.39	4.00

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर

अ.नं	तपशिल	दर
१	१ लिटर बॉटल	५.३३ पैसे
२	५०० मिली बॉटल	३.९९ पैसे

१४	मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल	-

१५	सध्याची शिल्लक स्थिती	-
१६	मागील खरेदी दर	अ.नं.१३ मध्ये नमूद केलेप्रमाणे
१७	मागील पुरवठादार	मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, टाकळी, श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव व वीर साई ॲग्रो इंडस्ट्रीज, राहाता
१८	सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर	अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे
१९	सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव	मे.वीर साई ॲग्रो इंडस्ट्रीज, राहाता
२०	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का.	होय.
२१	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे.	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी
२२	घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील -	------
२३	मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक	% ने कमी/जास्त
	रु. -- रु. -- रु. --	--
२४	विभागाने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदीसाठी मंजुरी घेतलेली अंदाजे रक्कम रू. १,५१,४२,२००/-	

संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेमध्ये ०६ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमंध्ये पात्र ठरलेल्या सर्व ०६ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.२९.०९.२०२० रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे.वीर साई ॲग्रो इंडस्ट्रीज, राहाता यांचे दर वर गडद व अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आले आहेत.

पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदी प्रस्तावाचे कमर्शिअल बीड उघडून सदर विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सभा कामकाज विभागाला दि.१३.१०.२०२० रोजी दिलेला आहे. सदर विषय मा.तदर्थ समितीच्या दि.२७.१०.२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेत अ.नं.१४ वर होता. सदर सभेसाठी पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर न्युनतम दरधारक मे.वीर साई ॲग्रो इंडस्ट्रीज, राहाता हे चर्चा वाटाघाटीसाठी दि.२७.१०.२०२० रोजी उपस्थित होते. मात्र काही अपरिहार्य कारणामुळे सदर सभा रद्द झाल्याने यावर निर्णय होऊ शकला नाही. सदर निविदाधारकाने याबाबत खालीलप्रमाणे मेल केलेला आहे.

"We had came for meeting on 27/10/20 but due to technical issue meeting was cancelled from saibaba sansthan trust, Shirdi and the rates which we have given in tender will be final there will be no change in rates."

वरील मेलनुसार पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे न्यूनतम दरधारक मे.वीर साई ॲग्रो इंडस्ट्रीज, राहाता यांनी निविदेत दिलेल्या १ लिटर व ५०० मिलीचे न्युनतम दरामध्ये अजून दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे.

विभागाचा अभिप्राय- पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदी निविदांचे कमर्शिअल बीड उघडून जवळपास १.५ महिन्यांचा कालावधी उलटला आहे. सदर निविदेचा वैधता कालावधी संपलेला आहे. परंतु न्यूनतम दरधारक पॅकेज्ड डिंकिंग वॉटर पुरविणेस तयार आहेत. पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे सन २०२०-२१ चे न्यूनतम दर हे सन २०१९-२० चे दरापेक्षा कमी आहेत. त्यामुळे संस्थानला पाण्याची गरज लागली तर मागील वर्षीचे जादा दराने पाणी खरेदी करणे उचित होणार नाही व सध्याचे निविदेचा अंतिम निर्णय झाला नसलेमुळे नवीन दराने पाणी खरेदी करता येणार नाही. त्यामुळे सदर पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणे व करारनामा करुन घेणे ही कार्यवाही लवकर होणे गरजेचे आहे. तथापि लॉकडाऊनमध्ये बराच कालावधी गेल्यामुळे उर्वरीत कालावधीसाठी आवश्यक असलेले परिमाण विचारात घेऊन न्यूनतम दरधारकाला मार्च २०२१ पर्यंतचे कालावधीसाठी पुरवठा आदेश देता येईल.

प्रस्ताव:- मे.वीर साई ॲग्रो इंडस्ट्रीज, राहाता यांचा सदर ई-निविदेत पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे दर सर्वात कमी म्हणजेच १ लिटरसाठी रक्कम रू.४.९० पैसे व ५०० मिलीसाठी रक्कम रू.३.८५ पैसे प्रती नग असे आहे. त्यांनी दि.३०.१०.२०२० रोजी दर कमी करणेबाबत मेलव्दारे असमर्थता दर्शविल्यामुळे मे.वीर साई ॲग्रो इंडस्ट्रीज, राहाता यांना पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर १ लिटरसाठी रू.४.९० पैसे व ५०० मिलीसाठी रक्कम रू.३.८५ पैसे दराने पुरवठा आदेश देणेबाबत अंतिम निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीकडे चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.४५५/२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

२६. संस्थानचे प्रसादालय लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे प्रसादालय, लाडु नर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०२०-२१ वर्षाकरीता लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

०१	खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल	लॅमिनेटेड पेपर पिशवी
०२	मागणी	विविध साईजच्या ६ प्रकारच्या पेपर पिशव्या
०३	ई-निविदा प्रसिद्धी	दि.२६.०२.२०२० ते १७.०३.२०२०
०४	वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते?	www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे.
०५	तर तसे, कोणाला पाठविले?	संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ०६ ई-मेल आय डी वर
०६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	दिनांक – २६.०२.२०२० टेक्निकल बीड – २०.०३.२०२० कमर्शियल बीड – १५.०७.२०२०
०७	प्राप्त निविदाकारांची संख्या	०४
०८	पात्र निविदाकारांची संख्या	०४
०९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का.	होय
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का?	होय
११	जर नमुने दिले नाही, तर का.	सर्व निविदाधारकांनी निविदा भरलेल्या कागदाचे नमुने दिलेले आहेत.

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

Sr.No	Description of Work / Item(s)	Qty	Units	**Star Packaging**	**Savvy packaging Private Limited**	DELIGHT INC	**Hariom Flexipack Industries**
				Rate	Rate	Rate	Rate
1	Size 4.5"x 6.5" Poster Laminated Plain Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal	135	Quintal	12200.00	**11900.00**	13000.00	12000.00
2	Size 6"x 7" Poster Laminated Paper Bags with Barcode, Prasad, 70 GSM, 4 Colour Printing, 2 Side Seal	450	Quintal	**12800.00**	12900.00	13600.00	13800.00
3	Size 5"x 6" Poster Laminated Paper Bags with Barcode, Prasad, 70 GSM, 4 Colour Printing, 2 Side Seal	560	Quintal	**12800.00**	13700.00	13550.00	13700.00
4	Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Food Packet	350	Quintal	12400.00	**12200.00**	13100.00	12500.00
5	Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Shri Sai Satyavrat Prasad	10	Quintal	**12400.00**	15100.00	13100.00	12500.00
6	Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Plain, Size 8"x 10"	5	Quintal	12400.00	15100.00	13100.00	**12000.00**

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर

अ.नं	तपशिल	दर प्रती क्विंटल
१	Size 4.5"x 6.5"	१२,९००/-
२	Size 6"x 7"	१३,८००/-

		३	Size 5"x 6"	१३,७००/-
		४	Size 8"x 10" - Food Packet	१३,३००/-
		५	Size 8"x 10" - Shri Sai Satyavrat Prad	१३,३००/-
		६	Plain, Size 8"x 10"	१३,२००/-
१४	मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल	-		
१५	सध्याची शिल्लक स्थिती	-		
१६	मागील खरेदी दर	-----		
१७	मागील पुरवठादार	मे.स्टार पॅकेजींग, दमण, मे.सॅव्ही पॅकेजींग प्रा.लि., नाशिक, मे.डीलाईट आयएनसी, नाशिक, मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर		
१८	सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर	अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे		
१९	सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव	अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे		
२०	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का.	होय.		
२१	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे.	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी		
२२	घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील -	------		
२३	मागील खरेदी	सध्याचे प्राप्त दर	फरक	% ने कमी/जास्त
	रु. --	रु. --	रु. --	--
२४	विभागाने पेपर पिशवी खरेदीसाठी मंजुरी घेतलेली अंदाजे रक्कम रू. २,१३,०१,३१२/-			

संस्थानचे प्रसादालय, लाडु नर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेमध्ये ०४ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.१५.०७.२०२० रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या आहेत.

पेपर पिशवी खरेदी प्रस्तावाचे कमर्शिअल बीड उघडून सदर विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सभा कामकाज विभागाला दि.२१/७/२०२० रोजी दिलेला आहे. तथापि दि.२८.०८.२०२० रोजी झालेल्या सभेत हा विषय अजेंडयावर नव्हता. सदर विषय मा.तदर्थ समितीच्या दि.२७.१०.२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेत अजेंडयावर अ.नं.१६ वर होता. मात्र काही अपरिहार्य कारणामुळे सदर सभा रद्द झाल्याने यावर निर्णय होऊ शकला नाही. मात्र सदर निविदाधारकांनी खालीलप्रमाणे मेल केलेले आहेत.

निविदाधारकांनी केलेले मेलचा तपशिल खालीलप्रमाणे:-

A. मे.हरीओम फ्लेक्झीपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापूर

We are ready to match L1 price for 8x10 Shri Sai Satyavrat Prasad of rs.12400/- per quintal.

B. मे.डिलाईट आयएनसी, नाशिक

Kindly note that we are not in a position to reduce any rates as of now & accept the tender. The raw material prices have gone up drastically after the lock down. So rather we will take a pass this year if the other suppliers are willing to supply at a better price. Request you to refund the EMD asap. We thank you for all your support & cooperation.

C. मे.सॅव्ही पॅकेजिंग प्रा.लि., नाशिक

Size	L1 Rate	Final Rate
4.5x6.5 Prasad bags	11900/-	11900/-
8x10 Food Packet	12200/-	12200/-

D. मे.स्टार पॅकेजिंग, दमण

We are sending you the final Rate for Tender Id -2020_SAI_ 553849_1. The above rates are as follows.

Size	L1 Rate	Final Rate
6x7 Prasad bags	12800/-	12700/-
5x6 Prasad bags	12800/-	12700/-
8x10 Shri Sai Satyavrat Prasad	12400/-	12400/-

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता व निविदाधारकांनी केलेले मेल विचारात घेऊन प्राप्त वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

अ. ४.५ x ६.५ भाजी पेपर पिशवी व ८x१० नाश्ता पॅकेट पेपर पिशवीसाठी मे.सॅव्ही पॅकेजींग प्रा.लि., नाशिक यांचे दर न्युनतम आहेत मात्र त्यांनी वरील मेलव्दारे निविदेतील दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे.

आ. ६x७ लाडु प्रसाद, ५x६ बुंदी प्रसाद व ८x१० सत्यनारायण पिशवीसाठी मे.स्टार पॅकेजींग, दमण यांचे दर प्रथम न्युनतम आहेत. तथापि सदर निविदाधारक हे महाराष्ट्र राज्याबाहेरील असल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.३.१.२.८ नुसार ६x७ लाडु प्रसाद पिशवीसाठी व्दितीय न्युनतम दरधारक मे.सॅव्ही पॅकेजींग प्रा.लि., नाशिक, ५x६ बुंदी प्रसाद पिशवीसाठी व्दितीय न्युनतम दरधारक मे.डिलाईट आयएनसी, नाशिक व ८x१० सत्यनारायण पिशवीसाठी व्दितीय न्युनतम दरधारक मे.हरीओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर हे प्रथम न्युनतम दरधारक मे.स्टार पॅकेजींग, दमण यांचे दरात सदर संबंधित पिशव्यांसाठी व्दितीय न्युनतम दर असलेल्या प्रथम न्युनतम अगर प्रथम न्युनतम दरधारकाने कमी केलेल्या दराने पिशव्यांचा पुरवठा करणेस तयार असतील तर त्यांना ५० टक्के पिशव्यांचा पुरवठा आदेश दयावा लागेल.

६x७ पिशव्यांसाठी मे.स्टार पॅकेजींग, दमण यांनी ई-निविदेत सादर केलेल्या प्रथम न्युनतम दरामध्ये प्रती क्विंटल रू.१००/- दर कमी केलेले आहेत. त्यामुळे मे.सॅव्ही पॅकेजींग, नाशिक सदर कमी केलेले न्युनतम दरात देणेस तयार आहेत किंवा कसे? याबाबत त्यांना विचारणा करावी लागेल व ते जर प्रथम न्युनतम दरधारकाने कमी केलेले दरात ६x७ पिशवी पुरविणेस तयार असतील तर त्यांना ५० टक्के परिमाणाचा पुरवठा आदेश दयावा लागेल व ते जर तयार नसतील तर पूर्ण परिमाणाचा पुरवठा आदेश मे.स्टार पॅकेजींग, दमण यांना दयावा लागेल.

५x६ पिशवीसाठी मे.स्टार पॅकेजींग, दमण यांनी ई-निविदेत सादर केलेल्या प्रथम न्युनतम दरामध्ये प्रती क्विंटल रू.१००/- दर कमी केलेले आहेत. त्यामुळे मे.डिलाईट आयएनसी, नाशिक हे सदर कमी केलेले न्युनतम दरात देणेस तयार आहेत किंवा कसे? याबाबत त्यांना विचारणा करता आली असती परंतु त्यांनी दि.२७.१०.२०२० चे मेलअन्वये दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे व पुरवठा करणेस तयार नसलेचे कळविले आहे. त्यामुळे पूर्ण परिमाणाचा पुरवठा आदेश मे.स्टार पॅकेजींग, दमण यांना दयावा लागेल.

८x१० श्री साई सत्यव्रत प्रसाद पिशवीसाठी मे.स्टार पॅकेजींग, दमण यांनी ई-निविदेत सादर केलेले प्रथम न्युनतम दर मेलमध्ये कायम ठेवले आहेत. सदर दरामध्ये व्दितीय न्युनतम दरधारक मे.हरिओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांनी दि.२७.१०.२०२० चे मेलव्दारे प्रथम न्युनतम दरधारकाचे दरात सत्यनारायण पिशवी पुरविणेस तयार आहेत. त्यामुळे मे.हरिओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांना ५० टक्के पुरवठा आदेश दयावा लागेल.

इ. ८x१० प्लेन पिशवीसाठी मे.हरीओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे दर न्युनतम आहेत. त्यांनी ८x१० प्लेन पिशवीसाठी दुरध्वनीव्दारे दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे. तथापि त्यांना पुन्हा विचारणा करता येईल. सदर दरधारकाने दर कमी केले तर कमी केलेल्या दराने व जर दर कमी केले नाही तर निविदेतील न्युनतम दराने त्यांना पुरवठा आदेश दयावा लागेल.

विभागाचा अभिप्राय- सदर ई-निविदेस लॉकडाऊनमुळे खुपच उशीर झालेला आहे. तसेच मा.तदर्थ समितीचे दि.२७.१०.२०२० चे सभेत हा विषय सादर करण्यात आला होता. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे सदर सभा रद्द झाली होती. त्यामुळे संस्थानला सध्या गरज नसली तरी याबाबत अंतिम निर्णय होणे तसेच पुरवठा आदेश देऊन करारनामा करून घेणे गरजेचे आहे. म्हणजे गरजेप्रमाणे पिशव्यांची खरेदी करता येईल. पुरवठा आदेश देतांना लॉकडाऊन कालावधीसाठीच्या पिशव्या कमी करून पुरवठा आदेश देता येईल.

प्रस्ताव:-

१. ४.५ x ६.५ भाजी पिशवी व ८x१० नाश्ता पॅकेट पिशवीसाठी मे.सॅव्ही पॅकेजींग, नाशिक यांचे दर न्यूनतम आहेत. तथापि त्यांनी सदर दोन्ही पिशव्यांचे दरात अजून दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे सदर दोन्हीही पिशव्यांसाठी मे.सॅव्ही पॅकेजींग, नाशिक यांना निविदेतील न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेस,

२. ६x७ पिशवीसाठी मे.स्टार पॅकेजींग, दमण यांचे दर प्रथम न्युनतम आहेत व त्यांनी दि.२८.१०.२०२० चे मेलव्दारे प्रती क्विंटल रू.१००/- दर कमी केले आहे. परंतु ते महाराष्ट्र राज्याबाहेरील असल्यामुळे व्दितीय न्युनतम दरधारक मे.सॅव्ही पॅकेजींग, नाशिक यांना मे.स्टार पॅकेजींग,दमण यांनी कमी केलेले दरात ६x७ पिशवी पुरविणेस तयार आहेत किंवा कसे? याबाबत विचारणा करणेस व ते जर पुरविणेस तयार असतील तर ५० टक्के पुरवठा आदेश त्यांना देणेस व पुरवठा करणेस तयार नसतील तर पूर्ण परिमाणाचा पुरवठा आदेश मे.स्टार पॅकेजींग, दमण यांना देणेस,

३. ५x६ पिशवीसाठी मे.स्टार पॅकेजींग, दमण यांचे दर प्रथम न्युनतम आहेत. तसेच त्यांनी दि.२८.१०.२०२० चे मेलअन्वये प्रती क्विंटल रू.१००/- कमी केलेले आहेत. तसेच द्वितीय न्युनतम दरधारक मे.डिलाईट आयएनसी, नाशिक यांनी दि.२७.१०.२०२० चे मेलअन्वये प्रथम न्युनतम दरधारक यांचे दरात पिशवीचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे सदर पिशवीचे पूर्ण परिमाणाचा पुरवठा आदेश मे.स्टार पॅकेजींग, दमण यांना देणेस,

४. ८x१० पिशवीसाठी मे.स्टार पॅकेजींग,दमण यांचे दर प्रथम न्युनतम आहेत ते महाराष्ट्र राज्याबाहेरील असल्यामुळे त्यांचे दरात मे.हरिओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांनी प्रथम न्युनतम दरधारकांचे दरात सदर पिशवीचा पुरवठा करणेस तयार असल्याचे दि.२७.१०.२०२० चे मेलअन्वये कळविले आहे. त्यामुळे सदर पिशवीसाठी मे.हरिओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांना ५० टक्के पुरवठा आदेश देणेस,

५. ८x१० प्लेन पिशवीसाठी मे.हरिओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे दर न्युनतम आहेत त्यांना सदर दर कमी करणेस विचारणा करून त्यांनी दर कमी केल्यास कमी केलेले दरात अगर कमी न केल्यास निविदेतील न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेस,

वरील १ ते ५ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय चक्रीय पध्दतीने मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४५५/२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रसादालय लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

२७. संस्थानचे मंदिर विभागासाठी उदी पॅकेट पॅकिंगकरीता प्लॅस्टिक रोल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे मंदिर विभागासाठी उदी पॅकेट पॅकिगकरीता प्लॅस्टिक रोल खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

०१	खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल	उदी पॅकेट पॅकिगकरीता प्लॅस्टिक रोल
०२	मागणी	७,००० किलो
०३	ई-निविदा प्रसिद्धी	प्रथम कालावधी दि.०९.०७.२०२० ते २२.०७.२०२० पहिली मुदतवाढ दि. २२.०७.२०२० ते ३१.०७.२०२०
०४	वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते?	www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे.
०५	तर तसे, कोणाला पाठविले?	संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ०७ ई-मेल आय डी वर
०६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	दिनांक – ०९.०७.२०२० टेक्निकल बीड – ०७.०९.२०२० कमर्शियल बीड – २९.०९.२०२०
०७	प्राप्त निविदाकारांची संख्या	०३
०८	पात्र निविदाकारांची संख्या	०३

०९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का.	होय
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का?	होय
११	जर नमुने दिले नाही, तर का.	--
१२	निविदाकारांनी सादर केलेले दर –	

Sl.No	Description of Work / Item(s)	No.of Qty	Units	tar Packaging	**Hariom Flexipack Industries**	YUVA POLYPRINT AND PACKAGING IND
				Rate	**Rate**	Rate
1.00	PLASTIC ROLL - PRINTED AND LAMINATED MULTILAYERED FILM UDI ROLLS ROLLS Width- 90MM (+- 1MM) 55 MICRONS ROLL Dia 285 MM ~ (OD) ROLL Length 1700~ MTRS ROLL WEIGHT 7 KGS (+- 1kg) GSM 56.4 (+- 5%) Pouches per kg- 3900 pouches (+- 50 pouches) (To be printed the name on roll as Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi & श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी)	7000	KG	195.00	**178.59**	206.79

१३	यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर	रू. १७९/-
१४	मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल	-
१५	सध्याची शिल्लक स्थिती	-
१६	मागील खरेदी दर	रू. १७९/-
१७	मागील पुरवठादार	मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर
१८	सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर	अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे
१९	सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव	मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर
२०	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का.	होय.
२१	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे.	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी
२२	घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील -	------
२३	मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त	
	रु. -- रु. -- रु. -- --	
२४	विभागाने उदी पॅकेट पॅकिगकरीता प्लॅस्टिक रोल खरेदीसाठी मंजुरी घेतलेली अंदाजे रक्कम रू. १४,००,०००/-	

संस्थानचे मंदिर विभागासाठी उदी पॅकेट पॅकिगकरीता प्लॅस्टिक रोल खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेमध्ये ०३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या सर्व ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.२९.०९.२०२० रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे दर वर गडद व अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आले आहेत.

उदी पॅकेट पॅकिगकरीता प्लॅस्टिक रोल खरेदी प्रस्तावाचे कमर्शिअल बीड उघडून सदर विषय मा.तदर्थ

समितीचे सभेपुढे चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सभा कामकाज विभागाला दि.१३.१०.२०२० रोजी दिलेला आहे. सदर विषय मा.तदर्थ समितीच्या दि.२७.१०.२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेत अ.नं.१६ वर होता. सदर सभा काही अपरिहार्य कारणामुळे रद्द झाली होती व मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर हे उपस्थित नव्हते परंतु त्यांनी याबाबत खालीलप्रमाणे मेल केलेला आहे.

With reference to above subject-we are discounting of rs.0.59/- per kg.

वरील मेलनुसार उदी पॅकेट पॅकिंगकरीता प्लॅस्टिक रोल न्यूनतम दरधारक मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर ०.५९ पैसे कमी करणेस तयार असलेबाबत कळविले आहे. त्यांचा निविदेतील दर १७८.५९ पैसे होता तो त्यांनी पुर्णांकित रू.१७८/- प्रती किलो असा केला आहे.

विभागाचा अभिप्राय- सध्या संस्थानला गरज नसली, तरीसुध्दा भविष्यकाळात मंदिर पूर्ववत चालू झालेनंतर साईभक्तांना उदी पॅकेट वाटपासाठी याबाबतचा निर्णय त्वरीत होऊन सदर पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणे व करारनामा करुन घेणे ही कार्यवाही लवकर होणे गरजेचे आहे.

प्रस्ताव:- मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचा सदर ई-निविदेत उदी पॅकेट पॅकिंगकरीता प्लॅस्टिक रोल दर सर्वात कमी रक्कम रू.१७८.५९ पैसे असा होता. त्यांनी याबाबत दि.२७.१०.२०२० रोजीचे मेलव्दारे ०.५९ पैसे कमी केले आहेत म्हणजेच आता त्यांचे दर रू.१७८/- आहे. त्यामुळे मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांना उदी पॅकेट पॅकिंगकरीता प्लॅस्टिक रोल खरेदीकामी रू.१७८/- दराने पुरवठा आदेश देणेबाबत अंतिम निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीकडे सभेत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी सादर.

निर्णय क्र.४५५/२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मंदिर विभागासाठी उदी पॅकेट पॅकिंगकरीता प्लॅस्टिक रोल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

२८. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ मिळणेबाबत मा.अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांचेकडील जा.क्र.डी.४७/इमारत/शिर्डी/भाडे करारनामा/२०२०-२१, दि.०४.०९.२०२०.

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.४/३ मधील साईउद्यान इमारतीतील १५९९.४१ चौ.फूट जागा शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता यापूर्वी खालील तक्त्यात नमूद कालावधीसाठी वापरास देणेत आलेली आहे.

अ.नं.	मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेचा दिनांक व ठराव	करारनामा केलेचा कालावधी
१	दि.१३/१२/२००३ निर्णय क्रं.५९०	दि.१८/१२/२००३ ते दि.१७/११/२००४
२	दि.२७/१२/२००४ निर्णय क्रं.१६६	दि.१८/११/२००४ ते दि.१७/१०/२००५
३	दि.१४/१२/२००५ निर्णय क्रं.७७०	दि.१८/१०/२००५ ते दि.१७/१०/२०१०
४	दि.२६/०३/२०११ निर्णय क्रं.२३९	दि.१८/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११
५	दि.२४/०९/२०११ निर्णय क्रं.७३४	दि.१७/१०/२०११ ते दि.१६/१०/२०१२

६	दि.२६/०२/२०१३ निर्णय क्रं.१७९,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लिकेशन नं.९४२२/२०१३ मधील दि.१३/०८/२०१३ रोजीचा आदेश	दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३
७	दि.०५/०६/२०१४ निर्णय क्रं.४३२,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२९/२०१४ मधील दि.२२/१२/२०१४ रोजीचा आदेश	दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४
८	दि.३०/११/२०१६ निर्णय क्रं.७६५	दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५ दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६ दि.१७/१०/२०१६ ते दि.१६/१०/२०१७
९	दि.०८/१२/२०१७ निर्णय क्रं.१०४४	दि.१७/१०/२०१७ ते दि.१६/१०/२०१८
१०	दि.१३/१२/२०१८ निर्णय क्रं.७३६	दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/१०/२०१९
११	दि.०४/१२/२०१९ निर्णय क्रं.५०३	दि.१७/१०/२०१९ ते दि.१६/१०/२०२०

पोस्ट ऑफीससाठी वापरास दिलेल्या उपरोक्त जागा वापराची मुदत दि.१६/१०/२०२० रोजी संपत असल्याने मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.०४/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त जागा वापराची पुढील मुदत दि.१७/१०/२०२० ते दि.१६/१०/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठीची मुदतवाढ मिळणेकामी व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामी इकडेस विनंती केलेली आहे. मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांनी त्यांना शिर्डी येथील पोस्ट ऑफीससाठी वापरास दिलेल्या संस्थानच्या उक्त जागेचे भाडे माहे ऑगस्ट २०२० अखेरचे संस्थानला अलाहिदा अदा केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय - मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांचे उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अनुषंगाने पोस्ट ऑफीससाठी वापरास दिलेली मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची जागा स.नं.४/३ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पैकी साईउद्यान इमारतीमधील दोन हॉल (क्षेत्र १५९९.४१ चौ.फूट) इतकी जागा वापराची पुढील मुदत दि.१७/१०/२०२० ते दि.१६/१०/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी FRAC (Fixed Rent Assessment Committee) प्रमाणे दरमहा रक्कम रु.१२,३८५/- इतके भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर जागा वापरास मुदतवाढ देता येईल व पूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- मा.अधिक्षक,डाकघर, श्रीरामपूर यांचे पोस्ट ऑफीससाठी वापरास दिलेली मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची जागा स.नं.४/३ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पैकी साईउद्यान इमारतीमधील दोन हॉल (क्षेत्र १५९९.४१ चौ.फूट) इतकी जागा वापराची पुढील मुदत दि.१७/१०/२०२० ते दि.१६/१०/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी FRAC (Fixed Rent Assessment Committee) प्रमाणे दरमहा रक्कम रु.१२,३८५/- इतके भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर जागा वापरास मुदतवाढ देणेच्या व पूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

२९. **मौजे शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी रेल्वे विभागास विनामुल्य वापरास दिलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम्सच्या वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर, सोलापुर यांचेकडील पत्र क्र.जा.नं.SUR/ C/518/SNSI/ PRS/2020, दि.१४.०७.२०२०.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सिटी सर्वे नं.११९ क्षेत्र ६८७.८ चौमी.मधील सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील रेल्वे विभागास वापरास दिलेल्या ५ खोल्या अ.नं.५६ व ७९ यांची एकत्रित लांबी ३ मी. व रुंदी ५.२९ मी. असे एकूण क्षेत्रफळ १५.८७ चौमी. या दोन खोल्यांच्या संबंधात यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्रं.४९६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"साईभक्तांचे सोयीसाठी रेल्वे बुकींग काऊंटर सुरु ठेवणेकामी रेल्वे विभागास संस्थानचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीतील दोन खोल्या विनामुल्य,पूर्वीच्याच अटी व शर्तीवर वापरास दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०८/२०२० या ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले."

उपरोक्त निर्णयाप्रमाणे दि.०४/०२/२०२० रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत दि.१४/०८/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील ११ महिन्यासाठीची उक्त जागा वापराची मुदतवाढ मिळणेकामी मा.सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर, सोलापूर यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.SUR/C/518/SNSI/ PRS/2020 दि.१४/०७/२०२० अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - मा.सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर,सोलापूर यांचेकडील उपरोक्त पत्रात नमुद केलेप्रमाणे रेल्वे विभागास संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.११९ क्षेत्र ६८७.८ चौमी.मधील सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील विनामुल्य वापरास दिलेल्या दोन रुम्स अ.नं.५६ व ७९ यांची एकत्रित लांबी ३ मी. व रुंदी ५.२९ मी. असे एकूण क्षेत्रफळ १५.८७ चौमी. येणेप्रमाणे दोन रुम्सच्या वापराची पुढील मुदत दि.१५/०८/२०२० ते दि.१४/०७/२०२१ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी व शर्तीवर वाढवून देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव – रेल्वे विभागास संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.११९ क्षेत्र ६८७.८ चौमी.मधील सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील विनामुल्य वापरास दिलेल्या दोन रुम्स अ.नं.५६ व ७९ यांची एकत्रित लांबी ३ मी. व रुंदी ५.२९ मी. असे एकूण क्षेत्रफळ १५.८७ चौमी. येणेप्रमाणे दोन रुम्सच्या वापराची

पुढील मुदत दि.१५/०८/२०२० ते दि.१४/०७/२०२१ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी व शर्तीवर वाढवून देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामी चक्रीय पध्दतीने सादर.

निर्णय क्र.४५५/२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी रेल्वे विभागास विनामुल्य वापरास दिलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम्सच्या वापराची मुदत वाढवून देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

३०. **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसा.लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.११४ मधील स्वागतकक्षाचे जागेत बॅग क्लोकरुमसाठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून मिळणेकामी मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसा. लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/३१/२०२०, दि.०८.०७.२०२०.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसा.लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील वापरास दिलेल्या स.नं.११४ मधील स्वागतकक्षाचे जागेच्या वापराबाबत यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्रं.५०८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.११४ मधील स्वागतकक्षाचे जागेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि. शिर्डी यांना बॅग क्लोकरुमसाठी जागा मागील मासिक परवाना फी रक्कम रु.१,३८१/- +१०% रक्कम रु.१३८/- अशी एकुण रक्कम रु.१,५१९/- इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन, तसेच साईभक्तांना क्लोकरुमची सुविधा विनामुल्य देणेच्या पूर्वीच्याच अटी व शर्तीवर दि.२२/१०/२०१९ ते दि.२१/०९/२०२० या ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेण्यात यावा,असे ठरले."

उपरोक्त निर्णयात नमुद केलेप्रमाणेचा करारनामा दि.२३/०१/२०२० रोजी अलाहिदा करणेत आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत दि.२१/०९/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील दि.२२/०९/२०२० ते दि.२१/०८/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी उक्त जागा वापरास मुदतवाढ मिळणेकामी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/३१/२०२० दि.०८/०७/२०२० अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसा. लि.शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.०८/०७/२०२० रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सर्वे नं.११४ मधील स्वागतकक्षाचे जागेत बॅग क्लोकरुमसाठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची पुढील मुदत दि.२२/०९/२०२० ते दि.२१/०८/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी रक्कम रु.१,५१९/- +१०% रु.१५२/- अशी एकूण रक्कम रु.१,६७१/- इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन साईभक्तांना क्लोकरुमची सुविधा विनामुल्य देणेच्या पूर्वीच्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

प्रस्ताव - श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसा. लि.शिर्डी यांना संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सर्वे नं.११४ मधील स्वागतकक्षाचे जागेत बॅग क्लोकरुमसाठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची पुढील मुदत दि.२२/०९/२०२० ते दि.२१/०८/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी रक्कम रु.१,५१९/- +१०% रु.१५२/- अशी एकूण रक्कम रु.१,६७१/- इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन साईभक्तांना क्लोकरुमची सुविधा विनामुल्य देणेच्या पूर्वीच्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ चक्रीय पध्दतीने सादर.

निर्णय क्र.४५५/३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसा.लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.११४ मधील स्वागतकक्षाचे जागेत बॅग क्लोकरुमसाठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

३१. सन २०२० दीपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

प्रस्ताव- **(अ)** सन १९७७ पासून तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळ / समितीचे निर्णयानुसार तसेच संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा.कोर्ट रिसीव्हर यांचे अधिकारात व मा.न्यायालयाचे निर्णयानुसार, संस्थान कर्मचा-यांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत येत आहे. त्यानंतर सन १९८४ मध्ये मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखाली, तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असतांना दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत, माहे ऑगस्ट, २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारीत केला आहे. या अधिनियमात संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्या आहेत -

कलम १५ - मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

कलम १६ - सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील "नियत दिवसाच्या लगतपुर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तीला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

कलम १७ - समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२) (घ) समितीच्या सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत, या अधिनियमात कलम २२ - व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३) (ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने तसेच महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता त्यांच्या प्रती वर्षी माहे ऑक्टोबर ते माहे सप्टेंबर याकालावधीतील एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% इतके सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे. मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन पत्र क्र. सासंवि - २०११ / ५३८ / प्र.क्र.६९ / पूर्नबांधणी-१२ / का.१६, दिनांक २३ जानेवारी, २०१३ चे पत्रान्वये, मा.शासनाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासकीय कर्मचा-यांना बोनस देण्याचे बंद असतांना संस्थानच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना शासनाची मान्यता न घेता परस्पर बोनस आदा करणेत आला आहे, याबाबत खुलासा करणेत यावा, असे कळविलेले होते.

तथापी, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८ / १९६३ / प्र.क्र.३७ / कार्या-१६, दि. २९ मे, २०१८, शासन निर्णय क्रमांक - सासंवि १०१६ / १४३२ / प्र.क्र.१८२ / कार्या-१६,

दि. २९ ऑक्टोबर, २०१६, शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७ / १५३९ / प्र.क्र.१६६ / कार्या-१६, दि. ०५ ऑक्टोबर, २०१७, शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८ / १४८१ / प्र.क्र.१६६ / का.१६, दि. २२ ऑक्टोबर, २०१८ तसेच आता शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१९ / ७८९ / प्र.क्र.१४९ / का.१६, दि. ११ सप्टेंबर, २०१९ अन्वये अनुक्रमे सन २०१२ ते २०१५, सन २०१६, सन २०१७, सन २०१८ व सन २०१९ या कालावधीतील संस्थान कर्मचा-यांना एकुण वार्षिक वेतनाच्या ८.३३ % इतके सानुग्रह अनुदान वाटपास मान्यता दिलेली आहे.

सन २०१९ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दि. २६ जुलै, २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३८९ नुसार व मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि. ११ सप्टेंबर, २०१९ चे शासन निर्णयानुसार व मान्यतेनुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सेवेतील पात्र कायम (स्थायी) व कंत्राटी (अस्थायी) कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१८ ते दि.३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीत मिळालेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ % इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. याकामी लेखाशाखा विभागाकडील दिनांक २१ मे, २०२० रोजीचे अहवालानुसार, एकूण रुपये १०,०६,२५,२७९/- मात्र इतकी रक्कम पात्र कायम (स्थायी) व अस्थायी (कंत्राटी) संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानापोटी आदा करण्यात आलेली आहे.

(ब) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रचलित पध्दतीप्रमाणे सन २०२० चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदानाकरीता खाली नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम), अस्थायी (कंत्राटी), एकत्रित मानधन / वेतनावरील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

(०१) सन-२०२० दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदानासाठी प्रचलित नियमाप्रमाणे पात्र ठरणा-या स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) संस्थान कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१९ ते दि. ३० सप्टेंबर, २०२० अखेर या कालावधीत त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने व लेखाशाखेकडील दिनांक २१ मे, २०२० रोजीचे अहवालानुसार अंदाजे रक्कम रुपये ११,७५,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये अकरा कोटी पंच्याहत्तर लाख मात्र) इतका खर्च येणार आहे.

(०२) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत संस्थान आस्थापनेवरील स्थायी कर्मचारी (कायम), संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी कर्मचारी तसेच मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी, कंत्राटी सल्लागार / मोजणीदार, डीटीपी ऑपरेटर, ग्रंथपाल, अर्धवेळ सहाय्यक शिक्षक यांना दिलेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या / पगाराच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम आदा करता येईल.

(०३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत ज्या कर्मचा-यांवर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन, सेवेतून कमी केलेले आहे. तसेच ज्या कर्मचा-यांनी या कालावधीत संस्थान सेवेचा राजीनामा दिला आहे, अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

(०४) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत कामास असलेल्या कंत्राटी कुशल, अकुशल व एकत्रित वेतन / मानधनावरील तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधीत कंत्राटी कामगार यांना कंत्राटदारामार्फत आदा करता येईल.

(क) उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे सन २०२० चे दिपावली उत्सवासाठी अट शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणा-या संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने अंदाजे रक्कम रुपये ११,७५,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये अकरा कोटी पंच्याहत्तर लाख मात्र) इतके सानुग्रह अनुदान वाटप / आदा करणेकामीचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे मान्यतेने, मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविता येईल, त्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.४५५/३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२० दीपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन)

---

३२. कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी व बाहयस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत/उक्ते पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचारी व इतर यांना माहे सप्टेंबर व आक्टोंबर -२०२० चे तसेच LOCKDOWN ची मुदत संपून, नियमीतपणे संस्थान व्यवस्थापनाचे व प्रशासनाचे काम सुरु होईपावेतो विहित कार्यपध्दतीने वेतन/पगार/मानधन इत्यादी आदा करणेबाबत.

प्रस्ताव- **(अ) विषयाची पूर्वपीठीका –**

(अ-१) आपणांस विदितच आहे की, **कोव्हीड १९** (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपाययोजनेनुसार मा. भारत सरकार व मा. महाराष्ट्र शासन यांचेकडून संपूर्ण भारत देशात तसेच महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण LOCKDOWN घोषित करणेत आलेला होता. मा. केंद्र व राज्य शासनाने या LOCKDOWN चा कालावधी आजपावेतो ०६ वेळा वाढविलेला आहे.

आता, मा. गृह मंत्रालय, केंद्र शासन (भारत सरकार) यांचेकडील शासन आदेश क्रमांक 40-3/2020-DM-I(A), दिनांक २९ ऑगष्ट, २०२० आणि मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन

विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन आदेश क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक ३१ ऑगष्ट, २०२० अन्वये, या LOCKDOWN ची मुदत (कालावधी) **दिनांक ३० सप्टेंबर, २०२० अखेर** काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर LOCKDOWN ची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

तसेच मा. केंद्र व राज्य शासनाने अद्यापपावेतो धार्मिक स्थळे दर्शनासाठी खुली करणेबाबत ठोस निर्णय अथवा त्याबाबतचे आदेश पारित केलेले नाहीत. त्यामुळे संस्थान व्यवस्थापनाचे अखत्यारीतील श्री साईं चे समाधी मंदिर व इतर मंदिरे भक्तांसाठी खुली करणेत आलेली नाहीत, मात्र संस्थान व्यवस्थापनामार्फत मा. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक निर्देशांनुसार दैनंदिन पूजा-अर्जा, आरत्या ईत्यादी धार्मिक विधी कमीत कमी कर्मचा-यांच्या उपस्थितीत सुरु आहेत.

(अ-२) सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी पारित करणेत आलेल्या आदेशांनुसार, कोव्हीड १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. शासनाने निर्देशित केलेल्या उपाययोजनेनुसार, दिनांक २३ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कार्यालयातील / कार्यस्थळावरील कर्मचा-यांना आळीपाळीने / चक्रीय पध्दतीने कामावर बोलविणेत येत आहे. तसेच सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कार्यालयातील / कार्यस्थळावरील उपस्थितीवरील निर्बंध टप्प्या-टप्प्याने उठविणेत आलेले असून, सर्व विभागांची कार्यालये पूर्ण क्षमतेने सुरु करणेबाबत नियोजन करणेत येत आहे. सदरची कार्यपध्दती माहे मे, २०२० पासून अवलंबिणेत येत असून, माहे सप्टेंबर, २०२० मध्येही सलग व कायम ठेवणेत आलेली आहे.

(अ-३) माहे मे, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे दिनांक ०९ जून, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३०८ मध्ये नमूद विहित कार्यपध्दतीनुसार वेतन आदा करणेत आलेले आहे.

(अ-४) माहे जून, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जूलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५६ मध्ये नमूद विहित कार्यपध्दतीनुसार वेतन आदा करणेत आलेले आहे.

(अ-५) माहे जुलै, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जूलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५७ मध्ये नमूद विहित कार्यपध्दतीनुसार वेतन आदा करणेत आलेले आहे.

(अ-६) माहे **ऑगष्ट, २०२०** चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे **दिनांक २८ ऑगष्ट, २०२०** रोजीचे सभेत स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

सदरहू प्रस्तावावर मा. तदर्थ समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी वगळतां, उर्वरित अधिकारी / कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करणेबाबत कार्यवाही करणेत आलेली आहे / येत आहे. तसेच ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करणेबाबत स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

(ब) माहे सप्टेंबर, २०२० चे वेतनाबाबतचा प्रस्ताव –

(ब-१) कायम कंत्राटी कर्मचारी (५९८ कर्मचारी) यांचे वेतन - मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ आणि त्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावरील मान्यतेनुसार, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असणारे कुशल / अकुशल ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना, किमान वेतन कायद्यानुसार व किमान वेतन दरानुसार माहे जानेवारी, २०२० मध्ये कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थानांचे विविध विभागांकडे नियुक्त्या देणेत आलेल्या आहेत.

या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना LOCKDOWN चे कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार काही विभागात पूर्ण उपस्थितीसह इतर विभागात आवश्यकतेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. सदर ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे जुलै, २०२० अखेर विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार वेतन आदा करणेत आलेले आहे.

मा. तदर्थ समितीने दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेत माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कर्मचा-यांचे नेमणूकीबाबतचे प्रस्तावाचे अनुषंगाने, सदर कायम कंत्राटी कर्मचा-यांचे माहे ऑगष्ट,२०२० चे वेतन स्थगित ठेवणेबाबत निर्णय घेतलेला आहे.

तथापि, या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करणेबाबत सामान्य प्रशासन विभागांमार्फत मा. तदर्थ समितीचे मान्यतेस्तव चक्रीय पध्दतीने स्वतंत्ररित्या अलाहिदा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. या प्रस्तावावरील निर्णयानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

तसेच ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दिवाणी दावा क्रमांक ६२२४ / २०२० दाखल झालेला असून, या दाव्याच्या संदर्भात दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजी प्रथम सुनावणी झाली असून, संस्थानचे म्हणणे मांडणेसाठी ०३ आठवडयांची मुदत मिळालेली आहे. या दाव्याच्या कामकाज संदर्भात प्रशासन स्तरावर स्वतंत्ररित्या कार्यवाही सुरु आहे.

या बाबीचा विचार करुन, या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना मा. तदर्थ समितीने यापूर्वी माहे जून, जुलै व ऑगष्ट,२०२० चे वेतन आदा करणेसाठी निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार माहे सप्टेंबर, २०२० चे वेतन आदा करता येईल, असे मत आहे.

(ब-२) कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत –

संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत सध्या खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत-

१. कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी (साधारणतः सर्व विभागात कार्यरत)

२. कुशल / अकुशल सुरक्षा निरीक्षक / सुरक्षारक्षक / बंदूकधारी सुरक्षारक्षक / माजी सैनिक (संरक्षण विभाग)

३. निश्चित मानधन / वेतनावर आणि निश्चित कालावधीसाठी नियुक्त करणेत आलेले कर्मचारी (उदा. भूसंपादन सल्लागार, मोजणीदार, वैद्यकीय अधिकारी, पॅरा मेडिकल स्टाफ, शिक्षक इत्यादी – विशेषतः रुग्णालये / मालमत्ता / प्रकाशने / आयटीआय विभाग ई.)

४. बाह्यस्त्रोत स्त्री / पुरुष पारिचारिका व इतर (किमान वेतनावर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत – रुग्णालये विभाग)

वर नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील सर्वसाधारणपणे सर्वच विभागात कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत आहेत. या सर्व कर्मचा-यांना मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, प्रशासकीय स्तरावर विहित कार्यपध्दती निश्चित करुन माहे मार्च ते ऑगष्ट, २०२० या महिन्यांचे मासिक वेतन आदा करणेत आलेले आहे / येत आहे.

या कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. या बाबीचा विचार करुन, या कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना मा. तदर्थ समितीने यापूर्वी माहे जून, जुलै व ऑगष्ट,२०२०चे वेतन आदा करणेसाठी निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार माहे सप्टेंबर,२०२० चे वेतन आदा करता येईल, असे मत आहे.

(ब-३) या व्यतिरिक्त संस्थान आस्थापनेवरील खालील विभागांकडे उक्ते / ठोक पध्दतीने काम दिलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत –

०१. (अ) श्री साईनाथ रुग्णालय (हाऊसकिपींग) (ब) श्री साईनाथ रुग्णालय (पारिचारिका) (क) श्री साईनाथ रुग्णालय (इतर कर्मचारी)

०२. (अ) श्री साईबाबा हॉस्पीटल (हाऊसकिपींग) (ब) श्री साईबाबा हॉस्पीटल (पारिचारिका) (क) श्री साईबाबा हॉस्पीटल (इतर कर्मचारी)

०३. श्री साई प्रसादालय (चपाती / पुरी / नाष्टा पाकिटे / हाऊसकिपींग / वाढपी आदि)

०४. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग (बुंदी प्रसाद / बुंदी लाडू प्रसाद)

०५. व्दारावती / श्री साई आश्रम / श्री साई धर्मशाळा निवासस्थान विभाग (हाऊसकिपींग)

उपरोक्त नियुक्त करणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारांना तसेच उक्ते / ठोक पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदाराकडे काम करणारे कंत्राटी कर्मचा-यांना, ज्या-त्या संबंधित विभागांमार्फत स्वतंत्ररित्या अटी-शर्तीसह कार्यादेश देणेत आलेले आहेत.

त्यामुळे उपरोक्त अ.नं. ०१ व ०२ मधील, रुग्णालय विभागाकडील कंत्राटी कर्मचारी, ठोक / उक्ते दराने काम दिलेल्या कंत्राटदाराकडील कर्मचारी यांना मा. तदर्थ समितीने यापूर्वी माहे जून, जुलै व ऑगष्ट,२०२० चे वेतन आदा करणेसाठी निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार माहे सप्टेंबर, २०२० चे वेतन आदा करता येईल, असे मत आहे.

तसेच उपरोक्त अ. नं. ०३, ०४ व ०५ मधील ठोक / उक्ते पध्दतीने अथवा त्यांना देणेत आलेल्या कामाचे कार्यादेशानुसार, अशा कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना माहे जुलै व ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करणेसाठी निश्चित करणेत आलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे म्हणजेच हजर दिवसाला पूर्ण वेतन आणि कामावर नसलेल्या दिवसांसाठी अर्धे वेतन दयावे, असे मत आहे.

(ब-४) **तसेच,** दरम्यानचे कालावधीत मा.तदर्थ समितीने दिनांक २४ सप्टेंबर, २०२० रोजी चक्रीय पध्दतीने रुग्णालये विभागाकडील कंत्राटी कर्मचा-यांना (एकूण ४६६) ४० टक्के वाढीव वेतन लागू करणेबाबत सकारात्मक निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयाचा अंर्तभाव माहे सप्टेंबर, २०२० चे वेतन आदा करतांना करावा लागणार आहे.

(क) **विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव -** सध्या विषयांकित कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव वाढता असून, मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील **दिनांक ३१ ऑगष्ट, २०२० व दिनांक ३० सप्टेंबर, २०२०** रोजीचे आदेशान्वये, या LOCKDOWN ची मुदत (कालावधी) **अनुक्रमे दिनांक ३० सप्टेंबर, २०२० व दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० अखेर** काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर या आदेशांची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

त्यामुळे उपरोक्त **परिच्छेद (अ)** मधील पूर्वपीठीकेस अनुसरुन, **परिच्छेद ब मधील उपपरिच्छेद (ब-१ ते ब-४)** मध्ये नमूद केलेप्रमाणे, संस्थान व्यवस्थापनाकडे / आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना **माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२०** चे वेतन आणि तसेच माहे ऑक्टोबर, २०२० नंतर मा. केंद्र व राज्य शासनाचे आदेशान्वये LOCKDOWN ची मुदत संपेपर्यन्त अथवा नियमितपणे संस्थान व्यवस्थापनाचे व प्रशासनाचे काम सुरु होईपावेतो, वर नमुद केलेप्रमाणे विहित कार्यपध्दती निश्चित करुन वेतन / पगार / मानधन आदि आदायगी करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी व बाहयस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत/उक्ते पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचारी व इतर यांना माहे सप्टेंबर व आक्टोंबर -२०२० चे तसेच LOCKDOWN ची मुदत संपून, नियमीतपणे संस्थान व्यवस्थापनाचे व प्रशासनाचे काम सुरु होईपावेतो विहित कार्यपध्दतीने वेतन/पगार/मानधन इत्यादी आदा करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन)

---

३३. **माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगस्ट, सप्टेंबर व आक्टोंबर- २०२० चे वेतन आणि त्यानंतरचे कालावधीचे वेतन आदा करणेबाबत.**

प्रस्ताव- **विषयाची पूर्वपीठीका -**

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) काही अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेली आहे. तसेच त्यानंतर काही वाढीव पदांची मान्यता लक्षात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-२) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

(अ-३) या प्रस्तावाचे अनुषंगाने, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये **" श्री साईबाबा संस्थान**

विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

*" .. .. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे **सन २००१ ते २००४** या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या **६३५** कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन **किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन** शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन **निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*

*उपरोक्तप्रमाणे **एकत्रित मासिक वेतन** मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा **संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी** म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

(अ-४) उपरोक्त मा. शासन निर्णयानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन, एकूण ६०१ कंत्राटी कर्मचा-याना नियुक्ती आदेश देणेत आलेले होते, त्यापैकी सेवेत हजर झालेल्या ५९८ कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेले आहेत.

(ब) मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा सदस्य, मा. तदर्थ समिती (सध्या अध्यक्ष, मा. तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी) यांनी दिनांक ०६ जानेवारी, २०२० अन्वये उपरोक्त परिच्छेदांत नमूद केलेल्या कार्यवाहीबाबतची वस्तुःस्थिती मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत कळविलेले होते.

तसेच,मा. तदर्थ समितीचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०० अन्वये परिच्छेदांत नमुद केलेल्या कार्यवाहीबाबत मा. तदर्थ समितीपुढे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी, असा निर्णय घेणेत आलेला होता.

त्यानुसार, उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनानुसार, मा. तदर्थ समितीने खाली नमूद केलेप्रमाणे वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत -

०१. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० / निर्णय क्रमांक १५८

०२. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ०४ मार्च, २०२० / निर्णय क्रमांक १६४

०३. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २७ मार्च, २०२० / निर्णय क्रमांक २०३

०४. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ११ मे, २०२० / निर्णय क्रमांक २३५ व २३६

०५. मा. तदर्थ समिती सभा दिनांक ०९ जून, २०२० / निर्णय क्रमांक ३०९

०६. मा. तदर्थ समिती सभा दिनांक १३ जुलै, २०२० / निर्णय क्रमांक ३६०

०७. मा. तदर्थ समिती सभा दिनांक २८ ऑगष्ट, २०२० (अद्याप निर्णय प्राप्त कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला नाही)

(क) उपरोक्त निर्णयांपैकी, मा. तदर्थ समितीचे **दिनांक १३ जुलै, २०२०** रोजीचे सभेतील **निर्णय क्रमांक ३६०** मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे –

" .. .. समितीचे सदस्य १) मा. श्री. श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा. श्री. दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक ३) मा. श्रीमती गीता बनकर, सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.

This subject was discussed in detail and each member has expressed views.

This committee, while deciding Subject 1, 2, 43 and 63 on the agenda of the Ad-hoc Committee Meeting dt. 11.05.2020, has thoroughly examined the entire record of the Trust, the scheme of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 and the powers of the Chief Executive Officer to appoint employees.

This Committee has already found that the then Chief Executive Officer could not have appointed employees directly on the Sansthan on contract basis because such power is vested with the Committee constituted under section 13(4) of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004. Since such appointment on contract basis is a policy decision, it ought to have been presented before the Ad-hoc Committee, constituted by Hon'ble High Court.

This Committee has also found that the Sansthan has failed to follow the Government Resolution dt. 07.08.2009, more particularly the terms and conditions under which the said staffing pattern (आकृतीबंध) was approved. The Committee has also found that while issuing Government Resolution dt. 17.09.2019, the Government has called upon the SAnsthan to follow Government Resolution dt.07.08.2009 of which the reference is found at serial no. 2 under the caption " वाचा."

It is not the case of Sansthan before this Committee that Committee has followed Government Resolution dt. 07.08.2009 by preparing service rules, qualification of entry, promotion etc. In fact Committee has been constituted for preparation of such rules and even this Ad-hoc Committee has given extention to the said Committee to complete the remaining work. ***In the above background, therefore, the appointment orders issued by the then Chief Executive Officer (Shri. Deepak Muglikar) is a piece of paper and cannot be termed as an order under the authority of the Committee as invisaged under section 13(4) of the Act.***

Some of the members of this Committee tried to suggest that ex-post facto approval could be granted to the said order. However, on thorough examination of this proposal, the Committee is unanimous in refusing to grant such ex-post facto approval, more particularly when Government Resolution dt. 07.08.2009 has not been followed by the Trust. In addition to it, giving such ex-post facto sanction for such acts would be protecting the illegality and therefore, should not be approved at the hands of Ad-hoc Committee.

Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020. *This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.*

The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government.

समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.

राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकुण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्यस्थितीत पात्र ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूक ही शासन निर्णयाचे निर्देशानुसार करण्यात आली आहे. तरी सदर आदेशांना कार्योत्तर मान्यता देणे योग्य राहील. "

विषयाची सद्य:स्थिती -

(ड) उपरोक्त मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णयाची प्रत सामान्य प्रशासन विभागास दिनांक ०७ ऑगष्ट, २०२० रोजी सभा कामकाज विभागाकडून प्राप्त झाली. त्यामुळे

मा. तदर्थ समितीचे निर्णयात नमुद केलेप्रमाणे, विषयांकित प्रस्तावातील ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना देणेत आलेले नियुक्ती आदेश दिनांक ३१ जुलै, २०२० अखेरपासून रद्द करण्याची कार्यवाही करता आली नाही.

तसेच मा. तदर्थ समितीने प्रशासनास विषयांकित प्रस्तावाबाबत पुनःश्च सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत स्वातंत्र्य दिलेले असल्याने, विषयांकित प्रस्ताव दिनांक २४ जुलै, २०२० रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता, परंतु सभा तहकूब झाल्याने या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. *(याची कारणमीमांसा अशी की, वरील निर्णयाचे अनुषंगाने सभा कामकाज विभागाकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी ४ / ७१६ /२०२०, दिनांक १६ जुलै, २०२० अन्वये मा. तदर्थ समितीचे सदस्यांना विषयसूची पाठवून, समितीची सभा दिनांक २४ जुलै, २०२० रोजी अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत कळविणेत आलेले होते. या सभेच्या विषयसूचीमध्ये विषयांकित प्रस्तावाचा समावेश करणेत आलेला होता.तथापि, मा. तदर्थ समितीचे सदस्य श्री. दिलीप स्वामी, अपर आयुक्त, नाशिक यांनी त्यांचेकडील दिनांक २३ जुलै, २०२० रोजीचे पत्राने, उपरोक्त बैठकीस (सभेस) हजर राहणेपासून सवलत मिळणेबाबत विनंती पत्र दिलेले होते. तसेच मा. तदर्थ समितीचे अन्य ०३ सदस्यांपैकी, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे श्री. अरुण डोंगरे (भाप्रसे) यांची बदली मा. शासनाने दिनांक २३ जुलै, २०२० रोजी मुंबई येथे केल्याने आणि त्यांना बदलीचे जागी दिनांक २४ जुलै, २०२० त्वरीत हजर व्हावे लागले. या कारणास्तव मा. तदर्थ समितीची नियोजित दिनांक २४ जुलै, २०२० रोजीची सभा तहकूब करणेत आली असलेबाबत सभाकामकाज विभागामार्फत संबंधितांना कळविणेत आले.)*

तसेच, दरम्यानचे कालावधीत, विषयांकित नियुक्ती दिलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांपैकी श्री. भाऊसाहेब आनंदराव थोरात व इतर ०८ यांनी, सर्व कायम कंत्राटी कर्मचारी यांचे वतीने दिनांक २८ जुलै, २०२० रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांना अग्रेषित केलेल्या अर्जाव्दारे, संस्थान प्रशासनाने दिलेल्या नेमणूक आदेशास सहानुभूतीपूर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून संरक्षण देऊन, संस्थान सेवेत नियमित / कायम नेमणूक आदेश मिळणेबाबत विनंती केलेली होती.

उपरोक्त सर्व बाबींस अनुसरुन आणि नमूद केलेल्या कारणांस्तव, मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० अन्वये विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर करावयाचे कार्यवाहीचे अंमलबजावणीसाठी सदर विषयास अंतिम निर्णय होईपर्यन्त मुदतवाढ मिळणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेपुढे विचारार्थ / निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता, तथापि याबाबतचा निर्णय अद्यापपावेतो सामान्य प्रशासन विभागास कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला नाही.

(इ) **याव्यतिरिक्त,** मा. तदर्थ समितीचे दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेत, कोव्हीड १९ या संसर्गजन्य रोगाचे प्रादुर्भावामुळे मा. शासनाने दिनांक ३१ ऑगष्ट, २०२० अखेर सुरु / सलग ठेवलेली लॉकडाऊनची स्थिती विचारात घेऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कर्मचारी, बाह्यस्त्रोत पध्दतीने / उक्त्या व ठोक पध्दतीने कार्यरत असणारे कंत्राटदाराकडील कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करणेबाबत मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

मा. तदर्थ समितीने या प्रस्तावावरील चर्चेचे वेळेस समक्ष निर्देशीत केलेनुसार, संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत समितीने घेतलेल्या निर्णयावरील कार्यवाही प्रलंबित असल्याने, त्यांचे माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन स्थगित ठेवणेबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजी आदेशित करणेत आलेले आहे.

(ई-१) **आता,** संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे वतीने, श्री. अनिल कचरु कोते व इतर ०३ यांनी दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या व माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन मिळणेबाबत या विषयांतर्गत केलेल्या विनंती अर्जात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

" .. उपरोक्त विषयांस अनुसरुन विनंतीपूर्वक अर्ज करतो की, आमची ५९८ कर्मचा-यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे आस्थापनेवर दिनांक ०२ जानेवारी, २०२० रोजीचे आदेशान्वये कुशल / अकुशल कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिने कालावधीसाठी किमान वेतन दराने नियुक्ती झालेली आहे व त्यानुसार आम्हांस माहे जानेवारी, २०२० ते माहे जुलै, २०२० पर्यन्त प्रत्येक महिन्याला वेतन मिळालेले आहे.

तथापि, आता सामान्य प्रशासन विभाग जा. क्र. एसएसएस / साप्रशा / आस्था / १०३३ / २०२०, दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजीचे आदेशान्वये माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे ऑगष्ट, २०२० चे वेतनाची कार्यवाही स्थगित करणेत आलेली असल्याने आम्हाला माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन अद्यापपर्यन्त मिळालेले नाही. त्यामुळे आम्ही सर्व ५९८ कर्मचारी आर्थिक संकटात सापडलेलो असून आमचे कुंटूंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

तरी मे. साहेबांनी आमच्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करुन आम्हांला माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन आदा करावे, ही नम्र विनंती. ५९८ कर्मचारी यांचे वतीने. "

(ई-२) मा. तदर्थ समितीने दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० बाबत, ५९८ कंत्राटी कर्मचा-यांपैकी १६ कायम कंत्राटी कर्मचारी यांनी सर्व ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांचे वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे, महाराष्ट्र शासन व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेविरुध्द दिवाणी दावा दाखल केला असलेबाबत, संबंधित कायम कंत्राटी कर्मचा-यांचे वतीने ॲड. अश्विन व्ही.होन, औरंगाबाद यांनी दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० रोजीचे ई-मेल पत्राने कळविले आहे. त्यात खालीलप्रमाणे नमूद आहे –

".. .. Subject : Writ Petition filed on behalf of Anil s/o Kacharu Kote and Ors. In the Bombay High Court, Bench At Aurangabad.

.. .. Please take note that I have filed a writ petition challenging the resolution passed by Ad-hoc Committee in its meeting dated 13.07.2020 whereby the Ad-hoc Committee has reserved the resolution passed by the regular committee of the Sansthan in discontinuing the services of the petitioners and similarly placed 582 employees before the Hon'ble Bombay Hight Court, Bench At Aurangabad.

The Copy of the petition alongwith all exhibits is served on you as you have been made party respondent No.2. The petition will be taken up for hearing in due course accordingly, attend the same. "

ॲड. होन, औरंगाबाद यांचेकडून दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० रोजी ई-मेलने प्राप्त झालेल्या उपरोक्त पत्रानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजीचे मंजूर टिपणीन्वये आणि पत्र जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/१३७६/२०२०, दिनांक ११ सप्टेंबर, २०२० अन्वये विधीज्ञ ॲड. संजय चौकीदार, औरंगाबाद यांना वकीलपत्र देणेत आलेले आहे.

तसेच, श्री. अनिल कचरु कोते व इतर यांचे वतीने ॲड. होन यांनी दाखल केलेल्या सदरहू दिवाणी दाव्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे अधिकृत संकेतस्थळावरुन माहिती घेणेत आली आहे. त्यानुसार सदर दिवाणी दाव्याचा क्रमांक Stamp No. **WPST/14010/2020** / Reg. No. **WP/6224/2020** / Filing & Reg. **Date 11-09-2020** असा आहे. तसेच सदरहू दिवाणी दाव्याची पुढील सुनावणीची तारीख १४ सप्टेंबर, २०२० अशी दर्शविणेत आलेली होती.

तथापि, संस्थान विधीज्ञ ॲड. संजय चौकीदार यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजी पाठविलेल्या ई-मेल पत्राव्दारे असे कळविले आहे की, दिवाणी दावा क्र. ६२२४/२० मध्ये आज रोजी झालेल्या सुनावणीत मा. न्यायालयाने संस्थानचे म्हणणे दाखल करणेसाठी ०३ आठवडयांची मुदत दिलेली असून, दिनांक २८ सप्टेंबर, २०२० अखेर संस्थानचे म्हणणे दाखल करावयाचे आहे. याबाबत संस्थान प्रशासन स्तरावर कार्यवाही सुरु करणेत आली आहे.

तसेच, उपरोक्त दिवाणी दाव्याबाबत दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजीचे प्रथम सुनावणीचे तारखेस झालेल्या कामकाजाबाबत मा. उच्च न्यायालयाचे संकेतस्थळावर खालीलप्रमाणे आदेश प्राप्त झालेला आहे –

" .. .. Learned AGP accepts notice on behalf of Respondent No.1. Learned Counsel Mr. Choukidar state that he has instructions to appear for Respondent No.2 and seeks time.

Stand over to 05th October, 2020. "

(ई-३) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांचे वतीने ॲड. होन यांनी दाखल केलेल्या सदर दिवाणी दाव्याचा क्रमांक Stamp No. **WPST/14010/2020**/Reg.No.**WP/6224/2020**/Filing & Reg. **Date 11-09-**

2020 असा असून, त्यामध्ये याचिकाकर्त्यांनी खालीलप्रमाणे मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस खालील बाबींवर आदेश होणेबाबत विनंती केलेली आहे –

" .. .. 20. The Petitioners, therefore humbly, pray Your Lordships will be pleased to;

A) *Call for record and proceedings of the case.*

B) *Issue a writ of certiorari or writ the nature of certiorari to quash and set aside the Resolution dated 13.7.2020 (Exhibit "H") and he consequential order dated 2.9.2020 (Exhibit "I") passed by the Adhoc Committee of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi.*

C) *Issue a writ mandamus or writ in the nature of mandamus to the respondent to continue the petitioners and similarly placed 582 employees mentioned in the list annexed at Exhibit "A" to the petition, in service of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi in accordance with the Government Resolution dated 17.09.2019 of the State Government and that their service be not terminated and / or discontinued.*

D) *Pending the hearing and final disposal of this writ petition grant stay to operation, implementation and execution of the Resolution dated 13.7.2020 (Exhibit "H") and the consequential order dated 2.9.2020 (Exhibit "T") passed by the Adhoc committee of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi.*

E) *Pending the hearing and final disposal of this writ petition the petitioners and other 582 similarly place employees mentioned in the list annexed at Exhibit "A"*

F) *Ad-interim relief of granted in terms of prayer claused "D" and "E".*

G) *Any other just and equitable reliefs be granted in favour of the petitioner. "*

(ई-४) **तसेच,** दरम्यानचे कालावधीत म्हणजेच, दिनांक २५ सप्टेंबर, २०२० रोजी प्र.विधी अधिकारी, विधी विभाग यांचेकडून तोंडी सूचना मिळाल्या आहेत की, दिवाणी दावा क्रमांक ६२२४/२०२० बाबत ॲड. संजय चौकीदार, औरंगाबाद यांना वकीलपत्र देणेत आलेले होते. परंतु ॲड. चौकीदार यांनी सदर दाव्यामध्ये संस्थानकडून म्हणणे मांडणेकामी असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे दिवाणी दावा क्रमांक ६२२४/२०२० चे कामकाज आता संस्थानचे विधीज्ञ ॲड. अनिल बजाज, औरंगाबाद हे पाहणार आहेत. त्यानुसार दिनांक २८ सप्टेंबर, २०२० रोजी ॲड. अनिल बजाज, औरंगाबाद यांचेशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून, दिवाणी दावा क्रमांक ६२२४/२०२० बाबतची कागदपत्रे ई-मेलव्दारे पाठविणेत आलेली आहेत. उपरोक्त दाव्याच्या संदर्भात दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० रोजी सुनावणी झालेली असून, पुढील प्रस्तावित सुनावणी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी आहे.

(ई-५) मा. शासनाने कोव्हीड १९ या संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी जारी / सलग ठेवलेल्या लॉकडाऊन कालावधीतील माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन, संस्थान आस्थापनेवरील प्रतिनियुक्तीवरील अधिकारी, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी, सुरक्षारक्षक, बाह्यस्त्रोत / उक्त्या व ठोक पध्दतीने कार्यरत असणारे कंत्राटदाराकडील कर्मचारी व इतर यांना आदा करणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे, किंबहुना बहुतांशी पूर्ण झालेली आहे.

(ई-६) मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० नुसार संस्थान प्रशासनामार्फत अलाहिदा कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

(ई-७) **मा. सदस्य सचिव, तदर्थ समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी विषयांकित प्रस्तावाबाबत चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी दि. ४ सप्टेंबर, २०२० रोजी खालीलप्रमाणे निर्णय प्रस्तावित केलेला होता -

" .. .. विषयांकित प्रस्तावात नमुद केलेली वस्तु:स्थिती विचारात घेतां, माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे जुलै, २०२० वेतनासंबंधी झालेल्या निर्णयाप्रमाणेच माहे ऑगष्ट, २०२० चे वेतन (माहे सप्टेंबर, २०२० मध्ये अदा करावयाचे वेतन) आदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. "

मा. अध्यक्ष, तदर्थ समिती तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर यांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०२० रोजी चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या विषयांकित प्रस्तावावर खालीलप्रमाणे आपले मत मांडले आहे-

" .. .. तदर्थ समितीचे अध्यक्ष व दुसरे सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी दि. २८/०८/२०२० रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त त्यांच्या स्वाक्ष-या करुन अंतिम केलेले आहे. परंतु तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांनी दि. २३/०९/२०२० रोजी ई-मेल व्दारे पाठविलेल्या पत्रावरुन, सदरहू इतिवृत्तावर त्यांनी सही केली नसल्याचे दिसून येते. सहाजिकच त्यामुळे दि. १३/०७/२०२० रोजीच्या तदर्थ समितीच्या बैठकीचे इतिवृत्त अद्याप कायम झालेचे दिसून येत नाही. विषयात नमूद केल्याप्रमाणे सदरचे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. अशा परिस्थितीत याचिकेची प्रत इत्यादि बाबींचा विचार करणे सदर विषयावर निर्णय घेताना क्रमप्राप्त आहे.

वरील विषयाचा आवाका पाहता सदर विषयावर चक्रिय पध्दतीने निर्णय घेण्यापेक्षा पुढे होणा-या नियमित बैठकीत सदरचा विषय घेण्यात यावा असे माझे मत आहे. "

मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनी मांडलेल्या उपरोक्त मतास **मा. तदर्थ समितीचे इतर ०२ सदस्य** (अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक व सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर) यांनी सहमती दर्शविलेली आहे.

उपरोक्त मा. तदर्थ समितीने दिनांक २४ सप्टेंबर, २०२० रोजी बहुमताने मांडलेल्या मतास अनुसरुन, विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे प्रस्तावित नियमित सभेपुढे विचारार्थ सादर करणेकामी सभा कामकाज विभागाकडे दिनांक ०१ऑक्टोबर, २०२० रोजी सादर करणेत आलेला होता.

दरम्यानचे कालावधीत, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून प्राप्त झालेल्या मूळ विषय पत्रिकेच्या सुचीत सदरचे विषयाचा समावेश नव्हता. तद्-नंतर मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून प्राप्त झालेल्या २१ ऑक्टोबर, २०२० चे पत्रानुसार सदरचा विषय दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजीचे होणारे प्रस्तावित नियमित सभेच्या विषयपत्रिकेत समाविष्ट करणेत आला. परंतु मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडील दिनांक २६ ऑक्टोबर, २०२० रोजीचे पत्राने, सदरची सभा स्थगित करणेत आली असल्याचे सभा कामकाज विभागाकडून सांगणेत आलेले आहे.

या सर्व बाबींचा विचार करतां, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० पासून आजपावेतो वेतन आदा करणेत आलेले नाही. त्यामुळे या कायम कंत्राटी कर्मचारी यांची गेल्या ०२-०३ महिन्यापासून उपासमार होत असून, नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबतचा निर्णय होणे अत्यंत गरजेची व आवश्यक बाब आहे, हे लक्षात घेऊन सदरचा प्रस्ताव व्यावहारीक दृष्टीकोनातून चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर करणेत येत आहे.

विभागाचा प्रस्ताव–उपरोक्त परिच्छेद अ ते परिच्छेद ई मध्ये नमुद केलेल्या वस्तुस्थितीस अनुसरुन, तसेच सभा कामकाज विभागाकडील पत्र जा. क्र. १४३२ / दिनांक १५ सप्टेंबर, २०२० अन्वये, ५९८ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत दिनांक १३ जुलै, २०२० रोजी घेतलेल्या निर्णयाचे अंमलबजावणीकामी मार्गदर्शनपर आदेश व्हावेत अशी विनंती करणेत आलेली आहे. विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने संस्थान सेवेत कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेतलेल्या ५९८ कर्मचा-यांचे नियुक्तीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दिवाणी दावा दाखल झाल्याने, सदरची बाब आता न्यायप्रविष्ट झालेली आहे. सदरहू ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी हे माहे ऑगष्ट, २०२० मध्ये विविध विभागात आवश्यकतेनुसार व गरजेनुसार सेवेत हजर होते. त्यामुळे या कालावधीचे नैसर्गिक न्याय तत्वानुसार वेतन आदा करणे उचित राहील आहे, असे मत आहे.

या सर्व बाबींचा विचार करतां, सदर ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर, २०२० चे व त्यानंतरचे कालावधीचे वेतन विहीत व निश्चित करणेत आलेल्या कार्यपध्दतीनुसार आदा करणेस मान्यता मिळणेकामी, विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५/३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगस्ट, सप्टेंबर व आक्टोंबर- २०२० चे वेतन आणि त्यानंतरचे कालावधीचे वेतन आदा करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन)

---

३४. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून दैनंदिन वापराकरीता आवश्यक असणारे सॅनिटायझर खरेदी करणेकामी Short notice E-Tender प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- सध्या देशासह जगभरामध्ये कोविड-१९ या संसर्गजन्य कोरोना विषाणूने थैमान घातलेले असून, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने काही प्रतिबंधात्मक अटी/ शर्तींवर कार्यालये सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. कर्मचा-यांमध्ये सुरक्षित अंतराबरोबरच मास्क, हॅण्ड ग्लोज, सॅनिटायझर, हात धुण्यासाठी सुविधा अशा बाबींचा त्यामध्ये अंतर्भाव आहे.

संस्थान कर्मचा-यांना या विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये, याकरीता संस्थानमधील विविध विभाग त्यांचे अखत्यारीतील कर्म-यांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षित अंतराबरोबरच मास्क, सॅनिटायझरचा वापर करीत असून त्यासाठी या साहित्याची मागणी औषध भांडार विभागाकडे करीत आहेत. परंतु या साहित्यांचा वार्षिक खरेदीमधील साठा संपुष्टात आलेला आहे व विभागांची मागणी पहाता, नवीन खरेदी करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे भविष्यामध्ये समाधी मंदिर दर्शनासाठी खुले करावयाचे झाल्यास, त्याचा विचार करुन, आपल्या विभागांकरीता पुढील सहा महिने कालावधीसाठी आवश्यक असलेले सॅनिटायझर व सोडियम हायपोक्लोराईड सोल्युशन इ. ची मागणी प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत दिनांक १८/०९/२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत औषध भांडार विभाग यांचेकडे द्यावी. कापडी मास्क व हॅण्ड ग्लोजच्या मागणीचा समावेश फक्त रुग्णालये व आरोग्य विभाग यांचेसाठीच राहील. उपरोक्त तारखेनंतर आलेल्या मागणीचा विचार केला जाणार नाही, असे इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ वशी- स्टोअर (पीएस)/२९५/२०२०दि.१२/०९/२०२० रोजीचे परीपत्रकान्वये सर्व विभागांना कळविण्यात आलेले होते.

त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे विभागांची मागणी प्राप्त झालेली आहे.

अ. नं.	**विभागाचे नाव**	**सॅनीटायझर ५०० मीली बॉटल**	**खरेदी विभागास प्राप्त दि.**
1	सामान्य प्रशासन विभाग	400	२५/०९/२०२०
2	विधी विभाग	6	१९/०९/२०२०
3	जनसंपर्क विभाग	24	१८/०९/२०२०
4	लेखाशाखा	4950	१७/०९/२०२०
5	बांधकाम विभाग	360	१७/०९/२०२०
6	विद्युत विभाग	180	१८/०९/२०२०
7	प्रसादालय विभाग	1800	१७/०९/२०२०
8	बगीचा विभाग	30	१७/०९/२०२०
9	माहिती तंत्रज्ञान विभाग	10	१८/०९/२०२०
10	साई प्रसाद निवासस्थान	3600	१७/०९/२०२०
11	रेकॉर्ड विभाग	24	१७/०९/२०२०
12	खरेदी भांडार विभाग	80	२९/०९/२०२०
13	द्वारावती भक्तनिवास	1800	१७/०९/२०२०
14	साईबाबा भक्त निवासस्थान ५०० रुम	7200	२५/०९/२०२०
15	आरोग्य विभाग	2000	१७/०९/२०२०
16	संरक्षण विभाग	7200	१८/०९/२०२०
17	ध्वनीक्षेपन व टेलीफोन विभाग	336	१८/०९/२०२०
18	पाणी पूरवठा विभाग	360	१८/०९/२०२०
19	वाहन विभाग	660	१७/०९/२०२०
20	आय टी. आय.	500	२३/०९/२०२०
21	इंग्लीश मेडीयम स्कूल	30	२५/०९/२०२०
22	कन्या विद्या मंदीर व	120	१७/०९/२०२०
22	कनिष्ठ महाविद्यालय	200	१७/०९/२०२०
23	श्री साईनाथ हॉस्पिटलमधील वार्ड/ विभाग	1200	१८/०९/२०२०
24	सी. सी. टी. व्ही. विभाग	90	२४/०९/२०२०
25	श्री साईबाबा ज्यूनियर कॉलेज	100	१८/०९/२०२०
26	फायर ॲन्ड सेफ्टी विभाग	60	१७/०९/२०२०

अ. नं.	विभागाचे नाव	सॅनीटायझर ५०० मीली बॉटल	खरेदी विभागास प्राप्त दि.
27	साई आश्रम भक्त निवास १००० रुम	3600	१७/०९/२०२०
28	साई धर्मशाळा विभाग	2400	१७/०९/२०२०
29	मालमत्ता विभाग	12	१७/०९/२०२०
30	लाडू व बर्फी निर्मिती विभाग	396	१५/०९/२०२०
31	मॅकेनिकल विभाग	240	२३/०९/२०२०
32	श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वार्ड/ विभाग	6000	
	एकूण सॅनीटायझर ५०० मीली बॉटल	**45968**	

संस्थानमधील विविध विभागांकडून ५०० मिली सॅनीटायझरच्या ४५९६८ नग बाटल्यांची मागणी आलेली आहे. सध्या बाजारामध्ये ५ लिटर जारमध्ये सॅनिटायझर उपलब्ध असून प्राप्त मागणीनुसार ४५,९६८ नग ५०० मिली बाटली खरेदी करणे ऐवजी ५ लिटर जारमध्ये सॅनिटायझर खरेदी करणे योग्य होईल. ४५,९६८ नग ५०० मिली बाटलीचे ५ लिटरचे ४५९७ जार होतात. परंतु काही विभागांनी मागणी दिलेली नाही, ऐनवेळी ते विभागही सॅनीटायझरची मागणी करतील. त्याकरीता ५ लिटरचे ५००० नग जार खरेदी करणे अपेक्षित आहे.

सामान्यतः रुग्णालयांच्या ठिकाणी मेडिकेटेड सॅनीटायझरचा वापर करणेत येतो व इतर ठिकाणी FDA मान्यताप्राप्त अल्कोहोल बेस सॅनीटायझर वापरले जाते. तसेच भविष्यामध्ये श्रींचे मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करावयाचे झाल्यास सॅनीटाझर वापराचे प्रमाणही वाढणार आहे. त्याचप्रमाणे केंद्र तसेच राज्य सरकारने अनेक खाजगी कंपन्या व साखर कारखाने यांना सॅनीटायझर तयार करणेस परवानगी दिलेली आहे. त्यामुळे अल्कोहोल बेस सॅनीटायझरचे दरही स्पर्धात्मक दृष्टीने कमी प्रमाणात प्राप्त होत आहेत.

सदर सॅनीटायझर जार खरेदीकामी येणारा अंदाजे खर्च निश्चीत करणेसाठी अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दूरध्वनीद्वारे दरपत्रक मागविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

अ.नं.	पुरवठाधारकाचे नाव	दर प्रति नग रु.	खरेदी नग संख्या	एकुण अंदाजे खर्च
१	Pratik Medical & General Stores, Kolhar Bk.	५००/-		
२	Shree Sai Traders, Kopargaon	४९०/-		
	एकुण रु.-	९९०/-		
	सरासरी प्रती नग दर रु.-	**४९५/-**	**५०००**	**२४,७५,०००/-**

वरीलप्रमाणे ५ लिटर ८०% अल्कोहोल बेस सॅनीटायझरचे ५००० नग जार खरेदीकामी अंदाजे रु.२४,७५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

या बाबींचा विचार करता, संस्थानमधील रुग्णालयातील ओटी/ वार्ड/ विभाग व कोव्हीड हॉस्पिटल वगळता, इतर विविध विभागांच्या दैनंदिन वापराकरीता ८०% अल्कोहोल बेस सॅनीटायझर खरेदी करावयाचे झालेस, अल्कोहोल बेस सॅनीटायझर ५ लिटरचे ५००० नग जार खरेदीकामी अंदाजे रु.२४,७५,०००/- मात्र खर्च येईल.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :- संस्थान रुग्णालयातील ओटी/ वार्ड/ विभाग व कोव्हीड हॉस्पिटल वगळता, इतर विविध विभागांच्या दैनंदिन वापराकरीता ८०% अल्कोहोल बेस सॅनीटायझर ५ लिटरचे ५००० नग जार खरेदी करणे अपेक्षित आहे. सदरहू सॅनीटायझर अल्पावधीत खरेदी करुन वापरासाठी देणेकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये व आय.टी. विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात देऊन, महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Short Notice E-Tender प्रसिध्द करुन, आवश्यकतेनुसार सॅनीटायझर खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी संस्थान रुग्णालयातील ओटी/ वार्ड/ विभाग व कोव्हीड हॉस्पिटल वगळता, इतर विविध विभागांच्या दैनंदिन वापराकरीता ५ लिटरचे ५००० नग जार ८०% अल्कोहोल बेस सॅनीटाझर संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये व आय.टी. विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर

जाहिरात देऊन, महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Short Notice E-Tender प्रसिध्द करुन विहीत कार्यपध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२४,७५,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळणेकामी सदरहू प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४५५/३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून दैनंदिन वापराकरीता आवश्यक असणारे सॅनिटायझर खरेदी करणेकामी Short notice E-Tender प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

३५. संस्थान संचलित दोन्ही हॉस्पिटल व कोरोना हॉस्पिटल येथे वापराकरीता PPe Kit खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- दि.०१/०९/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे PPE Kit, Short notice E-Tender प्रक्रिया राबवून खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदी करणेस तसेच PPE Kit खरेदीकामी येणा-या रक्कम रु.४४,९०,०००/- चे खर्चास मा.तदर्थ समिती सभेची चक्रिय पध्दतीने मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन तांत्रिकदृष्टया मसुदा अंतिम करणेकामी संस्थान अंतर्गत बनविण्यात आलेल्या तज्ञ समितीकडून दि.२८/०९/२०२० रोजी उपरोक्त खरेदीकामीचा मसुदा तपासून घेण्यात आलेला असून त्यांनी सुचविलेल्या आवश्यक त्या बदलानुसार दुरुस्ती करुन सदरहू मसुदा अंतिम करण्यात आला व नियमानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०६/१०/२०२० पासुन दि.१३/१०/२०२० पर्यंत संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात ठेवण्यात आलेली होती व www.mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती, तसेच पुरवठाधारक/ अधिकृत विक्रेते यांना जाहिरातीबाबत ई-मेलव्दारे देखील कळविण्यात आले होते, त्यास अनुसरुन PPE Kit, खरेदीकामी २३ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

प्राप्त २३ ऑनलाईन ई-निविदांचे टेक्नीकल बीड दि.१५/१०/२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असता, त्यामध्ये सर्व २३ ई-निविदाधारक पात्र ठरले होते. त्यास अनुसरुन दि.०३/११/२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा उघडण्यात आलेल्या असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्यामध्ये M/s. Pharmdeal, Pune यांचे प्रती नग रु.२००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहे. या दरामध्ये आणखी काही सुट मिळणेकामी त्यांना विचारणा केली असता, त्यांनी दिनांक १६.११.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे ई-निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये आणखी सुट देणेस असहमती दर्शविली.

M/s.Pharmdeal, Pune यांना पुरवठा आदेश देणेपुर्वी ई-निविदेतील अटी/ शर्तीनुसार ते पुरवठा करणार असलेल्या PPE Kit च्या नमुन्याची वापरकर्ते डॉक्टर्स/ कर्मचारी यांनी पाहणी केली असता, सदरहू PPE Kit वापरण्यास योग्य असलेबाबत त्यांनी लेखी अभिप्राय दिलेला आहे.

तरी M/s. Pharmdeal, Pune यांचे ई-निविदेमधील प्रती नग रु.२००/- मात्र निम्नत्तम दर स्विकारणेत येऊन, या दराने त्यांना १०००० नग PPE Kit पुरविणेकामीचा पुरवठा आदेश देणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

निर्णय क्र.४५५/३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान संचलित दोन्ही हॉस्पिटल व कोरोना हॉस्पिटल येथे वापराकरीता PPe Kit खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

३६. संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांचे अहवालानुसार खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस व सी.आय.एस.एफ.मुंबई यांचे मार्फत करण्यात आलेले असुन सदर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांची उपरोक्त संदर्भ क्रं०२ नुसार ई – निविदा प्रक्रियाव्दारे संस्थानचे फायर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. फायर सल्लागार यांनी साई मंदिर व मंदिर परिसराची पहाणी करुन मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणेकामी शासनाचे सुधारीत सुधारीत S.S.R. (स्टेट शेडयुल्ड रेट) इलेक्ट्रीक डिव्हीजन, चॅप्टर नं. १३ नुसार अंदाजे ०२ कोटी १५ लाख खर्च अपेक्षित अहवाल सादर केलेला होता. सदर अहवालानुसार मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणेकामी (स्थायी अग्निशमन यंत्रणा, हायड्रंट सिस्टीम, स्प्रिंकलर सिस्टीम, स्मोक डिटेक्टर, अलार्म सिस्टीम) ई – निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे २ कोटी १५ लाख मात्रचे खर्चास उपरोक्त संदर्भ क्रं०१ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील विषय क्र.३६ नुसार मंदीर व मंदीर परीसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणीकामी फायर सल्लागार मे.ग्राफीक इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे प्राप्त अहवालाप्रमाणे खरेदी विभागामार्फत ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस,महाराष्ट्र शासनाचे व संस्थानचे संकेत ई-निविदा प्रसिध्द करुन पुणे,मुंबई नासिक,अहमदनगर व ईतर मोठया शहरातील वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेषक खर्चास मान्यतेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.२६० नुसार सविस्तर चर्चा होऊन, **उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२.१५ कोटी मात्र खर्चास मान्यता देणेत आली.**

श्री साईबाबा संस्थानचे साई मंदिर व मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणे कामी तसेच सदर ई- निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या तसेच संस्थानच्या वेबसाईटवर अपलोड करावी लागणार असल्याने मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रकचर प्रा.लि. औरंगाबाद कंपनीमार्फत ई- निविदा मुसदा तयार करणेत आला होता. सदरची निविदा मसुदा दि.०९.०४.२०१९, दि.११.०६.२०१९, दि.२२.०६.२०१९, दि.२४.०१.२०२०, दि.१७.०२.२०२०, दि.०९.०३.२०२०. दि.१९.०३.२०२० रोजी निविदा तपासणी समितीने तपासणी केलेली असून सदर निविदेमध्ये तपासणी समितीने वेळोवेळी सुचविलेल्या बदलांप्रमाणे निविदेमध्ये बदल करणेत आलेला आहे. फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.कंपनी यांनी तपासणी समितीने वेळोवेळी सुचविलेल्या बदलाप्रमाणे निविदेमध्ये बदल करुन दुरुस्त ई - निविदा दि.०७.१०.२०२० रोजी आयोजीत केलेल्या ई–निविदा तपासणी समितीचे सभेमध्ये सादर केलेली होती. त्यामध्ये सर्व मुदयांची पाहणी करुन निविदा अंतीम करणेत आलेली आहे तसेच प्रि-बिड मिटींगमध्ये उपस्थित होणारे मुद्दे आवश्यक असलेस बदल करता येईल.

आता तसेच उपरोक्त संदर्भ क्रं ०४ चे टिपणीवरील मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे **सिव्हील ॲप्लीकेशन, प्रेझेंटेशन व डेमोस्ट्रेशन** बाबत निर्देश दिलेले आहे. सदरची मान्यता मा.व्यवस्थापन समितीने सन २०१८ साली दिलेली आहे. सदर प्रकल्पाबाबत मा.तदर्थ समितीपुढे विषय सादर करुन फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे अहवालानुसार येणा-या अंदाजे रु.२.१५ कोटी खर्चास मान्यता घेता येईल तसेच मा.तदर्थ समितीने मान्यता दिल्यानंतर सदर खर्चाबाबत मा.उच्च न्यायालय मुबंई हायकोर्ट औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ऑप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेता येईल.

तरी संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी फायर सल्लागार मे. इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबद यांचे अहवालानुसार रु.२.१५ कोटी खर्चास तसेच सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणेबाबत तदर्थ समितीची चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.४५५/३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांचे अहवालानुसार खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)

विषय नं.०३ **BS-6 प्रकारातील दोन नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः- १.कलम १७(१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष् आदेशास अधीन राहून , संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने

व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे , ही समितीची कर्तव्ये असतील.

२.कलम २१(१) मध्ये विश्वस्तव्यस्थेचा निधी, आयक अधिनियम, १९६१ च्या तुरतुदींना अधिन राहुन, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करणत येईल,--

(ख) रुढी व प्रथांनुसार , मंदिरातील धार्मिक विधी , पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग)- भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) श्री साईबाबांच्या शिकविणीचा प्रचार करणे.

प्रस्तावना- श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकडे सद्यस्थितीत दोन कार्डीयाक रुग्णवाहिका कार्यरत आहे. त्यापैकी एमएच १७ एजी १०१६ ही कार्डीयाक रुग्णवाहिका दि.१०.०८.२०१० पासून कार्यरत असून तिचा १४/०८/२०१९ अखेर २,२६,७८५ किमी वापर झालेला असल्याने दुरुस्ती देखभालीचा खर्च वाढत असलेमुळे नवीन एक कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.२५,००,०००/- (अक्षरी रु पंचवीस लाख) मात्र व या रुग्णवाहीकेत आवश्यक उपकरणे रुग्णालयामार्फत बसविणेस व त्याकरीता रु. दहा लाख मात्रचे खर्चास अशा एकुण पस्तीस लाख मात्रचे खर्चास मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात आला होता.

दिनांक २१/०८/२०१९ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं ४६० नुसार, श्री साईबाबा रुग्णालयाकडे सद्यस्थितीत दोन कार्डीयाक रुग्णवाहिका कार्यरत आहे. त्यापैकी एमएच १७ एजी १०१६ ही कार्डीयाक रुग्णवाहिका दि.१०.०८.२०१० पासून कार्यरत असून तिचा आज अखेर २,२६,७८५ किमी वापर झालेला असल्याने दुरुस्ती देखभालीचा खर्च वाढत आहे. सदरची कार्डीयाक रुग्णवाहिका शासन मान्यतेने जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

तसेच संस्थानचे रुग्णालयाकरीता दोन नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका करीताफोर्स मोटर्स कंपनीची Advance life support Ambulance (Type D) Bs4, Ps, A/Cव स्वराज्य माझदाकंपनीची Cardiac cum Trauma Care Unit ,Bs4, Ps, A/Cरुग्णवाहिका खरेदी कामी या दोन्ही कंपनीकडून / कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास तसेच रुग्णवाहिकांकरीता आवश्यक उपकरणे बसविणेकरीता येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार,नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका करीताफोर्स मोटर्स कंपनी व स्वराज्य माझदाकंपनी (एसएमएल) या दोन्ही कंपनीकडून / कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून Advance life support Ambulance (Type D) Bs4, Ps, A/Cया प्रकारातीलरुग्णवाहिका खरेदी कामी दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दर मागणीपत्र संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आले होते.

Advance life support Ambulance (Type D) Bs4, Ps, A/Cया प्रकारातील रुग्णवाहिका खरेदी कामीफोर्स कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून यांचेकडून पाच (५) दरपत्रके व स्वराज्य माझदा कंपनी (एसएमएल) कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून यांचेकडून (४) चार दरपत्रके प्राप्त झाली होती. सदरची दरपत्रके दि.०७/०१/२०२० रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्याकरीता संबंधीत पुरवठादार यांना हजर राहण्याचे कळविण्यात आले होते. यावेळी फोर्स कंपनीचे ०३ व स्वराज्य माझदाकंपनीचे ०३ प्रतिनीधी हजर होते. यावेळी उपस्थिती असलेल्या फोर्स कंपनीचे पुरवठादारापैकी ०२ पुरवठादारांनी माहे जानेवारी-२०२०पासुन किंमतीत वाढ झालेली असलेचे सांगितल्यामुळे त्यांच्या दरपत्रका व्यतिरीक्त इतर दरपत्रक उघडण्यात आली. यावेळी हजर असलेल्या प्रतिनीधीनी १ एप्रिल,२०२० पासुन BS-6 प्रकारच्या रुग्णवाहीका मार्केटमध्ये येणार असलेने सध्या BS-4 मॉडेल या प्रकारच्या रुग्णवाहीका उपलब्ध नाहीत असे सांगीतलेमुळे यावेळी खरेदी समितीचे सभेत झालेल्या चर्चेत सदरची रुग्णवाहीका देणगी स्वरुपात मिळणेबाबत प्रयत्न करावे. देणगी न मिळाल्यास BS-4 या जुन्या प्रकारच्या रुग्णवाहीका खरेदी करण्याऐवजी BS-6 या प्रकारातील अत्याधुनिक रुग्णवाहीका खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी असे ठरले.

सदरची रुग्णवाहीका देणगी स्वरुपात प्राप्त होणेकरीता साईबाबा हॉस्पीटल मार्फत जा.नं. एसएसएसटी /एसएसएच/ वशी/२०७९/२०२० दिनांक १०/०१/२०२० रोजी रिलायन्स इंडस्टींज लि. मुंबई यांना लेखी पत्र दिलेले आहे. मात्र अदयाप त्यांचे कडून याबाबत काहीही प्रतीसाद आलेला नाही.

विभागाचा स्पष्ट अभिप्रायः- त्यामुळे BS-6 या प्रकारच्या कार्डीयाक रुगणवाहीका खरेदी करणेकरीता दिनांक २१/०८/२०१९ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं ४६० नुसार,Advance life support Ambulance (Type D) Bs4, Ps, A/Cया प्रकारातील दोन कार्डीयाक रुग्णवाहिका खरेदी करणेस मान्यता मिळालेला विषय निरस्त करावा लागेल. व BS-4 ऐवजी BS-6 या प्रकारची कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेस व या कामी येणा-या खर्चास मा. तदर्थ समितीची मान्यता घ्यावी लागेल. सदर रुग्णवाहीका खरेदी करणे कामी येणारा खर्च रूग्णवाहीका खरेदी या अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करता येईल. सदर निर्णयानुसार या रुग्णवाहीका मध्ये आवश्यक ती मशनरी / उपकरणे बसविणेची कार्यवाही रुग्णालयामार्फत चालु आहे.

महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीकेतील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये , " कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि , मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." अशी तरतूद आहे.

यानुसार याकामी फोर्स मोटर्स व स्वराज्य माझदाया दोनच कंपन्या कार्डीयाक रुग्णवाहीका तयार करत असल्यामुळे या कंपनी अथवा या कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून Advance life support Ambulance (Type D) BS-6, Ps, A/Cया प्रकारच्या कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणे करीता दरपत्रके मागवावी लागतील. अधीक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दर मागणी पत्र संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

मागणीः- तरी दिनांक २१/०८/२०१९ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं ४६० नुसार, फक्त बीएस ४ या प्रकारातीलरुग्णवाहिका खरेदी करणेस मान्यता मिळालेला विषय निरस्त करुन बीएस ६ प्रकारातील फोर्स मोटर्स व स्वराज्य माझदाया कंपनी अथवा या कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडूनAdvance life support Ambulance (Type D) BS-6, Ps, A/Cया प्रकारच्या दोन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणे करीता दरपत्रके मागविणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.४७,००,०००/- (अक्षरी रु. सत्तेचाळीस लाख मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणे कामी सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, BS-6 प्रकारातील दोन नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेकामी बीएस६ प्रकारातील फोर्स मोटर्स व स्वराज्य माझदा या कंपनी अथवा कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून Advance life support Ambulance (Type D) BS-6, Ps, A/C या प्रकारच्या दोन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेकरीता दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४७,००,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच श्री साईबाबा रुग्णालयाकडे सद्यस्थितीत दोन कार्डीयाक रुग्णवाहिका कार्यरत आहेत. त्यापैकी एमएच १७, एजी १०१६ ही कार्डीयाक रुग्णवाहीका दि.१०.०८.२०१० पासून कार्यरत आहे. तिचा आज अखेर २,२६,७८५/- किमी वापर झालेला असुन दुरुस्ती देखभालीचा खर्च वाढत असल्याने सदरची कार्डीयाक रुग्णवाहीका दि.२१.८.२०१९ चे निर्णय क्र.४६० नुसार शासन मान्यतेने जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०८.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६० नुसार बीएस ४ या प्रकारातील रुग्णवाहीका खरेदी करणेस मान्यता मिळालेला निर्णय निरस्त करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करण्यात येऊन मा.न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-वाहन विभाग/विधी विभाग)

विषय नं.०४ **साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-

१) कलम १७ (१) मध्ये,"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये

विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,-

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) – श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४) कलम २१ (१क-२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

५) कलम-१७ (३) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही", अशी तरतुद आहे.

प्रस्तावना:- दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये,*श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वत:च्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्येसंस्थान मार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.*

श्री साईबाबांचे हे रुग्णसेवेचे कार्य पुढे असेचचालु ठेवुन त्यांची व्याप्ती वाढविण्याकरीता, "राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यामाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहिका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहिकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहिका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहिका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी" असा निर्णय झालेला होता.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस-वशी-वाहन/४४५५/२०१६ दि.२३/११/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना सदर साई-रुग्णवाहिका प्रकल्पास शासन मान्यता मिळणे कामी पत्र देण्यात आलेले होते.

त्यानंतर दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४ व निर्णय क्र.१४ अन्वये,"*महाराष्ट्रातील ग्रामीण,दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन*

देणेसाठी ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प राबविणेकामी अंतीम सुधारित नियमावली तयार करणेत येऊन त्यास मान्यता देण्यात आली व या सर्व कार्यवाहीस संस्थानच्या छाननी समितीची मान्यता घेऊन पुढील मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावा'', असे ठरले.

सदर निर्णयानुसार,दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा छाननी समितीचे सभेत सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पास व त्या बाबतचे सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला होता.

''वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. श्री साईबाबा संस्थानमार्फत ५०० रुग्णवाहिकांचा साई-रुग्णवाहिका प्रकल्प राबविणेस व याकामी महिंद्रा व महिंद्रा कंपनीचे BS-III बोलेरो वाहन, विशेष किंमत रु.५ लक्ष प्रति रुग्णवाहिका या दराने खरेदी करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

सर्वसहमतीने असेही ठरले की, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्यात १०० रुग्णवाहिका खरेदी करण्यात याव्यात व त्यानंतर या १०० रुग्णवाहिकांच्या व त्या रुग्णवाहिका चालविणा-या संस्थाच्या कामकाजाबाबत आढावा घेवुन पुढील प्रकल्प राबविण्याची कार्यवाही करावी. श्री साईबाबा संस्थानचे रुग्णवाहिका संदर्भातील सर्व नियम हे संबंधीत संस्थांना लागु असतील. तसेच या प्रकल्पात लागु होणारे सर्व प्रकारचे सरकारी कर माफ करण्याचा विनंती प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. सर्वानुमते प्रस्तावीत नियमावलीस मान्यता देण्यात आली व सदरहु नियमावलीस व प्रकल्प राबविणेस शासनाची मान्यता घेणेसाठी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले होते.

यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/२५३/२०१७ दि.१५/०४/२०१७ चे पत्रान्वये, साई रुग्णवाहिका प्रकल्पास व या बाबतचे मा.व्यवस्थापन समितीने तसेच छाननी समितीने मान्यता दिलेले नियमावलीस शासन मान्यता मिळणे करीता प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आला होता.

यावर महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, *''श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता, ''भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब, संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी''*, असे कळविलेले होते.

यानुसार सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ चे सभेत सादर केला असता, निर्णय क्र.३६० अन्वये, ''राज्यातील गोर-गरीब, दुर्बल, आदिवाशी रुग्णांच्या सेवेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामार्फत साई रुग्णवाहिका प्रकल्प सुरु करण्याचा समितीचा माणस आहे. सदरहू प्रकल्प राबविणेसाठी, अधिनियमातील तरतूदींचा सखोल अभ्यास करुन, तसेच संस्थान कायदे सल्लागाराचा सल्ला घेण्यात येऊन व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेबरोबर चर्चा करुन सविस्तर फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा'', असे ठरले.

या निर्णयानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/९०९/२०१७ दि.२३/०५/२०१७ चे पत्रान्वये संस्थानचे कायदे विषयक सल्लागार ॲड. नितीन आर. भवर, औरंगाबाद यांना शासनाचे पत्र संस्थान अधिनियम याचा अभ्यास करुन साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत उचीत मार्गदर्शन करणे बाबत कळविलेले होते.

कार्यासन अधिकारी,विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.सासवि-१०१७/सं.क्र.११९५/का.१६, दि.१९.०७.२०१७ चे पत्रामध्ये,"श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्या दिनांक २१/०६/२०१७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास त्वरीत सादर करण्यात यावेत'', असे कळविलेले होते.

तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार ॲड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे. सदर जनहित याचिकेचा नंबर ८६/२०१८ आहे.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचेकडील पत्रातील व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या जनहित याचीकेतील मुद्यांबाबत सविस्तर चर्चा होऊन शासनास देणेचे अभिप्राय बाबत निर्णय होणे करीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०५, निर्णय क्र.२०४ *"साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये संस्थानने Aggregator ची भूमिका पार पाडावी. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीशी चर्चा करुन एका रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर किंमतीच्या २५% रक्कम रुग्णवाहिका मागणी करणा-या संस्थेने व उर्वरीत ७५% रक्कम साईभक्तांनी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे भरावेत. यासाठी संस्थानने सर्व साईभक्तांना आवाहन करावे.*

प्रथम महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन या प्रकल्पासाठी रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर रुग्णवाहिकेवर "साई रुग्णवाहिका" असे कंपनीमार्फत प्रिंट करुन घ्यावे. यासाठी प्रथम कार्यवाही करावी.

सध्या सदर प्रकल्पासाठी ज्या साईभक्तांनी देणगी दिलेली आहे. त्यांना त्यांची रक्कम परत करता येईल का? याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सभेसमोर सदर करणेत यावा, असे ठरले.

यानंतर दि.०४/०४/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०१ निर्णय क्र.२२४ (५) नुसार दि.०७/०३/२०१८ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

दि.०७/०३/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२०४ या मध्ये खालील मजकुर समाविष्ठ करणेत यावा.

साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी साईभक्तांनी देणगी दिलेल्या रकमेचा सदर योजनेसाठी विनियोग कसा करता येईल, याबाबत समिती सदस्य मा. ॲड. मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली कायदेतज्ञ व आयकर तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.

यानंतर दि.०२/०५/२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३३८ व दि.०१/०६/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"रुग्णवाहिकांसाठी साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री केळकर व सनदी लेखापाल श्री चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याऐवजी सदर निधीचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन १०० रुग्णवाहीका खरेदी कराव्यात, सदर रुग्णवाहिकेवर साई रुग्णवाहिका व संस्थानचे तसेच देणगीदार साईभक्ताचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहिका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणा-या सेवाभावी संस्था / ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुग्णवाहीकेवरील वाहन चालक त्यासाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहिकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणा-या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील", असे ठरले. त्याप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार, साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या रुग्णवाहिका संस्थानच्या नावावर असलेने त्या अनुषंगीक ब-याच कायदेशिर जबाबदा-या संस्थानवर बंधनकारक राहतील. त्यामुळे ज्या स्वयंसेवी संस्था / ट्रस्ट यांना रुग्णवाहिका द्यावयाच्या आहेत, त्यांचे निकष / नियमावली निश्चित करुन त्यानुसार त्यांचेकडून विहीत

नमुन्यात अर्ज मागवुन त्या संस्था निश्चित करुन त्यांना ठरावीक रक्कम अनुदान म्हणुन देवुन त्या रक्कमेतुन त्यांनी रुग्णवाहिका खरेदी केल्यास त्या रुग्णवाहिकांची कायदेशीर जबाबदारी त्यांची राहील. यामुळे अनुदान देणे बाबतचा सुधारित प्रस्ताव व या अनुशंगाने सुधारित नियमावलीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेले होते.

दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२० निर्णय क्र.४८० व दि.२२/०८/२०१८ चे सभेतील विषय क्र.१ निर्णय क्र.५०६(१) नुसार, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) *५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प मान्यतेसाठी मा.छाननी समितीचे शिफारशीने शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यात यावा.*

२) *याकामी संस्थानने पात्र सेवाभावी संस्थाना प्रत्येकी रुपये ५ (पाच) लाख उपलब्ध करुन द्यावेत, उर्वरीत रक्कम संबधीत संस्थेने द्यावी.*

३) *संबधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.*

४) *रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा अॅन्ड महिंद्रा कंपनीचे BS-VI हे मॉडेल निश्चित करणेत यावे.*

५) *प्रत्येक रुग्णवाहीकेस GPS System बसवुन घेण्यात यावी.*

६) *रुग्णवाहीकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.*

७) *रुग्णवाहीकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे सौजन्याने 'श्री साई शताब्दी रुग्णवाहीका' असे नमुद करण्यात यावे.*

तसेच दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२१ निर्णय क्र.४८१ नुसार, सविस्तर चर्चा होऊन, पुढील प्रमाणे नियमावलीस मान्यता देण्यात आली.

१) स्वयंसेवी संस्था ही मुंबई सार्वजनिक संस्था १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट १९५०) खाली नोंदणीकृत होऊन कमीतकमी तीन वर्ष कार्यरत असावी. (अथवा सोसायटी रजि. अॅक्ट खाली किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे ३ वर्षापुर्वी नोंदलेली असावी).

२) ज्या स्वयंसेवी संस्था या प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक रुग्णवाहिकेसाठी अनुदान देय राहील.

३) सदर अनुदानातुन केवळ रुग्णवाहिकाच खरेदी करता येईल.

४) संस्थान अनुदानातुन रुग्णवाहिका खरेदी केले बाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.

५) रुग्णवाहिकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व साई शताब्दी साई रुग्णवाहिका असे नाव टाकणे बंधनकारक राहील.

६) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ (तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान १०(दहा) लाख रुपये असावी.

८) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

९) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१०) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस,टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

११) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.

१२) कायदेशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव व औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१३) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

दि.२६/०७/२०१८ व दि.२२/०८/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४८०व निर्णय क्र.४८१ नुसार, फेर प्रस्तावास व त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारित नियमावलीस मान्यता मिळणेस तसेच

सदरचा सुधारित नियमावलीस मान्यता मिळणे बाबतचा दि.२२/०८/२०१८ रोजीचे मा.छाननी समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होते.

दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, विषय नं.६ वर प्रशासकीय अडचणी पाहिल्यानंतर पुढे येणाऱ्या अडचणी व कायदेशीर बाबी लक्षात घेता, शिर्डी संस्थानतर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील नोंदणीकृत प्रत्येकी एक या प्रमाणे ५०० सामाजीक संस्थाना (मुंबई सार्वजनिक संस्था कायदा १९५० किंवा सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकासाठी संस्थानतर्फे रु.५.०० लक्ष कायमस्वरुपी अनुदान म्हणून देण्यात यावी. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणाऱ्या संस्थेने महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (५ लक्ष वजा करुन) भरावी व कागदोपत्री पुर्तता करावी अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानतर्फे रु.५लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावे. रुग्णवाहिकेची मालकीही स्वयंसेवी संस्थेची राहील. मात्र त्यांना संस्थानच्या नावाने हमीपत्र द्यावे लागेल,की ते सदर रुग्णवाहिका विकणार नाही व सर्व कार्यवाही संस्थानचे नियमाप्रमाणे करतील, सदर छाननी समितीची शिफारस व्यवस्थापन समितीपुढे ठेवून तदनंतर शासनाकडे पाठवावी, तसेच दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतील विषय क्र.०७ निर्णय क्र.४१ नुसार,"५०० रुग्णवाहिका प्रकल्पाला शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर रुग्णवाहिका नियमावलीबाबत शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर निर्णय घ्यावा असे एकमताने ठरले. व हा प्रस्ताव व्यवस्थापन समितीकडे पाठविण्यात यावा". असे ठरले.

दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार,"५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता मिळणेस तसेच मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार सदर प्रस्तावास मान्यता मिळणे कामी व त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यता मिळणेस सादर करणे कामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेपुढे मान्यता मिळणे कामी सादर करण्यात आला होता. या सभेत निर्णय क्र.५४९ नुसार,*"दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविणेस मान्यतेसाठी पाठविण्यात यावा"*,असे ठरले.

त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वाहन/३१११/२०१८ दि.२७/०९/२०१८ नुसार, सुधारीत साई रुग्णवाहिका योजनेचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर करण्यात आला होता.

यावर, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/ प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साईबाबा संस्थन विश्वस्तव्यवस्था, अधिनियम, २००४ कलम १७(२-ण) मध्ये, मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्याला चालना देण्यात येईल, अशी तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रुपये ५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणेकरीता रुपये २५ कोटी येणा-या खर्चास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) *शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी रक्कम स्वयंसेवी संस्थेनी भरल्यानंतर संस्थेतर्फे रु.५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावी.*

२) *संबंधित संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.*

३) *रुग्णवाहिकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा बोलेरो BS-IV हे मॉडेल निश्चित करण्यात यावे.*

४) *प्रत्येक रुग्णवाहिकेस GPSSystem बसवून घेण्यात यावी.*

५) *रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.*

६) *रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे नमूद करण्यात यावे.*

७) *रुग्णवाहिका नियमावली अंतिम करुन शासन मान्यतेस्तव तात्काळ सादर करण्यात यावी. सदर नियमावलीस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियमावलीमध्ये नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्रातील नोंदणीकृत संस्थांना प्रत्येकी एक याप्रमाणे रुग्णवाहिके करीता अनुदान देण्यात यावे.*

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार ॲड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे. सदर जनहित याचिकेचा नंबर ८६/२०१८ असुन सध्या कोरोना महामारी मुळे या केसची दि.२४/०३/२०२० नंतर पुढील तारीख ऑनलाईन पोर्टलवर दिसत नाही.

साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता देणगी स्विकारणे करीता स्वतंत्र खाते तयार करण्यात आले होते. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ चे सभेतील निर्देश व दि.०५/०४/२०१८चे मान्यतेने व जा.नं.एसएसएस /वाहन/९९/२०१८ दि.१२/०४/२०१८ चे आदेशान्वये साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता संस्थानमार्फत साईभक्तांकडून स्विकारण्यात येणारी देणगी पुढील आदेश पावेतो स्थगित करण्यात आलेली आहे. त्यानुसार साई रुग्णवाहिका प्रकल्पाचे निधीमध्ये संस्थानखाती दि.१६/०७/२०२० अखेर एकुण रक्कम रु.५,३३,८३,०६३/- जमा आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ चे सभेतील विषय क्र.०१ निर्णय क्र.३९ (८) व (९) नुसार,दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेच्या इतिवृत्त कायम करतांना त्यातील निर्णय क्र.३४ व ३५ ऐवजी खालील प्रमाणे दुरुस्ती करुन त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

"मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचीकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचीका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदिन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील ॲड. नितीन भवर यांनी दुरध्वनीद्वारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.

मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरुन आजचे सभेत सदरचा निर्णय कामय करतांना मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा",असे ठरले.

मागणी:- तरी साई रुग्णवाहिका प्रकल्प बाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे माहितीस्तव व अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.४५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय , मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असलेल्या रिट पिटीशन १२०/२०१९ मध्ये मा.न्यायालयाने दि.३०.०१.२०२० रोजी 'संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदिन कामकाजाशी संबधीत बाबीवर खर्च करावा, संस्थान व्यतिरिक्त अन्य संस्थान अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये.' असे निर्देश दिलेले असल्याने साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबतचा निर्णय स्थगित करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-वाहन विभाग)

विषय नं.०५ **संस्थानची भारत बेंज कंपनीची एसी बस (साईरथ) वाहन क्रमांक एमएच-१७-बीवाय-०२६३ या शिर्डी (काकडी) विमानतळावर विमानाने येणारे साईभक्तांना आणणेकरीता वापर करणेस तसेच याअनुषंगाने टॅक्स भरणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन २००४ ची अधिनियम तरतुद:**

१. कलम १७(१) मध्ये -"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणंना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून देणे. आणि या अधिनिमान्वये विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील." अशी तरतूद आहे.

२. कलम २१(१)(क) मध्ये - "विश्वस्तव्यवस्थेच्या निधी, आयकर अधिनियम,१९६१ च्या तरतुदीस अधीन राहुन समितीकडून मंदीराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल."अशी तरतुद आहे.

प्रस्तावना:- दिनांक १/१०/२०१७ ते ३१/१०/२०१८ या कालावधीत साई समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले होते. या काळात श्री साईबाबांनी वापरलेल्या पवित्र पादूका दर्शनासाठी भारतात तसेच परदेशात विविध ठिकाणी पाठविण्याचे निश्चीत करण्यात आले होते. सदरच्या ठिकाणी साईबांबाच्या पवित्र पादुका व दर्शन सोहळया करीता नेमलेले कर्मचारी ने आण करणे करीता भारत बेंज कंपनीची ३६ आसनी एसी बस खरेदी करुन तीला बाहेरील बाजूने विविध साईबाबांचे पोष्टर लावून साईरथ बस तयार करण्यात आली होती. या बसचा क्रमांक एमएच-१७-बीवाय-०२६३ असा आहे. या कालावधीत आयोजित केलेल्या साई पादूका दर्शन सोहळयांचे ठिकाणी साई पादूका व संस्थान कर्मचारी यांना ने आण करणे करीता या बसचा वापर करण्यात आलेला आहे. आज तागायत सदर बसचा २५९२२ किमी वापर झालेला आहे.

सध्या पुढील कालावधीचा पादूका दर्शन सोहळयाचा कार्यक्रम निश्चीत झालेला नाही. त्यामुळे सदर बस वाहन विभागात वापरा अभावी उभी आहे . तसेच कोरोना महामारी प्रादूर्भावामुळे आता अशा प्रकारचा साईपादुका दर्शन सोहळयाचे आयोजन लवकर होणार नाही असे मत आहे. या बसमध्ये फक्त कर्मचारी न्यावयाचे असलेने प्रादेशीक परिवहन कार्यालय श्रीरामपूर यांचेकडून या बस करीता कर्मचारी वाहतूकीचा परवाना घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर बसला प्रती शिट २०००/- प्रमाणे ३६ सिटांकरीता रु ७२०००/- वार्षीक टॅक्स भरलेला आहे.

या बसचा वापर कोरोना महामारीचा प्रादुर्भाव कमी झाल्यावरशिर्डी(काकडी) विमानतळ येथील विमान सेवा सुरु झाल्यानंतर तेथे विमानाने येणारे साई भक्तांना शिर्डी येथे आणणे करीता सशुल्क करता येईल असे मत आहे.

सदर बसचा वापर शिर्डी(काकडी) विमानतळ येथे विमानाने येणारे भक्तांसाठी करणे हा विषय हा धोरणात्मक स्वरुपाचा असलेने सदर बस याकामी वापरणेस तसेच यातील साईभक्तांकडून घेण्यात येणारा सेवा आकार निश्चीत करणेस मा तदर्थ समितीची मान्यता घ्यावी लागेल. तसेच सदर बसचा याकामी वापर करणे करीता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा ना हरकत दाखला घ्यावा लागेल.

तसेच उपरोक्त प्रमाणे मा. तदर्थ समितीची मान्यता व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा ना हरकत दाखला मिळालेनंतर याबसचा वापर विमानतळावरील साईभक्तांना ने आण करणे करीता उप प्रादेशीक परिवहन अधिकारी श्रीरामपूर यांचे कडून मार्ग परवाना घ्यावा लागेल व याकामी प्रती शिट रु ५५००/- प्रमाणे ३६ सिटांकरीता रु १,९८,०००/- वार्षीक टॅक्स भरावा लागेल .

सदर बस सुरु केलेस येणारे अंदाजे उत्पन्न व खर्च या बाबतचा तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

अ. **सदर बस सेवेव्दारे मिळणारे अंदाजे उत्पन्न .**

अ.नं	तपशिल	आसन क्षमता	विमातळावरुन शिर्डी येथे येणे करीता प्रती दिवस १ खेप	३६५ दिवसा करीता (वार्षीक) (प्रती दिवस १ खेप प्रमाणे)
०१	**प्रति साईभक्त ८५ रुपये प्रमाणे (प्रस्तावित)**	३५	२९७५/-	१०,८५,८७५/-

ब. येणारा अंदाजे खर्च -

अ.नं	तपशिल	१ दिवसा करीता	३६५ दिवसा करीता (वार्षीक) (प्रती दिवस १ खेप प्रमाणे)
०१	**इंधन-** प्रती खेप येणे जाणे ३२ कि मी करीता प्रती लिटर ४ किमी प्रमाणे ८ लिटर डिझेल x प्रती लिटर रु ८१/- प्रमाणे प्रती दिवसास १ खेप करीता	६४८/-	२,३६,५२०/-
०२	**वेतन खर्च-** १ वाहन चालक कुशल कंत्राटी – (कि.वेतन ४३७.५४, ४०% वाढ १७५.०२+ पीएफ हिस्सा१३%- ७९.६३ + जीएसटी १८% १२४.५९) (प्रती दिवस) प्रमाणे (८१६.७८)	८१७/- (पुर्णांकीत)	२,९८,२०५/-
०३	**वेतन खर्च-** १ मदतनिस अकुशल कंत्राटी- (कि.वेतन ३७५.५४, ४०% वाढ १५०.२१ + पीएफ हिस्सा१३%- ६८.३४ +जीएसटी१८% १०६.९३) (प्रती दिवस) प्रमाणे (७०१.०२)	७०१/- (पुर्णांकीत)	२,५५,८६५/-
०४	**टॅक्स** – प्रती शिट ५५००/- प्रमाणे ३६ सिटांकरीता वार्षीक	--	१,९८,०००/-

०५	**विमा खर्च-** (२०२०-२१ नुसार)	--	७३९३८/-
०५	इतर किरकोळ खर्च	--	२३३४७/-
		एकूण खर्च	१०,८५,८७५/-

मागणी:- तरी उपरोक्त प्रमाणे सध्याची साईरथ एसी बस शिर्डी(काकडी) विमानतळ येथे विमानाने येणारे साईभक्तांना आणणे करीता ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेस प्रती शिट रु ८५ /- प्रमाणे सेवा आकार घेणे तसेच या अनुशंगीक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे नाहरकत प्रमाणपत्र व उप प्रादेशीक परिवहन कार्यालय श्रीरामपूर यांची मान्यता घेणे व या बसचा नियमानुसार आर.टी. ओ. टॅक्स भरणे तसेच सदर प्रस्तावास मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेबाबत विधी विभागामार्फत कार्यवाही करणे बाबतचे सदर विषयावर निर्णय होणे करीता मा तदर्थ समितीचे सभेपुढे सदरचा विषय निर्णयार्थ सविनय सादर.

विभागाचा अभिप्राय:- उपरोक्त तपशिलाप्रमाणे सध्याची साईरथ एसी बस क्रमांक एमएच-१७-बीवाय-०२६३, शिर्डी (काकडी) विमानतळ येथे विमानाने येणारे साईभक्तांना आणणे करीता ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेस प्रती शिट रु ८५/- प्रमाणे सेवा आकार घ्यावा लागेल. वरील खर्च १ खेपेचा असून साईभक्तांचा प्रतिसाद व विमानांची संख्या यांचा विचार करुन भविष्यात विविध विमानांच्या वेळेस बस फे-या वाढविल्यास फक्त दैनंदिन इंधन खर्चात वाढ होईल. तसेच याच प्रमाणात उत्पन्नात देखील वाढ होईल. तसेच शिर्डी (काकडी) विमानतळावर जाताना देखील काही साईभक्त या बस सेवेचा लाभ घेतील. तसेच या अनुशंगीक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे नाहरकत प्रमाणपत्र व उप प्रादेशीक परिवहन कार्यालय श्रीरामपूर यांची मान्यता घ्यावी लागेल. तसेच नियमानुसार आर टी ओ टॅक्स भरावा लागेल. तसेच सदरचा विषय धोरणात्मक असल्याने यास मा तदर्थ समितीची व तदनंतर मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणे बाबतचा विषय मा तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानची भारत बेंज कंपनीची एसी बस (साईरथ) वाहन क्रमांक एमएच-१७-बीवाय-०२६३ शिर्डी (काकडी) विमानतळ येथे विमानाने येणारे साईभक्तांना आणणे करीता ना-नफा ना-तोटा या तत्वावर प्रति प्रवाशी रु.८५/-प्रमाणे सेवा आकार घेऊन चालविणेस मान्यता देण्यात आली. याकामी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे नाहरकत प्रमाणपत्र व उप प्रादेशीक परिवहन कार्यालय, श्रीरामपूर यांची मान्यता घेण्यास व नियमानुसार आर.टी.ओ.टॅक्स भरणेकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-वाहन विभाग/विधी विभाग)

विषय नं.०६ **सन २०२१२२ या वार्षीक कालावधीत संस्थानचे १२५ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियम २००४ मधील तरतुद:-१७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील ," असे नमुद केलेले आहे.

अधिनियम २००४ मधील तरतुद:-१७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

कलम २१ (१)(ज) मध्ये विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम च्या तरतुदींना अधिन राहून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कादयान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, असे नमुद केलेले आहे.

प्रस्ताविक :- मा.तदर्थ (Add hoc) समिती निर्णय क्रमांक २०४ नुसार संस्थानचे वाहन विभागाकडील १२३ वाहनाचा सन २०२०-२१ या कालावधी करीता वार्षीक विमा नुतनीकरण करणे कामी राष्ट्रीयकृत विमा

कंपन्याकडून मागविण्यात आलेल्या दरपत्रकामधील खालीलप्रमाणे निम्नतम दरधारक यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन विमा नुतणीकरण करण्यात आलेले आहे.

अ.न.	विमा प्रकार	विमा कंपनी	वाहन संख्या	**आय. डी .व्ही. Insurance Declare Value (पॉलीसी नुसार)**	विमा हप्ता रक्कम रू.
१	झिरो डेप विमा (विना घसारा)	नॅशनल इंन्शोरेन्स कं. लि. कोपरगाव	१३	१,१३,६९,९९३.००	३,७६,०००.००/-
२	फुल विमा (पॅकेज पॉलीसी)	दि.न्यु. इंडिया इंश्योरेन्स कं.लि. शाखा श्रीरामपुर	८६	५,०९,६५,१५८.००	२८,८७,३१०.००/-
३	थर्ड पार्टी विमा	दि ओरीएन्टल इंन्शोरेन्स कं.लि. कोपरगाव	२४	०.००	८८५२७/-
		एकुण	१२३	६,२३,३५,१५१.००	३३,५१,८३७/-

उपरोक्त प्रमाणे सन २०२०-२१ मधील वाहन विभागाकडील १२३ वाहनाचे विमा नुतणीकरणा करीता एकुण रक्कम रू.३३,५१,८३७/- /-(अक्षरी रक्कम रु.तेहतीस लाख एक्कावन्न हजार आठशे सदोतीस मात्र) खर्च आलेला आहे.

सध्या वाहन विभागाकडे असलेली १२५ वाहनांचा दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ या कालावधीतील विमा नुतनीकरण करणे आवश्यक आहे.या वाहनांचे करावयाच्या विमाप्रकारानुसार तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) दि. ०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२अखेर विना घसारा (Zero depreciation) विमा करावयाची वाहने.

अ. न.	**वाहन क्रमांक**	**वाहन कंपनी**	**वाहन प्रकार**	**आय. डी .व्ही.**
१	MH17 BV 1510	टोयोटा अल्टीस	कार्यालयीन वाहन	१२,१९,६८०.००
२	MH17 BV 3526	इनोव्हा क्रिस्टा	कार्यालयीन वाहन	१०,१६,८२०.००
३	MH-17-BD-5181	मारुती इकोॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	२,१८,७००.००
४	MH-17-BD-5601	बोलेरो ॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	३,६७,२००.००
५	MH17 BD 9933	कार्डीयाक ॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	११,२२,६६०.००
६	MH17 BY 0263	भारत बेंच एसी बस	प्रवासी एसी बस	१७,६७,४०२.००
७	MH 17 CC 1918	TVS मोटारसायकल	दुचाकी वाहन	१,२७,८००.००
८	MH-17 BV-7297	इनोव्हा क्रिस्टा	कार्यालयीन वाहन	१२,८२,५००.००
९	MH17 BV-7306	इनोव्हा क्रिस्टा	कार्यालयीन वाहन	१२,८२,५००.००
१०	MH17 BY 1535	महेंद्रा पिकअप	मालवाहतुक वाहन	४,०७,५२०.००
११	MH 17 BY 1536	महेंद्रा पिकअप	मालवाहतुक वाहन	४,०७,५२०.००
१२	MH 17 BV8588	महेंद्रा बोलेरो प्लस	कार्यालयीन वाहन	४,९५,०१२.००
१३	MH 17 BV8589	महेंद्रा बोलेरो प्लस	कार्यालयीन वाहन	५,१७,६८०.००
			एकुण	**१,०२,३२,९९४.००**

ब.) दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ अखेर फुल विमा (पॅकेज पॉलीसी) करावयाची वाहने

अ.न.	वाहन क्रमांक	वाहन कंपनी	वाहन प्रकार	आय. डी .व्ही.
१	MH-17-AE-3801	टाटा नॅनो	कार्यालयीन वाहन	४५,०००.००
२	MH-17-AJ-1691	स्विफ्ट डिझायर	कार्यालयीन वाहन	२,०२,५००.००
३	MH-17-AJ-9899	टोयोटा इनोव्हा	कार्यालयीन वाहन	४,७२,५००.००
४	MH-17-AJ-8889	टोयोटा इनोव्हा	कार्यालयीन वाहन	४,७२,५००.००
५	MH-17-AJ-2651	महिंद्रा बोलेरो	कार्यालयीन वाहन	२,११,५००.००
६	MH-17-AJ-2951	महिंद्रा **XUV**	कार्यालयीन वाहन	२,७०,०००.००
७	MH-17-AZ-5015	महिंद्रा स्कॉर्पिओ	कार्यालयीन वाहन	३,६०,०००.००
८	MH-17-BS-0301	महिंद्रा T.U.V.300	कार्यालयीन वाहन	३,६०,०००.००
९	MH-17-AG-1016	कार्डीयाकॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	४,०५,०००.००
१०	MH-17-BD-1991	मारुती इकोॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	८१,०००.००
११	MH-17-BD-1992	मारुती इकोॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	८१,०००.००
१२	MH-17-BD-0889	मोबाईल मेडीकल व्हॅन	रुग्णवाहीका वाहन	७,६५,०००.००
१३	MH-17-BD-2248	एस.एम.एल.इसुझू ॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	५,४०,०००.००
१४	MH-17-BD-2249	मारुती इकोॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	१,८०,०००.००
१५	MH-15-EF-0596	फोर्स मोटार्स टेम्पो ट्रॅव्हलर	रुग्णवाहीका वाहन	५,३५,५००.००
१६	MH-17-BD-2442	तवेरा ॲम्ब्युलन्स	रुग्णवाहीका वाहन	३,३३,०००.००
१७	MH-17-C-8851	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	२,०२,५००.००
१८	MH-17-K-9371	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	२,२५,०००.००
१९	MH-17-K-9370	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	२,२५,०००.००
२०	MH-17-T-8501	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	३,२४,०००.००
२१	MH-17-T-8502	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	३,२४,०००.००
२२	MH-17-T-8503	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	३,२४,०००.००
२३	MH-17-T-9501	अशोक लेलँण्ड स्कुलबस	स्कुलबस वाहन	२,७०,०००.००
२४	MH-17-T-9502	अशोक लेलँण्ड स्कुलबस	स्कुलबस वाहन	२,७०,०००.००
२५	MH-17-T-3101	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	३,३७,५००.००
२६	MH-17-T-3102	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	३,३७,५००.००
२७	MH-17-T-3103	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	३,३७,५००.००
२८	MH-17-T-3104	टाटा-1510 स्कुलबस	स्कुलबस वाहन	३,३७,५००.००
२९	MH-17-BD-3240	आयशर स्कुलबस	स्कुलबस वाहन	६,५२,५००.००
३०	MH-17-T-3301	टाटा-1510 पॅसेंजरबस	प्रवासी बस वाहन	३,३७,५००.००
३१	MH-17-T-3302	टाटा-1510 पॅसेंजरबस	प्रवासी बस वाहन	३,३७,५००.००
३२	MH-17-AG-9747	आयशर पॅसेंजरबस	प्रवासी बस वाहन	६,३०,०००.००
३३	MH-17-AG-9748	आयशर पॅसेंजरबस	प्रवासी बस वाहन	६,३०,०००.००
३४	MH-17-AG-9749	आयशर पॅसेंजरबस	प्रवासी बस वाहन	६,३०,०००.००
३५	MH-17-AG-9750	आयशर पॅसेंजरबस	प्रवासी बस वाहन	६,३०,०००.००
३६	MH-17-AG-9751	आयशर पॅसेंजरबस	प्रवासी बस वाहन	६,३०,०००.००
३७	MH 17 BY 2264	आयशर प्रवासी बस	ज्यु. कॉलेज बस	१४,४४,५००.००
३८	MH 17 BY 2265	आयशर प्रवासी बस	ज्यु. कॉलेज बस	१४,४४,५००.००
३९	MH 17 BY 2266	आयशर प्रवासी बस	ज्यु. कॉलेज बस	१४,४४,५००.००
४०	MH 17 BY 2267	आयशर प्रवासी बस	ज्यु. कॉलेज बस	१४,४४,५००.००
४१	MH 17 BY 2268	आयशर प्रवासी बस	ज्यु. कॉलेज बस	१४,४४,५००.००

४२	MH 17 BY 2262	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,०००.००
४३	MH 17 BY 2263	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
४४	MH 17 BY 2269	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
४५	MH 17 BY 2270	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
४६	MH 17 BY 2271	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
४७	MH 17 BY 2272	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
४८	MH 17 BY 2273	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
४९	MH 17 BY 2274	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
५०	MH 17 BY 2275	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
५१	MH 17 BY 2276	आयशर प्रवासी बस	नविन प्रवासी बस	१४,४४,५००.००
५२	MH 17 BY 1532	महेंद्रा पिकअप	मालवाहतुक वाहन	४,०५,०००.००
५३	MH 17 BY 1533	महेंद्रा पिकअप	मालवाहतुक वाहन	३,९६,०००.००
५४	MH 17 BY 1534	महेंद्रा पिकअप	मालवाहतुक वाहन	४,०५,०००.००
५५	MH17 BY 0711	टाटा एलपीके	मालवाहतुक वाहन	८,००,९१९.००
५६	MH-17-T-7111	महिंद्रा मॅक्स	मालवाहतुक वाहन	९९,०००.००
५७	MH-17-T-7112	महिंद्रा मॅक्स	मालवाहतुक वाहन	९९,०००.००
५८	MH-17-T-2811	टाटा-1109 टेम्पो	मालवाहतुक वाहन	२,०७,०००.००
५९	MH-17-T-2810	टाटा-407 टेम्पो	मालवाहतुक वाहन	१,४४,०००.००
६०	MH-17-T-2809	टाटा-ACE	मालवाहतुक वाहन	७२,०००.००
६१	MH-17-T-3751	टाटा-407 टेम्पो	मालवाहतुक वाहन	१,३५,०००.००
६२	MH-17-AG-0253	महिंद्रा मॅक्सिमो	मालवाहतुक वाहन	९०,०००.००
६३	MH-17-AG-2358	टाटा ए.सी.ई	मालवाहतुक वाहन	२,७०,०००.००
६४	MH-17-AG-4506	महिंद्रा पिकअप	मालवाहतुक वाहन	१,५७,५०५.००
६५	MH-17-AG-9190	टाटा-407 टेम्पो	मालवाहतुक वाहन	३,३७,५००.००
६६	MH-17-BD-0458	ॲपेथ्रिव्हीलररिक्षा	मालवाहतुक वाहन	५४,००३.००
६७	MH-17-BD-2552	एस.एम.एल.सम्राट ट्रक	मालवाहतुक वाहन	५,५३,५००.००
६८	MH17 BD 6401	एल एम एल	थ्रि व्हीलर मालवाहतुक	५६,७००.००
६९	MH 17 BY 4301	कचरा गाडी	मालवाहतुक वाहन	३,१५,०००.००
७०	MH-17-V-6421	स्वराज-८५५	ट्रॅक्टर	९९,०००.००
७१	MH-17-AE-3820	महिंद्रा ॲन्ड महिंद्रा	युवराजट्रॅक्टर	५४,०००.००
७२	MH-17-AV-2414	आयशर	ट्रॅक्टर-२४२	१,२१,५००.००
७३	MH-17-AV-7313	महिंद्रा ॲन्ड महिंद्रा	अर्जुन नोव्हो ट्रॅक्टर	३,६०,०००.००
७४	MH 17 BX 1615	जॉनडिअर (नविन)	ट्रॅक्टर	३,५३,१६०.००
७५	बॅटरी थ्रिव्हीलर	इलोडर	मालवाहतुक वाहन	३२,२५६.००
७६	MH-17-BV-828	दोन चाकी ट्रेलर	मालवाहतुक ट्रेलर	८१,०००.००
७७	MH-17-W-8542	हिरो होंडास्प्लेंडर	दुचाकी वाहन	९,०००.००
७८	MH-17-BB-7635	महिंद्रा सेंच्युरो	दुचाकी वाहन	१६,२००.००

७९	MH-17-BG-8844	टी.व्ही.एस झेस्ट	दुचाकी वाहन	१८,९००.००
८०	MH-17-T-2651	टाटा-407	कॅशव्हॅन	१,९३,५००.००
८१	MH-17-AG-0241	टाटा-407 (क्रेन)	आपत्तकालीन	२,१६,०००.००
८२	ओझान मशिन	सक्शन मशिन टॉली	आपत्तकालीन	१,५७,५००.००
८३	MH-17-BD-0696	सेप्टीकजेटमशिन	आपत्तकालीन	३,२४,०००.००
८४	MH-02-CE-6723	मिनी फोम वॉटर फायर	अग्निशामक	५,४९,०००.००
८५	MH-17-BD-2718	मोठी अग्निशामक (आयशर)	अग्निशामक	१६,२०,०००.००
८६	MH 17 BY 4001	अग्निशामक (भारत बेंज)	अग्निशामक	५२,२०,०००.००
८७	MH-17-BY-0278	लॅडर माऊटेंड व्हॅन(टाटा)	आपत्तकालीन	२१,६०,०००.००
८८	MH-17-AG-2251	टॉयलेट व्हॅन (टाटा ACE)	आपत्तकालीन	२,४७,५००.००
			एकुण	४,५८,८६,६४३.००

क.) दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ अखेर थर्डपार्टी विमा करावयाची वाहने

अ.न.	**वाहन क्रमांक**	**वाहन कंपनी**	**वाहन प्रकार**	**आय. डी .व्ही.**
१.	MH-17-V-1701	टाटा सुमो	कार्यालयीन वाहन	**०.००**
२.	MH-17-Y-3636	महिंद्रा लोगान	कार्यालयीन वाहन	**०.००**
३.	MH-17-AG-2418	टाटा विंगर	रूग्णवाहीका	**०.००**
४	MH-17-F-5545	चार चाकी ट्रेलर	मालवाहतुक ट्रेलर	**०.००**
५.	MH-17-F-5645	चार चाकी ट्रेलर	मालवाहतुक ट्रेलर	**०.००**
६.	MH-17-F-9099	चार चाकी ट्रेलर	मालवाहतुक ट्रेलर	**०.००**
७.	MH-17-AF-0848	दोन चाकी ट्रेलर	मालवाहतुक ट्रेलर	**०.००**
८.	MH-17-F-6001	चार चाकी ट्रेलर	मालवाहतुक ट्रेलर	**०.००**
९.	MH-17-AF-3778	चार चाकी टॅन्कर	वॉटर टॅन्कर	**०.००**
१०.	MH-17-AF-4531	दोन चाकी ट्रेलर	मालवाहतुक ट्रेलर	**०.००**
११	इलेक्ट्रीककार-**01**	मिनी मटेरिअल मुव्हमेंट	बॅटरी कार	**०.००**
१२	इलेक्ट्रीककार-**02**	मिनी मटेरिअल मुव्हमेंट	बॅटरी कार	**०.००**
१३	इलेक्ट्रीककार-**03**	मिनी मटेरिअल मुव्हमेंट	बॅटरी कार	**०.००**
१४	इलेक्ट्रीककार-**04**	मिनी मटेरिअल मुव्हमेंट	बॅटरी कार	**०.००**
१५	मोबाईल टॉयलेट नं.१	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
१६	मोबाईल टॉयलेट नं.२	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
१७	मोबाईल टॉयलेट नं.३	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
१८	मोबाईल टॉयलेट नं.४	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
१९	मोबाईल टॉयलेट नं.५	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
२०	मोबाईल टॉयलेट नं.६	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
२१	मोबाईल टॉयलेट नं.७	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
२२	मोबाईल टॉयलेट नं.८	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
२३	मोबाईल टॉयलेट नं.९	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**
२४	मोबाईल टॉयलेट नं.१०	मोबाईल टॉयलेट	फिरते शौचालय	**०.००**

वरील वाहनांचा करावयाचा विमा प्रकारानुसार संख्यानिहाय तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.न.	कालावधी	झिरो डेप विमा (विना घसारा)	फुल विमा	थर्ड पार्टी	एकुण वाहने
		अ	ब	क	
१.	कार्यालयीन वाहने	०६	०८	०२	१६
२.	रुग्णवाहीका वाहने	०३	०८	०१	१२
३.	स्कुल बस वाहने	००	१३	००	१३
४.	प्रवासी एसी बस वाहने	०१	००	००	०१
५.	प्रवासी बस वाहने	००	०७	००	०७
६.	ज्यु कॉलेज बस	००	०५	००	०५
७.	नविन प्रवासी बस वाहने	००	१०	००	१०
८.	मालवाहतुक वाहने (ट्रॅक्टर सह)	०२	२४	००	२६
९.	टॅन्कर / ट्रेलर	००	०१	०७	०८
१०	दुचाकी वाहने	०१	०३	००	०४
११.	इतर(आपत्कालीन)	००	०९	००	०९
१२.	बॅटरी कार वाहने	००	००	०४	०४
१३.	मोबाईल टॉयलेट	००	००	१०	१०
	एकुण वाहने	**१३**	**८८**	**२४**	**१२५**

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ अखेर एक वर्ष कालावधी करीता उपरोक्त प्रमाणे वाहन विभागाकडील १२५ वाहनांचा वाहन निहाय विमा उतरविण्याचा असलेने सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच सिलबंद लिफाप्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे. कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसलेने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाही. तसेच विमा कंपन्याचे दरात स्पर्धा ही होत नाही.हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा दि.१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीतील विमानुतनीकरण करते वेळी आलेला आहे.

त्यामुळे सन २०१६-१७ पासून प्रतिवर्षी संस्थान वाहनांचे विमानुतणीकरणाचे काम राष्ट्रीयकृत विमाकंपन्याकडून दर पत्रके मागवून करण्यात येत आहे. संस्थान फक्त राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुनच दरपत्रक मागवित असलेने ई-निविदेची आवश्यकता नाही असे मत आहे. यानुसार मागील वर्षी सन २०२०-२१ या आर्थीक वर्षात १२३ वाहनांचा विमा नुतनीकरण राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन दरपत्रके मागवून केलेले आहे.याकामी एकुण रू. ३३,५१,८३७/- इतका खर्च आलेला आहे.

संस्थानकडे असलेल्या सध्याचे उपरोक्त तपशिलानुसार १२५ वाहनांचे दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ या वार्षीक कालावधीसाठी विमा नुतनीकरण करणे कामी (जी.एस.टी.सह) अंदाजे रक्कम रु.३३,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. तेहतीस लाख मात्र) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. वाहन विभागाचे सन-२०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्राकामध्ये विमा खर्चाकरीता रक्कम रु.३५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पस्तीस लाख) मात्र खर्चाची तरतुद प्रस्तावीत असुन सदरचा खर्च विमा खर्च या अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करता येईल.

उपरोक्त प्रमाणे वाहनांचा विमा नुतनीकरण करण्याचा कालावधी दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ वार्षीक आहे. यातील 'अ' रकान्यात नमुद केलेल्या १३ वाहनांचा विना घसारा (Zero dep.) प्रकारचा व 'ब' रकान्यात नमुद केलेल्या ८८ वाहनांचा पुर्ण विमा (पॅकेज पॉलीसी) तसेच 'क' रकान्यात नमुद केलेल्या २४ वाहनाचा थर्ड पार्टी विमा करणे आवश्यक आहे.वरील प्रमाणे एकुण १२५ वाहनांचे विमा नुतनीकरणा करीता सर्व चार (४) राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन दरपत्रके मागवावे लागतील.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान:-सदरचे काम संस्थान वाहनाचे विमा नुतनीकरणा संबधीत असुन सदर बाब आर्थिक आहे.

मागणी:- तरी उपरोक्त प्रमाणे संस्थानचे प्रस्तावित विमा प्रकारानुसार १२५ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.३३,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तेहतीस लाख मात्र) पर्यतचे खर्चास मान्यता मिळणेस तसेच याकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे १२५ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३३,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभाग)

विषय नं.०७ **संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२०-२१ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

प्रस्ताव- **अ)** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा. कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी. ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेच्या दराचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

मा. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे पत्र- सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दिनांक- १६ जुलै, २००९ अन्वये सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, असे पत्रान्वये कळविलेले आहे.

उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काच्या परताव्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०१.२०२० चे सभेतील निर्णय क्र.२५ अन्वये संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१९-२० या वर्षातील शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.७५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचे शैक्षणिक शुल्क परताव्याकामी सामान्य प्रशासन (सर्व विभाग) रक्कम रु.२०,९५,११८/- (अक्षरी रुपये– वीस लाख पंच्यान्नव हजार एकशे अठरा मात्र) तसेच रुग्णालय विभाग रु.१३,५९,१५०/- (अक्षरी- तेरा लाख एकोणसाठ हजार एकशे पन्नास मात्र) असा एकूण रु.३४,५४,२६८/- (अक्षरी रुपये- चौतीस लाख चोपन्न हजार दोनशे अडूसष्ठ मात्र) खर्च झालेला आहे.

तसेच संस्थानचे शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात ज्या कर्मचा-यांचे पाल्य शिक्षण घेत आहेत, त्यांचेकडून प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क न घेता, सदरची रक्कम जमा नावे करण्यात येते. त्यानुसार उपरोक्त दोन्ही शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांची रक्कम रु.१९,६८,२८०/-(अक्षरी रुपये-एकोनीस लाख आडूसष्ठ हजार दोनशे ऐंसी मात्र) जमा नावे करण्यात आलेली आहे. म्हणजेच संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परताव्याकामी सन २०१९-२० मध्ये मंजुर रक्कम रु.७५,००,०००/-मात्र पैकी रक्कम **रुपये-५४,२२,५४८/- मात्र एकुण खर्च** झालेला आहे. सध्या कोविड-१९ या जागतीक संसर्गजन्य रोगाचा प्रार्दुभाव असल्याने शाळा, कॉलेज व व्यावसायीक कोर्सेसचे कार्यालये बंद असल्याने पालकांना वेळेत कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने शैक्षणिक शुल्क परताव्याची कार्यवाही अद्याप सुरु आहे.

ब) उपरोक्त परिच्छेद **अ** मध्ये नमुद केलेप्रमाणे, सन २०१९-२० प्रमाणेच सन २०२०-२१ या चालू शैक्षणिक वर्षाकरीता कायम कर्मचा-यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ. क्र.	तपशिल	सन २०१९-२० मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च	सन २०२०-२१ मध्ये अपेक्षित खर्च
०१.	सर्व विभाग (रुग्णालये वगळता)	रु.२०,९५,११८/-	रु.२५,००,०००/-
०२.	रुग्णालये विभाग	रु.१३,५९,१५०/-	रु.२०,००,०००/-
	एकुण रक्कम	**रु.३४,५४,२६८ /-**	**रु.४५,००,००० /-**
०३.	शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा	**रु.१९,६८,२८०/-**	**रु.२५,००,०००/-**
	अ.क्र.१, २ व ३ एकुण रक्कम	**रु.५४,२२,५४८ /-**	**रु.७०,००,०००/-**

विभागाचा अभिप्राय:- मा.शासनाचे दि. १६ जुलै, २००९ चे पत्रानुसार संस्थानचे प्रचलित पद्धतीप्रमाणे संस्थानच्या कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२०-२१ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे **रुपये-७०,००,०००/- (अक्षरी रुपये- सत्तर लाख मात्र)** खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करावा लागेल. मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र. १२०/२०१९ मध्ये दिनांक-०९/१०/२०१९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार, विषयांकीत प्रस्तावाचे अनुषंगाने रु. ५० लाख मात्र पेक्षा जास्त खर्च असल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडेस याकामी दिवाणी अर्ज दाखल करुन मान्यता घ्यावी लागेल. अशी मान्यता मिळल्यानंतर विहित पद्धतीने कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२०-२१ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करता येईल, असे मत आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात कायम कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.७०,००,०००/- (अक्षरी रुपये- सत्तर लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४६० यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२०-२१ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)

विषय नं.०८ श्री.अनिल कचरु कोते व इतर १५ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांनी ॲड. अश्विन होन, औरंगाबाद यांचेमार्फत दाखल केलेल्या याचिका क्रमांक ६२२४/२०२० बाबत.

प्रस्ताव- (अ-१) तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे निर्णयानुसार, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यंत या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्याकाम करत असलेल्या अकुशल ८११ व कुशल १०५ अशा एकुण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाच्या अनुषंगाने, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, दि.१७ सप्टेंबर, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय पारित केलेला आहे.

मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी **" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली** पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या

आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. ''

(अ-२) सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत-

तक्ता क्रमांक ०१

अ.नं.	तपशील	संख्या	शेरा / कारण
(अ)	**दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांची संख्या**	**६३५**	--
०१	यादीत एक नांव दोन वेळेस आलेले कंत्राटी कर्मचारी	००१	श्री. रविंद्र भडांगे यांचे नांव यादीतील अ.नं.५० आणि अ.नं. ५४ वर ही आलेले आहे, त्यापैकी यादीतील अ. नं. ५० नुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला आहे.
०२	यादीतील ६० वर्षे वयोमान पूर्ण केलेले कंत्राटी कर्मचारी	००१	श्रीमती पंचफुला राठोड (यादीतील अ.नं.०२) वयोमान ६० वर्षे पूर्ण झाल्याने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला नाही.
०३	यादीतील मयत झालेले कंत्राटी कर्मचारी	००२	श्री. दिवेकर (यादीतील अ.नं.६०) व श्री. कसबे (यादीतील अ.नं.५६४) हे मयत असल्या कारणाने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत.
०४	यादीतील दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतरचे कंत्राटी कर्मचारी	००८	सदरचे कंत्राटी कर्मचारी हे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर हजर झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देणेत आलेले नाहीत. (यादीतील अ.नं. ५७२, ५७४, ५७६, ५७७, ६३२, ६३३, ६३४ व ६३५)
अ.नं.	**तपशील**	**संख्या**	**शेरा / कारण**
०५	यादीतील सतत गैरहजर असणारे कर्मचारी	००७	कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत अलाहिदा कार्यवाही सुरु आहे. या २५ कंत्राटी कर्मचा-यांपैकीतसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांची नांवे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीत आहेत, परंतु सध्या कामावर हजर नाहीत अशा कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत (यादीतील अ.नं. ८९, १७२, २४०, ४९१, ५०४, ६०० व ६११)
०६	यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४)या कालावधीत कामावर नसणारे कर्मचारी	०१५	कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारे परंतु माहे डिसेंबर, २००० पुर्वी कामावर हजर असणारे कर्मचारी. (यादीतील अ.नं.३, ४, ९, २७, ४८, ८२, ८४, १०५, ११४, ११६, १२२, १२९, १४९व १६९)
(ब)	**एकूण (अ.नं.०१ ते ०६)**	**०३४**	--
(क)	**पारित करणेत आलेले आदेश ((अ) –(ब))**	**६०१**	**दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील ६०१ पात्र कर्मचा-यांना आदेश पारित करणेत आले.**
(ड)	यादीत समाविष्ट आहेत परंतु नियुक्ती आदेश स्वीकारले नाही असे कर्मचारी	**००३**	कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्यायादीनुसार हजर दिवस व कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले होते परंतु काही कारणास्तव नियुक्ती आदेश स्वीकारले नाहीत असे कर्मचारी (यादीतील अ.नं.७६, ९० व ५३३)
(इ)	नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले एकूण कंत्राटी कर्मचारी **एकूण (क-ड)**	**५९८**	कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर कामावर असलेले) या कालावधीतील हजर दिवस आणि कागदपत्रांची पडताळणी

			करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले असून, सदर कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत.

(अ-३) उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ **(इ)** मध्ये नमुद केलेप्रमाणे, कंत्राटी कर्मचा-यांना पारित करणेत आलेल्या नियुक्ती आदेशातील कर्मचा-यांचा विभागाप्रमाणे व प्रकारानुसार (कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी) यानुसार थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

तक्ता क्रमांक ०२

अ. नं.	नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले कंत्राटी कर्मचारी	कंत्राटी कर्मचारी			कंत्राटी कर्मचारी		
		कुशल	अकुशल	एकुण	पुरुष	स्त्री	एकुण
०१	५९८	०८७	५११	५९८	५६३	०३५	५९८

उपरोक्त प्रमाणे ठेकेदारामार्फत कामावर असलेल्या ५९८ कंत्राटी कर्मचारी यांना संस्थानच्याआस्थापनेवरील मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. तसेच, उपरोक्त ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना शासन निर्णयाप्रमाणे संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून करण्यात आलेल्या नेमणूकांना मा.तदर्थ समितीची मान्यता मिळणेकामी वेळोवेळी प्रस्ताव सादर करणेत आलेले होते.

(अ-४) मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० पुढीलप्रमाणे पारीत करणेत आलेला आहे –

" .. .. समितीचे सदस्य १) मा. श्री. श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्रन्यायाधीश, अहमदनगर, २) मा. श्री. दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक ३) मा. श्रीमती गीता बनकर, सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.

This subject was discussed in detail and each member has expressed views.

This committee, while deciding Subject 1, 2, 43 and 63 on the agenda of the Ad-hoc Committee Meeting dt. 11.05.2020, has thoroughly examined the entire record of the Trust, the scheme of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 and the powers of the Chief Executive Officer to appoint employees.

This Committee has already found that the then Chief Executive Officer could not have appointed employees directly on the Sansthan on contract basis because such power is vested with the Committee constituted under section 13(4) of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004. Since such appointment on contract basis is a policy decision, it ought to have been presented before the Ad-hoc Committee, constituted by Hon'ble High Court.

This Committee has also found that the Sansthan has failed to follow the Government Resolution dt.07.08.2009, more particularly the terms and conditions under which the said staffing pattern (आकृतीबंध) was approved. The Committee has also found that while issuing Government Resolution dt. 17.09.2019, the Government has called upon the Sansthan to follow Government Resolution dt.07.08.2009 of which the reference is found at serial no. 2 under the caption " वाचा."

It is not the case of Sansthan before this Committee that Committee has followed Government Resolution dt.07.08.2009 by preparing service rules, qualification of entry, promotion etc. In fact Committee has been constituted for preparation of such rules and even this Ad-hoc Committee has given extention to the said Committee to complete the remaining work. ***In the above background, therefore, the appointment orders issued by the then Chief Executive Officer (Shri. Deepak Muglikar) is a piece of paper and cannot be termed as an order under the authority of the Committee as invisaged under section 13(4) of the Act.***

Some of the members of this Committee tried to suggest that ex-post facto approval could be granted to the said order. However, on thorough examination of this proposal, the Committee is unanimous in refusing to grant such ex-post facto approval, more particularly when Government Resolution dt. 07.08.2009 has not been followed by the Trust. In addition to it, giving such ex-post facto sanction for such acts would be protecting the illegality and therefore, should not be approved at the hands of Ad-hoc Committee.

Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020.*This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.*

The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government.

समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.

राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकुण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्यस्थितीत पात्र ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूक ही शासन निर्णयाचे निर्देशानुसार करण्यात आली आहे. तरी सदर आदेशांना कार्योत्तर मान्यता देणे योग्य राहील."

(ब) मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० बाबत, ५९८ कंत्राटी कर्मचा-यांपैकी १६ कायम कंत्राटी कर्मचारी यांनी सर्व ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांचे वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे, महाराष्ट्र शासन व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेविरुध्द दिवाणी दावा दाखल केला असलेबाबत, संबंधित कायम कंत्राटी कर्मचा-यांचे वतीने ॲड.अश्विन व्ही.होन, औरंगाबाद यांनी दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० रोजीचे ई-मेल पत्राने कळविले आहे. त्यात खालीलप्रमाणे नमूद आहे –

".. .. Subject : Writ Petition filed on behalf of Anil s/o KacharuKote and Ors. In the Bombay High Court, Bench At Aurangabad.

.. .. Please take note that I have filed a writ petition challenging the resolution passed by Ad-hoc Committee in its meeting dated 13.07.2020 whereby the Ad-hoc Committee has reserved the resolution passed by the regular committee of the Sansthan in discontinuing the services of the petitioners and similarly placed 582 employees before the Hon'ble Bombay Hight Court, Bench At Aurangabad.

The Copy of the petition alongwith all exhibits is served on you as you have been made party respondent No.2. The petition will be taken up for hearing in due course accordingly, attend the same. "

तसेच, श्री. अनिल कचरु कोते व इतर यांचे वतीने ॲड. होनयांनी दाखल केलेल्या सदरहू दिवाणी दाव्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे अधिकृत संकेतस्थळावरुन माहिती घेणेत आली आहे. त्यानुसार सदर दिवाणी दाव्याचा क्रमांक Stamp No. **WPST/14010/2020** / Reg. No.**WP/6224/2020** / Filing & Reg. **Date 11-09-2020**असा आहे. तसेचसदरहू दिवाणी दाव्याची पुढील सुनावणीची तारीख १४ सप्टेंबर, २०२० अशी दर्शविणेत आलेली होती.

तसेच, उपरोक्त दिवाणी दाव्याबाबत दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजीचे प्रथम सुनावणीचे तारखेस झालेल्या कामकाजाबाबत मा. उच्च न्यायालयाचे संकेतस्थळावर खालीलप्रमाणे आदेश प्राप्त झालेला आहे –

" .. .. Learned AGP accepts notice on behalf of Respondent No.1. Learned Counsel Mr. Choukidar state that he has instructions to appear for Respondent No.2 and seeks time.

Stand over to 05th October, 2020. "

(क) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांचे वतीने ॲड. होन यांनी दाखल केलेल्या सदर दिवाणी दाव्याचा क्रमांक Stamp No. **WPST/14010/2020** / Reg. No.**WP/6224/2020** / Filing & Reg. **Date 11-09-2020**असा असून, त्यामध्ये याचिकाकर्त्यांनी खालीलप्रमाणे मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस खालील बाबींवर आदेश होणेबाबत विनंती केलेली आहे, त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

" .. .. *20. The Petitioners, therefore humbly, pray Your Lordships will be pleased to;*

A) *Call for record and proceedings of the case.*

B) *Issue a writ of certiorari or writ the nature of certiorari to quash and set aside the Resolution dated 13.7.2020 (Exhibit "H") and he consequential order dated 2.9.2020 (Exhibit "I") passed by the Adhoc Committee of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi.*

C) *Issue a writ mandamus or writ in the nature of mandamus to the respondent to continue the petitioners and similarly placed 582 employees mentioned in the list annexed at Exhibit "A" to the petition, in service of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi in accordance with the Government Resolution dated 17.09.2019 of the State Government and that their service be not terminated and / or discontinued.*

D) *Pending the hearing and final disposal of this writ petition grant stay to operation, implementation and execution of the Resolution dated 13.7.2020 (Exhibit "H") and the consequential order dated 2.9.2020 (Exhibit "T") passed by the Adhoc committee of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi.*

E) *Pending the hearing and final disposal of this writ petition the petitioners and other 582 similarly place employees mentioned in the list annexed at Exhibit "A"*

F) *Ad-interim relief of granted in terms of prayer claused "D" and "E".*

G) *Any other just and equitable reliefs be granted in favour of the petitioner. "*

उपरोक्त दाव्याच्या संदर्भात आता दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी पुढील सुनावणी प्रस्तावित आहे.

तरी आता, श्री. अनिल कचरु कोते व इतर, संस्थान कंत्राटी कर्मचारी (५९८ कायम कंत्राटी कर्मचारीमध्ये समावेश असलेले) यांनी दाखल केलेली याचिका क्रमांक ६२२४ / २०२० तसेच उपरोक्त वस्तुःस्थिती मा. तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.४६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अनिल कचरु कोते व इतर १५ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांनी ॲड. अश्विन होन, औरंगाबाद यांचेमार्फत दाखल केलेल्या याचिका क्रमांक ६२२४/२०२० चे सद्यस्थितीबाबतची माहिती तसेच सदर ५९८ कंत्राटी कर्मचा-यांचे पुढील सेवेबाबत व माहे नोव्हेंबर-२०२० चे वेतनाबाबतचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०९ **मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री.विजय गणपत रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबतच्या अर्जावर निर्णय होणेबाबत व श्री.रोहमारे यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल झालेली कंटेम्प्ट पिटीशन क्र.२७७/२०२० बाबत.**

प्रस्ताव- **अ)** उपरोक्त विषयांस अनुसरून, मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र.४०१८/२०१९, श्री विजय गणपतराव रोहमारे, उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी याचिका दाखल केलेली होती. सदर याचिकेची मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सुनावणी होऊन दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी मा.उच्च न्यायालयाने निकाल दिलेला आहे. श्री रोहमारे यांच्या प्रशासकीय अधिकारी पदी नेमणुक होणेकामीचा दि.५.११.२०१५ रोजीचे

अर्जावर तात्काळ तीन महिन्याच्या आत गुणवत्तेनुसार व नियमानुसार संस्थानने निर्णय घ्यावा, असे मा.उच्च न्यायालयाने आदेशात म्हंटले आहे.

अ-१) त्याअनुषंगाने, श्री रोहमारे यांचेबाबत मा.न्यायालयाच्या निकालावर निर्णय घेणेकामी मा.तदर्थ समितीचे दि.०९ जुन, २०२० रोजीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.तदर्थ समितीने पुढीलप्रमाणे निर्णय पारीत केलेला आहे. . " श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, येथील कोर्टात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पिटीशन नं.४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र / आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला ? याबाबत संबधीत श्री गमे यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात यावा व तोपर्यंत त्यांचे सेवा निवृत्तीची देयके थांबवून ठेवावे, असे ठरले. तसेच प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करून तीन महिन्याची मुदत वाढवुन मागणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले."

उपरोक्त निर्णयास अनुसरून, सामान्य प्रशासन विभागामार्फत खालील कार्यवाही करणेत आलेली आहे

सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १७ जून, २०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत येऊन, विषयांकित प्रस्तावाबाबत निर्णय घेणेकामी ०३ महिन्याची मुदतवाढ घेणेकामी संस्थानचे विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना पत्र देणेस मान्यता घेणेत आली. दिनांक १७ जून, २०२० रोजीचे कार्यालयीन टिपणीवरील मान्यतेनुसार, संस्थानचे विधीज्ञ ॲड. नितिन भवर पा., औरंगाबाद यांना जा. क्र.एसएसएस/ साप्रशा / आस्था / ४४६ / २०२०, दिनांक २५ जून, २०२० रोजी पत्र देणेत आलेले आहे. तसेच संस्थानचे विधी विभागामार्फत विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मुदतवाढ घेणेकामी संस्थान विधीज्ञ ॲड. नितीन भवर पा. यांना दिनांक ०३ जुलै, २०२० रोजी पत्र देणेत आलेले असून, मा.उच्च न्यायालयाच्या निकालास ०३ महिने मुदतवाढ घेणेकामी ॲड.नितीन भवर यांचे सहकारी ॲड.अविनाश खेडकर यांनी सिव्हील ॲप्लीकेशन मा.कोर्टात सर्क्युलेशन घेणेकामी दि.२४/०७/२०२० रोजीच्या ई मेलने विनंती केलेली होती. परंतु, त्यावर रजिष्ट्रार मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.५/८/२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश केलेला आहे.

" The Hon'ble Lordships are pleased to reject your Circulation note as there is no urgency with liberty to move afresh only after normal court functioning is restored."

- श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांना मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र/ आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला ? याबाबत लेखी खुलासा मागविणेकामी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/ आस्था/ ५००/२०२०, दि.१ जुलै, २०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

अ-२) उपरोक्त श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांचा लेखी खुलासा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै, २०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.तदर्थ समितीने पुढीलप्रमाणे निर्णय क्र.३५९ पारीत करणेत आलेला आहे.

" या विषयावर सविस्तर चर्चा झाली, प्रस्तुत प्रकरणी श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांनी दि.०२ जुलै, २०२० रोजी सादर केलेल्या लेखी खुलाशाचे अवलोकन केले असता त्यांनी मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव तयार करून सादर करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाचे प्रभारी अधिक्षक/प्रभारी विभाग प्रमुख यांचेवर निश्चित करण्यात आलेली असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार सबंधीत विभागाचे विभागप्रमुख व प्रभारी अधिक्षक यांना

कारणे दाखवा नोटीस देऊन, त्यांचा खुलासा घेण्यात यावा, व सदर विलंबास कोण जबाबदार आहे, याबाबत विभागाने अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा.

तसेच, संस्थानच्या ब-याच प्रकरणात ॲड नितीन भवर हे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद या न्यायालयात हजर झालेले नाहीत असे ब-याच विषयात नमूद केलेले दिसते. असे असतांना संस्थानच्या विधी विभागाने सदरची बाब मा.तदर्थ समितीचे निदर्शनास का आणली नाही, पॅनलवर नसलेल्या वकिलांमार्फत सिव्हील ॲप्लीकेशन कसे दाखल केले व त्या वकिलांनी सदरहु सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये संस्थानचे पॅनलवर नसतांना कसे काम पाहिले याचा खुलासा संबधीत विभाग प्रमुख व संबधीत कर्मचारी यांचेकडून घेण्यात यावा व तो खुलासा मा.तदर्थ समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा.

मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने कामकाज पाहण्यासाठी ॲडव्होकेट पॅनल तयार करण्याची आजच्या सभेतील विषय नं.१० निर्णय क्र.३६४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री एस.व्ही.गमे यांना पाठविलेल्या नोटीसीचा मुळ मुद्दा हा श्री व्ही.जी.रोहमारे यांच्या पदोन्नतीबाबत आहे. यापुर्वी या विषयावर चर्चा होऊन सर्वसमावेषक विचार करून प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याबाबत पदोन्नतीची साखळी व पदोन्नतीकरीताचे निम्न पद (Feeder Cadre) सेवा जेष्ठता यादी यासह वरील सर्व विषयांचा एकत्रित प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेपुढे आणावा, असे ठरले होते. तसा संपुर्ण प्रस्ताव द्यावा."

अ-३) मा. तदर्थ समितीचे दि. १३ जुलै, २०२० रोजीचे निर्णयास अनुसरून, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक १५ जुलै, २०२० रोजी प्रभारी अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांचा खुलासा मागविणेकामी कार्यालयीन टिपणी सादर करुन, त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/७३६/२०२०, दिनांक १८ जुलै, २०२० अन्वये प्रभारी अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांना पत्र देण्यात आलेले आहे. त्यासअनुसरून, श्री विश्वनाथ हरिकिसन बजाज, प्रभारी अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांनी दि.२० जुलै, २०२० रोजीच्या पत्रान्वये आपला लेखी खुलासा सादर केलेला असून सदरचा खुलासा तसेच श्री रोहमारे यांचेबाबत मा.न्यायालयाच्या निकालावर निर्णय घेणेकामीचा एकत्रित प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.२८ ऑगस्ट, २०२० रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. परंतु, आजपावेतो दि.२८ ऑगस्ट, २०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेचे इतिवृत्त अंतीम करणेत आलेले नाही.

अ-४) प्रशासकीय अधिकारी पदाचे निम्नपद (Feeder Cadre) निश्चित करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाने दि.०७ सप्टेंबर, २०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यावरील मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आकृतीबंधातील प्रशासकीय अधिकारी या पदाचे निम्नपद (Feeder Cadre) व पदोन्नतीची साखळी निश्चित करणेकामी उप समितीचे गठन करणेत आलेली आहे. सदर उपसमितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्य आहेत. सोबत दि.२१ सप्टेंबर, २०२० रोजीचा उपसमिती नेमणूकीचा आदेश जोडलेला आहे.

१.	श्री दिलीप त्र्यंबक उगले, प्रशासकीय अधिकारी	अध्यक्ष,	उप समिती
२.	श्री. कैलास सोनाजी खराडे, प्र. लेखाधिकारी	सदस्य	-,,-
३.	श्री. साहेबराव पांडूरंग लंके, प्र. लेखाधिकारी	सदस्य	-,,-
४.	श्री रविंद्र बाळासाहेब नवले, मनुष्यबळ व्यवस्थापक	सदस्य	-,,-
५.	श्री. गोरक्षनाथ रायभान नलगे, प्र. विधी अधिकारी	सदस्य	-,,-

ब) श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या कंटेंम्प्ट पिटीशन बाबत....

मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या निकालाची अमंबलबजावणी न केल्याबद्दल श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री अरूण डोंगरे, भा.प्र.से., तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व ३) श्री रविंद्र ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. यांचे विरूध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे कंन्टेम्प्ट पिटीशन नं.२७७/२०२० दाखल केले आहे. तसेच, मा.उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या दि.१० सप्टेंबर, २०२० रोजीचे आदेशात पुढीलप्रमाणे नमूद आहे. **"Issue simple notice to respondents No.2 and 3, returnable on 8th October, 2020, with a view to gauge the response of respondents No.2 and 3."** प्रस्तुत कंन्टेम्प्ट पिटीशन मध्ये संस्थानला दि.०६.१०.२०२० रोजी नोटीस प्राप्त झालेली असुन पुढील कार्यवाही करणेत येत आहे. सोबत कंटेंम्प्ट पिटीशन २७७/२०२० ची छायांकित प्रत जोडलेली आहे.

उपरोक्त मा.उच्च न्यायालय येथे दाखल करणेत आलेल्या कंन्टेम्प्ट पिटीशन नं.२७७/२०२० मध्ये न्यायालयीन कामकाज पहाणेकामी संस्थानचे पॅनलवरील ॲड. श्री विनायक होन यांना श्री अरूण डोंगरे, भा.प्र.से., तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री रविंद्र ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे वतीने न्यायालयात कामकाज पहाणेकामी वकीलपत्र देण्यात आलेले आहे. उपरोक्त दाव्याच्या संदर्भात दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२० रोजी सुनावणी झालेली असुन पुढील सुनावणीची दिनांक अद्याप प्राप्त झालेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, बिंदूनामावली आदी बाबींना मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेनंतर प्रशासकीय अधिकारी या पदाची पदोन्नतीची प्रक्रिया पुर्ण करता येणार आहे. तसे पत्र श्री विजय गणपतराव रोहमारे यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१७०८/२०२०, दि.५ ऑक्टोबर, २०२० रोजी देण्यास आलेले आहे. श्री. विजय गणपतराव रोहमारे यांनी दाखल केलेली न्यायालय अवमान याचिका क्रमांक २७७ / २०२० माहितीस्तव सविनय सादर.

उपरोक्त वस्तुःस्थिती मा. तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.४६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विजय गणपत रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबतच्या अर्जावर संस्थानचे स्तरावर चर्चा होऊन श्री. रोहमारे यांचे पदाचा प्रशासकीय अधिकारी पदासाठी Feder cadre (पदोन्नतीचे निम्नपद) यामध्ये समावेश आहे काय? तसेच ते प्रशासकीय अधिकारी पदाची पात्रता धारण करत आहेत काय? व विभागाने गुणवत्तेच्या आधारे त्यांना प्रशासकीय अधिकारी पदी पदोन्नती देता येईल काय? या संदर्भात विभागाने स्पष्ट अभिप्राय नोंदवून प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१० **संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहिती केंद्र येथील श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी कर्मचारी यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.३०.६.२०२० रोजीचा अर्ज.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत सिकंदराबाद (हैद्राबाद) येथे साईभक्तांना सोई - सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी सन २०१० पासून माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर माहिती केंद्र कार्यालयात दि.१७/१०/२०१० रोजी पासून श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, यांची ऑफीस असिस्टंट म्हणून कंत्राटी पध्दतीने एक वर्षाच्या मुदतीकरीता एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानंतर आज अखेर श्री. चंद्रकांत सुराणा यांना वेळोवेळी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ व मानधन वाढ देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४६१ नुसार श्री. सुराणा यांना मागील वर्षी इकडील जा. नं. एसएसएस / साप्रशा – आस्था / १७४१ / २०१९ दि.१३/०९/२०१९ रोजीचे पत्राने दि.२५/०८/२०१९ ते २४/०८/२०२० अखेर एक वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१८,०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार मात्र) एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली आहे.

श्री. सुराणा हे संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहिती केंद्रात साईभक्तांसाठी ऑनलाईन आरती / दर्शन बुकींग, ऑनलाईन रुम बुकींग, पुस्तक विक्री, देणगी स्विकारणे इ. सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम करत आहेत.

श्री. सुराणा यांनी दि.३०/०६/२०२० रोजीचे अर्जाने, कंत्राटी पध्दतीने नेमणूकीचे कालावधीस मुदतवाढ व मानधन वाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री. सुराणा यांचे सदर अर्जावर प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी 'श्री. चंद्रकात माणकचंद्र सुराणा, हे संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहिती केंद्र येथे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर ऑफीस असिस्टंट म्हणून काम करत असून, त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांच्याबाबत कोणतीही तक्रार नाही. त्यांची मुदत दि.२४/०८/२०२० अखेर संपत असून, श्री. सुराणा यांचे उपरोक्त मुदतवाढ विनंती अर्जाचा विचार करता, संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ देण्यास हरकत नाही. असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री. सुराणा यांचा मुदतवाढीबाबतचा विनंती अर्ज व त्यावरील प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, श्री. सुराणा यांना संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहिती केंद्रात कार्यालय सहाय्यक म्हणून कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीची मुदत दि.२४/०८/२०२० अखेर संपुष्टात येत असून, पुढे एक वर्षाकरीता संस्थान नियमाप्रमाणे मुदत वाढ व योग्य मानधन वाढ देणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी, संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहीत केंद्रात कार्यरत असलेले श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कार्यालय सहाय्यक, यांचे दि.३०/०६/२०२० रोजीचे अर्ज व त्यावरील प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्रायास अनुसरुन, श्री. सुराणा यांना **दि.२५/०८/२०२० पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी** कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ व योग्य मानधनवाढ देणेबाबतचा प्रस्ताव उचित निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.४६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) येथील माहीती केंद्रात कार्यरत असलेले श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कार्यालय सहाय्यक यांना ४ दिवसांचा ब्रेक देवून / सेवाखंड देऊन दि. २९/०८/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१८,०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार मात्र) एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.११ **संस्थानचे चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढीचे अर्जाबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत साईभक्तांना सोई - सुविधा उपलब्ध करुन देणेकामी चेन्नई येथे माहिती केंद्र सुरु करणेत आलेले आहे. सदरचे माहिती केंद्र सन २०११ पासून सुरु करणेत आलेले असून, माहिती केंद्रावर कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. सदर कंत्राटी कर्मचारी यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वेळोवेळी मुदतवाढ व मानधनात वाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार मागीलवर्षी मा. तदर्थ (Ad - hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५२ अन्वये संस्थानचे चेन्नई येथील माहिती केंद्रातील श्री व्ही.कन्नन, कुशल कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे विनंती अर्जास अनुसरुन त्यांचे कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीस दि.०३/११/२०१९ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. श्री. व्ही. कन्नन हे संस्थानचे चेन्नई येथील माहिती केंद्रात साईभक्तांसाठी ऑनलाईन आरती / दर्शन बुकींग, ऑनलाईन रुम बुकींग, पुस्तक विक्री, देणगी स्विकारणे इ. सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम करत आहेत.

उपरोक्त निर्णयानुसार, श्री व्ही.कन्नन यांना देण्यात आलेली एक वर्ष कालावधीची मुदत दि.०२/११/२०२० अखेर संपत असल्याकारणाने, त्यांनी दि.१५/१०/२०२० रोजीचे अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली असून, सदर विनंती अर्जावर, प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी दि.०३/११/२०२० अन्वये खालील प्रमाणे अभिप्राय दिला आहे.

"श्री. व्ही. कन्नन, माहिती केंद्र, चेन्नई यांचे काम समाधानकारक असून, त्यांच्याबाबत कोणतीही तक्रार नाही त्यांची मुदत दि.०२/११/२०२० अखेर संपत असून श्री. कन्नन यांचे उपरोक्त मुदतवाढ विनंती अर्जाचा विचार करता, संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ देण्यास हरकत नाही."

श्री. व्ही. कन्नन यांचा मुदतवाढीबाबतचा विनंती अर्ज व त्यावरील प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, श्री. व्ही. कन्नन यांना त्यांचे कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीस दि.०३/११/२०२० पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी, संस्थानचे चेन्नई येथील माहिती केंद्रातील श्री. व्ही. कन्नन, कुशल कंत्राटी कर्मचारी यांना दरमहा रुपये १८०००/- एकत्रित माधनावर दि.०३/११/२०२० पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे चेन्नई येथील माहिती केंद्रातील श्री. व्ही. कन्नन, कुशल कंत्राटी कर्मचारी यांना दरमहा रुपये १८०००/- एकत्रित माधनावर ४ दिवसांचा ब्रेक देवून दि. ०९/११/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१२ **श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथील असंघटीत कर्मचा-यांना समानकाम-समान वेतन लागू करण्यांच्या मागण्यांबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र शासन, क्र.सासवि.१०१५/८२८/प्र.क्र.१५०/का.१६, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.१६.०७.२०२० रोजीचे पत्र दि.२३.०७.२०२० रोजी इकडिल कार्यालयास प्राप्त झाले असून, त्यात त्यांनी, '' मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचे दि.०५.०३.२०२० रोजीच्या पत्राची प्रत जोबत जोडली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांना समान कामासाठी समान वेतन देण्याबातची विनंती केली आहे. उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने सुधारित परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.'' असे कळविलेले आहे.

प्रस्तावना:-

०१) साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी, यांचे समान काम समान वेतनाबाबत सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर, यांचेकडील पत्र जा.क्र.सकाआ/नगर/किवेब/२३०३, दि.६-४-२०१५, अन्वये इकडील कार्यालयास पत्र प्राप्त झालेले होते. त्यात, त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, येथील कंत्राटी कामगारांना कंत्राटी कामगार अधिनियम, १९७०, अन्वये वेतन व महागाई भत्ता मिळणेबाबत, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, येथील कंत्राटी कामगार संघटनेच्या प्रतिनिधीत्व करणा-या कामगार संघटनेने कंत्राटी कामगार व नियमित कामगार हे समान स्वरूपाचे काम करीत असल्याने त्यांचे पगारामध्ये खुपच तफावत असल्याने कंत्राटी कामगार अधिनियमाच्या तरतुदीनुसार समान कामासाठी समान वेतन याचा अवलंब करण्यात येऊन त्यांना नियमित कामगाराप्रमाणे वेतन मिळवुन द्यावे अशी मागणी करणेत आलेली होती.

०२) त्यावर, सदर प्रकरणी चर्चा करून, मार्ग काढण्यासाठी दि.१०-०४-२०१५, रोजी, सकाळी ११.३० वा,मा. सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर, यांचे कार्यालयात बैठक आयोजित करणेत आलेली होती, सदर बैठकिस प्रशासकीय अधिकारी (कामगार विभाग) व प्र.कामगार अधिकारी उपस्थितहोते, बैठकी दरम्यान सदर संघटनेचे दि.२३-०२-२०१५, रोजीचे पत्र संस्थानला प्राप्त झाले नसलेबाबत सांगितले, मा.सहाय्यक कामगार आयुक्त, यांनी सदर पत्राची प्रत संस्थानला देणेबाबत संघटनेचे प्रतिनिधींना सांगितले, त्यांनतर, मा. सहाय्यक कामगार आयुक्त, यांनी संस्थान प्रतिनिधी यांस तुम्ही तुमचे लेखी म्हणने, दि.२४-४-२०१५, रोजी सादर करावे असे निर्देश दिले होते.त्यानुसार संस्थानमार्फत, ॲड.श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर, यांचे सल्ल्याप्रमाणे, दि.२४-४-२०१५, रोजी,खालील नमूदप्रमाणे, मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर, यांना लेखी म्हणने सुनावनीचे वेळी समक्ष सादर करण्यात आले आहे.

०३) तदनंतर, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, यांनी पुन्हा, दि.२०.१०.२०१५, रोजी, समान काम समानवेतन दयावे, अन्यथा, दि.२८.१०.२०१५, पासून शांततेच्या मार्गाने आमरण उपोषणास बसणार असलेबाबत पत्र सादर केले होते, तसेच, सदर उपोषणाबाबत महाराष्ट्शासन, यांनी, पत्र क्र.संकीर्ण-२०१५/७३७/प्र.क्र.१४४/का.१६/विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.१९.१०.२०१५, चे, पत्राने कंत्राटी कर्मचारी उपोषणाबाबत आपल्या स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदयस्थिती बाबतचा अहवाल शासनास सादर करावा असे कळविलेले होते.

०४) तदनंतर, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, यांचे पत्रास अनुसरुन इकडील पत्र क्र. जा. नं. एसएसएस / वशी७ए/४१८०/२०१५, दि.२७.१०.२०१५, अन्वये, समान काम समान वेतनाबाबतचा विषय त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करण्यात आलेला असून, आपण उपोषणास बसू नये बाबत सदर संघटनेला संस्थानकडून कळविणेत आलेले होते.

०५) तरी ही, दि.२८.१०.२०१५, पासून, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना यांनी उपोषण सुरु केले होते.

०६) तदनंतर कंत्राटी कर्मचारी समान काम समान वेतनाबाबत, दि.२७.१०.२०१५, रोजीचे, मा.त्रिसदस्य समिती सभे मध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता, मा.त्रिसदस्य समिती सभेमध्ये त्यावर चर्चा होऊन त्याबाबत प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविणेबाबत निर्णय झाला होता, तसेच, विधी व न्याय विभागाचे पुढील आदेश प्राप्त झालेनंतर, मा.उच्च न्यायालय, खंडपीड औरंगाबाद, यांचे मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करणेत येईल बाबत लेखी निर्णय झाले ने इकडील जा.नं.एसएसएस/ वशी७ए/४१८८/२०१५, दि.२८.१०.२०१५, अन्वये, सदर संघटनेचे प्रतिनिधी यांना कळविणेत आलेले होते.

०७) त्यानंतर, मा.त्रिसदस्य समिती सभेच्या निर्णय क्र.४१२ अन्वये महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएलए/०३/२०१४ पत्र क्र.९५/ कामगार-१०, दि.१०.०६.२०१४ या शासन परिपत्रकानुसार संस्थानमध्ये कार्यरत असणा-या कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन देणेबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेण्यात यावा तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करणेत यावी. असे ठरले. त्यानुसार, संस्थान कडून मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ४२५१/२०१५, दि.३०.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव पाठविणेत आलेला असून, विधी व न्याय विभागयांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे,परंतु, अदयाप पावेतो विधी व न्याय विभागाकडून संस्थानला लेखी अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

०८) त्यानंतर, मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर, यांचे कडील जा.क्र.सकाआ/अ.नगर/किवेनि / १८७७/२०१६ , दि. २२.०८.२०१६, रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले होते, सदर पत्रात असंघटीत कामगार संघटना, शिर्डी, यांचे समान काम समान वेतनाचे पत्र प्राप्त झालेने समान काम समान वेतन बाबत चर्चेतून तोडगा काढण्यासाठी, दि.२५.८.२०१६, रोजी, कामगार आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित केली असलेबाबत कळविलेने, सदर बैठकी कामी, उपकार्यकारी अधिकारी व प्र.कामगार अधिकारी, हे उपस्थित होते, सदर बैठकित कंत्राटी कामगार यांना समान काम समान वेतन देणे बाबतचा शासनास पाठविलेल्या प्रस्तावावर संस्थान तर्फे पाठपुरावा करणेत यावा अशा त्यांनी सूचना दिलेल्या होत्या. त्यात अनुसरुन, इकडील पत्र क्र.एसएसएस/वशी7ए/२८९०/२०१६ दि.८.९.२०१६, अन्वये, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना, समान काम समान वेतनाबाबत अभिप्राय मिळणेबाबत विनंती पत्र पाठविणेत आलेली असून सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबीत आहे.

०९) श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी दि.२८.१०.२०१५ रोजी कामबंद आंदोलन केलेले होते. त्यावर कंत्राटी कर्मचा-यांना वेतनात वाढ करणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७ मध्ये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.१४१- - उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायद्यानुसार कामबंद आंदोलन करता येत नाही, त्यांच्या मागण्या त्यांनी संबंधीत कंत्राटदारास कळवायला हव्या आहेत. यापुर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणे, समान काम समान वेतन देणे, त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा देणे या बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले असून त्याचाही पाठपुरावा चालू आहे. संस्थानचा प्रशासनावरील खर्च सुमारे ४५% पर्यंत होत आहे व कंत्राटी कामगारांना सध्या देत असलेल्या वेतनाव्यतिरिक्त प्रती व्यक्ती जवळपास २८% (सेवाकर १५% व पी.एफ.१३.३६%) रक्कम संस्थानला अदा करावी लागत आहे. सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतनदरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासुन कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहेत व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रती दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधीत कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा रु.१० लाख पर्यंतचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना फक्त किमान वेतन देणे बंधनकारक आहे. महागाई निर्देशंकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते, ती कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चित करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करुन किमान वेतन निश्चित केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे ४०% वेतनवाढ भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजुर करणेत आली.

कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव असल्यामुळे दि. १७ मार्च २०२० पासून श्री साईबाबा मंदिर बंद करणेत आलेले आहे. त्यामुळे माहे एप्रिल - २०२० पासून कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येत असलेली किमान वेतनावरील ४०% वेतनवाढ आदा करणेत आलेली नाही.

१०) त्यानंतर, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा कामगार विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दि.१०.०७.२०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थानमधील असंघटीत कामगारांच्या प्रश्नांबाबत दि.१२.०७.२०१७ रोजी मा.मंत्री कामगार यांचे दालनात बैठक असलेबाबत पत्र प्राप्त झालेले होते. तथापि सदर बैठक रद्द झालेने त्यावर त्यांचे सदर बैठक दि.१८.०७.२०१७ रोजी आयोजीत केलेबाबत पत्र प्राप्त झाले होते.

११) त्यानंतर, उद्योग व उर्जा कामगार, मंत्रालय, मुंबई यांचे दि.१८.०७.२०१७ रोजीचे बैठकीबाबत इतिवृत्त प्राप्त झाले, सदर इतिवृत्तात श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचेमार्फत विधी व न्याय विभागास दि.३०.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये समान काम समान वेतनाबाबत पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भात कामगार विभागाने देखील विधी व न्याय विभागाकडे पाठपुरावा करावा असे नमूद केले आहे.

१२) त्यावर, कामगार विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३७१०/२०१७, दि.११.१०.२०१७ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना दि.१८.०७.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. तथापि सदर बैठकीचे इतिवृत्त अद्याप पावेतो श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथील कार्यालयास प्राप्त झालेले नाही असे कळविणेत आलेले होते.

१३) तथापि, अद्याप पावेतो मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे अभिप्राय इकडिल कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

उपरोक्त नमूद विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी सुचित केलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील असंघटीत कामगारांना समान काम समान वेतन लागू करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडून मार्गदर्शन मागविणेकामी संस्थानकडून प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे. मा.विधी व न्याय विभाग यांचेकडून याबाबत अद्याप निर्देश प्राप्त झालेले नाहीत. यापुर्वी शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासनाकडून मागर्दशन/अभिप्राय प्राप्त करुन घेऊन त्यानंतर याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार विभाग)

विषय नं.१३ **सन २०२१ या वर्षाकरीता गाईचे शुध्द तुप खरेदी करणेकामी व याकामी येणा-या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री समाधी मंदिरात साईभक्तांनी दर्शन केलेनंतर संस्थानमार्फत प्रत्येक साईभक्तास मोफत बुंदीप्रसादाचे वाटप केले जाते व लाडू काऊंटरवर लाडू प्रसादही उपलब्ध करुन दिला जातो. तसेच जे साईभक्त श्री साई सत्यव्रत पूजेसाठी उपस्थित असतात त्यांनाही शिरा प्रसाद वाटप केले जाते. यासाठी आवश्यक असणारे शुद्ध तुपाची वार्षीक खरेदी दरवर्षी खरेदी विभागामार्फत ई-निविदा पद्धतीने केली जाते.

सन २०२० वर्षासाठी शुद्ध तुप खरेदीसाठी दि. ३१ डिसेंबर, २०२० अखेरपर्यंत ८,४०० क्विंटल शुद्ध तुप मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर, हरीद्वार, यांचेकडून खरेदीचा निर्णय झालेला आहे. तथापि, माहे एप्रिल, २०२० ते ३१ जुलै, २०२० या कालावधीसाठी कोविड १९ मुळे लॉकडाऊन होते व त्यानंतरही ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत कंटेनमेंट झोनमध्ये लॉकडाऊन आहे. तसेच मंदिरेही भक्तांसाठी बंद ठेवण्यात आलेली आहेत. त्यामुळे संस्थानची लाडू व बुंदी प्रसाद व श्री साई सत्यव्रत पूजा या सेवाही बंद असल्याने शुद्ध तुपाचा माहे एप्रिल ते सप्टेंबर २०२० या कालावधीचा पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मात्र सध्याचे शुद्ध तुप पुरवठादाराची पुरवठा करण्याची मुदत दि.३१ डिसेंबर, २०२० पर्यंत आहे.

सन २०२१ ची शुध्द तूपाची खरेदीची ई-निविदा प्रक्रिया वेळेत होण्याच्या दृष्टीने, संस्थानचे शुद्ध तुपाचे वापर करणारे प्रसादालय, लाडू निर्मिती व मंदीर या विभागांकडून इकडील परिपत्रक क्रं..४४३/२०२०, दि.०६.०७.२०२० अन्वये सन २०२१ साठीची शुद्ध तुपाची मागणी दि.२०.०७.२०२० पर्यंत नोंदविणेबाबत कळविणेत आलेले होते.

प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदीर या विभागांनी विहित मुदतीत शुद्ध तुपाची वार्षीक मागणी खालीलप्रमाणे कळविलेली आहे.

अ.नं.	विभागांचे नांव	सन २०२१ ची वार्षीक मागणी (क्विंटलमध्ये)
०१	लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग	८,४३०.०००
०२	श्री साई प्रसादालय विभाग	१०.०००
०३	मंदिर विभाग	१३०.०००
	एकूण	८,५७०.०००
	पुर्णांकीत एकुण मागणी	**८,६००.०००**

वरील मागणीचा विचार करता, सन २०२१ या वर्षासाठी शुद्ध तुपाची अंदाजे वार्षीक मागणी ८,६०० क्विंटल निश्चित करावी लागेल.

माहे जानेवारी, २०२० ते ३० जून, २०२० या कालावधीत वरील तीनही विभागांकडून १,९२५ क्विंटल शुद्ध तुपाचा वापर करणेत आलेला आहे, असे त्यांनी कळविले आहे. तथापि, दि. १८ मार्च, २०२० ते दि.३१ ऑगस्ट, २०२० या कालावधीत लॉकडाऊन असल्यामुळे श्री साई सत्यव्रत शिरा प्रसाद, लाडू- बुंदी प्रसाद या सेवा पूर्णतः बंद आहेत. तर प्रसाद भोजन सेवा अंशतः पण अगदी थोड्या प्रमाणात सुरु आहे. त्यामुळे शुद्ध तुपाचा वापर होऊ शकलेला नाही. तथापि, त्यामुळे पुढील वर्षाची शुध्द तूपाची मागणी कमी करता येणार नाही.

सन २०२१ या वर्षासाठी वार्षीक खरेदी करावयाचे ८,६०० क्विंटल शुद्ध तूप खरेदीकामी Estimated Cost काढणेकामी, शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील तरतुद क्र. ३.१.२.२ – खरेदी करावयाच्या वस्तुच्या किंमतीचा अंदाज खालील बाबींच्या आधारे काढण्यात यावा. यामध्ये एकूण विविध ५ बाबी नमूद केलेल्या आहेत. तथापि त्यापैकी अंदाजे किंमत काढणेसाठी अ.नं.३ वर "एक किंवा अधिक संभाव्य विक्रेत्यांकडून घेण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील भाव/किंमत" अशी तरतुद आहे. ती आपल्याला सोईस्कर असल्यामुळे या तरतुदीनुसार विविध उत्पादकांकडून अंदाजे दर मागविणेत येतात व त्या दरांची सरासरी काढून शुद्ध तुपाची Estimated Cost निश्चित केली जाते.

सदर तरतुदीनुसार सन २०२१ साठी संस्थानला ८,६०० क्विंटल गाईचे शुद्ध तुप ४ टप्प्यात तिमाही दर मागवून ई-निविदा पद्धतीने खरेदी करणेसाठी Estimated Cost काढणेसाठी अंदाजे दर कळविणेबाबत एकूण १६ उत्पादकांना ई-मेलद्वारे विनंती करणेत आली होती. त्यास अनुसरुन ४ उत्पादकांनी प्रतिसाद देवून ई-मेल व दुरध्वनीद्वारे कळविलेले अंदाजे दर व त्यांची सरासरी काढून त्याप्रमाणे Estimated Cost निश्चित केली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.नं.	**उत्पादकांचे नांव**	**सरासरी दर (प्रती क्विंटल) रु/पैसे**
०१	हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि., हरिद्वार	३१,२७५/-
०२	एस.डी.पी. इंडस्ट्रीज प्रा.लि., दमण	३८,२५०/-
०३	व्ही.एस.पी. डेअरी इंडस्ट्रीज, उमरगांव	३२,०००/-
०४	वास्तु प्युअर घी, सुरत, गुजरात	३७,७२५/-
Estimated Cost **प्रती क्विंटल दर रुपये-**		**३४,८१२/-**

वरील प्राप्त दरांची सरासरी काढता सन २०२१ वर्षाकरीता शुद्ध तुप खरेदीसाठी Estimated Cost रुपये ३४,८१२/- प्रती क्विंटल अशी येत आहे.

विभागाचा अभिप्राय:- सन २०२१ या वर्षाकरीता (माहे जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१) संस्थानला एकुण अंदाजे ८,६०० क्विंटल शुद्ध तुप वार्षिक खरेदी करणेची आवश्यकता आहे. सदर शुद्ध तुप खरेदीसाठी वरील Estimated Cost रु. ३४,८१२/- प्रती क्विंटल दराप्रमाणे अंदाजे रु. २९,९३,८३,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मा. तदर्थ समितीची तसेच त्यानंतर मा.उच्च न्यायालयाचीही मान्यता घ्यावी लागेल. तसेच शुध्द तूप खरेदीसाठी येणारे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामीचा कालावधी, ई-निविदा प्रक्रिया करणेसाठीचा कालावधी,व्हेंडर ऑडीट, चर्चा-वाटाघाटी, शुध्द तुपाची लॅब तपासणी व अंतिम निर्णय या विविध टप्प्यांसाठी आवश्यक असणारा कालावधी याचा सर्वांगीण विचार करता प्रत्येक टप्प्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सदर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे तातडीने सादर होऊन याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे, असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी सन २०२१ करीता (माहे जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१) संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदिर या विभागांसाठी वार्षिक ८,६०० क्विंटल गाईचे शुद्ध तुपाची खरेदी संस्थानचे खरेदी विभागामार्फत ई-निविदा पध्दतीने करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम **रु. २९,९३,८३,२००/-** (अक्षरी एकोणतीस कोटी त्र्यान्नव लाख त्र्याऐंशी हजार दोनशे मात्र) पर्यंतचे अंदाजे खर्चास मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.४६६ **सन २०२१ या वर्षाकरीता गाईचे शुध्द तुप खरेदी करणे व याकामी येणा-या अंदाजीत खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली असल्याने आजचे सभेत सदरचा विषय मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही-भांडार विभाग)

विषय नं.१४ **मार्च-२०२० महिन्याकरीता किराणा माल मा.तदर्थ समितीचे दि.०४.०३.३०३० चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार खरेदी करणेची व त्यासाठी सिव्हील ॲप्लीकेशन करण्याची गरज नसल्याची बाब मा.तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे श्री साई प्रसादालय व लाडू निर्मीती विभागाने दि.२७.०२.२०२० रोजीचे प्रस्तावाने "श्री साई प्रसादालय व लाडू विभागाकरीता सन २०१९-२० किराणा मालाचे आर्थिक वर्ष हे मार्च २०२० अखेर संपत आहे. उत्सव काळात तसेच नाताळ व नववर्षानिमित्त साईभक्तांची गर्दी वाढल्याने दालचिनी व खसखस संपलेली असुन काही प्रमाणात किराणा माल व मसाले संपत येत आहे. श्रीरामनवमी उत्सव हा एप्रिल महिन्याच्या सुरुवातीस आल्याने साईभक्तांची गर्दी होणे अपेक्षित आहे. तसेच गर्दीच्या प्रमाणात मालात वाढ-घट होणे अपेक्षित असल्याने माहे मार्च २०२० अखेर करीता खालीलप्रमाणे २५ टक्क्यामधील काही प्रमाणात किराणा माल व मसाल्याची आवश्यकता लागेल", असे कळविले होते. सदर दोन्ही विभागांनी सादर केलेल्या मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.नं.	**मालाचा तपशिल**	**पुरवठा आदेश परिमाण (क्विंटल)**	**दर प्रती क्विंटल**	**मागणी तथा २५ % परिमाण**	**येणारा खर्च (रु.पै.)**
०१	**०२**	**०३**	**०४**	**०५**	**०६**
०१	हरभरा दाळ	१,९००	५,२८८/-	४७५ क्विंटल	२५,११,८००/-
०२	साखर	३६६७.५०	३,३९०/-	९१७ क्विंटल	३१,०८,६३०/-
०३	गहू	३७५०	२,३३५/-	९३८ क्विंटल	२१,९०,२३०/-
०४	तांदूळ	२५००.६८	३,०७५/-	६२५ क्विंटल	१९,२१,८७५/-
०५	जायपत्री	०१.००	१,५५,०००/-	२५ किलो	३८,७५०/-
०६	शहाजिरे	०१.००	५४,०००/-	२५ किलो	१३,५००/-
०७	मसाला विलायची	०१.००	६८,०००/-	२५ किलो	१७,०००/-
०८	दगडफुल	०१.००	४५,०००/-	२५ किलो	११,२५०/-
०९	नाकेश्वर	०१.००	१,२०,०००/-	२५ किलो	३०,०००/-
१०	दालचिनी	१.८०	२२,०००/-	४५ किलो	९,९००/-
११	खसखस	०१.००	५४,०००/-	२५ किलो	१३,५००/-
				एकुण-	**९८,६६,४३५/-**

वरील तपशिलाप्रमाणे माहे मार्च २०२० महिन्याकरीता किराणा माल वार्षीक निविदा मंजूर दराने खरेदी करणेकामी एकूण येणारे रक्कम रु. ९८,६६,४३५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.४/३/२०२० चे सभेसमोर सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झाला होता.

निर्णय क्रं.-१७०- यावर सविस्तर चर्चा होवून, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मार्च-२०२० महिन्याकरीता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.९८,६६,४४५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद,यांचेकडे सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

सदर निर्णयाची प्रत दि.२३.०३.२०२० रोजी भांडार विभागास प्राप्त झाली होती. सदर निर्णयान्वये मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेण्यासाठी सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करण्यासाठी विधी विभागास दि.२४.०३.२०२० रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. परंतु कोव्हिड-१९ चे प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन लागू झालेमुळे दि.१७.०३.२०२० पासून मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद करण्यात आले होते. त्यामुळे प्रसादालय, लाडू प्रसाद व कॅन्टीन सेवाही बंद करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मार्च २०२० करीता सदर निर्णयाप्रमाणे वरील नमूद किराणा मालही खरेदी करण्याची गरज भासली नाही. तसेच मा.न्यायालयाचे कामकाजही बंद असल्यामुळे सिवील ॲप्लीकेशन दाखल होऊ शकले नाही.

महाराष्ट्र शासनाने कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव महाराष्ट्रात जास्त झालेमुळे दि.३१.०७.२०२० पर्यंत लॉकडाऊन वाढविला आहे. तसेच धार्मिक स्थळे बंद ठेवण्याचे निर्देश अजुन कायम आहेत. त्यामुळे मंदिर नेमके कधी सुरु होईल तसेच संस्थानचे प्रसादालय, लाडू व कॅन्टीन सेवा कधी सुरु होतील, याचा अंदाज बांधता येत नाही. तथापि संस्थानला किराणा मालाची गरज भासल्यास सन २०२०-२१ ची खरेदी प्रक्रियाही काही कालावधीत पूर्ण होईल.

वरील किराणा माल खरेदी ही एप्रिल महिन्याचे पहिल्या आठवडयात होणा-या श्री रामनवमी उत्सवासाठी होणारी गर्दी अपेक्षित धरुन प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि कोरोना प्रादुर्भावामुळे दि.१७ मार्चपासून लॉकडाऊन असल्यामुळे संस्थानच्या प्रसादालय, लाडू, कॅन्टीन या सर्व सेवा बंद होत्या व अदयापही

बंद आहेत, त्यामुळे वरील निर्णय क्रं.१७० प्रमाणे किराणा माल खरेदी करण्याची व त्यासाठी मा.उच्च न्यायालयात सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करणेची आता आवश्यकता नाही ही बाब मा. तदर्थ समितीचे अवलोकनार्थ सादर करणेसाठी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा किराणा माल खरेदी ही माहे एप्रिल-२०२० या महिन्याचे पहिल्या आठवडयात होणा-या श्री रामनवमी उत्सवासाठी होणारी गर्दी अपेक्षित धरुन प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि कोव्हीड-१९ चे प्रादुर्भावामुळे दि.१७ मार्चपासून श्रींचे मंदिर दर्शनासाठी बंद असल्यामुळे संस्थानच्या प्रसादालय, लाडू, कॅन्टीन या सर्व सेवा बंद होत्या, त्यामुळे सदरचा किराणा माल खरेदी करण्याची व त्यासाठी मा.उच्च न्यायालयात सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करणेची आता आवश्यकता नाही, याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही-भांडार विभाग)**

विषय नं.१५ **गाईचे शुध्द तुपातील Reichert-Meissl-Wollny (RM) Value या पॅरामिटरचे प्रयोगशाळा तपासणीचे अहवाल मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानला माहे फेब्रुवारी, २०२० ते मार्च, २०२० या कालावधीत प्राप्त झालेल्या शुद्ध तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या लॅब तपासण्यांचे अहवाल (पा.नं. १ ते २७) व तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते ६) मा. तदर्थ समितीचे दि.२८.०८.२०२० रोजीचे सभेत विषय क्रं.३३ अन्वये नोंद घेण्यासाठी सादर करण्यात आलेले होते.

सदर अहवालावर मा. तदर्थ समितीचे दि.२८/८/२०२० चे सभेत निर्णय क्रं.४३७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं. ४३७:- "याबाबत प्राप्त झालेल्या शुद्ध तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. याबाबत असे ठरले की, संबंधीत प्रयोग शाळांकडून गाईच्या शुद्ध तुपातील Reichert-Meissl-Wollny (RM) Value याबाबतचा अहवाल मागविण्यात यावा व तो समितीसमोर लवकरात लवकर ठेवावा."

सदर निर्णयामध्ये समाविष्ट असलेल्या शुद्ध तुप लॅब रिपोर्ट बाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणेः-

वरील निर्णयाचे प्रस्तावामध्ये, मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि. भगवानपूर, यांचेकडून फेब्रुवारी व मार्च २०२० या कालावधीत खरेदी केलेले शुद्ध तुप बॅच नं. ३,४,५,९ व ११ चे नमुने अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नासिक/अ.नगर, व केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर व संस्थान या प्रयोगशाळांमध्ये तपासण्यात आले होते. सदर सर्व लॅब तपासणीचे अहवाल FSSAI स्पेसिफीकेशन प्रमाणे योग्य होते. तथापि वरील मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्रं.४३७ अन्वये संबंधित प्रयोगशाळेकडून गाईचे शुध्द तूपातील Reichert-Meissl-Wollny (RM) Value चा अहवाल मागविण्यात यावा व तो समितीसमोर लवकरात लवकर ठेवणेबाबत निर्देशित केले आहे.

वरील निर्देशास अनुसरुन सादर करण्यात येते की, संस्थानचे लॅब तपासणी करुन घेतलेले सदर चारही लॅबचे शुध्द तूपाचे लॅब रिपोर्टमध्ये Reichert-Meissl-Wollny (RM) Value या पॅरामिटरचा समावेश होता व त्यांचे तपासणी अहवालामध्येही याचा उल्लेख आहे. तसेच सदर प्रयोगशाळांचे तपासणी अहवालाचे जे समरी तक्ते प्रस्तावासोबत सादर केले होते, ते Reichert-Meissl-Wollny (RM) Value या पॅरामीटरचे रिपोर्टसहच होते. त्यामुळे सदर Reichert-Meissl-Wollny (RM) Value अहवाल पुन्हा सदर चारही लॅबकडून मागविण्याची आवश्यकता नाही.

संस्थानकडून शुध्द तूपाची तपासणी केलेले वरील चारही लॅबचे तेच अहवाल सोबतचे समरीत Reichert-Meissl-Wollny (RM) Value ठळक व अधोरेखीत करुन मा. तदर्थ समितीचे सभेत नोंद घेणेसाठी पुन्हा सादर करावेत, असे मत आहे.

तरी संस्थानचे फेब्रुवारी-मार्च २०२० महिन्यात खरेदी केलेले शुद्ध तुपाचे लॅब तपासणी अहवाल पा.नं. १ ते २३ चे समरीमध्ये Reichert-Meissl-Wollny (RM) Value ठळक व अधोरेखीत करुन मा. तदर्थ समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर.

निर्णय क्र.४६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, गाईचे शुध्द तुपातील Reichert-Meissl-Wollny (RM) Value या पॅरामिटरचे प्रयोगशाळा तपासणी अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-भांडार विभाग)

विषय नं.१६ प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता भांडी धुणेकामी लिक्वीड सोप खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीड सोप खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

०१	खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल	प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीड सोप खरेदी
०२	मागणी	हाताने व मशीनव्दारे भांडी धुणेकामी लिक्वीड सोप
०३	ई-निविदा प्रसिद्धी	दि. १८.०९.२०२० ते दि. ०१.१०.२०२०
०४	वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते?	www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व १५ निविदाधारकांना ई-मेल व्दारे
०५	तर तसे, कोणाला पाठविले?	१५ ईमेल आय डी वर
०६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	दिनांक – १८.०९.२०२० टेक्निकल बीड – १५.१०.२०२० कमर्शियल बीड – ०३.११.२०२०
०७	प्राप्त निविदाकारांची संख्या	११ (अकरा)
०८	पात्र निविदाकारांची संख्या	११ (अकरा)
०९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का.	नमुने मागविण्यात आले नाहीत.
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ?	होय.
११	जर नमुने दिले नाही, तर का ?	---

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

अ.नं.	निविदाकाराचे नाव	सादर केलेले दर प्रती लिटर रु.	स्थिती
१	sainath corporation	१५.५०	L1
२	Saichem Enterprises	१५.९०	L2
३	Mangalmurti Enterprises	१६.७४	L3
४	HITU JITU ENTERPRISES	१९.९०	L4
५	OMKAR TRADERS	२७.००	L5
६	Dattatray Bhagwat Halwar	३१.९५	L6
७	starwinperfect mfg com pvt ltd	३३.९९	L7
८	Sandi S. Shelke	५०.५०	L8
९	Noble Marketing	७०.००	L9
१०	M/S ROHIT AGENCY	८६.४५	L10
११	SHREE A. D. ENTERPRISE	१५१.००	L11

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

अ.नं.	वर्ष	पुरवठा आदेश परिमाण	मागील वर्षात वापरलेले परिमाण	दर प्रती लिटर रु.
१	२०१९-२०२०	२३७०० लिटर	१७८५० लिटर	रु. १६.७५ पैसे

१४	मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे	
१५	सध्याची शिल्लक स्थिती	---
१६	मागील खरेदी दर	रुपये १६.७५ पैसे प्रती लिटर
१७	मागील पुरवठादार	मे. हितु जीतु एंटरप्रायजेस, मुंबई
१८	सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर	रुपये १५.५० पैसे प्रती लिटर
१९	सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव	मे. साईनाथ कार्पोरेशन, इचलकरंजी
२०	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ?	होय

२१	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे.	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी

२२	मागील खरेदी दर प्रती लिटर	सध्याचे प्राप्त दर	फरक	% ने कमी/जास्त
	रुपये १६.७५ पैसे	रुपये १५.५० पैसे	- १.२५	७.४६% ने कमी

२३. संक्षिप्त टीप – (प्रस्ताव) - संस्थानचे प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीड सोप खरेदीकामी सदर ई-निविदा राबविण्यात आलेली असून या ई-निविदेमध्ये ११ निविदाधारकांनी भाग घेतला होता. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ११ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.०३.११.२०२० रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये मे. साईनाथ कार्पोरेशन, इचलकरंजी यांचे दर वर सादर केलेल्या तक्त्यामध्ये अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक मे. साईनाथ कार्पोरेशन, इचलकरंजी यांचेशी त्यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दराबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सादर.

निर्णय क्र.४६९ **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्तनम निविदाधारक मे.साईनाथ कार्पोरेशन, इचलकंरजी यांनी ई-निविदेत नमुद केलेले दर कमी करणेस ई-मेलव्दारे असमर्थता दर्शविलेली आहे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता भांडी धुणेकामी लिक्वीड सोप खरेदीकामी ई-निविदेतील निम्नतम निविदाधारक मे.साईनाथ कार्पोरेशन, इचलकंरजी यांचे निम्नतम दर रु.१५.५० प्रती लिटर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

विषय नं.१७ **संस्थानचे पाणीपुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम आणि क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीकामी ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम आणि क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

०१	खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल	पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम आणि क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी
०२	मागणी	ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम आणि क्लोरीन गॅस सिलेंडर
०३	ई-निविदा प्रसिद्धी	दि. १८.०९.२०२० ते दि. ०१.१०.२०२०
०४	वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते?	www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व १४ निविदाधारकांना ई-मेल व्दारे
०५	तर तसे, कोणाला पाठविले?	१४ ईमेल आय डी वर
०६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	दिनांक – १८.०९.२०२० टेक्निकल बीड – १५.१०.२०२० कमर्शियल बीड – ०३.११.२०२०
०७	प्राप्त निविदाकारांची संख्या	०४ (चार)
०८	पात्र निविदाकारांची संख्या	०४ (चार)
०९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का.	नमुने मागविलेले नाहीत.
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ?	होय
११	जर नमुने दिले नाही, तर का ?	
१२	निविदाकारांनी सादर केलेले दर –	

Description of Work / Item(s)	YASH CHEMICALS	G.S. Commercial Corporation	HITU JITU ENTERPRISES	K S ENTE RISES
ब्लिचींग पावडर - विक्रम ब्रॅंड - ग्रासीम मेक/ डी.सी.एच. / जी.ए.सी.एल. (आय.एस.आय. मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध)	27999.00	0.00	**26100.00**	28950.00

	परिमाण- 35 मे. टन				
	फेरिक अॅलम (१६% अॅलोमिना फेरिक उपलब्ध) परिमाण- 55 मे. टन	**7800.00**	0.00	0.00	9060.00
	क्लोरीन गॅस सिलेंडर (१ सिलेंडर = १०० किलो वजन) परिमाण- 45 सिलेंडर	35000.00	**4250.00**	0.00	9600.00

३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – २०१९-२०

अ.नं.	तपशील	मागील वर्षात वापरलेले परिमाण दि. ०७.०९.२०२० अखेर	मागील वर्षाचा खरेदी दर
01	ब्लिचींग पावडर (विक्रम ब्रॅंड, ग्रासीम मेक, डी.सी.एच.(डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध) परिमाण- ३५ मे. टन	२६ मे. टन	२२,८३०/- प्रती मे. टन
02	फेरिक अॅलम (१६% अॅलोमिना फेरिक उपलब्ध) परिमाण- ५५ मे. टन	४८.८ मे. टन	७,३९९/- प्रती मे. टन
०३	ई-निविदा प्रसिद्धी	दि.२५.०९.२०२० ते १६.१०.२०२०. प्रथम मुदतवाढ दि.१७.१०.२०२० ते २३.१०.२०२० व्दितीय मुदतवाढ दि.२४.१०.२०२० ते ३१.१०.२०२०
०४	वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते?	www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे.
०५	तर तसे, कोणाला पाठविले?	संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ११ ई-मेल आय डी वर व फोन नंबरव्दारे
०६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	दिनांक – २५.०९.२०२० टेक्निकल बीड – १८.११.२०२० कमर्शियल बीड – १९.११.२०२०
०७	प्राप्त निविदाकारांची संख्या	०३
०८	पात्र निविदाकारांची संख्या	०३
०९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का.	होय
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का?	होय
११	जर नमुने दिले नाही, तर का.	-

११२ निविदाकारांनी सादर केलेले दर – 1st October-2020 to 31st December-2020

Sl.No	**Description of Work / Item(s)**	**No.of Qty**	**Units**	**M/S PRAMOD SUPPLIERS**	jaihind kirana stores	Lalji Kanji And Sons
				Rate	Rate	Rate
1.00	Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin	750.00	Quintal	**13200.00**	13838.00	14000.00

2.1st January-2021 to 31st March-2021

Sl.No	Description of Work / Item(s)	No.of Qty	Units	**M/S PRAMOD SUPPLIERS**	jaihind kirana stores	Lalji Kanji And Sons
				Rate	Rate	Rate
1.00	Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin	750.00	Quintal	**13500.00**	13838.00	14500.00

3.1st April 2021 to 30th June 2021

Sl.No	Description of Work / Item(s)	No.of Qty	Units	**M/S PRAMOD SUPPLIERS**	jaihind kirana stores	Lalji Kanji And Sons
				Rate	Rate	Rate
1.00	Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin	750.00	Quintal	**13600.00**	13939.00	14300.00

4.1st July-2021 to 30th September-2021

Sl.No	Description of Work / Item(s)	No.of Qty	Units	**M/S PRAMOD SUPPLIERS**	jaihind kirana stores	Lalji Kanji And Sons
				Rate	Rate	Rate
1.00	Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin	750.00	Quintal	**13600.00**	13939.00	14500.00

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

अ.नं	तपशिल	कालावधी	दर प्रती क्विंटल
१	खादयतेल	एप्रिल २०१९ ते जून-२०१९	८,८७५/-
२		जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९	९,१५०/-
३		ऑक्टोंबर २०१९ ते डिसेंबर २०१९	९,१९०/-

		४		जानेवारी २०२० ते मार्च २०२०	९,२५०/-

१४	मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल	-
१५	सध्याची शिल्लक स्थिती	-
१६	मागील खरेदी दर	अ.नं.१३ मध्ये नमूद केलेप्रमाणे
१७	मागील पुरवठादार	मे.कैलास फुड्स ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा
१८	सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर	अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे
१९	सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव	अ.नं.१२ मध्ये गडद व अधोरेखित केलेप्रमाणे
२०	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का.	होय.
२१	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे.	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी
२२	घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील -	------
२३	मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त	
	रु. -- रु. -- रु. -- --	
२४	विभागाने खरेदीसाठी मंजुरी घेतलेली अंदाजे रक्कम रू. ३,००,५०,०१०/-	

संक्षिप्त (प्रस्ताव)- संस्थानचे प्रसादालय विभागासाठी खादयतेल खरेदीकामी सदर फेर ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. यामध्ये मुदतीनंतर २ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर प्राप्त नमुनेधारकांचे २ तेलाचे नमुने राहुरी कृषी विदयापीठातील तज्ञांकडून तपासून घेण्यात आले होते. तथापि दोनच निविदा असल्यामुळे सदर निविदेस २ मुदतवाढी देण्यात आल्या होत्या. दुस-या मुदतवाढीनंतर याकामी ०३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. सदर निविदेचे तांत्रिक निविदेमध्ये ०३ ही निविदाधारक पात्र ठरले होते. तिस-या निविदाधारकाने दिलेले तेलाचे २ नमुने पॅकिंग राहुरी विदयापीठातील तज्ञांना व्हॉट्सअप वर पाठवून त्यांचेकडून तपासून घेण्यात आले आहेत.

सदर पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा खरेदी समितीचे दि.१९.११.२०२० चे सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०, जानेवारी ते मार्च २०२१, एप्रिल ते जून २०२१ व जुलै ते सप्टेंबर २०२१ या ४ ही क्वार्टरमध्ये मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई यांचे दर वरील अ.नं. १२ रकान्यात गडद व अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आलेले आहेत.

तरी खादयतेलासाठी न्युनतम निविदाधारकाशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेत सविनय सादर.

निर्णय क्र.४७७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संबधीत विभागाचे प्र.अधिक्षक यांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने प्रसादालय विभागासाठी सन २०२०-२१ या वर्षासाठी खाद्यतेल खरेदीकामी वार्षिक फेर ई-निविदा प्राप्त न्यूनतम दरधारक यांचेशी दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन संबधीतांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. व त्याबाबत अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- खरेदी विभाग)

विषय नं.२५ **वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता,जि.अहमदनगर टप्पा क्र.१ कार्याकरीता मुदतवाढ मिळणेसाठी ठेकेदार यांनी केलेल्या मागणीबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीपुढे विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.

तसेच अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

मा. शासन निर्णय:-

१. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७/का.१६, दि.०१ सप्टेंबर, २०१७ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ आणि रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास अटी-शर्तीचे अधीन राहून सदर योजनेची अंमलबजावणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करुन त्यांना मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी देणेस मान्यता देणेत आली.

२. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मुख्य अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.२५/०१/२०१८ रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) योजनेस श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे) – अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C. charge यांची गणना करुन अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असून या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

३. मा.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/का.१६, दि.२१ डिसेंबर, २०१८ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे पात्र निविदाधारक ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि.पुणे यांना रु.२३,८१,००,०००/- (रु.तेवीस कोटी एक्याऐंशी लाख फक्त) इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देण्यास व त्यावर अधिक ५% Contg व २% W.C. सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय:-

१. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, निळवंडे धरण उद्भव घेवून, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने पुर्ण करुन घ्यावीत व सदर संपूर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात यावी. याकामी तज्ञप्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येऊन, त्यांना शासकिय दराने सल्लागार फी देण्यात यावी. तसेच याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करणेत यावा."

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.२८२ खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरासाठी आणणेसंदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/०४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील नमुद केलेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच याचवेळी मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत तथा व्यवस्थापन समिती सदस्या यांनी शिर्डीसाठीही या पाईपलाईनमधून पिण्याचे पाणी मिळावे, असे लेखी पत्र संस्थानला दिले.

यावर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून संस्थानसाठी येणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनमधून कोपरगाव व शिर्डी शहरासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकामी, कोपरगाव व शिर्डी नगरपंचायतींना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक बाबींची पुर्तता करुन सविस्तर आराखडा संस्थानकडे सादर करणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले."

३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७३९ अन्वये खाली नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली.

१) शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे.

२) टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे.

३) सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन संपुर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात येवून याकामी तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करुन त्यांना मागणी केलेप्रमाणे या कामासाठी मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी देणे.

४. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.१००८ खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"..श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे धरण उद्भव घेऊन पाणी पुरवठा योजनेसाठी यापुर्वी रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (निळवंडे धरण हिस्यासाठी होणारी रक्कम वगळून) इ.किमतीच्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधिन राहून, सदर योजनेची अंमलबजावणी करणेस शासनाने मान्यता दिलेली होती. परंतु त्यानंतर कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे रु.२७८.९० कोटी किमतीचे अंदाजपत्रके व आराखडे महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून प्राप्त झाल्याचे तसेच अंदाजपत्रक व प्रशासकीय मान्यता एकत्रित असल्यास टप्पा-०१ व टप्पा-०२ याप्रमाणे स्वतंत्र निविदा काढता येणार नाही. संपुर्ण कामाची एकच निविदा काढावी लागेल, ही बाब मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन खुप जुनी झालेली असल्यामुळे ती बऱ्याचवेळा फुटते/लिकेज होते व पाणी पुरवठा करणेस अडचण निर्माण होते. याकरीता कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टप्पा-०१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) टप्पा-०२ (निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंतची पाईपलाईन टाकणे) असे वर्गीकरण करणेत येऊन, त्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करावा तसेच सदरहू प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा व त्याप्रमाणे टप्पा-०१ व टप्पा-०२ अशी स्वतंत्रपणे मान्यता देण्यासाठी शासनास विनंती करावी."

५. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२३९ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेच्या निविदेचे मुद्दयांचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मंजुरी देण्यात आली व तात्काळ निविदा प्रसिध्द करणेत यावी. तसेच या प्रस्तावित पाईपलाईन योजनेत शिर्डी परिसरातील दुष्काळग्रस्त सात गावांचा समावेश केल्यास या योजनेस सुधारित प्रशासकिय मान्यता घ्यावी लागेल व त्यास बराचसा कालावधी लागेल, याकरीता दुष्काळग्रस्त सात गावांचा या योजनेत समावेश करणेचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.

मात्र राहाता नगरपरिषदेचा समावेश करावयाचा झाल्यास संपूर्ण योजनेचा आराखडा व alignment बदलावी लागेल. त्यामुळे सदर प्रस्ताव अमान्य करणेत आला.

६. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्रं.२८७ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२३९ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, व त्यास मान्यता देण्यात आली.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेच्या निविदेचे मुद्दयांचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मंजुरी देण्यात आली व तात्काळ निविदा प्रसिध्द करणेत यावी. टप्पा १ चा निविदा कालावधी २५ दिवस ठेवण्यात यावा. व टप्पा २ चा निविदा कालावधी ७५ कार्यरत दिवस (Working day) ऐवजी ९० दिवस (सर्व दिवस धरुन) करण्यात यावा. कारण शासनाचे महाटेंडर या website वर जास्तीत जास्त ९० दिवस इतका कालावधी घेतला जातो. तसेच या संयुक्तीक पाणी पुरवठा योजनेत शिर्डी परिसरातील दुष्काळग्रस्त खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, नादुर्खी खु., नांदुर्खी बु. या सात गावांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. तथापि याबाबतचा सविस्तर प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन तयार करुन या सात गावाच्या योजनेसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.

मात्र राहाता नगरपरिषदेचा समावेश करावयाचा झाल्यास संपूर्ण योजनेचा आराखडा व alignment बदलावी लागेल. त्यामुळे सदर प्रस्ताव अमान्य करणेत आला.

७. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५६३ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) (टप्पा-१) प्रकल्पासाठी ई-निविदा वाणिज्यिक देकार उघडणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि.०६/०९/२०१८ रोजी मान्यता दिली त्यानुसार वाणिज्यिक देकार उघडण्यात आले. त्यामध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

अ.नं.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त दर	शेरा
०१	LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD. Kolhapur	२५,६७,१९,८२०.०९	L3
०२	R.A.GHULE, Palghar.	२३,९१,०७,०३९.९०	L2
०३	THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE.	२३,८७,१४,५५५.१०	**L1- निम्नतम**

यामध्ये THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे निम्नतम दर रुपये २३,८७,१४,५५५.१० इतके असुन अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ३१.३४ % अधिक आहे. अंदाजपत्रकीय रक्कम २०१६-१७ चे DSR प्रमाणे आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक कडून २०१८-१९ चे DSR प्रमाणे अंदाजपत्रक मागवून घ्यावेत. तसेच प्रस्तुत प्रकरणी टप्पा क्रं.-१ स्तर शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणेकरीता शासनाची प्रशासकिय मान्यता रुपये २७,१३,०३,९८०/- मात्र इतकी आहे.

मा.प्रधान सचिव, विधीव न्याय शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७ (भाग-१)/का.१६, दि. ०७ फेब्रुवारी, २०१८ यांचे पत्रान्वये, योजनेसाठी आवश्यक उद्भव प्रमाणपत्र, पाणी आरक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी अहवाल, उपांगासाठी लागणा-या जमिनीची संमतीपत्रके व अनुषंगिक परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नयेत, असे निर्देश आहेत. तथापी वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना ता.राहाता जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव धरुन) या योजनेचा टप्पा क्रं.-१ व टप्पा क्रं.-२ दोन स्वतंत्र टप्प्यात राबविणेस मान्यता दिलेली आहे. तसेच टप्पा क्रं.-१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) इ. कामे अंतर्गत पाणी पुरवठा वितरनासाठी असून आज रोजी याकामी दारणा धरणावरुन आरक्षण मंजूर आहे. त्यामुळे शासन निर्णयातील अट शिथील करुन टप्पा क्रं.-१ साठी कार्यारंभ आदेश देणेकामी शासनाची मान्यता घ्यावी यासाठी शासनाला त्वरीत प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.

तसेच THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे प्राप्त झालेले निम्नतम दर रुपये २३,८७,१४,५५५.१० असून त्यांनी वाटाघाटी अंती लेखी स्वरुपात रु.२३,८१,००,०००/- इतक्या रकमेस सदरचे काम करणेस सहमती दर्शविली आहे. अंदाजपत्रकिय रक्कम ही सन २०१६-१७ चे DSR दराप्रमाणे असल्याने THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे निम्नतम दर स्विकारण्यात यावे असे ठरले. तथापि

टप्पा क्रं.-१ साठी शासनाने Work Order देण्यासाठी अटी शिथील करुन मान्यता दिल्यानंतर THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांना कार्यारंभ आदेश दयावा, असे ठरले."

प्रकल्पाची माहिती:- टप्पा क्रं .-१ चे कामात खालीलप्रमाणे कामाचा अंतर्भाव आहे.

Estimated Cost- २७.१३ कोटी.

१. १७ द.ल.लिटर क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे.

२. ५०० mm व्यास शुध्द पाणी उर्ध्वनलिका डी आय के-९, लांबी- १०० मिटर.

३. आर.सी.सी. मुख्य संतुलीत जलकुंभ, क्षमता- १४,२५,००० लिटर, उंची- २५ मिटर.

४. आर.सी.सी. उंच जलकुंभ- **अ)** क्षमता- ६,६०,००० लिटर, उंची- १५ मिटर. **ब)** क्षमता- ७,६५,००० लिटर, उंची- १५ मिटर. **क)** क्षमता- ३,४०,००० लिटर, उंची- १५ मिटर. **ड)** आर.सी.सी. सम्प, क्षमता-२८०००लिटर-०२ नग.

५. ८०० mm ते १५० mm व्यास शुध्द पाणी गुरुत्ववाहिनी विविध भागासाठी डी आय के-७, एकुण लांबी- ९१८० मिटर.

६. अस्तित्वातील उंच संतुलित जलकुंभ, क्षमता- १०,००,००० लिटर दुरुस्ती कामे.

७. वितरण व्यवस्था- अ) ३५० mm ते १०० mm व्यास पाईप- डीआय के-७, लांबी-५६१९ मिटर.
ब) ३५० mm ते ९० mm व्यास पाईप शुध्द पाणी सम्प पर्यंत वितरण व्यवस्थासाठी, लांबी-७२८२ मिटर.

८. ६ महिनेकरीता O & M व चाचणीकरीता कालावधी इत्यादी.

निविदा प्रक्रिया:- दि.०७/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयास अनुसरुन सदरहू योजनेची निकड विचारात घेता ही योजना तातडीने कार्यान्वित होणेसाठी निविदा तयार करणेसाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी/ वशी/पाणी पुरवठा/६०१७/२०१८, दि.०८/०२/२०१८ अन्वये पत्र देण्यात आले. त्यास अनुसरुन मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून दि.२०/०३/२०१८ रोजीचे पत्रानुसार निविदा मसुदा तयार करुन सदरहू निविदेचे मसुदयाची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झाली.

सदरहू संयुक्त पाणी पुरवठा योजनेविषयी मा.अध्यक्ष महोदय यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अभियंता व प्रतिनिधी यांचे समवेत निविदे संदर्भात दि.२६/०३/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. त्यानंतर वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेचे टप्पा क्रं.०१ करीता दि.०४/०४/२०१८ रोजी निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत आलेली आहे. या कामासाठी B-2 पध्दतीने (ॲटम रेट) निविदा मागविण्यात आल्या.

टप्पा क्रं.०१ करीता दि.०२/०७/२०१८ अखेर ०५ ई-निविदा प्राप्त झाल्या. दि.०९/०७/२०१८ रोजीचे मा.खरेदी समिती सभेत प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडणेत येवून सदर तांत्रिक ई-निविदांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर यांचेकडुन तांत्रिक छाननी करण्यात आली. या प्रकल्पाचे सल्लागार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी खालील ०३ ठेकेदार पात्र होत असल्याचा अहवाल दिला.

१. LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD. Kolhapur.

२. R.A.GHULE, Palghar.

३. THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE.

याकामी वरील पात्र ०३ ठेकेदार यांचे वाणिज्यिक देकार (Price Bids) उघडणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५६३ नुसार वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) इ. कामे करणेकरीता शासन निर्णयातील अट शिथील करुन टप्पा क्रं.-१ साठी कार्यारंभ आदेश देणेकामी शासनाची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना जा.नं.एसएसएसटीवशी / पाणी पुरवठा/४४१४/२०१८, दि.०५/१२/२०१८ अन्वये टप्पा क्रं.-१ साठी THE INDIAN HUME PIPE

CO.LTD. यांचे प्राप्त झालेले निम्नतम दर रु.२३,८१,००,०००/- इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देणेस व +५% Contg+२% WC सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला.

मा.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७/का.१६, दि.२१ डिसेंबर, २०१८ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे पात्र निविदाधारक THE INDIAN HUME PIPE CO.LTD यांना रु.२३,८१,००,०००/- (रु.तेवीस कोटी एक्याऐंशी लाख फक्त) इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देण्यास व त्यावर अधिक ५% Contg व २% W.C. सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावना:- वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे कामासाठी ठेकेदार THE INDIAN HUME PIPE CO.LTD., यांना जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/४६६५/२०१८, दि.२२/१२/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

सदरहु कामाचा ठळक तपशिल व कामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव:-	वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर (टप्पा क्रं.-१)
प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार:-	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग.
ठेकेदार:-	द इंडियन हयुम पाईप कंपनी लि. पुणे.
कार्यादेश:-	जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/४६६५/२०१८, दि.२२/१२/२०१८
मंजूर निविदा रक्कम:-	रु.२३.८१ कोटी.
द इंडियन हयुम पाईप कंपनी लि. यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक :-	दि.२९/०६/२०१९.
कामाचा कालावधी:-	१८ (१२ + ०६) महिने.
कामाची सद्यस्थिती:-	ठेकेदार यांचेकडुन या योजनेसाठी आवश्यक पाईप व इतर मटेरियलचा पुरवठा करणेत आलेला असून ८०० mm डी आय के-७ व्यासाची ६७७ मीटर पाईपलाईन टाकणेचे करणेत आलेले आहे. परंतू खालील नमुद परवानगी अभावी त्यापुढील पाईपलाईन अंथरणे व बांधकाम करणेचे काम सुरु करता आलेले नाही. १. कॅनॉल क्रॉसिंग करीता व त्यालगत पाईपलाईन अंथरणेकरीता जलसंपदा विभागाची परवानगी. २. शेती महामंडळाचे जागेमधून पाईपलाईन अंथरणेबाबत शेतीमहामंडळाचा परवानगी . ३. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील खाजगी जागा मालकांची परवानगी. ४. शिर्डी न.प. हद्दीतील पाईपलाईन करीता शिर्डी नगरपंचायतचा ना हरकत दाखला. ५. नगर-मनमाड हायवे पाईपलाईन क्रॉसिंग करणेबाबत रस्ते बांधकाम विभागाकडुन परवानगी. ६. नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी.

ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि.पुणे यांचेकडुन टप्पा क्रं.१ चे कामात टाकावयाच्या पाईपलाईनचा सर्व्हे करणेत येवून या अंतर्गत येणारे WTP, MBR, ESR, GSR उभारणेचे ठिकाणे व पाईपलाईन ज्या गट नं./सर्व्हे नं. मधुन जात आहेत यासाठी उपविभागीय अधिकारी शिर्डी, तहसिलदार, राहाता, नगरपंचायत शिर्डी , ग्रामपंचायत निमगांव-को-हाळे, ग्रामपंचायत निघोज, शिर्डी पोलीस स्टेशन, बी.एस.एन.एल, महावितरण कंपनी शिर्डी, महामार्ग प्राधिकरण, इरिगेशन विभाग, शेती महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, जागतिक बँक प्रकल्प, (सा.बा.) विभाग अहमदनगर यांचे कार्यालय, अहमदनगर यांची परवानगी घेणे आवश्यक होते.

टप्पा क्रं१ चे ठेकेदार यांचेकडुन डी आय के-७, ८०० mm व्यासाची ६७७ मीटर पाईपलाईन टाकणेचे काम करणेत आलेले आहे. परंतू खालील नमुद परवानगी अभावी त्यापुढील पाईपलाईन अंथरणे व बांधकाम करणेचे काम सुरु करता आलेले नाही.

१) चारी क्रॉसिंग व त्या लगत पाईपलाईन अंथरणेकरीता जलसंपदा विभागाची परवानगी.

परवानगी मिळणेकरीता कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक दि.१७/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

सदरहू योजनेत टाकावयाच्या पाईपलाईनमधून सार्वजनिक पाणी पुरवठा करण्यात येणार असलेने पाटबंधारे विभागाकडुन पाईपलाईन संदर्भात कोणताही आकार न घेता, पाटबंधारे विभागाचे मालकीचे जमीनीखालून १

मीटर खोलीवर पाईपलाईन टाकणेकामी ना हरकत प्रमाणपत्र देणेत यावे यासाठी दि.२७/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. यावर जलसंपदा विभागाकडून परवानगी देणेची कार्यवाही सुरु आहे.

२) शेती महामंडळाचे जागेमधून पाईपलाईन अंथरणेबाबत शेतीमहामंडळाचा परवानगी

सदरहू काम करणेसाठी परवानगी मिळणेकरीता इस्टेट मॅनेजर, शेती महामंडळ, लक्ष्मीवाडी मळा यांचेकडे दि.१७/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

याविषयी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, लक्ष्मीवाडी मळा यांचे दि.११/१२/२०१९ रोजीचे पत्रात नमूद केल्यानुसार व तहसिलदार, राहाता यांनी दि.१९/१२/२०१९ चे पत्रानुसार कळविलेप्रमाणे श्रीसाईबाबा संस्थानचे संयुक्त पाणी पुरवठा योजनेची पाईपलाईनकरिता खोदाई फी रु.१७,१००/- वार्षिक परवाना फी रु.१७,१००/- व अनामत रक्कम रु.८५,५००/- अशी एकूण रक्कम रु.१,१९,७००/-(अक्षरी रक्कम रुपये एक लाख एकोणावीस हजार सातशे मात्र) दि.०९/०१/२०२० रोजी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या, लक्ष्मीवाडी यांचेकडे जमा करणेत आलेले आहेत.

शेती महामंडळाचे जागेतून पाईपलाईन अंथरणेसाठी शेतीमहामंडळाची परवानगी घेणेबाबत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. लक्ष्मीवाडी यांचेशी करावयाचा करारनामा दि.१८/०७/२०२० रोजी करणेत आलेला आहे.

३) नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी.

टप्पा क्रं.१ चे कामात मौजे निमगांव-को-हाळे गट नं.२२१ मध्ये वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट (WTP) व ओव्हर हेड टाकी (MBR), गट नं.८०/८५ मध्ये टाकी (ESR) व हौद (GSR), गट नं.१८६ मध्ये हौद (GSR) इ. कामे करणेसाठी सुचविण्यात आलेल्या ठिकाणी बांधकामाचे प्रयोजन योग्य आहे किंवा (अनुज्ञेय) कसे याबाबत नगर रचना विभागाचे अभिप्राय घेणेसाठी उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणीपुरवठा/२५६४/२०१९, दि.३०/०९/२०१९ रोजी आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करणेत आला.

यावर मा.सहायक संचालक नगर रचना, शाखा-अहमदनगर यांचेकडुन उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांना अग्रेषित जा.क्र.मौ.निमगांव को-हाळे, ता.राहाता/ग.नं.२२१,८०/८५,१८६/ससं अ/६१, दि.०२/०१/२०२० रोजीचे पत्रानुसार अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, शिर्डी यांचेकडून दि.१४/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेप्रमाणे पुढील परवानगी मिळणेकरिता प्रस्तावित बांधकामच्या एकुण मुल्यांकणानुसार १% उपकराची रक्कम रु.८,४६,२८५/- मात्र महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना जमा करणेत आलेली आहे.

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, शिर्डी यांचेकडून क्र.कार्या.-३/बां.प/एसआर/२२/२०२०, दि.२०/०५/२०२० रोजीचा आदेश संस्थान कार्यालयास दि.०८/०६/२०२० रोजी प्राप्त झाला आहे. सदरहू आदेशान्वये टप्पा क्रं.१ चे कामात गट नं.२२१ मध्ये वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट (WTP) व ओव्हर हेड टाकी (MBR), गट नं.८०/८५ मध्ये टाकी (ESR) व हौद (GSR), गट नं.१८६ मध्ये हौद (GSR) इ. कामे करणेस परवानगी देणेत आलेली आहे.

४) शिर्डी न.प. हद्दीतील पाईपलाईन व मौजे शिर्डी गट नं.१२४ मधील ओव्हर हेड टाकी व हौद इ.चे बांधकामास परवानगी मिळणेकरीता शिर्डी नगरपंचायतचा ना हरकत दाखला.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पाईपलाईन व मौजे शिर्डी गट नं.१२४ मधील ओव्हर हेड टाकी व हौद इ. चे बांधकामास परवानगी मिळणेसाठी दि.३०/०९/२०१९ अन्वये मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला.

यावर मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.१३/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार याकरीता मा.सहसंचालक, नगररचना विभाग नाशिक यांचेकडून मंजूरी घेणे आवश्यक आहे. याकरीता मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे मागणीप्रमाणे कागदपत्र स्वाक्षांकित करुन सादर करणेस मान्यता मिळणेसाठी दि.२६/०२/२०२० रोजीचे टिपणीन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

५) नगर-मनमाड हायवे पाईपलाईन क्रॉसिंग करणेबाबत रस्ते बांधकाम विभागाकडुन परवानगी.

याबाबत परवानगी मिळणेसाठी दि.३०/०९/२०१९ रोजीचे पत्रान्वये कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

६) दि.२२/०३/२०२० पासून कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात आल्याने काम करता आले नाही. मा.जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांचे दि.२१/०४/२०२० व दि.२७/०४/२०२० रोजीचे आदेशान्वये प्रकल्पाचे कामे सुरु करणेस परवानगी देणेत आली.

याबाबत कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी दि.०३/०५/२०२० रोजी पारित केलेल्या आदेशान्वये अटींवर काम सुरु करणेसाठी ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि. यांना जा.नं.एसएसएसटी/पाणी पुरवठा/२४९/२०२०, दि.२२/०५/२०२० व जा.नं.एसएसएसटी/पाणी पुरवठा/३५६/२०२०, दि.०९/०६/२०२० रोजी पत्र देणेत आले. परंतू ठेकेदार यांचेकडुन काम सुरु करणेत आले नाही.

ठेकेदार यांनी दि.०८/०६/२०२० रोजी ई-मेल व्दारे पत्र पाठवुन कामाची मुदत संपलेली असुन याविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे पदाधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करावी अशी विनंती केली. तसेच या कामासाठी विविध परवानग्या घेणे बाकी असलेने प्रकल्पाचे कामास दरवाढीसह कामास मुदतवाढ (time limit extension with escalation) दयावी अशी मागणी केली.

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपरिषद व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.१ कामाचे ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि.पुणे यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार काम पुर्ण करण्याचा कालावधी दि.०६/०१/२०२० अखेर पर्यंत आहे व कार्यान्वित करणे या कामी दि.०६/०७/२०२० अखेरपर्यंत होती. साईटवरील अडचणी व कोव्हीड-१९ मुळे काम पूर्ण करता आले नाही. त्यामुळे कामास मुदतवाढ व भाववाढ मिळावी अशी विनंती द इंडियन ह्युम पाईप कंपनी लि., पुणे यांनी केली. त्यास अनुसरुन टप्पा क्रं.-१ चे कामाचा आढावा घेणेसाठी दि.०९/०७/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे पदाधिकारी यांचेसमवेत बैठक घेण्यात आली.

सदरहू बैठकित भाववाढ बाबतचा Clause निविदेमध्ये नाही, त्यामुळे देय होत नाही, असे उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांनी सांगितले आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी साईटवरील अडचणी व कोव्हीड-१९ याबाबत विचार करुन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे मुदतवाढ प्रस्ताव सादर करणेत येईल. ठेकेदार यांनी दरम्यान काम सुरु करावे, असे सांगितले. त्यानुसार ठेकेदार द इंडियन ह्युम पाईप कं.लि यांनी दि.०१ ऑगस्ट, २०२० पासुन काम सुरु करणार असल्याचे सांगितले आहे. सदरहु बैठकित ठेकेदार यांना काम पुर्ण करणेसाठी (stipulated period for completion) ०६ महिने व योजना कार्यान्वित करणेकरीता (Period for Trial run Post commissioning) ०६ महिने अशी १२ महिने मुदतवाढ देता येईल अशी प्राथमिक चर्चा झाली.

यापुर्वी ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि.पुणे यांचेकडून IHP/SHIRD/WSS Phase-१/०११, दि.०९/०९/२०१९,PNA/AGM/Shirdi WSS- Phase-१/३९९, दि.१८/१०/२०१९ व PNA/AGM/ Shirdi WSS- Phase-१/५७५, दि.२९/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर कामाकरीता वाढीव मुदतवाढ व कामासाठी जागा उपलब्ध न केलेने भाववाढ व आयडल चार्जेस मिळणेबाबत मागणी करणेत आलेली आहे.

याबाबत उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग कोपरगांव यांनी जा.क्र/तांशा/शिर्डी संस्थान पापुयो/४४६/२०१९, दि.१८/१०/२०१९ रोजीचे पत्रान्वये संस्थानकडुन आपले स्तरावरुन ठेकेदारास स्पष्टपणे कळविणेत यावे की, निविदा अटी-शर्ती नुसार (Prebid चे मुद्दयांचे पुर्ततेनुसार) भाववाढ कलम लागु नसुन ते कुठल्याही परिस्थितीत बदलणे शक्य नाही. मात्र निविदा काम पुर्ण करणेसाठी/ कामाच्या पुर्ततेसाठी वाढीव मुदतवाढ देणे शक्य आहे. त्यानुसार आपले स्तरावरुन ठेकेदारास अवगत करणेत यावे असे कळविलेले आहे.

प्रस्ताव:- टप्पा क्र.१ कामाचे ठेकेदार यांनी IHP/SHIRD/WSS Phase-1/019, दि.१४/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये दि.२२/१२/२०१८ रोजीचे कार्यादेशा नुसार काम पुर्ण करण्याचा कालावधी (stipulated period for completion) १२ महिने व योजना कार्यान्वित करणेकरीता (Period for Trial run Post commissioning) ०६ महिने असा १८ महिने नमुद आहे. परंतू साईटवरील अडचणी व विविध परवानगी अभावी पाईपलाईन अंथरणे व बांधकाम करणेचे काम विहीत मुदतीत पुर्ण करता आले नाही. तसेच कोव्हीड-१९ मुळे कामास अडचणी येत आहेत. याकरीता प्रत्यक्ष काम सुरु झालेपासून कामास १८ महिने मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे कामासाठी ठेकेदार द इंडियन हयुम पाईप

कंपनी लि.पुणे यांना काम पुर्ण करणेसाठी (stipulated period for completion) ०६ महिने व योजना कार्यान्वित करणेकरीता (Period for Trial run Post commissioning) ०६ महिने असे १२ महिने मुदतवाढ प्रत्यक्ष काम सुरु झालेपासून देता येईल. असे मत आहे.

तरी सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.४७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना निळवंडे धरण उद्धव धरुन) ता.राहाता,जि.अहमदनगर टप्पा क्र.१ कामाचे ठेकेदार यांनी आतापर्यंत केलेले काम, झालेल्या कामाचे costing, संबधीत ठेकेदाराला आतापर्यंत अदा केलेली रक्कम इत्यादी बाबींसह सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

विषय नं.२६ **सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घटतुटीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)**- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१)घ नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रस्तावना– लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागांतर्गत श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे गर्दीनुसार दररोज सरासरी अंदाजे ४०,००० ते ५०,००० मोफत बुंदी प्रसाद पाकीटे व सरासरी २५,००० ते ३०,००० मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटांची निर्मिती करुन विक्री केली जाते.

श्रींचे उत्सवामध्ये सदरची पाकटांची संख्या वाढुन अंदाजे ६५,००० ते ७०,००० मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप केले जाते व अंदाजे ४०,००० ते ५०,००० लाडु प्रसाद पाकीटांची विक्री केली जाते. सदरचा प्रसाद तयार करणेसाठी लागणारे कडधान्य (हरभरा दाळ) लाडु विभागाकडील मशिनव्दारे व मनुष्यबळाव्दारे दाळीमध्ये निघणा-या काडया, खडे काढुन स्वच्छ करण्यात येते व त्यानंतर पीठ गिरणीवर सदरची हरभरा दाळ दळुन घ्यावी लागते, दाळ दळल्यानंतर तिच्या वजनामध्ये घट-तुट येते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०७.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) अन्वये, सन २००७-०८ या आर्थिक वर्षात आलेली प्रत्यक्ष घट/तुट खर्ची टाकण्यात आली होती. मात्र सदरील घट-तुटीस मान्यता देतांना अंतर्गत लेखापरीक्षक - मा.श्री ए.जी.लोंगाणी व मुख्यलेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती त्यास मा.व्यवस्थापन समितीने दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) नुसार मान्यता मिळालेली आहे.

१. सन २००७-०८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट, इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असुन, इतरांचे तुलनेने कमी असल्याने प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट जमा - नांवे टाकणेत यावी.

२. दर ६ महिन्यांनी प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची पडताळणी करावी.

३. दर ६ महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर अवलोकनार्थ सादर करावा, मात्र प्रस्तावित सरासरीपेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे नियमावलीनुसार दरवर्षी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट-तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेत आलेली आहे.

सन २०१९-२०२० मध्ये कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल
(कालावधी दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०३/२०२०)

दिनांक	तपशिल	आवक किराणा माल	खर्च झालेला किराणा माल	प्रत्यक्ष आलेली घट-तुट	घट-तुटीचे प्रमाण (प्रती क्विंटल)	मान्य घट-तुटीचे प्रमाण
		कि. ग्रॅ.	कि. ग्रॅ.	कि.ग्रॅ.	कि.ग्रॅ.	कि.ग्रॅ.
दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२०	हरभरा दाळ	६७२५३६ कि.ग्रॅ.	६६१०७७ कि.ग्रॅ.	६२६८ कि.ग्रॅ.	०.००९३ ग्रॅम	०२ .०० कि.ग्रॅ.
दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२०	हिरवी विलायची	१९४६.६५० कि.ग्रॅ.	१९५७.६५० कि.ग्रॅ.	४५ कि.ग्रॅ.	००.२३० ग्रॅम	०१.०० कि.ग्रॅ.

मागणी- सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती.

उपरोक्त तक्त्यातील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.तदर्थ (Adhoc) समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय व मत–लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीत कडधान्य व किराणा मालात झालेल्या घट-तुट ही मा.मुख्यलेखाधिकारी तसेच अंतर्गत लेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या सुचनास (नियमावली अधीन राहुन) आहे, तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार मान्य घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आहे. तरी सदरच्या अहवालाची मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Adhoc) समितीचे सभेपुढे सादर सादर.

निर्णय क्र.४७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घटतुटीचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.२७ **सन २०२०-२०२१ करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेमधील न्युनतम दरधारकासोबत चर्चा वाटाघाटी करुन, कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)-** सन २००४ चा महाराष्ट अधिनियम क्रमांक १४ (भाग-०४) मध्ये महाराष्ट विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावीत केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नुसार साईभक्तांना जेवन पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्तावना- मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता सन २०२०-२०२१ करीता ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.१४/०८/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. पासुन Downloading करणेकरीता Upload करणेत आली होती व निविदा भरण्याची अंतिम मुदत दि.२९/०८/२०२० अशी ठेवणेत आली होती. सदरचे कालावधीत केवळ ०१ निविदा प्राप्त झाली.

त्यामुळे खरेदी नियमावलीतील नियम व व अट क्र. ४.४.२.१ मध्ये - निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी ०३ निविदाकार असणे आवश्यक आहे. तीनपेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास संबंधित खरेदी अधिका-यांने प्रथम किमान ०१ आठवडयाची मुदतवाढ द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीनपेक्षा कमी निविदाकांरानी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा ०१ आठवडयाची मुदतवाढ द्यावी. त्यांनतर कोंणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये असे नमुद आहे.

त्यानुसार सदर प्रक्रीयेस दि.३१/०८/२०२० रोजीपासुन दि.०७/०९/२०२० पर्यंत एकुण ०७ दिवसांची प्रथम मुदतवाढ देणेत आली होती. त्यानंतर दि.०७/०९/२०२० रोजी साय.०५ वा. ऑनलाईन बीड तपासले असता, एकच निविदा प्राप्त झाल्याचे निदर्शनात आल्याने व निविदा स्पर्धात्मक होणेसाठी आवश्यक असणा-या निविदा संख्येपेक्षा कमी म्हणजे एकच निविदा प्राप्त झाल्याने सदर ई-निविदा प्रक्रीयेस दि.०८/०९/२०२० ते

दि.१५/०९/२०२० अखेर दुस-यांदा मुदतवाढ देणेत आली होती. तरीदेखील एकच निविदा प्राप्त झाल्याचे दिसुन आले.

त्यामुळे खरेदी नियमावलीतील नियम व अट क्र.४.४.३.१ मध्ये "कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ०३ निविदांपेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरीही त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी किंमतीच्या वजवीपणाची खात्री करणेसाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल" असे नमुद केलेले आहे.

सदर खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार आहे त्याच प्राप्त झालेल्या एका निविदेचे तांत्रीक बीड दि.१५/१०/२०२० रोजी मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडुन कागदपत्रांची तपासणी केली असता, दि यशोधरा महिला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक यांची ई-निविदा तांत्रीकदृष्टया पात्र ठरली आहे.

तसेच खरेदी नियमावलीतील प्रकरण ४.४.३.१ (ब) मध्ये - "दोन निविदा तांत्रीकदृष्टया पात्र इरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व आगोदर ठरलेली अंदाजीत किंमत यामध्ये (-) २० टक्के ते (+) १० टक्के तफावत असल्यास ती मान्य करणेस खरेदीदार विभागास मुभा राहील, या किंमत श्रेणीमध्ये (Price Brand) किंमती न आल्यास फेर निविदा काढावी" असे नमुद आहे.

त्यानुसार दि.२१/१०/२०२० रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे सदर तांत्रीकदृष्टया पात्र झालेली एक निविदेचे वाणिज्यीक बीड समक्ष उघडयात आले असुन, सध्याचे दर, चालु वर्षाकरीता अंदाजत्रकीय दर व निविदेलील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.नं	**तपशील**	**सध्याचे दर**	**पुढील वर्षाकरीता अंदाजकीय तरतुद सध्याचे दरात २०% वाढ गृहीत धरून**	**दि यशोधरा महीला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक, यांचे प्राप्त दर**	**अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाढीव /कमी दर %**
(१)	*(२)*	*(३)*	*(४)*	*(५)*	*(६)*
१	गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचा एक लाडू) **हाताने पॅकिंग करणे.**	२६६/-	३१९/-	**२७१/-**	**-१५.०४ %**
२	गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचा एक लाडू) **मशिनने पॅकिंग करणे**	२१९/-	२६३/-	**२७१/-**	**+ ३ %**
३	गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ.चा दर प्रती १००० नग पाकिटास (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) **हाताने पॅकिंग करणे.**	२८४/-	३४१/-	**२८५/-**	**-१६.४२ %**
४	गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ.चा दर प्रती १००० नग पाकिटास (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) **मशिनने पॅकिंग करणे**	२१९/-	२६३/-	**२८०/-**	**+६.४६%**
५	वनस्पती तुपातील रवा, खोबरा बर्फी तयार करणे **(०१ क्विंटल साखरेचे)**	१५६/-	१८७/-	**२१०/-**	**+१२.२९ %**

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याची खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार [(-)२०% ते (+) १०%] दरांची तपासणी केली असता,

अ.नं.०१ ते ०४ चे दर स्तंभ क्र.०५ मध्ये दर्शविलेप्रमाणे असुन, सदरचे दर खरेदी नियमावलीतील प्रकरण ४.४.३.१ (ब) मध्ये नमुद केलेप्रमाणे वाजवी स्वरुपाचे आहेत.

अ.नं. ०५ चे दर स्तंभ क्र.०५ मध्ये दर्शविलेप्रमाणे असुन, सदरचे दर खरेदी नियमावलीतील प्रकरण ४.४.३.१ (ब) मध्ये नमुद केलेप्रमाणे वाढीव स्वरुपाचे आहेत.

सदरचे दराबाबत संबंधीत निविदाधारक यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चा वाटा-घाटीसाठी बोलवुन पुढील निर्णय घेणे योग्य राहील. (मागील वर्षी श्री साई प्रसादालय विभागाचे मागणीनुसार माहे ऑगस्ट २०१९ पासुन ते मार्च २०२० अखेर केवळ २२८ क्विंटल मालाची बर्फी तयार करणेत आलेली असुन, त्यासाठी दर रक्कम रु.१५६/- प्रती क्विंटल इतका होता. त्यानुसार सदर कामाकरीता ठेकेदार यांना उक्त्या कामाची मजुरी म्हणुन (२२८ क्विंटल X प्रती क्विंटल रु.१५६/- X जीएसटी १८%) रुपये ४१,९७०/- इतकी मजुरीची रक्कम आदा करणेत आलेली आहे.)

मागणी - सध्या कोव्हीड-१९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाचे दि.१७/०३/२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजेपासुन श्रींचे मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद करण्यात आले होते. आता शासन निर्णयानुसार श्रींचे मंदिर दि.१६/११/२०२० रोजीपासुन दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे. तथापि, सध्या लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती व वितरण व्यवस्था बंद आहे. भविष्यात लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद वितरण सुरु झाल्यास साईभक्तांना सेवा पुरवितांना लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद वाटपाबाबत अडचणी निर्माण होऊ नये, याकरीता लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता नविन ठेकेदाराची नियुक्ती होणे गरजेचे आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय – श्री साईभक्तांना देण्यात येणारा प्रसाद तयार करण्यास अडचणीचे होऊ नये याकरीता, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता सन २०२०-२०२१ करीता मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेली एक निविदा खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार दि.२१/१०/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आली असुन, सदर ई-निविदेतील अ.नं.०१ ते ०४ चे दर खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार [(-) २०% ते (+) १०%] वाजवी आहेत. तसेच तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.०५ चे दर वाजवीपेक्षा १२.२९ % म्हणजेच खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार [(-)२०% ते (+) १०%] वाढीव आहेत.

तरी उपरोक्त प्राप्त निविदेतील अ.नं.०१ ते ०५ दरांबाबत संबंधितांशी चर्चा-वाटाघाटी करुन, दि यशोधरा महीला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक यांनी दिलेले दर मागील वर्षाचे तुलनेत खरेदी नियमावलीनुसार वाजवी स्वरुपाचे आल्यास, त्यांना कार्यादेश देता येईल असे नम्र मत आहे. तथापि, सदरचा प्रस्ताव धोरणात्मक असल्याने, मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८० यावर सविस्तर चर्चा होऊन, यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संबधीत विभागाचे प्र.अधिक्षक यांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने सन २०२०-२०२१ करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेमधील न्युनतम दरधारकासोबत दराबाबत चर्चा/वाटाघाटी करुन संबधीतांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. व त्याबाबत अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.२८ श्रींचे समाधी मंदिरातील तळघरात भिंतीचे खालील भागातुन झिरपणारे पाणी बंद करणेसाठी करण्यात आलेल्या उपयायोजनांबाबतचा अहवाल.

प्रस्ताव- सध्या पावसाळा सुरु असून शिर्डी परिसरात झालेल्या मोठया प्रमाणातील पावसामुळे श्री समाधी मंदिर, व्दारकामाई व चावडी या वास्तुंमध्ये काही ठिकाणी लिकेज झाल्याचे आढळून आले. त्यानुसार व्दारकामाई येथिल लिकेज बंद करण्याचे काम त्वरीत करण्यात आले. त्यानंतर समाधी मंदिरावरील टेरेसवरुन एका ठिकाणी होणारे लिकेज बंद करणेत आले. तसेच चावडी येथे पाठिमागील उदी रुममध्ये होत असलेले पावसाचे पाण्याचे किरकोळ स्वरुपातील लिकेज बंद करणेसाठी चावडीचे टेरेसवर सिमेंट व वॉटरप्रुफींग कंपाऊंडचे मिश्रण (स्लरी) लावून तात्पुरती दुरुस्ती केली आहे. विशेषतः दि.२३/०७/२०२० व दि.२४/०७/२०२० रोजी शिर्डी येथे मोठया

प्रमाणात पाऊस झाला. त्यानंतर दि.२५/०७/२०२० रोजी समाधी मंदिर तळघराचे दगडी जिन्याचे तळाला पाण्याचे लिकेज होत असल्याचे दिसून आले.

समाधी मंदिर इमारतीलगत दक्षिण बाजूस शिर्डी गावठाण परिसर आहे. सदर परिसराची पातळी ही मंदिराचे उत्त्रेकडील भागाचे पातळीपेक्षा चार ते पाच फूट उंच आहे. यंदा जून व जुलै या दोन महिन्यांत शिर्डीमध्ये मोठया प्रमाणात पाऊस झालेला आहे. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे भूगर्भातील पाण्याच्या दाबाने लिकेज उदभवले असण्याची शक्यता आहे. शिर्डी गावठाणात मोठया प्रमाणात बोअरवेल्स आहेत. सध्या श्री साईबाबा मंदिर दर्शनासाठी बंद असल्याने शिर्डीतील सर्व लॉजिंग व हॉटेल्स बंद असल्याने बोअर वेल्सचा उपसा होत नाही. तसेच समाधी मंदिरात समाधीचे पाठीमागील ओपन चौकात पुर्वी लहान विहीर होती. ती सन २००० पुर्वी बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे मंदिर परिसराचे आजुबाजूचे भूगर्भातील पाणी पातळीत वाढ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

समाधी मंदिरातील तळघरात पाणी झिरपत असलेल्या ठिकाणी मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्र. कार्यकारी अभियंता, उप अभियंता व मंदिर विभाग प्रमुख यांचे समवेत दि.२५/०७/२०२० रोजी समक्ष पाहणी केली. सदर ठिकाणी येत असलेले पाणी साचून राहणार नाही यासाठी छोटा विद्यूत पंप बसवून त्याव्दारे पाण्याचा उपसा करण्याची व्यवस्था करणेत आली. त्यानंतर दि.२७/०७/२०२० पर्यंत झिरपत असलेले पाणी बंद न झाल्याने पाणी येत असलेल्या ठिकाणी सिमेंट व वॉटर प्रुफ केमिकलने ग्राऊट करणेबाबत चर्चा झाली. यासाठी वॉटर प्रुफींग केमिकल व सिमेंटचे मिश्रण (स्लरी) भिंतीत ग्राऊट करणे आवश्यक असल्याने याकामी संस्थानचे शैक्षणिक संकुलाचे काम करीत असलेले ठेकेदार न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्स्लटंट प्रा. लि. पुणे यांचेकडे वॉटर प्रुफींग कामाचा अनुभव असलेले व सध्या काम करीत असलेल्या एजन्सीकडे आवश्यक मशिनरी व केमिकल्स उपलब्ध होते. याबाबत त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी आवश्यक मशिनरी, केमिकल व मनुष्यबळ विनामुल्य उपलब्ध करुन देणेस तयारी दर्शविली. त्यानुसार विभागामार्फत त्यांचेकडून काम करुन घेणेस इकडील विभागाचे दि.२७/०७/२०२० रोजीचे कार्यालयीन टिपणीवर मान्यता घेणेत आली.

तसेच याबाबत संस्थान शैक्षणिक संकूल प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री.आर.आर.कुलकर्णी व दर्शन रांग प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.उदय काप्रे, नवी दिल्ली यांचेशी दूरध्वनीवर चर्चा करुन याबाबत त्यांचे मार्गदर्शन घेणेत आले. त्यानुसार न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कन्सल्टंटस, प्रा.लि.पुणे यांचेकडील वॉटरप्रुफींग काम करणा-या स्पेशलाईज्ड एजन्सीचे प्रतिनिधींमार्फत दि.२७/०७/२०२० ते दि.०३/०८/२०२० या कालावधीत मंदिराचे तळघरात व तळघरातील स्ट्रॉगरुमचे आतिल भागात लिकेज होत असलेल्या ठिकाणी ड्रील मशिनव्दारे ०८ ते २० एम.एमचे होल घेऊन नोझल पाईप बसविणेत आले व त्यामध्ये सिमेंट व वॉटर प्रुफिंग पावडर / लिक्वीड यांचे मिश्रण ग्राऊंटींग करणेत आले आहे. दि.०१/०८/२०२० रोजी सदर ठिकाणी होत असलेले लिकेज अंदाजे ६०% कमी झाल्याचे आढळून आले. त्यानंतर दि.०३/०८/२०२० रोजी सदर लिकेज अंदाजे ७५% ने कमी झाले. त्यामुळे नव्याने सिमेंट ग्राऊट केले नाही. दि.०३/०८/२० ते दि.०४/०८/२० रोजी सायंकाळपर्यंत साधारणतः तितकेच पाणी झिरपत होते.

याकरीता वर नमूद उपरोक्त आर्किटेक्ट व स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांचेशी संपर्क साधला असता सिमेंट ग्राऊट ऐवजी पॉलीयुरीथेन ग्राऊट प्रेशर पंपने करावे असे मत त्यांनी नमूद केले आहे. याकामी आवश्यक असलेले साहित्य व मनुष्यबळ ठेकेदार न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्स्लटंट प्रा. लि. पुणे यांचेकडे उपलब्ध होते, व सदर काम विनामुल्य करण्याची त्यांची तयारी होती. त्यामुळे याबाबत मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी समक्ष चर्चा करुन त्यांचे परवानगीने दि.०५/०८/२०२० रोजी न्याती इंजिनिअर्स यांचे सबकॉन्ट्रक्टर मे. फ्रंटलाईन टेक्नॉलॉजीस, पुणे यांचेमार्फत मंदिर तळघरात एकूण १३ ठिकाणी होल घेऊन PU- Injction Grouting चे काम करुन घेणेत आले. त्यानंतर आता तळघरात झिरपत असलेल्या पाण्याचे प्रमाण सुमारे ९८ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे.

दरम्यान मा.अध्यक्ष महोदय यांचेशी झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद येथिल Heritage Conservation Consultant श्री पंकज प्रकाश कहाळेकर यांना सदरहू झिरपणारे पाणी बंद करणेबाबत मार्गदर्शन करणेसाठी पाचारण करणेत आले होते. त्यांनी दि.०६/०८/२०२० रोजी समाधी मंदिर तळघर आतील बाजू तसेच इमारतीची समक्ष पाहणी केली आहे. याबाबत सविस्तर अहवाल ते सादर करणार आहेत. माहितीस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.४८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत विषयाबरोबरच आजचे सभेतील विषय नं.३४ बाबतही या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचा सल्ला घेऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर सादर करण्यात यावा व तज्ञांनाही चर्चेसाठी समितीसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.२९ **शिर्डी सर्व्हे नं. १/१ मधील रुई रस्त्यालगत हॉटेल तुलसी समोर असलेल्या शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे मोकळया जागेतील दुरवस्था झालेली मुतारी पत्राशेड बांधकाम पाडलेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजाअर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १अन्वये (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावना- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या उपरोक्त संदर्भिय पत्रात, "शिर्डी नगरपंचायत मालकीचे मोफत सर्व्हे क्रं. १/१ रुई रोडलगत हॉटेल तुलसीचे समोर असलेल्या मोकळया जागेत श्री साईबाबा संस्थानव्दारे तात्पुरत्या स्वरुपात शौचालय बांधलेले आहे. सदर शौचालयाची अत्यंत दुर्दशा झालेली असून या ठिकाणी नेहमीच अस्वच्छता व दुर्गंधी पसरलेली असते. नगरपंचायत मालकीच्या या मोकळया जागेत भव्य वॉटर फाऊंटन, लॅण्डस्केपींग या पध्दतीने सुशोभिकरण केल्यास परिसराच्या सौंदर्यात भर पडू शकेल यास्तव सदर शौचालय पाडणेसाठी आपली ना- हरकत मिळणेबाबत विनंती," असे नमूद केले आहे.

संस्थानकडून साईभक्तांचे सोयीसाठी पिपंळवाडी रस्त्यालगत श्री साईनाथ मंगल कार्यालया शेजारी ०४ लेडीज व ०४ पुरुष अशा एकूण ०८ मुता-यांचे बांधकाम सुमारे १५ वर्षांपुर्वी करण्यात आले आहे. सदरहू मुता-यांसाठी ११x१३ या साईजमध्ये बांधकाम करणेत आलेले असून याकामी ०४ फुटापर्यंत वीट बांधकाम आतील व बाहेरील प्लास्टर व उर्वरीत भागात ०४ फुट ऊंचींचे बायसन पॅनल बसविलेले असून छताला सिमेंट पत्रे आहेत. सदर पत्राशेड बांधकामाचे मुल्य अंदाजे रु. ३५,०००/- मात्र इतके आहे. सदर मुता-यांचा वापर पुर्वी पिपंळवाडी रस्त्यावरील गर्दीचे काळात दर्शन लाईनमधील भक्तांकरीता होत असे. सध्या दर्शन लाईन मंदिर परीसर प्रवेशव्दार क्र.१चे बाजूस असलेल्या दर्शन रांग प्रवेशव्दारातून, म्हणजेच पिंपळवाडी रस्त्याचे पश्चिमेकडील भागातून सुरु आहे. त्यामुळे सदर मुता-यांचा वापर कमी झालेला असून मुता-यांचे बांधकाम खराब झालेले आहे.

तसेच सदर जागेबाबत श्री राहूल दिगंबर गोंदकर, शिर्डी यांनी जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील दि.३०/०५/२०१४ रोजीचे निकाल प्राप्त झाले असून सदर निकालात ही जागा शिर्डी शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार रस्त्यापैकीची जागा दिसून येते. सबब प्रस्तुत जागेत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम अनुज्ञेय होऊ शकत नाही. त्यामुळे नगरपंचायतीचा प्रस्ताव मान्य करता येत नाही. उलटपक्षी सदरची जागा वाहतुकीसाठी खुली ठेवणे आवश्यक आहे. असे नमूद केले आहे.

याबाबत संस्थानचे विधी विभागाने दि.१४/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये, *"संस्थानने १५ वर्षापुर्वी साईभक्तांचे सोयीसाठी स्वच्छतागृह उभारले आहे. सदरची जागा शिर्डी नगरपंचायतीची असल्याने त्याठिकाणी स्वच्छतागृहाची सोय असावी किंवा नसावी याबाबत शिर्डी नगरपंचायत निर्णय घेऊ शकते",* असे कळविलेले आहे.

सदर मोफत सर्व्हे नं.१/१ मधील पिंपळवाडी रस्त्यालगत हॉटेल तुलसी समोर असलेल्या जागेत शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत राजहंस पक्षी असलेल्या कारंजाचे बांधकाम सुरु करणेत आले आहे. सदरहू कारंजा सुमारे २५ वर्षांपुर्वी मंदिर परिसरात असलेल्या राजहंस पक्षी कारंजाचे थीमवर आधारीत आहे. त्यासाठी सदर ठिकाणी असलेल्या उक्त मुता-यांचे दुरवस्था झालेले बांधकाम काढून घेणे आवश्यक असलेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा झाली होती. त्यानुसार दि.१६/०७/२०२० रोजी शिर्डी नगरपंचायत यांनी सदरहू मुतारी पत्रा शेड बांधकाम काढून घेतले आहे.

प्रस्ताव- तरी संस्थानने पिपंळवाडी रस्त्यालगत साईनाथ मंगल कार्यालयाशेजारी सर्व्हे नं.१/१ मध्ये संस्थानव्दारे १५ वर्षापूर्वी बांधण्यात आलेले मुतारी पत्राशेड बांधकाम शिर्डी नंगरपचायत यांचेमार्फत दि.१६/०७/२०२० रोजी काढून घेणेत आलेची बाब अवलोकनार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.४८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

विषय नं.३० **मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लॉंट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामासाठी येणारे रु.१९,४५,०००/- मात्र इतक्या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

प्रस्तावनाः- संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. ८०,८५ मध्ये श्री साईप्रसादालय इमारतीचे बांधकाम दि.१५/०९/२००७ रोजी पूर्ण झाले असून इमारतीचे बांधकामाबरोबरच या परिसरातील अंतर्गत रस्ते तयार करणेत आलेले आहेत. श्री साईप्रसादालय इमारतीचे बांधकामाचा व परिसरातील रस्त्यांचा Defects Liability Period दि.१५/०९/२००८ रोजी संपुष्टात आलेला आहे. रस्त्याचा दोष दायित्व कालावधी संपुष्टात आलेनंतर सन २००९ ते आजतागायत सदर रस्त्यावर काही ठीकाणी खड्डा पडल्यास क्रॉक्रीटचा माल टाकून किरकोळ दुरुस्ती करणेत आली आहे. या व्यतिरिक्त इतर कोणतेही मोठया स्वरुपाचे दुरुस्तीचे काम करणेत आलेले नसल्याने त्यावर खर्च झालेला नाही. सदर डांबरीकरणास आता १० वर्षापेक्षाही जास्त कालावधी झालेला असल्याने प्रदीर्घ वापराने श्री साई प्रसादालयातील अंतर्गत रस्ते खराब झालेले आहेत. लाडू प्रसाद निर्मिती विभागाने दि.२८/०९/२०१९ रोजीच्या पत्राने सदरहू रस्त्यास बरेचसे खड्डे पडलेले असून सदरचा रस्ता दुरुस्त करणेबाबत कळविले आहे. तसेच मेकॅनिकल विभागाने दि.३१/१०/२०१९ रोजीच्या श्री साईप्रसादालयाचे उत्तरेस असलेल्या मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लान्टकडे जाणा-या रस्त्यावर खडीकरण व डांबरीकरण केलेले नसल्यामुळे गॅस प्लान्टकडे जाणारे १२ ते १७ टन वजनाचे गॅस वाहतुक टॅंकर नेण्यास अडचण येते. करीता सदरहू रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेस कळविले आहे.

त्यामुळे श्री साई प्रसादालयातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे तसेच मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लान्टकडे जाणा-या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेकामी महाराष्ट्र राज्य सन २०१९-२० चे दरसूची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले होते. त्यानुसार खालील तपशिलात नमूद केले प्रमाणे अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१४/०१/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

अ.नं.	कामाचा तपशिल	अंदाजीत खर्च (रू.)
०१	मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे. एकून लांबी -३६९.२० मी., सरासरी रुंदी – ७.३५ मी. गृहीत धरण्यात आलेल्या तरतूदी – Tack coat, 75mm thick Modified Penetration Macadam (MPM), 20mm thick Open Graded Premix Surfacing (OGPS) and Bituminus Type A liquid seal coat.	१३,४८,८७४/-
०२	मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. एकून लांबी -१५८.५० मी., रुंदी – ३.७५ मी. गृहीत धरण्यात आलेल्या तरतूदी – 150mm thick WBM Grade I, 75mm thick WBM Grade II, 75mm thick Modified Penetration Macadam (MPM), 20mm thick Open Graded Premix Surfacing (OGPS) and Bituminus Type A liquid seal coat.	९,५६,७१८/-
	एकूण -	२३,०५,५९२/-
	जीएसटी -१८% -	४,१५,००७/-
	कन्टीनजन्सी -०४ % -	९२,२२४/-
	एकूण -	२८,१२,८२३/-
	एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये -	**२८,१३,०००/-**

उक्त रू.२८,१३,०००/- मात्र अंदाजपत्रकीय खर्चाचे प्रस्तावावर मा. तदर्थ(Ad-hoc) समितीचे दि.१४/०१/२०२० रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.०३ संमत करणेत आलेला आहे.

"मौजे निमगांव को-हाळे येथिल संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे ऐवजी तात्पुरती डागडुजी करणे शक्य आहे काय? याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ(Ad-hoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले."

यापुर्वी सादर करणेत आलेल्या वर नमूद अंदाजपत्रकात श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीतील रस्त्यासाठी संपूर्ण पृष्ठभागावर ७५mm thk. Modified Penetration Macadam (MPM) या बाबीची तरतूद करणेत आली होती. आता मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यानुसार सदर लांबीतील फक्त खड्डे भरण्यासाठी Modified Penetration Macadam (MPM) या बाबीची तरतूद करणेत आलेली आहे. त्यावर संपुर्ण रस्त्याचे लांबीमध्ये 20mm thick Open Graded Premix Surfacing (OGPS) and Bituminus Type A liquid seal coat ही तरतूद आवश्यक असल्याने गृहीत धरण्यात आली आहे.

मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्यास यापुर्वी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार 150 mm thick WBM Grade I, 75 mm thick WBM Grade II, 75 mm thick Modified Penetration Macadam (MPM), 20 mm thick Open Graded Premix Surfacing (OGPS) and Bituminus Type A liquid seal coat करणे गृहीत धरण्यात आले होते. यापैकी प्रथम टप्प्यात सदर लांबीतील रस्त्यास सध्या फक्त 150mm thick GSB, 150mm thick WBM Grade I व 75mm thick WBm Grade II करता येईल व सदर रस्ता सेटल झाल्यावर त्यावर दुस-या टप्प्यात डांबरीकरण करता येईल. सदरहू तरतुदी प्रमाणे काम करणेसाठी सुधारीत अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च येईल.

Sr. No.	Item of Work	Qty.	Unit	Rate	Amount
A)	**Road from Prasadalaya Gate to Maintenance Block**				
1	Providing and applying tack coat on the prepared surface heating by fames in Boiler and spraying bitumen with sprayer on Dry / Hungry B.T. surface 3 kg/10 sqm. (VG-30 bulk bitumen rates are considered to arrive at rates) SSR Item No.3.31, Page No.31	3,276.68	Sq.M.	14.56	47,698.63
2	Providing and constructing 75 mm. thick Modified Penetration Macadam (MPM) road surface including all materials, preparing the existing road surface, spreading 40 mm. stone metal layers 30% crusher broken metal + 70% Hand broken (by breaking rubble obtained by blasting) heating and spraying the bitumen of specified grade @ 2 Kg/sqm, spreading 12 mm.size chips compacting with three wheel static roller having weight 8 to 10 MT. to achive the desired degree of compaction as per Technical Specification Clause 506 etc. complete. Including picking of existing WBM surface. (VG-30 bulk bitumen rates are considered to arrive at rates) SSR Item No.3.35a, Page NO.36	198.43	Sq.M.	226.10	44,864.84
3	Open Graded Premix Surfacing- Providing and Laying OGC 20 mm thickness composed of 13.2 mm to 5.6 mm aggregates premixed with bituminous binder transported to site with VTS , laid over a previously prepared surface, finished to the required grade, level, alignment, and rolling to achieve the desired compaction but excluding prime / tack and Seal coat. For Bitumen of specified grade--USING drum mix type hot mix plant with SCADA, Paver and Vibratory roller(over BT Surface) (VG-30 bulk bitumen rates are considered to arrive at rates. SSR Item No.4.11, Page No.43	3,276.68	Sq.M.	147.95	484,784.46

4	Providing bituminous Type A liquid seal coat on bituminous surface including supplying all materials and bitumen of specified grade preparing existing road surface, heating and applying bitumen @ 0.98 KgSqm. by mechanical means, spreading chips and rolling, by static roller having weight 8 to 10 MT. etc. complete. (VG-30 bulk bitumen rates are considered to arrive at rates) SSR Item No.4.01, Page No.42	3,078.25	Sq.M.	47.00	144,677.75
	Total (B) Rs.:				**722,026.00**
B)	**Road from Maintenance Block to LPG Plant**				
1	Excavation for road way in earth,soil of all sorts, sand, gravel or soft murum including dressing section to the required grade,camber and side slopes and conveying the excavated materials with all lifts upto a lead of 50metre. and spreading for embankment or stacking as directed. (Ref. No. MORTH 301)	39.39	Cu. M.	73.00	2875.47
2	Excavation for catch /side water gutter in all sorts of soils to the specified section including stacking the excavated stuff in a regular bund and disposing of unsuitable or excess stuff as directed all sorts of soils. SSR Item No.2.18, Page No.27	255.96	Cu. M.	73.00	18,685.08
3	Construction of granular sub-base by providing close graded Material, mixing in a mechanical mix plant at OMC, carriage of mixed Material to work site, spreading in uniform layers with motor grader/ Paver on prepared surface and compacting with vibratory roller to achieve the desired density, complete as per clause 401 -- Plant Mix Method and Grading - I Material, SSR Item No.3.01, Page No.31	163.34	Cu. M.	2,060.00	336,480.54
4	Providing, laying, spreading and compacting stone aggregates of specific sizes to water bound macadam specification including spreading in uniform thickness, hand packing to proper grade and camber, applying and brooming requisite type of screening/ binding Materials to fill up the interstices of coarse aggregate, watering and compacting with Vibratory roller. to the required density. By Mechanical Means - Grading I (Using Screening Type A (13.2) mm Aggregate) SSR item No.3.18, Page No.33	142.29	Cu. M.	2,113.15	300,679.89
5	Providing, laying, spreading and compacting stone aggregates of specific sizes to water bound macadam specification including spreading in uniform thickness, hand packing to proper grade and camber, applying and brooming requisite type of screening/ binding Materials to fill up the interstices of coarse aggregate, watering and compacting with vibratory roller to the required density. By Mechanical Means - Grading II (Using Screening Type B (11.2 mm) Aggregate)SSR item No.3.20, Page No.34	62.78	Cu. M.	2,263.15	142,080.46
6	Supplying hard murum /kankar at the road site, including conveying and stacking complete. SSR Item No.29a, Page No.29	22.73	Cu. M.	561.82	12,770.17
7	Spreading hard murum for side width etc. complete SSR Item No.30, Page No.29	22.73	Cu. M.	63.00	1,431.99
8	Compacting the hard murum side widths including laying in layers on each side with power roller including artificial watering etc. complete. SSR Item No.31, Page No.29	22.73	Sq.M.	16.00	363.68

9	Providing and laying cement concrete pipe of IS 458:2003 NP-2 class of 450mm diameter in proper line, level and slope including providing and fixing collars in cement mortar 1:2 and curing etc. complete. SSR item No.11.8, Page NO.103	20.00	R.M.	1,657.00	33,140.00
	Total (B) Rs. :				**848,507.00**
C)	**Royalty**				
1	Royalty Charges as per Revenue and Forest Department's notification dated 11/05/2015 as Maharashtra Minor Mineral Extraction Rules, 2015 and as per insruction in general notes on SSR 2017-18 vide Sr No 4.3 on Page 3 of P. W. Sanctioned schedule of rates for all District of Maharashtra State for the year 2017-18 for items of lime stone, lime shell, stones, rubble, shingles, gravel, murum, and ordinary clay, ordinary earth (to be used for embankment and filling), slate and shell etc. Spec. No. : As directed by Engineer-in- charge.	163.83	Cu. M.	141.34	23,155.73
	Total (C) Rs. :				**23,156.00**
	Total Amount (A+B+C) Rs.:				**1,593,689.00**
	Add 18% GST Rs.:				**2,86,864.00**
	Add 4% Contingencies Rs.:				**63,748.00**
	Total Amount Rs.:				**19,44,301.00**
	Total Estimated Cost of the work - Say R/o Rs.:				**19,45,000.00**

वर नमूद सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रु.१९,४५,०००/- ही यापूर्वी प्रस्तावित अंदाजपत्रकीय रककम रु.२८,१३,०००/- पेक्षा रु.८,६८,०००/- मात्र ने कमी आहे.

१) श्री साईप्रसादालय इमारतीचे बांधकाम दि.१५/०९/२००७ रोजी पूर्ण झाले आहे. इमारतीचे बांधकामाबरोबरच या परिसरातील अंतर्गत रस्ते तयार करणेत आलेले आहेत.

२) श्री साईप्रसादालय इमारतीचे बांधकामाचा व परिसरातील रस्त्यांचा Defects Liability Period दि.१५/०९/२००८ रोजी संपुष्टात आलेला आहे.

३) रस्त्याचा दोष दायित्व कालावधी संपुष्टात आलेनंतर सन २००९ ते आजतागायत सदर रस्त्यावर काही ठीकाणी खड्डा पडल्यास क्रॉक्रीटचा माल टाकून किरकोळ दुरुस्ती करणेत आली आहे. या व्यतिरिक्त इतर कोणतेही मोठया स्वरुपाचे दुरुस्तीचे काम करणेत आलेले नसल्याने त्यावर खर्च झालेला नाही.

श्री साईप्रसादालय इमारतीचे व परिसरातील रस्त्याचे काम सन २००७ मध्ये पूर्ण झालेनंतर सदर रस्त्यावर डांबरीकरण करणेत आलेले नाही. त्यामुळे आता सदर परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे गरजेचे आहे.

प्रस्तावः- तरी मौजे निमगांव को-हाळे येथिल संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे प्रस्तावित सुधारीत अंदाजपत्रकानुसार मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीतील खड्डे MPM ने भरणे व संपुर्ण रस्त्याचे डांबरीकरण करणे व मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामासाठी येणारे रु.१९,४५,०००/- मात्र इतक्या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामासाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लॉंट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.१९,४५,०००/- मात्र इतक्या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३१ मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मधील वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतिल व बाहेरील भागाचे रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकासमवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.

प्रस्ताव-

१)	कामाचे नाव	मौजे निमगांव - को-हाळे येथिल गट नं.१६९ मधील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतिल व बाहेरील भागाचे रंगकाम करणे
२)	प्रशासकिय मान्यता	मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१४/०१/२०२० रोजीचे सभेतील नि.क्र.०५
३)	अंदाजपत्रकीय रक्कम	

अ.नं.	तपशील	रक्कम
०१)	इमारतीचे आतील बाजूने जुना रंग घासुन, प्रायमर व पुट्टी सह भिंतीला व छताला ऑईल बाऊंड डिसटेंपर रंग देणे तसेच भिंतीला तिन फुट ऊंची पर्यंत ऑईल पेन्ट रंगकाम करणे.	रु.१७,१६,८६६/-
०२)	इमारतीचे बाहेरील बाजुने जुना रंग घासुन, प्रायमरसह दोन कोट एक्सटेरीअर ॲक्रेलीक इमल्शन पेन्टने रंगकाम करणे.	रु.२९,१९,७००/-
	एकूण :	रु.४६,३६,५६६/-
	जी.एस.टी १८% :	रु.८,३४,५८२/-
	कंटीनजंसी ४% :	रु.१,८५,४३६/-
	एकूण :	रु.५६,५६,६११/-
	एकूण अंदाजपत्रकीय रक्कम :-	**रु.५६,५७,०००/-**

४)	प्रस्तावित कामाबाबत माहिती	१) इमारतीचे आतील बाजूने जुना रंग घासुन, प्रायमर व पुट्टी सह भिंतीला व छताला ऑईल बाऊंड डिसटेंपर रंग देणे तसेच भिंतीला तिन फुट ऊंची पर्यंत ऑईल पेन्ट रंगकाम करणे. २) इमारतीचे बाहेरील बाजुने जुना रंग घासुन, प्रायमरसह दोन कोट एक्सटेरीअर ॲक्रेलीक इमल्शन पेन्टने रंगकाम करणे.
५)	निवीदा तपशील	दि.३०/०३/२०२० रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. सदरहू कामासाठी दि.१३/०४/२०२० पर्यंत निवीदा जमा करणेस अंतिम मुदत देणेत आली होती. परंतू कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोकण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून महाराष्ट्रासह संपुर्ण देशात लॉकडाऊन लागू असल्याने ई-निवीदा जमा करणेस दि.१६/०६/२०२० पर्यंत मुदत देणेत आली. सदरचे अंतिम मुदतीत ०८ निवीदाधारकांनी ई-निवीदा जमा केल्या होत्या. दि.१५/०७/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत तांत्रिक निवीदा उघडणेत आल्या असून ०८ निविदाधारकांपैकी ०५ निविदाधारक हे पात्र झाले आहेत. पात्र निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.०७/०९/२०२० रोजीच्या मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडणेत आला आहे.
अ)	निविदा कालावधी	दि.३०/०३/२०२० ते दि.१३/०४/२०२० निवीदा अपलोड करणेस प्रथम मुदतवाढ दि.०६/०५/२०२० अखेर निवीदा अपलोड करणेस व्दितीय मुदतवाढ दि.१६/०५/२०२० अखेर निवीदा अपलोड करणेस तृतीय मुदतवाढ दि.१६/०६/२०२० अखेर
ब)	तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ	दि.१५/०७/२०२० सकाळी ११.०० वाजता.
क)	निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या	०८ (आठ), त्यापैकी पात्र निवीदाधारक ०५
ड)	सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय?	होय, जमा केले आहेत.
इ)	सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय?	होय. रु.५७,०००/- मात्र
ई)	निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम	रु.५६,५७,०००/-
	तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिलः	

अ.नं.	ठेकेदारचे नांव	निविदा रक्कम	शेरा

	१.	मे. एस. व्ही. चंदन, मुंबई	**रु. ३२,९०,१०३.४४**	**निम्नतम**
	२.	डिसेंट डेकोरंटर्स, पुणे	रु. ४३,८१,५६८.६३	
	३.	शिंदे स्वप्निल भाऊसाहेब, नाशिक	रु. ५०,१९,१२१.६०	
	४.	श्रीम भानू कन्सट्रक्शन प्रा. ली. मुंबई	रु. ४७,०५,२६९.२८	
	५.	यु. सी.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. मुंबई	रु. ५४,२०,३४७.४५	

७)	निम्नतम निविदा धारकाचा तपशिल -	
अ)	ठेकेदाराचे नांव	**मे. एस. व्ही. चंदन, मुंबई**
ब)	निविदा रक्कम	**रु. ३२,९०,१०३/-**
क)	निविदा टक्केवारी कमी / अधिक	४१.८३६ % कमी
८)	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार	मा. तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, निर्णय क्र.सीएटी २०१७/प्रक्र८/इमा-२ दि.१२/०४/२०१७ मधील शर्त क्र ४.६.२ नुसार १० टक्क्यांपेक्षा कमी दराच्या निविदेला निविदाधीन रक्कमेच्या १% एवढया किंमतीची बँकेची प्रतीपुर्ती हमी परफॉर्मन्स सिक्युरिटी हमी म्हणून जमा करणे तसेच शर्त क्र.४.६.३ नूसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १० टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने आहे तेवढया रक्कमेचा बँकेची प्रतिपुर्ती हमी घेणेबाबत तरतूद नमूद आहे.

त्यानूसार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा निविदाधीन रक्कम ४१.८३६% कमी असल्याने १०% पर्यंत १% अधिक १०% पेक्षा जास्तची ३१.८३६% मिळून एकूण ३२.८३६% नुसार होणारी रक्कम रु.१०,८०,३३८/- मात्र या रक्कमेपोटी बँकेची प्रतिपुर्ती हमी जमा करून घेता येईल.

तरी वर नमूद तपशिलानूसार मौजे निमगांव - को-हाळे येथिल गट नं.१६९ मधील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतिल व बाहेरील भागाचे रंगकाम करणे कामाकरीता पात्र निविंदापैकी निम्नतम दराचे ठेकेदार **मे. एस. व्ही. चंदन, मुंबई** यांचे दर **रू.३२,९०,१०३/-**मात्रची निम्नतम निविदा स्विकारणेकामी त्यांचेशी मा.तदर्थ समितीचे सभेमध्ये चर्चा-वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मधील वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतिल व बाहेरील भागाचे रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकासमवेत चर्चा वाटाघाटी करुन सबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३२ **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम२००४मधील तरतुद**:- अधिनियम कलम २१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"...पोटकलम (१)आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."

मा. व्यवस्थापन समिती निर्णय :

१. निर्णय क्रमांक ९५१ दिनांक १४/११/२०१७ - "..आजचे सभेत उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते, त्यांनी सभेसमोर शिर्डी शहरातील २७ रस्ते करावयाचे आहेत, अशी माहिती सभेसमोर दिली. यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील २७ रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी मात्र आर्थिक अनुदान शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी छाननी समितीच्या पुर्वपरवानगीने महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

२. निर्णय क्रमांक ७७ (ब)(७) दिनांक ०२/०२/२०१८ अन्वये सभेमध्ये झालेली चर्चा - ".. समक्ष रस्त्यांची स्थळ पहाणी करणे हे छाननी समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये येत नाही, ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली. याची नोंद घेण्यात आली."

३. निर्णय क्रमांक ९५१ दिनांक ३०/०१/२०१- "..सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला."

४. मा.तदर्थ समिती निर्णय क्रमांक ३६८ दिनांक १३/०७/२०२० -"..यावर सविस्तर चर्चा होवून संस्थान निधीतून शिर्डी नगरपचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेसाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे संबंधीतांनी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर justification द्यावे, असे ठरले."

मा. छाननी समितीचे सभेतील निर्णय :

१) निर्णय क्र.२६ दि.१९/०१/२०१८-"..यावर सविस्तरचर्चाहोऊन,खालीलप्रमाणे निर्णय घेतला. प्रस्तावीत रस्त्यांच्या विकसनासाठी व त्याची आवश्यकता व उपयुक्ततेबाबत श्री.आर.एस.घुले, कार्यकारी अभियंता, श्री. आर.बी. आहेर, उप कार्यकारी अभियंता, श्री.डी.एम.देसाई, उप अभियंता, श्री. आर.डब्ल्यु.भामरे,उप अभियंता, श्री.जी.एस.जाधव,कनिष्ठ अभियंता या बांधकाम विभागाच्या अभियंत्यानी प्रत्यक्ष पहाणी करून तसा अहवाल छाननी समितीसमोर ठेवावा. तसेच शताब्दी वर्षानिमित्ताने भक्तांची गर्दी लक्षात घेवून, रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी मात्र खर्च करण्यास छाननी समिती एकमताने मंजूरी देत आहे. तत्पुर्वी संस्थानमार्फत सर्व निविदा प्रक्रिया करण्यात यावी व कामाचे वाटप, ठेकेदाराला कामाच्याप्रगतीनुसार रकमेचे प्रदान करण्यात यावे. सदरहु काम व्यवस्थित झाले किंवा नाही व सर्व सहयोग/निगराणी नगरपंचायत करेल."

२) निर्णय क्र.३० दिनांक ०९/०४/२०१८ - "..उपरोक्त प्रस्ताव चर्चेअंती मंजूर करण्यात आला. याअगोदर शिर्डी नगरपंचायतीने दि.१५.०१.२०१८ रोजी केलेल्या खुलाशाप्रमाणे श्री साईबाबा संस्थानद्वारे नमूद केलेली कामे करणेसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेस व संस्थाननेच सर्व कामे करणेस शिर्डी नगरपंचायतीची हरकत नाही असे कळविण्यात आले आहे. परंतु संस्थानचे अधिका-यांकडून असे दाखविण्यात आले की, सध्या शताब्दी वर्षामुळे माठया प्रमाणावर संस्थानच्या विविध इमारतींची दुरूस्ती-देखभालीची कामे सुरु आहे व उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ अपुरे आहे. त्यामुळे २४ रस्ते विकसनाची कामे शिर्डी नगरपंचायतीतर्फे करण्यात यावीत.जी कारणे संस्थानतर्फे दर्शविण्यात आलेली आहेत, ती छाननी समितीला संयुक्तिक वाटत नाहीत. जी २५ कामे चालू असल्याबद्दल लिहीले आहे, त्यापैकी बहुतांश कामे हि निविदा काढून अथवा कंत्राटी पद्धतीने दिलेली आहे. डांबरीकरणाचे काम, रंगकाम हे बहुतांशी होत आलेले आहे. त्यामुळे संस्थानचे अधिकारी २४ रस्त्यांचे विकसनाचे कार्यास उपलब्ध राहू शकत नाहीत, हे म्हणणे अयोग्य आहे. सर्व कार्यात पारदर्शकता राहावी व संस्थानला देणगीतून मिळालेला पैसा योग्य मार्गाने खर्च व्हावा म्हणून २४ रस्तेविकसनाचे कार्य अथवा भविष्यात जे ३ रस्ते विकसीत करावयाचे आहे, त्यांचेही कार्य संस्थानचे अधिपत्याखाली/ निगरानीखाली निविदा प्रक्रिया राबवून व्हावे, असे छाननी समितीला वाटते, याबाबत शासनमान्यता घ्यावी असे ठरले."

शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता :- शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८१४/ प्र.क्र. ७१/का.१६ दि.१०/०१/२०१९ -"..शिर्डी शहरातील २४ रस्त्यांच्या विकसनासाठी रु.८.९८ कोटी इतके अनुदान शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देण्यास तसेच कामे निविदा प्रकीयेसह शिर्डी नगरपंचायतीमार्फत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासनमान्यता देण्यात येत आहे.

अट – सदर शिर्डी शहरातील २४ रस्त्यांची गुणवत्ता राखली जाईल, यांसाठी "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत नियुक्त करण्यात यावी...."

मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ आदेश :- पी.आय.एल.नं.८६/२०१८- मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेशात खालीलप्रमाणे नमूद आहे.

१. दि.३०/०१/२०१९ - *"..Shri Saibaba Sansthan Trust Shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense, till the next date."*

२. सिव्हील ॲप्लीकेशन नं.१७९१/२०२० बाबत दि.१३/०२/२०२० - *"Respondent No.3 - Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi is directed to release the funds allocated for the 25 roads under an approved amount of 8.98 Crores as per annexure 'R1' to the report of two members committee appointed by this Court."*

प्रस्तावना:- शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसनासाठी रक्कम रु.८.९८ कोटी अनुदानस्वरूपात शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देणेस महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाचे वर नमूद शासन निर्णय क्र. सासंवि-१०१८/८१४/प्र.क्र.७१/का-१६ दि.१० जानेवारी २०१९ अन्वये मान्यता देण्यात आली. मात्र मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे जनहित याचिका क्र.८६/२०१८ मधील दि.३०/०१/२०१९ रोजीचे आदेशात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा निधीतून इतरत्र अनुदान देणेस मनाई करणेत आली. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत सदर विषय स्थगित ठेवण्यात आला असल्याने सदर निधी वितरीत करणेत आलेला नव्हता. शिर्डी नगरपंचायतद्वारे सदर जनहित याचिकेमध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्र. 2427 of 2019 दाखल करण्यात आले होते. त्यावर दि.१३ फेब्रुवारी २०२० रोजी मे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये शिर्डी शहरातील २५ रस्ते विकसनासाठी रक्कम रु.८.९८ कोटी अनुदानस्वरूपात शिर्डी नगरपंचायतीस वितरीत करणेबाबत निर्देश दिले. त्यामुळे संस्थान निधीतून शिर्डी नगरपचायतीस रु.८.९८ कोटी निधी वितरीत करणेत आला.

त्यानंतर नगरपंचायतीने दि.०३/०६/२०२० रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

" ...श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस मंजूर केलेल्या रु.८.९८ कोटी अनुदानामधून खालील कामांची निविदा प्रक्रीया पूर्ण करून मंजूर निविदाधारक मे. डायमंड कन्स्ट्रक्शन कं. लोणी यांना खालील कामांचे कार्यारंभ आदेश आदेश दिले असून आजरोजी कामे प्रगतीत आहेत. यास्तव संदर्भ क्र.२ (शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८१४/प्र.क्र.७१/का.१६ दि.१०/०१/२०१९) मधील नमूद अटीनुसार सदर योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या रस्त्यांची गुणवत्ता राखली जाईल यासाठी तांत्रिक तपासणी करणेसाठी त्रयस्थ संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत नियुक्त करण्यात यावी असे नमूद आहे. तरी सध्या पावसाळा सुरू होत असल्याने कामे जलद पूर्ण करावी लागणार आहे. यास्तव कामाचे प्रगतीनुसार या कामांचे तांत्रिक लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे. तरी खालील कामांचे तांत्रिक लेखापरीक्षण करणेकरीता त्रयस्थ संस्था नियुक्त करून कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक आहे.

०१. **कामाचे नाव -** शिर्डी नगरपंचायत हद्दीत विविध प्रभागातील रस्ते विकास कामे करणे.

०२. **कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.** ८,९७,८२,३००/-

०३. **कामाचा आदेश** - शिर्डी नगरपंचायत जा. क्र. नप/टे-०८/ ५७६/२०१९ दि.०२/०३/२०१९

अ.नं.	रस्त्याचे नाव
१.	ओमसाईनगर मुख्य रस्ता (कोळेकर गल्ली चौक ते निमगाव- निघोज शिव रस्ता) –डांबरीकरण व कॉक्रीटीकरण करणे.
२.	स. नं. १११मधील गायकवाड वस्ती (बन रस्ता पुर्व व पश्चिम बाजु रस्ता) डांबरीकरण करणे.
३.	स. नं. १११मधील पावलस गायकवाड वस्ती रस्ता (बन रस्ता पुर्व बाजु रस्ता) कॉक्रीटीकरण करणे.
४.	पटेल कॉलनी रस्ता (१५ मी.डीपी रस्ता ते नगर मनमाड रस्ता) डांबरीकरण करणे.
५.	स.नं.१२३ मधील संदिप पारख लेआऊटमधील रस्ता(न.म. रस्ता ते१२चारी रस्ता)डांबरीकरण करणे.
६.	स.नं.१४६मधील लेआऊट मधील रस्ता(नांदूर्खीरस्ता ते कॉलनी) डांबरीकरण करणे.
७.	झुलेलाल मंदीर लगत रस्ता (नाला रस्ता ते रमेश गोंदकर) कॉक्रीटीकरण करणे.
८	माऊली नगर तुषार गोंदकर लगत रस्ता(इनामवाडी ते तुषार गोंदकर वस्ती) डांबरीकरण करणे.
९.	शिंदे वस्ती लगत रस्ता(चारी रस्ते रुई शीव रस्ता) डांबरीकरण करणे.
१०.	साई पंढरीनगर रस्ता(स.नं. २७) अंतर्गत पुर्व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे.
११.	पिंपळवाडी रस्ता ते एस.टी.पी .प्रकल्प रस्ता डांबरीकरण करणे.
१२.	नवनाथ शेळके वस्तीलगत रस्ता (बिरेगावरस्ता ते वसाहत) डांबरीकरण करणे.
१३.	भाऊसाहेब गायके वस्तीलगत रस्ता(पिंपळवाडी रस्ता ते भाऊसाहेब गायके वस्ती)डांबरीकरण करणे.
१४.	सम्राटनगर रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते सम्राटनगर) डांबरीकरण करणे.
१५.	स.नं.४२ मधील रस्ता (बिरेगाव रस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे.
१६.	साईप्रयागा सिटी स.नं.६५(नालारस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे.

१७.	स.नं.६६कॉलनी रस्ते (नालारस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे.
१८.	स. नं. ९० मधील मधुकर कोते लगत रस्ते (नाला रस्ते कोते वस्ती दोन रस्ते) डांबरीकरण करणे.
१९.	स.नं.७२ बर्डे वस्ती रस्ता (बिरोबा मदिर चौफुली ते बर्डे वस्ती) डांबरीकरण करणे. भाग -१
	स.नं.७२ बर्डे वस्ती रस्ता (साईट नं.५३ ते बर्डे वस्ती)डांबरीकरण करणे.भाग-२
२०.	शरदबाबा आश्रम रस्ता(नविन पिंपळवाडी रस्ता ते साईपदम आश्रम) डांबरीकरण करणे.
२१.	विजय शेळके वस्ती (संभाजीनगर समोर) रस्ता (बन रस्ता ते शेळके वस्ती) डांबरीकरण करणे.
२२.	स.नं.९७ विरभद्रनगर रस्ते (बन रस्ता ते विरभद्र कॉलनी-२ रस्ते)डांबरीकरण करणे.
२३.	स.नं.१२२मधील जेजूरकर वस्ती रस्ता(स्वामी रिसोर्टलगत रस्ता ते जेजूरकर वस्ती डांबरीकरण करणे.
२४.	स.नं.१३४ मधील विजयनगर रस्ता (नांदूर्खी रस्ता ते कॉलनी) डांबरीकरण करणे.

...तरी उपरोक्त कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण साठी त्रयस्थ संस्थेची नेमणूक तातडीने करावी ही विनंती."

सदर कामास प्राप्त शासनमान्यतेनुसार रस्त्यांची गुणवत्ता राखली जाईल यासाठी तांत्रिक तपासणी करणेसाठी त्रयस्थ संस्था संस्थानमार्फत नियुक्त करणे आवश्यक असल्याने नगरविकास विभागाचे दि. २८/०३/२०१८ चे शासन निर्णयात नमूद संस्थापैकी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (COEP), पुणे यांना दि.०२/०७/२०२० अन्वये कार्यादेश देणेत आला आहे.

याबाबत सादर प्रस्तावावर मा. तदर्थ समितीचे दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेतील नि.क्र.३६८ मध्ये संस्थान निधीतून शिर्डी नगरपचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेसाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे संबंधीतांनी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर justification द्यावे, असे नमूद असल्याने इकडील दि.११/०८/२०२० चे पत्रान्वये नगरपंचायतीमार्फतचे कार्यवाहीची माहिती, Justification तथा कामाचा प्रगती अहवाल मागविणेत आला. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी दि.२१/०९/२०२० रोजीचे पत्राने प्रकल्पाची माहिती, Justification तथा कामाचे प्रगतीबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

"...शिर्डी नगरपंचायतद्वारे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने शिर्डी नगरपंचायतीस मंजूर केलेल्या रु. ८.९८ कोटी अनुदानातून विकसित करावयाच्या २४ कामांसाठी सादर प्रस्तावास महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८१४/प्र.क्र.७१/का-१६ दि.१० जानेवारी २०१९ अन्वये शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसनासाठी रक्कम रु.८.९८ कोटी अनुदानस्वरूपात शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देणेबाबत आदेश पारीत झाला. मात्र दरम्यानचे कालावधीत निळवंडे धरणाचे अनुषंगिक कामे व इतर ठिकाणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा निधी देण्यास मनाई करणेसाठी मे. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.८६/२०१८,१५२/२०१८ चे अनुषंगाने सदर निधी वितरीत करणेत आलेला नव्हता. मात्र संदर्भिय जनहित याचिका शिर्डी नगरपंचायतद्वारे दाखल सिव्हील ॲप्लीकेशन मध्ये दि. १३ फेब्रुवारी २०२० रोजी मे. उच्च न्यायालयाने आपले आदेशामध्ये शिर्डी शहरातील २५ रस्ते विकसनासाठी रक्कम रु.८.९८ कोटी अनुदानस्वरूपात शिर्डी नगरपंचायतीस वितरीत करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार उपरोक्त निधी शिर्डी नगरपंचायतीस प्राप्त झाला. ..."

प्रस्ताव- उपरोक्त बाबी विचारात घेता, संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेसाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे Justification खालीलप्रमाणे आहे -

१. मा. व्यवस्थापन समितीने नि.क्र.९५१ दि.१४/११/२०१७ अन्वये शिर्डी शहरातील सदर रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी अनुदान शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिली आहे.

२. मा. छाननी समितीने नि.क्र.२६ दि.१९/०१/२०१८ अन्वये सदरचे प्रस्तावास व खर्चास मान्यता दिली आहे.

३. विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८१४/प्र.क्र.७१/का.१६ दि.१०/०१/२०१९ अन्वये २४ रस्ते विकसनासाठी शिर्डी नगरपंचायतीस रु.८.९८ कोटी अनुदान उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

४. मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.८६/२०१८,१५२/२०१८मध्ये शिर्डी नगरपंचायतद्वारे दाखल सिव्हील ॲप्लीकेशनवरील दि.१३/०२/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयाचे आदेशामध्ये "Respondent No.3 - Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi is directed to release the funds allocated for

the 25 roads under an approved amount of 8.98 Crores as per annexure 'R1' to the report of two members committee appointed by this Court." असे निर्देश दिले आहेत.

५. उपरोक्त मान्यतेनुसार तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था नेमणेसाठी आवश्यक फी रु.८,०८,२००/- राखून ठेवून नगरपंचायतीस उर्वरीत रक्कम रु. ८,८९,९१,८००/- अनुदान उपलब्ध करून देणेत आले आहे.

६. शिर्डी नगरपंचायतीने दि.०३/०६/२०२० रोजीचे पत्रान्वये रु.८.९८ कोटी अनुदानामधून २४ रस्ते विकसनकामांची निविदा प्रक्रीया पूर्ण करून मंजूर निविदाधारक मे. डायमंड कन्स्ट्रक्शन कं. लोणी यांना कामांचे कार्यारंभ आदेश आदेश दिले असून आजरोजी कामे प्रगतीत असल्याने शासन निर्णय क्र. सासंवि-१०१८/८१४/प्र.क्र.७१/ का.१६ दि.१०/०१/२०१९मधील नमूद अटीनुसार सदर योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या रस्त्यांची गुणवत्ता राखली जाईल यासाठी तसेच सध्या पावसाळा सुरू होत असल्याने कामे जलद पूर्ण करावी लागणार आहे. यास्तव कामाचे प्रगतीनुसार या कामांचे तांत्रिक लेखापरीक्षण होणेसाठी त्रयस्थ संस्था नियुक्त करून कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणेबाबत कळविले होते.

७. शासन निर्णय दि.१०/०१/२०१९ नुसार "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था" संस्थानमार्फत नियुक्त करणेबाबत नमूद केले असल्याने त्याकरीता निविदा मागविणे अथवा पावसाळा सुरू होत असल्याने व कामे जलद पूर्ण करावी लागणार असल्यामुळे तांत्रिक तपासणी संस्था नेमणेस विलंब होवू नये यासाठी नगरविकास विभागाचे दि.२८/०३/२०१८ रोजीचे शासननिर्णयानुसार तांत्रिक तपासणी संस्था नेमणे प्रस्तावीत होते. नगरविकास विभागाचे सदर दि. २८/०३/२०१८ रोजीचे शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद आहे.

८. " त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षणाचे टप्पे -मधील अ) पहिला टप्पा (नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तर)

१) या पहिल्या टप्प्यातील त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण नगर विकास विभागाच्या निधीतून करण्यात येणा-या सर्वच कामांसाठी करण्यात यावे. २) त्या करिता सोबतच्या प्रपत्र अ व प्रपत्र ब मधील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/ नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालये यांना त्यांनी दिलेल्या देकारास अनुसरून नामिकासूचीवर (एमपॅनेल) घेण्यात येत आहे. "

त्यानुसार नामिकासूचीवरील (एमपॅनेल) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (COEP) यांची "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था" संस्थानमार्फत नियुक्त करणेस तसेच नगरविकास विभागाचे शासन निर्णयानुसार रु.५ ते १० कोटीचे कामासाठी कामाच्या किंमतीच्या ०.९० टक्के इतका फीचा दर नमूद केलेला असल्याने रु.८.९८ कोटी रकमेवर रु.८,०८,२००/- इतकी रक्कम शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (COEP) यांना द्यावी लागेल. सदरची रक्कम रु.८.९८ कोटी मधून वजा करून उर्वरीत रक्कम शिर्डी नगरपंचायतीस रु.८,८९,९१,८००/-रक्कम देता येईल असे इकडील दि.०६/०३/२०२० रोजीचे टिपणीने प्रस्तावीत करणेत आले. त्यास मान्यता देण्यात येवून नगरपंचायतीस रक्कम रु. ८,८९,९१,८००/- अनुदान उपलब्ध करून देणेत आले व शासनाचे नामिकासूची अ मधील (एमपॅनेल) प्रथम क्रमांकाची संस्था शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (COEP) यांची "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था " संस्थानमार्फत ०.९०% फीदराने नियुक्ती करणेत आली.

तरी संस्थान निधीतून शिर्डी नगरपचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीचा उपरोक्तप्रमाणे अहवाल माहिती तथा मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.४८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचा अहवाल मा.तदर्थ समिती अध्यक्ष व सदस्य यांना पाठविण्यात यावा, असे ठरले. तो पर्यंत सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३३ **श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिस-या मजल्याचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूदः- अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय :- १) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३८ "यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०५१ (०९) "यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामी आर.के.सावंत, नाशिक यांचे एकत्रित रु.३,९९,९७,१६२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७६ "यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना सदर कामासाठी दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार श्री.आर.के.सावंत, नाशिक यांना कार्यादेश देण्यात आला असुन सदरहू कामाचा तपशिल व सद्यस्थिती खालील प्रमाणे–

१	कामाचे नांव	श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे.
२.	ठेकेदार	आर.के. सांवत, नाशिक
३.	मंजूर निविदा रक्कम	रु.३,९९,९७,१६२/-
४.	कार्यादेश क्र. व दिनांक	जा.नं.६८४३/२०१७ दि.२०/०३/२०१८
५.	करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दि.	दि.०५/०४/२०१८
६.	काम पूर्ण करण्याचा कालावधी व दिनांक	१२ महिने (दि.०५/०४/२०१९ अखेर)
७.	प्रथम मुदतवाढ दिनांक	दि.३०/०९/२०१९
८.	कामाची सद्यस्थिती	१. दोन्ही इमारतींना जोडणारा फॅब्रिकेशन मधील पुलाचे काम पुर्ण. २. इमारत क्र.०१ चे अंर्तगत विट बांधकाम, प्लास्टर, फ्लोअरींग, डॅडो, प्लंबींग व वॉटरप्रुफींगचे काम पुर्ण झाले असून ॲल्युमिनीयम विंडो व आतील व बाहेरील भागाचे रंगकाम बाकी आहे. ३. इमारत क्र.०२ चे अंर्तगत विट बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर, आणि डॅडोचे काम ९०% पुर्ण, फ्लोअरींग, प्लंबींग, वॉटरप्रुफींग, ॲल्युमिनीयम विंडो व आतील व बाहेरील भागाचे रंगकाम बाकी आहे.
९.	झालेल्या कामापोटी ठेकेदार यांना अदा केलेली रक्कम	आर. ए. बिल क्र. ०४ पर्यंत – रु.२,१०,९८,४६६/-

ठेकेदार यांचा करारनाम्यानुसार काम करण्याचा कालावधी बारा महिने दि.०५/०४/२०१८ ते दि.०५/०४/२०१९ अखेर असा होता. त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७६ अन्वये ठेकेदार यांना काम पुर्ण करणेसाठी दि.३०/०९/२०१९ अखेर मुदतवाढ देणेत आलेली होती. ठेकेदार यांनी आता पर्यंत वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे काम पूर्ण केले आहे. विहीत मुदतीत काम पुर्ण करणेसाठी व कामाचा वेग वाढविणेसाठी ठेकेदार यांना संस्थानमार्फत दि.१९/०५/२०१८, दि.२५/०५/२०१८, दि.०४/०६/२०१८, दि.२९/०६/२०१८, दि.११/०७/२०१८, दि.२१/०९/२०१८, दि.३१/१०/२०१८, दि.२८/०१/२०१९, दि.१६/०४/२०१९, दि.१७/०६/२०१९, दि.११/०९/२०१९, दि.१८/०९/२०१९, दि.१९/११/२०१९, दि.१०/१२/२०२१९, दि.२०/०१/२०२०, दि.१७/०३/२०२०, दि.०९/०५/२०२० व दि.१३/०७/२०२० रोजी पत्र देण्यात आलेले आहे.

ठेकेदार यांना अदा केलेल्या बिलातून विलंबापोटी दंडाची रक्कम रु.३,२९,०००/- मात्र कपात करणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी दि.२५/०८/२०२० रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अडचणी नमूद करुन दि.३१/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

"With reference to above mention subject and above work we request you to grant a work time extension for the above project till December 2020. As we all are aware we are stuck into the COVID-19 Crises right now and it has very badly affected our project time line which was already affected due due to the following reasons as they are not in our effective control.

1) Covid Crises - Due to outbreak of Covid – 19 our site has been shut down for a substential period of 4 – 5 months in lockdown as well as after the unlock procedure it has

been very difficult to procure raw materials of various kind at site, labours are not available in general but also nobody is ready to work in hospital premises which is already preoccuiped with patients. Afetr unlock of lockdown we are trying hard to get the contractors & labours back to restart the work.

2) Non Availibity of Sand - As the above project work is to be completed in Natural Sand as per conditions and no permissions ws given to use artificial sand after repeated requests. The natural sand was not available for avery prolonged amount of time and out works has been affected severly due to it.

3) In the period of Mansoon there was huge delay of work as the major work is of 4th floor only and due to rainfall no work could progress and thus the loss of time due to this has to be taken into consideration.

4) As we are all aware the work is carried out above a full-fledged running hospital building with huge rush of all kinds of patients we had many limitations in material handling, material depositions, extra carting requirements as well as stoppages in work during few critical moments like operations and other such issues. No work front during night time and noise silent periods due to patients.

Including the above issues we would also like to state that we have taken the tender at 17.5% below estimated rates and no profit no loss rates, but the very critical working conditions, tender clauses and the covid-19 has affected us severely and we are already running into huge losses, so we request you to please atleast grant us this relief about time extension. We are working hard and are pledged to complete the project as soon as possible struggling through this entire situation.

We would earnestly request that kindly grant us the extention upto 31st December 2020 to complete the work in satisfactory manner in this hard time. We have previously successfully completed 3 projects in timely and satisfactory manner."

ठेकेदार यांनी त्यांचे दि.२१/०३/२०२० रोजीचे पत्राने कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे त्याच दिवसापासून साईटवरील काम बंद केले होते. त्यानंतर जिल्हादंडाधीकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडील क्र.डी.सी./कार्या९ब१/ ८६५/२०२० दि.२७/०४/२०२० रोजीचे आदेशास अनुसरून प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू करणेसाठी ठेकेदार यांना संस्थानचे दि.०९/०५/२०२० रोजीचे पत्राने कळविणेत आले आहे. त्यानूसार ठेकेदार यांनी दि.१६/०७/२०२० पासुन प्रकल्पाचे कामास पुन्हा सुरूवात केली आहे. प्रत्यक्षात साईटवरील काम दि.२१/०३/२०२० ते दि.१५/०७/२०२० अखेर एकून ११७ दिवस बंद होते.

कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊन दरम्यान सुरू असलेल्या कामांना मुदतवाढ देणेबाबत वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे दि.१३/०५/२०२० रोजीचे **Office Memorandum** मधे खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

"4. It is recognized that in view of the restrictions placed on the movement of goods, services and manpower on account of the lockdown situations prevailing overseas and in the country in terms of the guidelines issued by the MHA under the DM Act 2005 and the respective State and UT Governments, it may not be possible for the parties to the contract to fulfill contractual obligations. In respect of Public-Private Partnership (PPP) concessions contracts a period of the contract may have become unremunerative.

Therefore, after fulfilling due procedure and wherever applicable, parties to the contract may invoke FMC for all construction / works contracts, goods and services contracts and PPP contracts with Government Agencies and in such event, date for completion of contractual obligations which had to be completed on or after 20th February 2020 shall stand extended for a period not less than three months and not more than six months without imposition of any cost or penalty on the contractor/

concessionaire. Concession period in PPP contracts ending on or after 20th February 2020 shall be extended by not less than three and not more than six months. The period of extension (between three and six months) may be decided based on the specific circumstances of the case and the period for which performance was affected by the force majeure events."

महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयामध्ये केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणा-या कंत्राटदाराना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीं संदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे विषयी खालील प्रमाणे नमूद आहे.

"२. १) शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास दि.१५ मार्च, २०२० ते दि.१५ सप्टेंबर, २०२० अशी सहा महिन्यांची मूदतवाढ देण्यात येईल. या कालावधीसाठी त्याचेवर कोणताही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही. मात्र कंत्राटदारास या कालावधीसाठी कोणतेही दावे (Claims) करता येणार नाहीत. भाववाढीसंदर्भात कंत्राटातील अटी व शर्ती लागू राहतील. वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तीचा अन्यथा भंग झाला नसेल अशा कंत्राटांना लागू राहतील.

९. शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या

फेरफारांसह लागू करु शकतील."

विभागाचा अभिप्राय:- ठेकेदार आर. के सावंत, नाशिक यांना सदरहू कामासाठी (एक वर्ष) दि.०५/०४/२०१९ अखेर मुदत देणेत आलेली होती. त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७६ अन्वये ठेकेदार यांना काम पुर्ण करणेसाठी दि.३०/०९/२०१९ अखेर (१७७ दिवस) मुदतवाढ देणेत आलेली होती. ठेकेदार यांना दिलेल्या वाढीव मुदतीत काम पूर्ण करता आलेले नाही.

कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊन दरम्यान सुरू असलेल्या कामांना मुदतवाढ देणेबाबत वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे दि.१३/०५/२०२० रोजीचे **Office Memorandum** मधे अशा कामांसाठी ०३ ते ०६ महीने मुदतवाढ देणेबाबत नमूद केलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयामध्ये शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास दि.१५ मार्च, २०२० ते दि.१५ सप्टेंबर, २०२० अशी सहा महिन्यांची मूदतवाढ देण्यात येईल असे नमूद केलेले आहे. तथापी **ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तीचा अन्यथा भंग झाला नसेल अशा कंत्राटांना या सुविधा लागू राहतील** तसेच शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू करु शकतील असे या शासन निर्णयात नमूद केलेले आहे.

ठेकेदार यांनी निवीदा शर्तीनुसार विहीत मुदतीत काम पुर्ण केले नाही. त्यामूळे निवीदा शर्तीचा भंग झालेला आहे. करीता उपरोक्त शासन निर्णयानूसार ठेकेदार यांना मुदतवाढ देय होत नाही असे मत आहे. परंतू ठेकेदार यांनी त्यांचे पत्रातील मुद्दा क्र. १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या कारणांमुळे सदर काम करणेसाठी दि.३१/१२/२०२० अखेर मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

प्रस्ताव:- तरी श्री साईनाथ रुग्णालयाचे दोंन्ही इमारतींवर तिस-या मजल्याचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार आर. के सावंत, नाशिक यांचे विनंती नुसार त्यांना दि.३१/१२/२०२० पर्यंत मूदतवाढ देणेबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिस-या मजल्याचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना कोणतीही दरवाढ न देता दि.३१.१२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३४ **श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा यावास्तुंचे सुदृढीकरण करणेसाठी सल्लागार Supreme Engicons (India) Pvt.Ltd.Mumbai यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत पाहणी व चर्चा करुन संस्थानला मार्गदर्शन करणेसाठी तज्ञांना पाचारण करणेस मान्यता देणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-

"२१.(१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल:- (क)मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;……"

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:-

१) मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीचे सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.२९० संमत करणेत आलेला आहे :

*"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, दिक्षित वाडा या पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करणेकामी आर्किटेक्टची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात **Request for proposal (RFP)** मागणी करणारी सूचना प्रसिध्द करुन त्याव्दारे या क्षेत्रातील तज्ञ आर्किटेक्टस कडून प्रस्ताव मागविणेस तत्वत: मान्यता देण्यात आली."*

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.२९२ संमत करणेत आलेला आहे.

*"श्री साईबाबा समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंचे स्ट्रक्चरल ऑडीटबाबत सल्लागार **Supreme Engicons (India) Pvt. Ltd., Mumbai** यांनी आजचे सभेसमोर सदरहु कामकाजाबाबतचे सादरीकरण केले व मा.सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन, **Supreme Engicons (India) PVT. LTD., Mumbai** यांनी याबाबत सादर केलेल्या अहवालाप्रमाणे दुरुस्ती व सुद्ढीकरण विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन पुर्ण करण्यास मान्यता देण्यात आली. श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, आणि दिक्षीतवाडा यावास्तूंचे दुरुस्ती व सुदृढीकरण करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.६९,८०,३७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, असे ठरले."*

प्रस्तावना:- उपरोक्त विषयाबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.२१/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५९ अन्वये समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या इमारतींना रासायनिक प्रक्रियेद्वारे कोटींग करणेचे कामासाठी **ASI** यांचेमार्फत कामाची सविस्तर रुपरेषा ठरवून प्रस्ताव मागविणेत यावा. त्यासाठी मा.डायरेक्टर जनरल, **ASI,** नवी दिल्ली यांना मा.कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत विनंती पत्र पाठविणेत यावे, असे ठरले होते. त्यानुसार **Director General, Archaeological Survey of India (ASI), New Delhi** यांना संस्थानतर्फे जा.नं.४१५३, दि.१४/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये विषयांकीत पवित्र पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करण्याचे दृष्टीने मार्गदर्शन करणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन **ASI** यांचेकडील श्री.पी.जी. देशमुख, **Asstt. Superintending Archaeological Engineer** व डॉ.तेजस गर्गे, **Asstt. Archaeologist** या अधिका-यांनी दि.१०/०२/२०१४ रोजी शिर्डी येथे भेट देऊन विषयांकीत पुरातन वास्तुंची पहाणी केली. तसेच त्यानंतर **ASI** यांचेकडील खालील अधिका-यांनी दि.२४/०१/२०१५ रोजी शिर्डी येथे भेट देऊन समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व दिक्षित वाडा या पवित्र पुरातन वास्तुंची पहाणी केली.

१) श्री. आर.एस. जमवाल, Superintending Archaeological Engineer, ASI, New Delhi.

२) श्री. मॅनेजर सिंग, Superintending Archaeological Engineer, ASI, Aurangabad.

३) श्री. डी.एस. दानवे, Ajanta Caves World Heritage Site Incharge.

त्यानूसार श्री.आर.एस.जमवाल, Superintending Archaeological Engineer, ASI, New Delhi यांनी दि.१३/०३/२०१५ रोजीचे पत्राद्वारे अहवाल सादर केला. सदर अहवालात या पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करणेसाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे सुचना नमूद केलेल्या आहेत.

1. All iron work, mild steel beams, should be maintained by applying appropriate paint.
2. Stone block masonry western façade should be restored to the original having original finish set in courses by replacing polygon rubble and other pattern masonry.
3. The cement pointing should be removed and re pointing done using lime mortar.
4. Parapet wall should be restored following original design and pattern.
5. The door windows on the northern façade may be redesigned by engaging professional architect to give uniform look, matching historic value of the building.
6. The random application of polymers over the stone surface should be avoided.

7. Regaining of damaged stone surface by cement mortar should be stopped. Instead, any such stone block should be replaced by using the new one of same colour and texture.

8. After attending the repair the package of chemical treatment comprising cleaning, fungicidal treatment, consolidation and water repellent treatment should be applied.

समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंचे सुदृढीकरणाचे काम हाती घेणे अगोदर त्याची आवश्यकता व स्वरुप या बाबी निश्चित करणेसाठी अगोदर स्ट्रक्चरल ऑडीट करणे आवश्यक होते. त्यासाठी सल्लागारांची नेमणूक करुन त्यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट करणे, स्ट्रक्चरल ऑडीटमधिल निरिक्षणानुसार आवश्यक सुदृढीकरणाचे स्वरुप ठरविणे, अंदाजपत्रक व निविदा तयार करणे, प्रत्यक्ष काम चालू असतांना त्यावर देखरेख ठेवणे, ठेकेदारांची बिले तपासून प्रमाणित करणे इत्यादी अनुषंगिक सेवा घेणेसाठी **e-RFP** प्रस्ताव मागविण्यात आले होते.

महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयामध्ये केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणा-या कंत्राटदाराना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीं संदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे विषयी खालील प्रमाणे नमूद आहे.

१) शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास दि.१५ मार्च, २०२० ते दि.१५ सप्टेंबर, २०२० अशी सहा महिन्यांची मूदतवाढ देण्यात येईल. या कालावधीसाठी त्याचेवर कोणताही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही. मात्र कंत्राटदारास या कालावधीसाठी कोणतेही दावे (Claims) करता येणार नाहीत. भाववाढीसंदर्भात कंत्राटातील अटी व शर्ती लागू राहतील. वरील सुविधा ज्या प्रकरणी दि. १५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तीचा अन्यथा भंग झाला नसेल अशा कंत्राटांना लागू राहतील.

२) ज्या कामांमध्ये सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) चालू देयकांमधून (RA Bills) मधून करण्यात येते, अशा प्रकरणी प्रत्येक चालू देयकातून करावयाची वजावट यांचे प्रमाण कमी करुन आणि / अथवा वजावटीचा कालावधी अधिक देयकांकरीता वाढविण्यात येईल. तथापि, संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम वसूल करण्यात येईल. याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२.२) मात्र ज्या कंत्राटांमध्ये मुळ सुरक्षा अनामत (Security Deposit) निवीदा रकमेच्या २ टक्क्यापेक्षा अधिक आहे, (RA Bill मधून वसूल करावयाची रक्कम निवीदा रकमेच्या १% पेक्षा जास्त आहे.)

(ब) जर वजावट रक्कम निविदा रकमेच्या १% वर वसुली झाली असल तर ती रक्कम कंत्राटदाराला एकूण वसूल करावयाची रक्कम (निविदा प्रमाणे RA Bill मधून वसूल करावयाची रक्कम) विनाशर्त बँक गॅरंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी.

५) वर परिच्छेत १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या सवलतींचा लाभ घेण्यास इच्छुकता दर्शविल्यानंतर कंत्राटदारास दैवी आपत्ती (**Force Majeure Clause**) संबंधातील कंत्राटातील अथवा सर्वसाधारण तरतूद लागू करण्याबाबत विनंती करता येणार नाही.

९) शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू करु शकतील.

निवीदेतील अटी व शर्तींनूसार ठेकेदार यांचेमार्फत व त्यांचे रनिंग बिलामधून खालीलप्रमाणे सुरक्षा अतामत रक्कम जमा / कपात करणेत आलेली आहे.

A)	**Details of Security Deposit**		**Amount Rs.**
1	EMD Deposited:	Through E-procurement Ref. No. 6382301966890, UTR No. CPL9107232, State Bank of India on dtd.29/12/2018.	1,26,99,200.00
2	ISD Deposited:	Through D.D. No.023597, dtd.12/03/2019. (Sansthan Receipt No.CHQ-18-327, dtd.26/03/2019)	4,18,00,800.00
B)	**Security Deposit Recovered from RA Bills**		
3	Security deposit to be recovered from bills @ 5% of gross value of the bill.	RA Bill No.1	43,60,000.00
4		RA Bill No.2	1,61,86,500.00
5		RA Bill No.3	45,78,000.00
6		RA Bill No.4	44,96,250.00
7		RA Bill No.5	44,96,250.00
8		RA Bill No.6	43,60,000.00
9		RA Bill No.7	58,58,750.00
10		RA Bill No.8	34,33,500.00
11		RA Bill No.9	36,78,750.00
12		RA Bill No.10	19,62,000.00
13		RA Bill No.11	54,50,000.00
14		RA Bill No.12	23,98,000.00

15		RA Bill No.13	64,47,350.00
16		RA Bill No.14	15,18,370.00
		Total deposit recovered from RA Bills Rs.:	**6,92,23,720.00**
C)	Performance Security Deposit:	Bank Guarantee No.:007GT02190740003. Valid up to date 15/12/2020 Drawn on HDFC Bank, Pune	**109,000,800.00**

ठेकेदार यांचे संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) परत करणेबाबत निवीदेत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

Page No. 20, Clause No.11 (Appendix A to Detail Tender Notice)

Return of Security Deposit (5%): 50% with settlement of final bill and 50% on successful completion of defects liability period.

Page No. 73, Clause No.154

The **balance 50% amount of Retention Money may be returned by the Employer to the Contractor after satisfactory expiry of the defect liability period**, if there is nothing outstanding against the Contractor and provided that all defects pointed out by the Architect and the Executive Engineer have been made good accordingly to the true intent and meaning and certified by the Architect and Executive Engineer and also provided that there was no case of fraud, dishonest or fraudulent concealment relating to works or materials or any matter dealt with in the completion certificate and in case of any defects and insufficiencies in the work or materials which on reasonable examination would not have disclosed and provided always that the Contractor shall have been paid the final bill after he has rendered a 'No Claim Certificate' and also contractor has submitted a "No Dues Certificate" from the Authorities from where water and electricity etc. were obtained by him for construction of work under this Contract.

विभागाचा अभिप्राय:- निवीदेतील सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) वसूल / कपात करणेचे तरतूदी नूसार ठेकेदार यांचे प्रत्येक रनिंग बिलातून ५% प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम कपात करणेत येते चौदावे रनिंग बिलापर्यंत ठेकेदार यांचे बिलातून रक्कम रु.६,९२,२३,७२०/- मात्र कपात करणेत आलेले आहे. महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयानूसार सदरहू रक्कम विनाशर्त बॅंक गॅरंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी असे नमूद केलेले आहे.

तथापी सदरहू सवलतींचा लाभ घेण्यास इच्छुकता दर्शविल्यानंतर कंत्राटदारास दैवी आपत्ती (**Force Majeure Clause)** संबंधातील कंत्राटातील अथवा सर्वसाधारण तरतूद लागू करण्याबाबत विनंती करता येणार नाही असे नमूद केलेले आहे. तसेच शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू करु शकतील असे नमूद केलेले आहे.

प्रस्ताव:- तरी मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांचे सिक्युरीटी डिपॉझीट रक्कम रु.६,९२,२३,७२०/- परत करणेचे मागणीबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४९२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्प्लेक्सचे बांधकाम अद्याप पुर्ण झालेले नसल्याने सदर कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचे सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम परत करणेची मागणी अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४० **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचे प्रकल्पाचे कामास मुदतवाढ मागणीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद : अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४ नुसार ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांना कार्यादेश देण्यात आला असुन सदरहू कामाचा तपशिल व दि. २४/१०/२०२० पर्यंत ठेकेदार यांनी केलेल्या कामाची सद्यस्थिती खालील प्रमाणे –

१	कामाचे नांव	मौजे निमगाव को-हाळे गट नं.१८३ मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प उभारणे.
२.	ठेकेदार	मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे
३.	मंजूर निविदा रक्कम	रु.२१८/- कोटी.
४.	कार्यादेश क्र. व दिनांक	१) जा.नं.५६३६/२०१९ दि.०८/०३/२०१९ २) जा.नं.१६९०/२०१९ दि.०३/०८/२०१९
५.	करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दि.	दि.२३/०३/२००९.
६.	काम पूर्ण करण्याचा कालावधी व दिनांक	१८ महिने (दि.२२/०९/२०२० अखेर)
७.	कामाची सद्यस्थिती	**इंग्लिश मेडियम स्कूल इमारत** – आर.सी.सी काम, बांधकाम व आतील प्लास्टरचे काम १००% पूर्ण., फ्लोरींग व स्कर्टिंगचे काम पहिला मजला व तिसरा मजला १००% पूर्ण, चौथा मजला ७०% पूर्ण. पाचव्या मजल्याचे काम प्रगतीत. इंटरनल प्लंबींग ९०% पूर्ण. दरवाजे व शटर पहिला मजला पूर्ण, उर्वरीत काम सुरु आहे. **कन्या विद्या मंदिर इमारत** – आर.सी.सी काम, बांधकाम व प्लास्टरचे १००% पूर्ण, वॉलपुट्टीचे काम प्रगतीत., फ्लोरींग व स्कर्टिंगचे पहिला मजला, दुसरा, तिसरा व चौथा ८०% पूर्ण. इंटरनल प्लंबींग १००% पूर्ण, उर्वरीत काम सुरु आहे. **कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय** – आर.सी.सी काम, बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर १००% पूर्ण.फ्लोरींग वर्क - तळमजला, ते पाचवा मजला १००% पूर्ण, रंगकाम – तळमजला ते पाचवा मजला वॉलपुट्टी फस्ट कोट पूर्ण, दरवाजे व शटर ग्राऊंड फ्लोअर पूर्ण, उर्वरीत काम सुरु आहे. **ऑडिटोरीयम**- आर.सी.सी काम १००% पूर्ण. बांधकाम – तळमजला व पहिला मजला ९०% पूर्ण. दुसरा मजला ५०% पूर्ण, प्लास्टर - तळमजला व पहिला मजला ६०% पूर्ण, वॉलपुट्टीचे काम प्रगतीत. **स्पोर्ट कॉम्पलॅक्स** – आर.सी.सी काम १००% पूर्ण, बांधकाम व आतील प्लास्टर - १००% पूर्ण व बाहेरील प्लास्टर १००% पूर्ण. वॉलपुट्टीचे काम प्रगतीत. फ्लोरींग वर्क - तळमजला ९०% पहिला मजला १००% पूर्ण **स्विमिंग पुल**- आर.सी.सी काम १००% पूर्ण, बांधकाम ६०% पूर्ण, आतील प्लास्टर - ३०% पूर्ण व बाहेरील प्लास्टर ६०% पूर्ण. भूमिगत पाण्याच्या टाकीचे आरसीसी व वाटर प्रुफींगचे काम १००%पूर्ण, कम्पाऊंड भिंतीचे काम ८०% पूर्ण, डिजीरुम व गेट कमानीचे आरसीसी, बांधकाम व प्लास्टरचे काम १००% पूर्ण, एसटीपीचे आरसीसी काम ४०% पूर्ण, अंतर्गत रस्ते तयार करणेचे काम प्रगतीत.

श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पास करारनाम्यानुसार काम पुर्ण करण्यासाठी १८ महिने दि.२३/०३/२०१९ ते दि.२२/०९/२०२० असा कालावधी देणेत आलेला होता. सदरहू प्रकल्पाचे उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी दि.१८/०६/२०२० रोजीचे पत्राने प्रकल्पाचे कामास सहा महिने मुदतवाढ मिळणेसाठी ठेकेदार यांनी खालील प्रमाणे विनंती केली आहे.

"We are carrying the construction work for Shri. Saibaba Educational Complex at Gat No. 183, Nimgaon – Korhale, Tal- Rahata, Dist- Ahmednagar (Hereinafter referred as

"Said project"). You have allotted the construction work to us vide Work order bearing No. SSST/CONST/1690/2019 on dated 03/08/2019. While we were moving steadfast to complete the construction of said project as agreed between us, the world has been threatened by the Covid-19 Virus, which has been declared as a Pandemic by the World Health Organisation.

Meanwhile, Government of India by its Office Memorandum dated 19th February, 2020 has clarified that Corona Virus should be considered as a case of natural calamity and Force Majeure Clauses have invoked.

You must be aware that restrictions have been imposed starting with the 'Janata Curfew' on 19th March, thereafter the Lockdown was declared by the Government of Maharashtra on 23rd March and then the Government of India imposed a nationwide Lockdown on 24th March for 21 days upto 14th April, thereafter extended it upto 3rd May 2020, thereafter extended it upto 17th May, 2020, thereafter further extended upto 30th May, 2020 and now the same is further extended upto 30th June, 2020. Further, Pune city is declared in the "Red Zone" with restrictions imposed accordingly.

As you must be aware, in light of the aforesaid Government of India, Ministry of Finance, Department of Expenditure, Procurement Policy Division has issued the notification bearing number F.18/4/2020 - PPD dated 13/05/2020 and granted the extension of time about maximum of 6 months for date of completion of contractual obligation without imposition any cost or penalty on the contractor.

In this notification it has also recognized that the construction work across India has been severely affected and due to the aforesaid lockdown, the supply chains for obtaining construction material have been disrupted and Labour Work Force may have migrated back to their home states.

As you are aware in these circumstances also, we have continued our construction work up to some extent with the available material and labour work force. But to restart the project work with full capacity it will take some time.

Going further, it is expected that even after, as and when the Lockdown measures are eased or lifted by the Central/ State Government, there could be various restrictions/ advisories in place pertaining to the conduct of construction work like restricting the use of work personnel, maintaining social distancing etc.

In light of all the aforesaid mitigating circumstances and force majeure conditions, We therefore request you to kindly make a note of the extension of the period for completion of contractual obligation between us and reference to this the construction work for your project which had to be completed as per the period mentioned in our contract agreement/reference Work Order now get extended for ***6 months*** *for the above mentioned project.*

Hoping for an early resolution of the present crisis and eagerly looking forward to the return to normalcy. Where ever necessary we will also keep you updated in the matter."

ठेकेदार यांनी त्यांचे दि.२०/०३/२०२० रोजीचे पत्राने कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे त्याच दिवसापासून साईटवरील काम बंद केले होते. त्यानंतर जिल्हादंडाधीकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडील क्र.डी.सी./कार्या९ब१/ ८६५/२०२० दि.२७/०४/२०२० रोजीचे आदेशास अनुसरून प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू करणेसाठी ठेकेदार यांना संस्थानचे दि.२९/०४/२०२० रोजीचे पत्राने कळविणेत आले आहे. त्यानूसार ठेकेदार यांनी दि.३०/०४/२०२० पासुन प्रकल्पाचे कामास पुन्हा सुरूवात केलेली आहे. प्रत्यक्षात साईटवरील काम दि.२१/०३/२०२० ते दि.२९/०४/२०२० अखेर एकून ४० दिवस बंद होते.

ठेकेदर यांनी उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे दि.१३/०५/२०२० रोजीचे **Office Memorandum** मधे खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

"4. It is recognized that in view of the restrictions placed on the movement of goods, services and manpower on account of the lockdown situations prevailing overseas and in the country in terms of the guidelines issued by the MHA under the DM Act 2005 and the respective State and UT Governments, it may not be possible for the parties to the contract to fulfill contractual obligations. In respect of Public-private Partnership (PPP) concessions contracts a period of the contract may have become unremunerative. Therefore, after fulfilling due procedure and wherever applicable, parties to the contract may invoke FMC for all construction / works contracts, goods and services contracts and PPP contracts with Government Agencies and in such event, date for completion of contractual obligations which had to be completed on or after 20th February 2020 shall stand extended for a period not less than three months and not more than six months without imposition of any cost or penalty on the contractor/ concessionaire. Concession period in PPP contracts ending on or after 20th February 2020 shall be extended by not less than three and not more than six months. The period of extension (between three and six months) may be decided based on the specific circumstances of the case and the period for which performance was affected by the force majeure events."

तसेच महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि. २९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयामध्ये केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणा-या कंत्राटदाराना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीं संदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे विषयी खालील प्रमाणे नमूद आहे.

"१) शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास दि.१५ मार्च**,** २०२० ते दि.१५ सप्टेंबर**,** २०२० अशी सहा महिन्यांची मूदतवाढ देण्यात येईल. या कालावधीसाठी त्याचेवर कोणताही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही. मात्र कंत्राटदारास या कालावधीसाठी कोणतेही दावे **(**Claims) करता येणार नाहीत. भाववाढीसंदर्भात कंत्राटातील अटी व शर्ती लागू राहतील. वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च**,** २०२० पूर्वी निविदा शर्तीचा अन्यथा भंग झाला नसेल अशा कंत्राटांना लागू राहतील**."**

ठेकेदार यांना मुदतवाढ देणेबाबत निविदेतील Page No.**53**, Clause No.**49** मधे खालीलप्रमाणे तरतूद आहे.

Extension:

Upon it becoming reasonably apparent that the progress of the works is delayed, the Contractor shall forthwith give written notice of the cause of the delay of the Sansthan, and if in the opinion of the Sansthan, the completion of the work is likely to be or has been delayed beyond that date for completion stated in the appendix to these conditions or beyond any extended time previously fixed under this clause.

(1) By force authority. OR

(2) By reason of any exceptionally inclement weather. OR

(4) By reason of civil commotion, local combination of workmen strike or lockout affecting any of the trades employed upon the works or any of the trades engaged in the preparation, manufacture or transportation of any of the goods or materials required for the work. OR

(10) By reason of the Contractor's inability for reason beyond their control and which they could not reasonably have overseen at the date of this Contract to secure such labor goods or materials as are essential to the proper carrying out of the Works.

The Sansthan shall as soon as they are able to estimate the length of the delay beyond the date or time aforesaid make in writing a fair and reasonable extension of time

for completion of the works, provided always that the Contractor shall use constantly their best endeavors to prevent delay and shall do all that may reasonably be required to the satisfaction of the Sansthan to proceed with the work.

विभागाचा अभिप्राय:- महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयानूसार ठेकेदरांना सहा महिन्यांची मूदतवाढ देणेबाबत तरतूद नमूद केलेली आहे. तसेच या कालावधीसाठी कोणतेही दावे (Claims) करता येणार नाहीत व भाववाढीसंदर्भात कंत्राटातील अटी व शर्ती लागू राहतील असे नमूद केलेले आहे. त्यानूसार सदरहू कामाचे निवीदेतील अटी व शर्तींनूसार ठेकेदार यांना भाववाढ किंवा भावफरक देय होत नाही.

प्रस्ताव:- तरी महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयानूसार श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांचे प्रकल्पाचे कामास ०६ महीने मुदतवाढ मागणीबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचे प्रकल्पाचे कामास कोणतीही दरवाढ न देता सहा महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४१ **संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाच्या शांतीनिवास इमारतीस लिफ्ट बसविणे व लिफट शॉफटचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट माथुर ॲन्ड कापरे असो., नवि दिल्ली यांचे मार्फत सादर करणेत आलेल्या ०२ पर्यायापैकी एका पर्यायाची निवड होऊन त्यानुसार येणा-या अंदाजपत्रकीय खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद - अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - श्री साईबाबा मंदिर परीसरातील शांतिनिवास इमारतीस कर्मचारी व साईभक्तांचे सुविधेकरीता लिफ्ट बसविणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष पाहणीचे वेळी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार याकामी मंदिर परिसर व श्री साईबाबा दर्शन रांग प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांचे कडून ०२ पर्याय सुचविणेत आले असून त्यांचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहे. आर्किटेक्ट यांनी लिफ्ट बांधकामाकरीता खालील दोन पर्याय व त्यासाठी अपेक्षित खर्च कळविलेला आहे.

पर्याय क्रं.१ - शांतिनिवास इमारत पश्चिम बाजू जेन्टस् टॉयलेट जवळ - आर्किटेक्ट यांनी या कामासाठी रू.३४,२४,०००/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी खालील बाबींचा समावेश केलेला आहे.

Sr.No.	Description	Amount (Rs.)
A)	**Civil and Allied Works -**	
01.	Dismantling Work.	8,771/-
02.	Plain Cement Concrete Work.	5,090/-
03.	Reinforcement Steel and RCC Work.	7,07,440/-
04.	Brick Work / Solid Concrete Block Work.	42,120/-
05.	Waterproofing Work.	31,239/-
06.	Internal Plastering & Pointing Work.	1,00,208/-
07.	Flooring & Dado Work.	99,114/-
08.	Colour, White Washing, Distempering.	45,695/-
09.	Door And Windows Work.	24,084/-
10.	Miscellaneous - Rebaring.	87,101/-
	Total Amount (A):	**11,50,862/-**
B)	**Lift Work -**	**18,00,000/-**

	Total Amount (B):	**18,00,000/-**
	Total (A+B):	**29,50,862/-**
	GST @ 18% on (A):	2,07,155/-/-
	Contingencies @ 4%:	1,18,034/-
	Centage Charges @ 5%:	1,47,543/-
	Total Estimated Amount (Rs.):	**34,23,595/-**
	Say R/O Amount (Rs.):	**34,24,000/-.**

पर्याय क्रं.२ - शांतीनिवास इमारतीचे आतील बाजूस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनाजवळील जिन्याचे समोरील शाफ्टमध्ये - आर्किटेक्ट यांनी या कामासाठी रू.३३,१९,०००/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी खालील बाबींचा समावेश केलेला आहे.

Sr. No.	Description	Amount (Rs.)
A)	**Civil and Allied Works -**	
01.	Dismantling Work.	8,522/-
02.	Plain Cement Concrete Work.	5,254/-
03.	Reinforcement Steel and RCC work	2,94,344/-
04.	Brick Work / Solid Concrete Block Work.	1,58,993/-
05.	Waterproofing Work.	31,239/-
06.	Internal Plastering & Pointing Work.	78,105/-
07.	Flooring & Dado Work.	5,41,401/-
08.	Colour, White Washing, Distempering.	29,900/-
09.	Miscellaneous - Rebaring.	87,101/-
	Total Amount (A):	11,53,745/-
B)	**Lift Work -**	**17,00,000/-**
	Total Amount (B):	17,00,000/-
	Total (A+B):	28,53,745/-
	GST @ 18% on (A):	2,07,674/-/-
	Contingencies @ 4%:	1,14,150/-
	Centage Charges @ 5%:	1,42,687/-
	Total Estimated Amount (Rs.):	**33,18,257/-**
	Say R/O Amount (Rs.):	**33,19,000/-.**

आर्किटेक्ट यांनी वरील तपशिलाप्रमाणे राज्य दरसुची सन २०२०-२०२१ अन्वये अंदाजपत्रक सादर केलेले आहेत. सदर दोन्ही अंदाजपत्रके ही लिफ्ट शाफ्ट बांधकामाचे सिव्हील वर्क, लिफ्ट केबीन / कार, मशीन इ. इलेक्ट्रीकल / इलेक्ट्रॉनिक्स व मेकॅनिकलचे कामांसह आहे. वर नमूद केलेले ०२ पर्याय दर्शविणारे नकाशे सोबत आवलोकनार्थ जोडले आहेत.

श्री समाधी मंदिर परीसरातील संस्थानचे प्रशासकिय कार्यालय असलेल्या शांतिनिवास इमारतीस लिफ्ट बसविणेकरीता आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांचेमार्फत तयार करणेत आलेल्या ०२ पर्यांयापैकी एका पर्यांयाची निवड झालेनंतर त्यानुसार सदर बांधकामासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी घ्यावी लागेल. तसेच याकामी आर्किटेक्ट यांचेकडून आर. सी .सी. डिझाईन, आर्किटेक्चरल वर्किंग ड्रॉईंग, ई-निविदा प्रपत्रे इ. तयार करून वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा मागविता येतील.

प्रस्ताव- तरी श्री समाधी मंदिर परीसरातील संस्थानचे प्रशासकिय कार्यालय असलेल्या शांतिनिवास इमारतीस लिफ्ट बसविणेकरीता लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करणे व लिफ्ट केबीन / कार, मशीन इ. इलेक्ट्रीकल / इलेक्ट्रॉनिक्स व मेकॅनिकल कामे करणेसाठी आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेमार्फत सादर करणेत आलेल्या वर नमूद पर्याय क्र.१ (अंदाजपत्रकीय रक्कम रू.३४.२४ लक्ष) व पर्याय क्र.२ (अंदाजपत्रकीय रक्कम रू.३३.१९ लक्ष) या दोन पर्यायांपैकी एका पर्यायाची निवड होणेस, तसेच आर्किटेक्ट यांचेकडून या प्रकल्पाचे सिव्हील कामासाठी आर्किटेक्चरल वर्किंग ड्रॉईंग, आर.सी.सी. डिझाईन व ई-निविदा प्रपत्रे तयार करुन

सदर बांधकामासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी घेतल्यानंतर वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे सिव्हील व इलेक्ट्रॉमेकॅनिकल कामांसाठी स्वतंत्र ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाच्या शांतीनिवास इमारतीस लिफ्ट बसविणे व लिफ्ट शॉफ्टचे बांधकाम करणेसाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या ०२ पर्यायापैकी पर्याय क्र.०१ मध्ये साईभक्तांकरीता स्वच्छतागृहाचे बांधकाम केलेले असुन आता फक्त पर्याय क्र.२ शिल्लक असल्याने पर्याय क्र.२- शांतीनिवास इमारतीचे आतील बाजुस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनाजवळील जिन्याचे समोरील शाफ्टमध्ये लिफ्ट बसविणे व लिफ्ट शॉफ्टचे बांधकाम करणेसाठी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणसे व त्याकामी येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम रु.३३.१९ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४२ **माहे फेब्रुवारी-२०२० व मार्च-२०२० जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी-२०२० व मार्च-२०२० या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.तदर्थ समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

अ.नं.	महिना	जमा	खर्च
०१	फेब्रुवारी-२०२०	५१,३०,९१,६७०/-	३२,०२,८८,४८२/-
०२	मार्च-२०२०	४२,५४,१९,२१९/-	१,१६,०१,१०,१६३/-

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे फेब्रुवारी-२०२० व मार्च-२०२० या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे फेब्रुवारी-२०२० व मार्च-२०२० जमा खर्च तक्त्याचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.४३ **माहे एप्रिल-२०२० व मे-२०२० जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे एप्रिल-२०२० व मे-२०२० या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.तदर्थ समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

अ.नं.	महिना	जमा	खर्च
०१	एप्रिल-२०२०	२६,११,९०,४४५/-	१,५१,२३५/-
०२	मे-२०२०	१५,०५,९६,४८१/-	८,६५,०९,८२२/-

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे एप्रिल-२०२० व मे-२०२० या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०२० व मे-२०२० जमा खर्च तक्त्याचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

विषय नं.४४ **माहे जुन-२०२० व जुलै-२०२० जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जुन-२०२० व जुलै-२०२० या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.तदर्थ समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

अ.नं.	महिना	जमा	खर्च
०१	जुन-२०२०	१८,४७,६९,२४१/-	८,७३,५०,१९०/-
०२	जुलै-२०२०	५,३९,३६,४५५/-	१६,७९,९१,७९०/-

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे जुन-२०२० व जुलै-२०२० या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुन-२०२० व जुलै-२०२० जमा खर्च तक्त्याचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.४५ **योगीराज सद् गुरु गंगागिरीजी महाराज संस्थान ट्रस्ट यांना रु.१.२५ कोटी आर्थिक मदत देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबांचे समकालीन श्री गंगागिरीजी महाराज यांची समाधी श्रीरामपूर व वैजापूर तालुक्याच्या सरहद्दीवर सराला बेट येथे आहे. वारकरी सांप्रदयाचे श्रद्धास्थान असलेल्या या गावात भाविक येत असतात. मार्गशिर्ष वद्य १४ ला सद् गुरू गंगागिरी महाराज पुण्यतिथी व त्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दर वर्षी केले जात आहे. त्या कार्यक्रमाचा लाखो भाविक लाभ घेतात. श्री गंगागिरी महाराजांचे शिष्य श्री नारायणगिरी यांचीही समाधी या ठिकाणी आहे.

सदगुरू श्री गंगागिरीजी महाराज संस्थान (ट्रस्ट) यांनी सन २०११ मध्ये श्री सद् गुरू गंगागिरी महाराज समाधी मंदिराचे काम हाती घेतलेले आहे. संस्थानकडे देणगी स्वरूपात व इतर स्वरुपात उत्पन्नाची बाब अत्यल्प आहे. लोकवर्गणीतूनच सदर मंदिराचे काम चालू आहे. योगिराज सद् गुरू गंगागिरीजी महाराज व श्री साईबाबांचा संबंध निकटचा आहे. त्यामुळे सरालाबेट येथील मंदीराचे जिर्णोद्धारासाठी श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी आर्थिक मदत द्यावी, अशी विनंती केली होती.

गत व्यवस्थापन मंडळाचा निर्णय:- दि. १९.११.२०११ रोजी झालेल्या मा. विश्वस्त मंडळाचे सभेत निर्णय क्रं. ८४५ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झाला आहे, सदगुरू गंगागिरी महाराज संस्थान सराला बेट, ता. श्रीरामपूर यांना मंदीर जिर्णोद्धारासाठी रुपये १.२५ कोटी आर्थिक मदत देणेस मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घ्यावी, असे ठरले.

व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर, छाननी समितीची मान्यता व नंतर महाराष्ट्र शासन यांची मान्यतेनुसार संस्थानच्या विहीत पद्धतीने संबंधीतांना अनुदान देण्याचा शिरस्ता आहे. श्री गंगागिरी महाराज यांच्या आर्थिक मदतीच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेत मान्यता मिळाली मात्र छाननी समितीचे मान्यता न मिळाल्याने संबंधीत प्रस्तावावर कार्यवाही होऊ शकली नाही.

मा. छाननी समिती निर्णय :- मा. छाननी समितीचे निर्णयानुसार संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणीसाठी नोंदणीकृत संस्थेकडून, शासनाकडून तसेच वैयक्तीक स्वरुपाचे अर्ज येत असतात. सदर अर्जाबाबत दि. २८.०६.२००९ रोजीचे छाननी समितीत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणीकामी पुष्कळ अर्ज आलेले आहेत/ येत असतात. असे येणारे अर्ज संस्थानकडे दाखल झालेल्या तारखेपासून फक्त एक वर्ष कालावधीपर्यंत ग्राहय धरण्यात यावेत. सदर कालावधीत अनुदान न मिळाल्यास एक वर्षाचा कालावधी संपलेनंतर सदरहू अर्ज निकाली काढण्यात यावेत, अशी शिफारस करण्यात आली असल्याने **दि.२७.०१.२०१७ चे मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेने गत व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिलेले, परंतु मुदत बाहय झालेले एकूण ३१ प्रस्ताव नस्तीबंद करण्यास मान्यता दिलेली आहे.**

प्रस्तावित फेर मागणी :-

मात्र दि. १८ जानेवारी २०१७ रोजीचे पत्रान्वये, महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले, सदगुरू योगिराज श्री गंगागिरीजी महाराज ट्रस्टसाठी संस्थानचे तत्कालीन विश्वस्तमंडळाने, दि. १९.११.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ८४५ अन्वये, मंजूर केलेले रक्कम रु. १.२५ कोटी मात्र घोषीत केलेल्या आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

तसेच, आपल्या कार्यकाळात, सद् गुरू श्री गंगागीरी महाराज संस्थान (ट्रस्ट) सराला बेट या तीर्थ क्षेत्राचा विकास व्हावा, या उद्देशाने गत व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिलेले रक्कम रु. १.२५ कोटी मात्रची आर्थिक मदत द्यावी अशी विनंती केलेली आहे.

अर्थ साहाय्य करणेबाब संस्थान अधिनियमातील तरतुद :-

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तीच्या अधीन राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्या वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा इतर धर्मादाय वा **धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी** अथवा अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :-

मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सदरहू प्रस्ताव फेरसादर केला असता दि. २३-२४.०५.२०१७ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रं. ४०३ अन्वये त्यावर पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. श्रींचा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने करावयाच्या विकासकामांसाठी संस्थानलाच निधीची कमतरता असल्यामुळे योगीराज सद् गुरू गंगागिरीजी महाराज संस्थान ट्रस्ट यांना मंदिर जिर्णोद्धारासाठी सध्या आर्थिक मदत देणे शक्य होणार नाही, याकरिता सदरहू **विषय तुर्त स्थगीत ठेवणेत यावा,** असे ठरले.

विभागाचा अभिप्राय :-

१) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ३०.०१.२०१९ रोजी "Shri Sai Baba Sasthan Trust, shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense" असे आदेश दिलेले आहेत.

२) संस्थानकडे अनुदान मागणीसाठी अशाप्रकारे बरेचशे अर्ज प्राप्त होतात त्यामुळे फक्त सदर ट्रस्टचे अर्जाचा विचार करता येणार नाही.

प्रस्ताव :-योगीराज सद् गुरू गंगागिरीजी महाराज संस्थान ट्रस्ट, सराला बेट ता. श्रीरामपूर यांना रक्कम रु. १.२५ कोटी आर्थिक मदत देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४९८ **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.४६ **करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० ची आयकर रिफंड रक्कम रु.२२,१९,५९,०४०/- संस्थानचे बॅंक खात्यात जमा झाल्याची नोंद घेणे व गुंतवणूकीबाबत.**

प्रस्ताव- आयकर कायदा १९६१ कलम २४५ अन्वये, आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चे आयकर विवरणपत्रात रिफंड असणारी रक्कम करनिर्धारण वर्ष २०१३-१४, २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ पोटी जमा करुन घेणे बाबत ई-मेलद्वारे दि.०९.०५.२०२० रोजी नोटीस पाठविली होती.

सदर नोटीस संस्थान कर सल्लागार सीए आर.आर. मुनी, मुंबई, सीए व्ही.के. बेसवाल, मुंबई व सीए दिपक टिकेकर, मुंबई यांना पाठविण्यात आली होती व त्यावर त्यांचे कायदेशीर मार्गदर्शन मागविले होते. त्यावर सीए आर.आर. मुनी यांनी दि.११.०५.२०२० व दि.२९.०५.२०२० रोजी ई-मेलद्वारे रक्कम वर्ग करणे बाबत अभिप्राय दिला होता. त्यावर दि.०९.०६.२०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेत मान्यता घेण्यात येऊन खर्च रक्कम मोठी असल्याने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे खर्चास मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. यामध्ये सामनेवाले यांनी सिव्हील ॲप्लीकेशनबाबत दि.०२.०७.२०२० रोजी रिप्लाय सादर केला होता, संस्थानचे औरंगाबाद येथील ॲडव्होकेट यांनी सदर रिप्लाय संस्थान कर सल्लागार व विधीज्ञ यांचा त्यावर अभिप्राय घेणे बाबत सुचविले. संस्थानचे मा.उच्च व सर्वौच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील एस. गणेश, दिल्ली, यांनी मा.उच्च व सर्वौच्च न्यायालयाची कर निर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे स्थगिती आदेशास अनुसरुन रिफंड रक्कम इतर वर्षांचे देय करापोटी समायोजित न करता परत मिळणे करीता पत्रव्यवहार करणे बाबद दि.०४.०७.२०२० रोजी अभिप्राय दिला. दरम्यानच्या कालावधीत मा. उच्च न्यायालयात सदर सिव्हील ॲप्लीकेशनवर सुनावणी होऊ शकली नाही. वरिष्ठ वकीलांच्या या युक्तीवाद-अभिप्रायानुसार सदर सिव्हील ॲप्लीकेशन मागे घेणे बाबत मा.तदर्थ समितीचे दि.१३.०७.२०२० रोजीचे सभेमध्ये मान्यता घेण्यात आली. सदर पत्रव्यवहार आयकर विभागाला करण्यापुर्वीच दि.१९.०६.२०२० व दि.२०.०६.२०२० रोजी आयकर विभागाने रिफंड रक्कम मागील वर्षांच्या देय करापोटी समायोजित केल्याची माहिती प्राप्त झाली मात्र लेखी स्वरुपात कळविले नाही.

संस्थानचे मा.उच्च व सर्वौच्च न्यायालयाचे ॲड.एस. गणेश,दिल्ली, यांच्या युक्तीवाद - अभिप्रायास अनुसरुन संस्थान करसल्लागार सीए आर. आर. मुणी, मुंबई यांचेमार्फत संस्थानने आयकर विभागाला मा. उच्च व सर्वौच्च न्यायालयाचे स्थगिती आदेशास अनुसरुन समायोजित केलेली रक्कम संस्थानचे खात्यात वर्ग करणेबाबत दि.१८.०७.२०२० रोजी पत्र व्यवहार केला. त्यानंतर मा.उपायुक्त आयकर विभाग, मा.अतिरिक्त आयुक्त आयकर विभाग, मुंबई व मा.उपायुक्त आयकर विभाग (CPC- Banglore) यांचेशी दुरध्वनी व ई-मेलद्वारे पाठपुरावा करण्यात आला. अंतीमत: आयकर विभागाने स्थगिती आदेश, पत्रव्यवहार व पाठपुरावा विचारात घेऊन दि.२९.०७.२०२० रोजी संस्थानचे बॅंक आफ महाराष्ट्र शाखा, मुंबई येथे आयकर रिफंड रक्कम रु.२०,८५,०२,५४०/- व त्यावरील व्याज रु.१,३४,५६,५००/- अशी एकुण रक्कम रु.२२,१९,५९,०४०/- जमा केली आहे.

कोव्हीड-१९ लाकडाऊन कालावधीत संस्थानचे देणगी उत्पन्न अत्यल्प झाले आहे. सदर कालावधीतील मासीक वेतन, दैनंदिन खर्च या करीता उत्पन्न कमी पडत आहे. आवश्यकतेनुसार व खर्चाचा अंदाज घेऊन गरजेएवढी रक्कम बचत खात्यात शिल्लक ठेऊन उर्वरित शिल्लक रक्कम विहीत पद्धतीने राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये मुदत ठेविच्या स्वरुपात ठेवता येईल.

दि.३१.०७.२०२० अखेर संस्थानचे आर्थिक स्थिती दर्शविणारा मुदतठेव गुंतवणुकीचा तक्ता खालीलप्रमाणे.

Sr.No.	Name of the Banks	Amount of Fixed Deposit
1	Andhra Bank (NPYA)A/c.	10,01,92,000/-
2	Andhra Bank, Shirdi A/c	333,00,00,000/-
3	Bank of Baroda Nashik	283,00,00,000/-
4	Canara Bank Shirdi	379,50,00,000/-
5	Central Bk India Staff Benifit Fund	19,44,985/-
6	Corporation Bank, Shirdi	125,49,99,998/-
7	Indian Bank, Shirdi	89,50,00,000/-
8	Oriental Bank of Commerce, Shirdi	56,00,00,000/-
9	Punjab National Bank,Shirdi.	203,00,00,000/-
10	State Bank of India -Shirdi	120,17,00,000/-
11	Syndicate Bank, Shirdi	171,00,00,000/-
12	Union Bank of India, Shirdi	361,07,00,000/-
13	Vijaya Bank, Shirdi	101,00,00,000/-
	Grand Total	**2232,95,36,983/-**

दि.३१.०३.२०१९ अखेर संस्थानचे सर्व मार्गाने मिळणारे स्थुल उत्पन्न(Gross Income) रक्कम रु.६८९.४३ कोटी मात्र व संस्थानचा सर्व प्रकारचा एकुण खर्च (Gross Expenture) रक्कम रु.६०८.४० कोटी मात्र होता. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अद्याप पुर्ण झालेले नसल्याने, जमा खर्चाची अंतीम आकडेवारी निश्चित झालेली नाही.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० ची आयकर रिफंड रक्कम रु.२२,१९,५९,०४०/- संस्थानचे बॅंक खात्यात जमा झाल्याची व गुंतवणूकीबाबतचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.४७ **अ) लॉकडाऊनचे काळात संस्थानला उत्पन्न फारसे नसतांना कर्मचा-यांचे पगार करणेसाठी व रुई येथील जमीन खरेदी करणेसाठी कोणत्या रकमा वापरल्या बाबत विचारणा करणारे पत्र.**

ब) लॉकडाऊन झालेपासून किती मुदत ठेवी ठेवल्या, किती मुदत ठेवीच्या मुदती संपल्या, मुदत संपलेल्या मुदतठेवीतील रकमांचा विनियोग कसा केला व तो विनियोग करण्याबाबत तदर्थ समितीची परवानगी घेतली काय. याकाळात किती मुदतठेवी मोडल्या, मोडल्या असतील तर त्यासाठी तदर्थ समितीची परवानगी घेतली काय?

क) Trust Corpus Fund बाबत संस्थानची भुमिका.

प्रस्ताव- उपरोक्त विषयास अनुसरुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना पाठविलेल्या पत्रातील मुद्दा क्र.३ व ५ बाबतचा खुलासा पुढीलप्रमाणे –

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) च्या अधिनियमात गुंतवणुकीबाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे. **"कलम २०(३) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बॅंकेत किंवा बॅंकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविण्यात येतील."**

या तरतूदीस अनुसरुन, उपलब्ध होणारी रक्कम ही उच्चतम व्याजदर देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकांकडे गुंतविण्यात येते. यासाठी संस्थानला बॅंकिंग सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकांना मासिक गुंतवणुकीचे नियोजन व उच्चतम व्याजदर देण्याबाबत पत्राव्दारे कळविण्यात येते. राष्ट्रीयीकृत बॅंकांच्या प्रतिनिधींची साईनिवास अतिथीगृह - लेंडीबाग/मुख्य लेखाधिकारी यांचे कक्षात सभा घेतली जाते. यामध्ये बॅंकांकडून गुंतवणूकीसाठी रु.५ कोटीसाठी, रु.१० कोटीसाठी व रु.१० कोटीपेक्षा अधिक रकमेसाठी व्याजदर मागविले जातात व उच्चतम व्याजदर देणा-या बॅंकेकडे मुदतठेवीच्या स्वरुपात १ वर्ष मुदतीसाठी रक्कम गुंतविण्यात येते. मुदतपुर्ती झालेल्या मुदतठेव पावत्यांची रक्कम त्या-त्या बॅंकांच्या बचत खात्यात मुदतपूर्तीच्या दिवशी जमा होत असते. त्यानंतर सदरची रक्कम आर.टी.जी.एस.व्दारे ज्या बॅंकेत मुदतठेव होणार आहे. त्या बॅंकेत वर्ग करण्यात येते. मुदतठेवीच्या गुंतवणुकीसाठी सर्वसाधारणपणे राबविण्यात येणारी प्रक्रिया उपरोक्त प्रमाणे आहे.

अ) लॉकडाऊनचे काळात संस्थानला उत्पन्न फारसे नसताना कर्मचा-यांचे पगार करणेसाठी व रुई येथील जमीन खरेदी करण्यासाठी कोणत्या रकमा वापरल्या याबाबत विचारणा करणारे पत्र -

कर्मचा-यांचे पगार अदा करण्यासाठी मुदतपूर्ती होणा-या गुंतवणुकीच्या मुदतपूर्ती रकमेतून रकमा वापरण्यात आलेल्या आहेत.

याबाबतचा तपशिल दर्शविणारा तक्ता सोबत जोडलेला आहे.

रुई येथील जमीन खरेदी करण्यासाठी पुढील मुदतठेवीच्या मुदतपूर्ती रकमेतून रक्कम वापरण्यात आलेली आहे.

मुदतठेव असलेल्या बॅंकेचे नांव -	पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी
मुदतठेवीची रक्कम	रु.२७,००,००,०००/-
मुदत -	१ वर्ष
मुदतपूर्तीनंतर मिळणारी रक्कम	रु.२९,०५,४१,३१५/-

जमीन खरेदीसाठी अदा करण्यात आलेली रक्कम रु.११,२५,३०,०००/-

रुई येथील जमीन खरेदी, माहे मे-२०२० मध्ये झालेली आहे. जमीन खरेदीची ८०% रक्कम रु.११,२५,३०,०००/- दिनांक १८.०५.२०२० रोजी अदा करण्यात आलेली आहे. सदर रकमेच्या तसेच पुरवठादारांच्या देयकांच्या अदायगीसाठी वर दर्शविलेल्या मुदतठेव पावतीच्या मुदतपूर्तीनंतर बचत खात्यात जमा झालेल्या रकमेतून रक्कम रु.१६,०५,४१,३१५/- ठेवण्यात आलेले होते. त्यापैकी जमीन खरेदीपोटी अदा केलेली रक्कम वजा जाता शिल्लक रक्कम रु.४,८०,११,३१५/- तसेच माहे मे-२०२० मध्ये मुदत पूर्ण होणा-या अन्य मुदतठेव पावत्यांच्या बचत खात्यात जमा झालेल्या मुदतपूर्ती रकमेतून रु.१०,५२,१७,६१०/- मात्र (सोबत जोडलेल्या तक्त्यातील तपशिलानुसार) व अन्य मार्गाने व देणगी स्वरुपात जमा झालेली रक्कम रु.२,७७,४२,६५६/- मात्र अशी एकुण रक्कम रु.१८,०९,७१,५८१/- मात्र एवढी रक्कम कर्मचारी वेतन (रु.११,८४,४३,८१९/-) व उर्वरित रक्कम पुरवठादारांच्या देयकांच्या अदायगीसाठी वापरण्यात आली. शिल्लक रक्कम पुढील महिन्याचे वेतन व इतर देयकांचे अदायगीसाठी वापरण्यात आली.

ब) लॉकडाऊन झालेपासून किती मुदत ठेवी ठेवल्या, किती मुदत ठेवींच्या मुदती संपल्या, मुदत संपलेल्या मुदत ठेवीतील रकमांचा विनियोग कसा केला व तो विनियोग करण्याबाबत तदर्थ समितीची परवानगी घेतली काय, या काळात किती मुदत ठेवी मोडल्या, मोडल्या असतील तर त्यासाठी तदर्थ समितीची परवानगी घेतली काय?

याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये नमूद करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ०६.११.२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.९५२ अन्वये, बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बॅंकांची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, त्यांचेकडून व्याजदर मागवून, जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बॅंकांकडे टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करण्यास, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन, गुंतवणूक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर करण्यात यावा असा निर्णय झाला आहे. सबब, दरमहा होणा-या गुंतवणूकीस मान्यता घेणेकामी मा.तदर्थ समितीसमोर जाणेची आवश्यकता नाही.

सदर निर्णयास अनुसरुन, दिनांक ०९.०६.२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीच्या सभेत विषय क्र.१४ अन्वये, आर्थिक वर्ष सन २०१९-२० मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल व आर्थिक वर्ष सन २०२०-२१ मध्ये कमाल व्याजदर देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकांमध्ये १ वर्षाच्या मुदत ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबतचा विषय सादर करण्यात आला होता.

सदरच्या विषयावर निर्णय क्र.३१९ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय झालेला आहे.-

यावर सविस्तर चर्चा होऊन आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये केलेल्या गुंतवणूक अहवालाचे अवलोकन करण्यात येऊन आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता, गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची, विहीत पद्धतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयीकृत बॅंकांकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवून जी राष्ट्रीयीकृत बॅंक जास्तीत जास्त व्याजदर देईल, त्या बॅंकेत गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

लॉकडाऊनच्या कालावधीत पूर्वी करण्यात आलेली कोणतीही मुदतठेव पावती मुदतपूर्ती होण्यापूर्वी (Pre-Maturity) मोडण्यात आलेली नाही. कर्मचारी पगार व जमीन खरेदी तसेच इतर पुरवठाधारकांच्या देयकांची रक्कम अदा करण्यासाठी मुदतठेव पावत्यांच्या मुदतपूर्तीनंतर बचत खात्यात जमा होणा-या रकमेतून इतर मार्गाने जमा होणा-या रकमेचा विचार करुन व ढोबळ खर्चाचा अंदाज घेऊन रक्कम बचत खात्यात खर्चासाठी शिल्लक ठेवण्यात येते व उर्वरित रकमेची मुदतठेव पावती करण्यात आलेली आहे.

क) **Trust Corpus Fund बाबत संस्थानची भूमिका -**

संस्थानचा कारभार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदींनुसार चालत आहे. आर्थिक वर्ष २०१९ अखेर Trust Corpus Fund मध्ये एकुण रक्कम रु.४८,८२,५२,८६९/- मात्र जमा आहेत. (सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण होणे बाकी आहे.)

Trust Corpus Fund व्यतिरीक्त संस्थानकडे काही Other Earmarked Fund सुद्धा उपलब्ध आहेत. आर्थिक वर्ष सन २०१८-१९ अखेर सदर निधीमध्ये जमा असलेल्या रकमेचा तपशिल पुढीलप्रमाणे-

अ.नं.	निधीचे नाव	रक्कम रुपये
१	अन्नदान निधी	३,२८,१३,४७,३८१/-
२	इमारत निधी	७०,३७,५९,९५८/-
३	इमारत निधी (साईआश्रम)	५१,८१,६१,८०२/-
४	धार्मिक कार्य निधी	२१,१६,३९,०९४/-
५	शिक्षण निधी	२५,७७,८७,३१०/-
६	मेन्टेनन्स, रिपेअर्स व इस्टॅब्लशिमेंट निधी	२,३५,२४,४४,७७३/-
७	नवीन भक्तनिवासस्थान निधी	४२,०९,९०,९३३/-
८	नित्य प्रसादालय अन्नदान योजना निधी	६,६५,३९१/-
९	कायम निधी	२८,०३,१८,२७३/-
१०	ॲम्बुलन्स प्रोजेक्ट निधी	५,३३,८३,०६३/-
	एकूण	**८,०८,०४,९७,९७७/-**

उपरोक्त Other Earmarked Fund हे विशिष्ट उद्देशासाठी तयार करण्यात आलेले असून, या मध्ये जमा असलेली रक्कम ही त्या त्या उद्देशासाठीच वापरण्यात येत असते. तथापि Trust Corpus Fund मध्ये जमा असलेली रक्कम ही महसुली खर्चासाठी (कर्मचारी पगार वगैरे) वापरता येत नसून, ती फक्त भांडवली खर्चासाठी वापरणे बंधनकारक आहे. त्यामुळे Trust Corpus Fund मध्ये रक्कम शिल्लक असूनसुद्धा ती इतर कारणांसाठी वापरण्यावर बंधन येते.

त्या अनुशंगाने, Trust Corpus Fund बाबत आवश्यक असलेली माहिती संस्थानचे अधिकृत लेखापरिक्षक (१) सुनिलकुमार अभ्यंकर, पुणे (२) उल्हास बोरसे ॲण्ड कंपनी, नाशिक, (३) ए.एस.बेदमुथा ॲण्ड कंपनी, नाशिक तसेच कर सल्लागार (१) आर.आर.मुनी, मुंबई (२) व्ही.के.बेसवाल, मुंबई यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

उपरोक्त लेखापरिक्षक व कर सल्लागार यांचेकडून Trust Corpus Fund संबंधी पुढील बाबींसंबंधीत माहिती मागविण्यात आलेली आहे.

१. संबंधित निधीतील रकमेचा विनीयोग संस्थानला कोणत्या कारणांसाठी करता येईल?

२. संबंधित निधीतील रक्कम इतर खर्चासाठी वापरता येईल किंवा कसे? असल्यास, ती कोणत्या खर्चासाठी वापरता येईल? नसल्यास, त्याचा विनियोग कसा करता येईल?

३. सदर निधीच्या रकमेत नव्याने वाढ करता येईल काय?

४. सध्या Other Earmarked Fund व्यतिरिक्त इतर मार्गाने (उदा.General Donation वगैरे) प्राप्त होणा-या रकमेतील शिल्लक असलेली काही रक्कम Trust Corpus Fund मध्ये वर्ग करता येईल काय?

५. सदर निधीमध्ये पुन्हा नव्याने देणगी स्विकारता येईल काय? असल्यास त्यासाठी काय कार्यपद्धती असावी?

६. सदर निधीच्या वापरासंबंधी आयकर कायद्यामध्ये काय तरतुदी आहेत? तसेच आयकरासंबंधीत भविष्यात काही अडचणी येऊ शकतात काय?

उपरोक्त अ.नं.१ ते ६ बाबींसंबंधी लेखापरिक्षक व करसल्लागार यांना दिनांक ११ व १२.०८.२०२० रोजी ई-मेल पाठवून त्यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. त्यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर याबाबत अलाहिदा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येईल.

सदर विषय मा.तदर्थ समितीच्या सभेत अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.५०० **सदर विषयाचे अनुषंगाने सदस्य सचिव/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस अशी माहिती दिली की, लॉकडाऊनच्या कालावधीत पूर्वी करण्यात आलेली कोणतीही मुदतठेव पावती मुदतपूर्ती होण्यापूर्वी (Pre-Maturity) मोडण्यात आलेली नाही. कर्मचारी पगार व जमीन खरेदी तसेच इतर पुरवठाधारकांच्या देयकांची रक्कम अदा करण्यासाठी मुदतठेव पावत्यांच्या मुदतपूर्तीनंतर बचत खात्यात जमा होणा-या रकमेतून इतर मार्गाने जमा होणा-या रकमेचा विचार करुन व ढोबळ खर्चाचा अंदाज घेऊन रक्कम बचत खात्यात खर्चासाठी शिल्लक ठेवण्यात येते व उर्वरित रकमेची मुदतठेव पावती करण्यात आलेली आहे.**

Trust Corpus Fund मध्ये एकुण रक्कम रु.४८,८२,५२,८६९/- मात्र जमा आहेत. व सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण होणे बाकी आहे. **Trust Corpus Fund** व्यतिरीक्त संस्थानकडे काही **Other Earmarked Fund** सुद्धा उपलब्ध आहेत. आर्थिक वर्ष सन २०१८-१९ अखेर सदर निधीमध्ये एकुण रक्कम रु.८,०८,०४,९७,९७७/-मात्र जमा आहेत. **Other Earmarked Fund** हे विशिष्ट उद्देशासाठी तयार करण्यात आलेले असून, या मध्ये जमा असलेली रक्कम ही त्या त्या उद्देशासाठीच वापरण्यात येत असते. तथापि **Trust Corpus Fund** मध्ये जमा असलेली रक्कम ही महसुली खर्चासाठी (कर्मचारी पगार वगैरे) वापरता येत नसून, ती फक्त भांडवली खर्चासाठी वापरणे बंधनकारक आहे. त्यामुळे **Trust Corpus Fund** मध्ये रक्कम शिल्लक असूनसुद्धा ती इतर कारणांसाठी वापरण्यावर बंधन येते. त्या अनुशंगाने, **Trust Corpus Fund** बाबत आवश्यक असलेली माहिती संस्थानचे अधिकृत लेखापरिक्षक यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

तसेच मौजे रुई, ता.राहाता येथील जमीन खरेदीबाबत तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०९.२०११, दि.०२.०२.२०१८ व दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेमध्ये मान्यता दिलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर शासनाचे मान्यतेसाठी विधी व न्याय विभाग यांचेकडे दि.३०.०७.२०१८ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/का.१६ दि.२४.१०.२०१८ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर प्रस्तावास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०६.०२.२०२० रोजीचे सभेमध्ये मान्यता दिलेली असुन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१५.०२.२०२० रोजीचे सभेमध्ये सदरचा विषय कायम करण्यात आलेला आहे. मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेनंतर दि.१५.०५.२०२० रोजी सदर जमीन खरेदीची कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे.

मा.अध्यक्ष यांनी असे नमुद केले की, संस्थानचे कामाजासंबधी खर्चाचे सर्व विषय तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर केले जातात व त्यामध्ये खर्चाची तरतुद करुन त्यास तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यताही घेतली जाते, अशा वेळी खर्चासाठी तदर्थ (Ad-hoc) समितीची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही असे म्हणणे योग्य नाही. प्रशासनाचे मा.उच्च न्यायालयात **C.A.** न करण्याचे स्पष्टीकरण हे मा.उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे. मात्र **Ad-hoc Committee** ने **C.A.** दाखल करण्यास सांगणे ही बाब **by way of precaution** आहे. **Trust Corpus Fund** बाबत लेखापरिक्षक व कर सल्लागार यांचेकडून माहिती मागविण्यात आलेली आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल व **Trust Corpus Fund** बाबत संस्थानची भूमिका तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

यासंदर्भात सदस्य सचिव/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे निवेदन केले की, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असलेल्या जनहित याचिका नं.१५२/२०१८ व नं.८६/२०१८ मध्ये मा.न्यायालयाने दि.३०.०१.२०१९ रोजी खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

'Shri Sai Baba "Sansthan Trust, shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense, till the next date.'

तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असलेल्या जनहित याचिका नं.१२०/२०१९ मध्ये मा.न्यायालयाने दि.०९.१०.२०१९ रोजीचे आदेशामधील मुद्दा क्र.१४ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

14. We further direct that any major policy decision or financial decision, wherein the amout involved is more than Rs.50 lakhs be submitted to the said committee for its approval, except for routine expenses as referred to in the order dated 30th January, 2019 in Public Interest Litigation Nos.152/2018 and 86/2018.

उपरोक्त निर्णयानुसार दैनंदिन खर्चाकामी व्यवस्थापन समितीची मान्यता अपेक्षीत नाही असे न्यायालयीन निर्णयात अध्यारुत आहे.

(कार्यवाही- लेखाशाखा)

विषय नं.४८ **संस्थानचे आयकर कामकाजाकरीता कर सल्लागार सीए आर.आर.मुणी, मुंबई यांची फी ठरविणेबाबत.**

प्रस्ताव- करनिर्धारण वर्ष **२०१५-१६** चे करनिर्धारण करत असताना संस्थान धार्मिक अथवा धर्मादाय असलेबाबत व इतर अनुषंगीक पुर्ततांबाबत मतांतर करुन आयकर विभागाने दि.१८.०२.२०१८ रोजी रु.१८३ कोटी आयकर भरण्याबाबत आदेश पारीत केला होता. सदर आदेशाविरुद्ध विहीत पद्धतीने मा.उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करण्यात येऊन फेर करनिर्धारण करण्यात आले व रु.१२२ कोटी इतका आयकर विभागाने निश्चित केला. त्यावेळचे कर सल्लागार यांचे बरोबर वरिष्ठ अनुभवी सीए दिपक टिकेकर यांना घेण्यात आले होते. त्यांनी फेर करनिर्धारण, आयकर अपिल व मा. उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करण्याकरीता आवश्यक माहिती संकलीत केली होती व सुनावणी करीता विधीज्ञांबरोबर उपस्थित होते. सदर करनिर्धारण वर्षाचे आयकर अपिल दाखल करण्यात आले असुन सुनावण्या चालु आहेत बाब न्यायप्रविष्ठ आहे. या कामकाजाची सीए. दिपक टिकेकर यांनी रु.१२.२७ लाख व संस्थानचे सीए. राहुल केळकर यांनी रु.५.५१ लाख फी मागणी केली होती.मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वरिष्ठ सीए.दिपक टिकेकर यांना रु.४.५० लाख फी आदा करण्यात आली असुन सीए.राहुल केळकर यांना फी आदा करण्यात आलेली नाही. सीए. दिपक टिकेकर परदेशी स्थायीक होण्याचे नियोजन असल्याने त्यांनी पुढील कामकाज करणार नसले बाबत कळविले होते.

कर निर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण करणे बाबत आयकर विभागाने दि.०३.०८.२०१८ रोजी नोटीस दिली. मा.व्य.स.निर्णय क्र.५३०/दि.२२.०८.२०१८ अन्वये *"कर निर्धारण वर्ष २०१३-१४ व त्यापुढील वर्षांसंबधीत आलेल्या नोटींशी संदर्भात आवश्यकतेनुसार फेर करनिर्धारण करणे, अपिल, आवश्यकतेनुसार मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करणे बाबत तसेच त्यासाठी कर सल्लागार, सीए, विधीज्ञांची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन ठरविणे बाबत निर्णय घेण्याचे अधिकार समिती सदस्य अड. मोहन जयकर यांना देण्यात यावे"*असे ठरले.

सीए आर.आर. मुणी, मुंबई यांना आयकर कामकाज:- संस्थानचे फार पुर्वी आयकर कामकाज करणारे सीए.आर.आर. मुणी, मुंबई यांना **२०१३-१४** चे फेर करनिर्धारण करणे बाबत मा.विश्वस्त यांनी कळविले. त्यांनी सदर कामकाजाकरीता कोणतीही फी आकारणार नसल्याचे मान्य केले. त्यास अनुसरुन त्यांनी २०१३-१४ चे फेर करनिर्धारण केले. आयकर विभागाने दि.१९.०३.२०१९ रोजी रु.१२२ कोटी आयकर आदेश पारित केला. सदर आदेशा विरुद्ध सीए आर.आर. मुणी यांनी दि.१७.०४.२०१९ रोजी आयकर अपिल दाखल केले. सदर कामकाजाकरीता त्यांनी फी आकारणार नसल्याचे मान्य केल्याने कोणतीही फी आकारली नाही.

आयकर विषयक सीए आर.आर. मुणी यांचे कामकाज समाधान कारक वाटल्यानंतर त्यांना खालील प्रमाणे आयकर विषयक कामकाज देण्यात आले आहे.

As per GOI's Circular of September 2020 (Copy attached) definition - any manufacturer with more than 50% of local content is classified as Class-I Local manufacturer. We hereby undertake that the product offered by us has more than 50% local content, and as such is qualified to be termed as Class-I Local manufacturer. Since your office wanted undertaking from us we had submitted above attached undertaking on 8th Oct 2020 with BIS certificate which is self declaration and self explanatory that FebriEye is manufactured in India. We have met all your tender technical clauses in right spirit and as per Government of India guidelines and statutory policies shared to various Government departments and industry to follow (attached latest policies PP MII Order for ready reference).

Hence we have met all tender clause as per requirement laid down in tender - evaluated by Devasthan Technical committee which cleared us technically and we have been lowest in terms of commercially. We are positive that Shri Saibaba Sansthan Trust will award us M/s Vehant Technologies Pvt Ltd its lawful order and oblige.

Looking forward for your valued order at earliest.

M/s Vehant यांनी उपरोक्त ई-मेलसोबत पुनश्च एकदा निविदेअंतर्गत देऊ केलेले साहित्य भारतीय बनावटीचे असलेबाबत हमीपत्र तसेच निविदाप्रक्रियेअंतर्गत प्रशिद्ध करणेत आलेले शुद्धीपत्रकाची प्रत व वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. १६.०९.२०२० रोजीचे "Public Procurement (Preference to Make in India), Order-2017-Revision;" आदेशाची प्रत सादर केलेली आहे. सदर ई-मेलमध्ये त्यांनी भारत सरकार यांचे संदर्भीय परिपत्रकाप्रमाणे कोणतेही उत्पादन ज्यामध्ये ५०% पेक्षा जास्त साहित्य हे भारतीय असल्यास सदर उत्पादन हे Class-I Local Manufacturer असे वर्गीकृत होते, असे नमुद करुन त्यांचे उत्पादनामध्ये ५०% पेक्षा जास्त साहित्य हे भारतीय असल्याचे कळविलेले आहे. ई-मेलमध्ये शेवटी त्यांनी ई-निविदेअंतर्गत त्यांची निविदा तांत्रिक पात्र ठरलेली असल्याने तसेच वाणिज्यक निविदा हि निम्नत्तम असल्याने, संस्थान याकामी त्यांना पुरवठा आदेश देतील असी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

नमुद केलेप्रमाणे M/s Vehant यांना कळविलेप्रमाणे त्यांचेमार्फत प्रतिज्ञापत्र सादर करणेस बाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने याकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस व याकामी निविदा मसुद्यामध्ये आवश्यक सुधारणांसह फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी :- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय

क्र.३५० अन्वये, Camera Based Thermal Screening & Scanning प्रणाली कार्यान्वीत करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध करणेत आलेल्या शुद्धीपत्रकामध्ये पुढीलप्रमाणे नमुद करणेत आलेले होते. "Bidder should quote the products manufactured in India. And Produce supporting documents as part of Technical Evaluation."

नमुद केलेप्रमाणे M/s Vehant यांना कळविलेप्रमाणे निविदा प्रक्रियेअंतर्गत त्यांनी देऊ केलेले साहित्य हे पुर्णपणे भारतीय बनावटीचे असून त्यामध्ये परकीय बनावटीचे कोणतेही स्पेअर वापरणेत येत नाहीत, असे प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबत आजपावेतो सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. सबब, याकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस व निविदा मसुद्यामध्ये आवश्यक सुधारणांसह फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५० अन्वये, Camera Based Thermal Screening & Scanning प्रणाली कार्यान्वीत करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध करणेत आलेल्या शुद्धीपत्रकामध्ये पुढीलप्रमाणे नमुद करणेत आलेले होते. "Bidder should quote the products manufactured in India. And Produce supporting documents as part of Technical Evaluation."

ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या एकूण ०८ ई-निविदांच्या तांत्रिक ई-निविदा मा.खरेदी समितीच्या दि.१५.०७.२०२० रोजीचे सभेमध्ये उघडणेत आल्या. त्यानुसार पात्र ०२ ई-निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.०७.०९.२०२० रोजी उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांच्या तुलनात्मक तक्त्याप्रमाणे निविदाकार M/s Vehant Technologies Pvt.Ltd.,Gagret, HP यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणेची एकूण रक्कम रुपये एकूण रक्कम रुपये २४,७८,०३०/- मात्र हि निम्नत्तम आहे. सबब, M/s Vehant यांनी देऊ केलेल्या दराबाबत त्यांचेबरोबर चर्चा होऊन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस इकडील विभागाचे दि.१०.०९.२०२० रोजी मान्यता घेणेत आलेली आहे.

कोव्हीड १९ चे धर्तीवर कॅमे-याद्वारे Thermal Screening & Scanning हि प्रणाली नव्यानेच बाजारामध्ये आलेली असल्याने, M/s Vehant यांचेकडून प्रणालीअंतर्गत संपुर्ण भारतीय बनावटीचे साहित्य संस्थानला पुरवठा होणेबाबत या क्षेत्रातील काही पुरवठाधारकांनी संस्थानकडे शंका उपस्थित केलेली होती. यासंदर्भात M/s Vehant यांचे प्रतिनिधी श्री अभिजीत पाटील हे दि.०८.१०.२०२० रोजी शिर्डी येथे याबाबत चर्चा करणेसाठी आले होते. यावेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात झालेल्या चर्चेच्या दरम्यान निविदा प्रक्रियेअंतर्गत मागणी केलेले साहित्य हे पुर्णपणे भारतीय बनावटीचे असणे आवश्यक असल्याचे श्री अभिजीत यांना अवगत करणेत येऊन याबाबत त्यांना लेखी स्वरुपात हमीपत्रक देणेबाबत सुचित करणेत आले होते. सदर चर्चेच्या दरम्यान श्री अभिजीत यांनी त्यांची कंपनीची नोंदणी भारतीय मानक संघटना (Bureau of Indian Standards (BIS)) यांचेकडे झाली असून याबाबतचे प्रमाणपत्र त्यांना प्राप्त असल्याचे नमुद केले. परंतू, प्रणालीअंतर्गत वापरणेत येणारे साहित्यापैकी काही साहित्य परदेशी बनावटीचे असू शकते, असेही नमुद केले होते.

M/s Vehant यांचे प्रतिनिधी श्री अभिजीत पाटील यांनी दि.०८.१०.२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात झालेल्या चर्चेदरम्यान प्रणाली अंतर्गत काही साहित्य परदेशी बनावटीचे असू शकते, असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. परंतू ई-मेलद्वारे सादर केलेल्या हमीपत्रामध्ये त्यांनी पुरवठा करणेत येणारे साहित्य हे भारतीय बनावटीचे असेल असे नमुद केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, याकामी प्रणाली कार्यान्वीत करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Vehant हे पुरवठा करणार असलेल्या साहित्याबाबत संदिग्धता निर्माण होते. सबब, Thermal Screening & Scanning प्रणाली कार्यान्वीत केलेनंतर भविष्यात काही अडचणी निर्माण होऊ नये याकरीता राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन प्रस्तावित निविदा मसुद्यामध्ये आवश्यक सुधारणांसह याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामी दि.१३.१०.२०२० रोजीचे टिपणीद्वारे प्रस्ताव सादर करणेत आलेला

होता.

दरम्यानचे कालावधीमध्ये आवक क्र.५९३५ दि.१५.१०.२०२० अन्वये M/s Vehant यांचा ई-मेल इकडील विभागास प्राप्त झालेला आहे. सदर ई-मेलसोबत M/s Vehant यांनी त्यांचे उत्पादन भारतीय बनावटीचे असलेबाबत त्यांचे लेटरहेडवर हमीपत्र व भारतीय मानक ब्युरो यांचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. ई-मेलसोबत प्राप्त झालेल्या हमीपत्रावर पुढीलप्रमाणे निर्देशीत करणेत आलेले आहे. "They should mention that their product do not contain any Chinese product used in the Thermal Camera. Pls. take their declaration."

दि.१३.१०.२०२० रोजीचे टिपणीवर दिलेल्या निर्देशाप्रमाणे याविषयी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत चर्चा झाली. सदर चर्चेच्या दरम्यान M/s Vehant यांचेकडून त्यांचे उत्पादन पुर्णपणे भारतीय बनावटीचे असून त्यामध्ये परकीय बनावटीचे कोणतेही स्पेअर वापरणेत येत नाहीत, असे प्रतिज्ञापत्र घेणेत यावे, असे निर्देशीत करणेत आलेले आहे. त्यानुसार M/s Vehant यांना दि.२२.१०.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे याकामी प्रतिज्ञापत्र सादर करणेस व प्रतिज्ञापत्र सादर करणेपुर्वी प्रतिज्ञापत्राचा मसुदा संस्थानकडून मान्य करुन घेणेस कळविणेत आले होते. त्यांचेमार्फत याबाबत प्रतिसाद न मिळाल्याने त्यांना दि.३१.१०.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे पुनश्च कळविणेत आलेले होते. M/s Vehant यांनी सदरचे ई-मेलला दि.१२.११.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

Greetings from Vehant Technologies. Vehant Technologies is incubated company of IIT Delhi. As per tender clause the equipment should be manufactured in India for which we had submitted all documents and certification during online bidding in technical part which was cleared by your Technical Committee during technical evaluation after which your good office declared us L1.

As per GOI's Circular of September 2020 (Copy attached) definition - any manufacturer with more than 50% of local content is classified as Class-I Local manufacturer. We hereby undertake that the product offered by us has more than 50% local content, and as such is qualified to be termed as Class-I Local manufacturer. Since your office wanted undertaking from us we had submitted above attached undertaking on 8th Oct 2020 with BIS certificate which is self declaration and self explanatory that FebriEye is manufactured in India. We have met all your tender technical clauses in right spirit and as per Government of India guidelines and statutory policies shared to various Government departments and industry to follow (attached latest policies PP MII Order for ready reference).

Hence we have met all tender clause as per requirement laid down in tender - evaluated by Devasthan Technical committee which cleared us technically and we have been lowest in terms of commercially. We are positive that Shri Saibaba Sansthan Trust will award us M/s Vehant Technologies Pvt Ltd its lawful order and oblige.

Looking forward for your valued order at earliest.

M/s Vehant यांनी उपरोक्त ई-मेलसोबत पुनश्च एकदा निविदेअंतर्गत देऊ केलेले साहित्य भारतीय बनावटीचे असलेबाबत हमीपत्र तसेच निविदाप्रक्रियेअंतर्गत प्रशिद्ध करणेत आलेले शुद्धीपत्रकाची प्रत व वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. १६.०९.२०२० रोजीचे "Public Procurement (Preference to Make in India), Order-2017-Revision;" आदेशाची प्रत सादर केलेली आहे. सदर ई-मेलमध्ये त्यांनी भारत सरकार यांचे संदर्भीय परिपत्रकाप्रमाणे कोणतेही उत्पादन ज्यामध्ये ५०% पेक्षा जास्त साहित्य हे भारतीय असल्यास सदर उत्पादन हे Class-I Local Manufacturer असे वर्गीकृत होते, असे नमुद करुन त्यांचे उत्पादनामध्ये ५०% पेक्षा जास्त साहित्य हे भारतीय असल्याचे कळविलेले आहे. ई-मेलमध्ये शेवटी त्यांनी ई-निविदेअंतर्गत त्यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेली असल्याने तसेच वाणिज्यक निविदा हि निम्नत्तम असल्याने, संस्थान याकामी त्यांना पुरवठा आदेश देईल असी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे M/s Vehant यांना कळविलेप्रमाणे प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने याकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेच्या व या कामी निविदा

मसुद्यामध्ये आवश्यक सुधारणांसह फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेच्या मान्यता मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.५१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, Thermal Screening & Scanning प्रणाली देणगी स्वरुपात मिळालेली असल्याने सदरचा विषय रद्द करण्यात आला.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)

विषय नं.६३ **साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या वेबसाईटचे तसेच संस्थानअंतर्गत Internet वापरासाठी 50 mbps Internet link उपलब्ध करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन भारत संचार निगम लि., (BSNL) यांचेमार्फत सदरची Link उपलब्ध करुन घेणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद :- २१ (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-

०१. दि.२५.०२.२०१७ नि.क्रं. ४८. ०२. दि.०८.१२.२०१७ नि. क्रं.१०५१ (०२).

०३. दि.११.०५.२०२० नि. क्रं.२५८. ०४. दि.०९.०६.२०२० नि.क्रं.३३०.

प्रास्ताविक :- साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या वेबसाईटसाठी तसेच संस्थानअंतर्गत Internet वापरासाठी 10 Mbps Internet Link पुरविणेकामी M/s Bharti Airtel Ltd यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत संपुष्टात आलेली आहे. सबब, मे. टिसीएस यांचे अभिप्रायानुसार याकामी नव्याने 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी पुढील दोन वर्षाकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मा. तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे निर्णय क्रं.३३० अन्वये मान्यता घेणेत आली.

मा.तदर्थ समितीचे निर्णयान्वये, 50 Mbps Internet Link कार्यान्वीत करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी इकडील विभागाचे दि.२२.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, दि.१०.०८.२०२० ते दि.२९.०८.२०२० या कालावधीत (०७ दिवस मुदतवाढीसह) ई-निविदा प्रसिद्ध करणेत आली होती. सदरचे कालावधीत प्राप्त झालेल्या एकूण ०३ ई-निविदांच्या तांत्रिक ई-निविदा मा.खरेदी समितीच्या दि.०७.०९.२०२० रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या असून, पात्र ई-निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.२९.०९.२०२० रोजी उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

Sr. No	**Supply, Installation, Integration & Commissioning of 50 MBPS (1:1) With OFC as backbone from BTS to Sansthan Data Center For two years.**	**Qty**	**M/s Maxtech Broadband Ltd, Koparga on**	**M/s Vilite Multimedia Pvt Ltd, Baramati**	**M/s BSNL, New Delhi**
1.	One time installation charges (if applicable)	1	**15,000**	10,000	10,000
2.	Annual Recurring charges of link for 1st Year	1	**2,16,000**	3,00,000	4,01,200
3.	Annual Recurring charges of link for 2nd Year	1	**2,16,000**	5,00,000	4,01,200
		Total	**4,47,000**	**8,10,000**	**8,12,400**

तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे M/s Maxtech Broadband Ltd, Kopargaon यांनी 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेसाठी देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकूण रक्कम रुपये ४,४७,०००/- मात्र हि निम्नत्तम आहे. सबब, M/s Maxtech यांनी देऊ केलेल्या दराबाबत त्यांचेबरोबर चर्चा होऊन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव, मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता मिळणेकामी सादर करणेत आलेल्या दि.१५.१०.२०२० रोजीचे टिपणीवर दिलेल्या निर्देशाप्रमाणे, सदर विषयी

दि.२१.१०.२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो., उपमुख्य कार्यकारी अधिकारी सो. व प्रशासकीय अधिकारी सो., माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे उपस्थितीत पुढीलप्रमाणे सविस्तर चर्चा करणेत आली.

संस्थानने 50 Mbps Internet Link हि भारत संचार निगम लि. (BSNL) यांचेमार्फत घेणेस प्राधान्य द्यावे अशी विनंती BSNL यांचे प्रतिनीधींनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांची प्रत्यक्ष भेटून केलेली आहे. तसेच, याकामी ई-निविदेअंतर्गत त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये अधिकची सुट देण्याची तयारी दर्शविलेली आहे. सबब, BSNL यांचेमार्फत 50 Mbps Internet Link घ्यावयाची झाल्यास सदरची लिंक व सध्या कार्यान्वीत असलेल्या दोन 10 Mbps Internet Lease Link यांचा तुलनात्मक आढावा घेतला असता, पुढील बाबी निदर्शनास येतात. सद्यस्थितीत संस्थानमध्ये कार्यान्वीत असलेल्या इंटरनेट लिंकची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे.

Sr. No.	**Link Details**	**Period**	**Amount**	**Use**
01	M/s Bharti Airtel Ltd - 10 Mbps - Primary Link	14.03.2018 to 13.03.2020	3,80,000	IT Department
02	M/s Swiftmail –50Mbps – Secondary Link	July-2017 to July-2022	Donation	IT Department
03	M/s Maxtech Broadband Pvt Ltd-10 Mbps	05.07.2019 to 04.07.2022	3,50,000	Saibaba Hospital

उपरोक्त नमुद अ.नं.०१ व ०२ ह्या इंटरनेट लिंक साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत online.sai.org.in ह्या वेबसाईटकरीता व संस्थानअंतर्गत इंटरनेट वापराकरीता Primary व Secondary Link या स्वरुपात कार्यान्वीत आहेत. अ.नं.०१ चा कालावधी दि.१३.०३.२०२० अखेर संपुष्टात आल्याने मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३०६ (१) अन्वये सदर लिंक पुरविणेकामी पुरवठाधारकास नविन पुरवठाधारकाची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

BSNL यांनी याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत 50 Mbps Internet Link साठी दोन वर्षाकरिता रक्कम रुपये ८,१२,४००/- + कर इतके दर देऊ केलेले आहेत. परंतु, दि.१४.१०.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे याकामी सादर केलेल्या सुधारीत दरांनुसार 50 Mbps Internet Link साठी ३,६४,०००/- + कर या वार्षिक दराप्रमाणे दोन वर्षाकरिता रुपये ७,२८,०००/- + कर (One time installation charges वगळता) इतके दर देऊ केलेले आहेत. सदर प्रस्तावामध्ये BSNL च्या Lease Line चे फायदेही नमुद करणेत आलेले असून त्यामध्ये प्रामुख्याने लिंकचा पुर्ण क्षमतेने पुरवठा, आर्थिक बचत व सुरक्षीतता यांचा समावेश आहे.

M/s Bharti Airtel Ltd व M/s Maxtech यांचे मार्फत कार्यान्वीत प्रत्येकी 10 Mbps Internet Link व BSNL यांनी 50 Mbps Internet Link करिता देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे-

Sr. No.	**Link Details**	**Period**	**Amount**	**Annual Amount**	**Total**
01	M/s Bharti Airtel Ltd- 10 Mbps Internet Link	14.03.2018 to 13.03.2020	3,80,000	1,90,000	2,88,870 (for 20Mbps)
02	Maxtech Broadband Pvt 10 Mbps Internet Link	05.07.2019 to 04.07.2022	2,96,610	98,870	
03	BSNL 50 Mbps Internet Link	Two Year	7,28,000	3,64,000	3,64,000 (for 50Mbps)

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे M/s Bharti Airtel Ltd व M/s Maxtech यांचे मार्फत कार्यान्वीत प्रत्येकी 10 Mbps Internet Link म्हणजेच 20 Mbps Internet Link साठी संस्थानला वार्षिक रक्कम रुपये २,८८,८७०/- + कर इतकी रक्कम अदा करावी लागते. सदर रकमेप्रमाणे 50 Mbps Internet Link साठी अपेक्षीत वार्षिक खर्च रक्कम रुपये ७,२२,१७५/- + कर इतका आहे. तर, BSNL दि.१४.१०.२०२० रोजीचे ई-

मेलद्वारे सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावानुसार 50 Mbps Internet Link साठी एका वर्षाकरिता रक्कम रुपये ३,६४,०००/- + कर (One time installation charges वगळता) याप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

BSNL यांनी सुधारीत प्रस्तावानुसार देऊ केलेले वार्षिक दर रक्कम रुपये ३,६४,०००/- + कर (One time installation charges वगळता) मात्र हि रक्कम याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या निम्नत्तम दर रक्कम रु. २,१६,०००+ कर (One time installation charges वगळता) यापेक्षा जास्त आहेत, परंतु पुढील बाबींचा विचार करता BSNL यांचेमार्फत 50 Mbps Internet Link कार्यान्वीत करणे हितावह ठरेल.

BSNL हि Class 'A' प्रकारची सरकारी कंपनी आहे. सबब, BSNL यांचेमार्फत सदरची 50 Mbps Internet Link हि संस्थानला थेट प्राप्त होणार आहे. परंतु, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Maxtech हि Class 'B' प्रकारची खाजगी कंपनी आहे. सबब, M/s Maxtech हे 50 Mbps Internet Link हि Class 'A' प्रकारचे पुरवठाधारकाकडून घेऊन संस्थानला पुरविणार आहेत.

M/s Maxtech हे 50 Mbps Internet Link हि Class 'A' प्रकारचे पुरवठाधारकाकडून घेऊन संस्थानला पुरविणार असूनही त्यांनी देऊ केलेले दर हे निम्मत्तम असल्याने त्यांचेमार्फत सदरची Link पुर्ण क्षमतेने पुरविणेबाबत तसेच Link ची अखंडता व सुरक्षितता या बाबींबाबत स्वयंस्पष्टता दिसुन येत नाही.

BSNL यांचेमार्फत 50 Mbps Internet Link हि संस्थानला उपलब्ध झालेनंतर सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान विभागात M/s Bharti Airtel Ltd यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या 10 Mbps Internet Link सह श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय विभागासाठी कार्यान्वीत असलेल्या 10 Mbps Internet Link चीही गरज सदरचे Link मध्ये पुर्ण होऊ शकते. सबब, संस्थानअंतर्गत सर्व विभागांकरिता एकच Internet Link चा वापर होऊ शकतो. पर्यायाने श्री साईबाबा रुग्णालय येथे कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link हि बंद करता येईल व त्यामुळे संस्थानचा आर्थिक फायदा होईल.

BSNL यांचे शिर्डी कार्यालय यांनी दुरसंचार विभाग, केंद्रीय दळणवळण मंत्रालय यांचेमार्फत सरकारी कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line चे वापराबाबतचे दि.१२.१०.२०२० रोजीचे कार्यालयीन निवेदनाबाबत अवगत केले असून सदर निवेदनाची प्रत सादर केलेली आहे.

उपरोक्त निवेदनामध्ये नमुद केलेप्रमाणे केंद्र सरकारने नुकतेच केंद्र सरकारचे सर्व मंत्रालये व कार्यालयामध्ये कार्यालयीन वापरासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line वापरणेस सक्ती केलेली असून याबाबत आदेश पारीत केलेला आहे. त्यास अनुसरुन राज्य सरकारचे सर्व कार्यालये, संस्था व सार्वजनिक कार्यालयांमध्ये कार्यालयीन वापरासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line वापरणेबाबत विचार करणेत यावा, असे नमुद करणेत आलेले आहे. सदर परिपत्रकाची प्रत सर्व राज्यांचे मा.मुख्य सचिवांना अग्रेषित करणेत आली आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, सविस्तर चर्चेअंती BSNL हि केंद्र सरकारी कंपनी असल्याने सुरक्षितता व कार्यक्षमतेच्या दृष्टीने त्यांचेमार्फत 50 Mbps Internet Link उपलब्ध करुन घेणे हितावह ठरेल. तसेच दुरसंचार विभाग, केंद्रीय दळणवळण मंत्रालय यांचेमार्फत सरकारी कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line चा वापराबाबत दि.१२.१०.२०२० रोजी कार्यालय निवेदन प्रसिद्ध केलेले आहे. सदर निवेदनामध्ये राज्य सरकारचे सर्व कार्यालये, संस्था व सार्वजनिक कार्यालयांमध्ये कार्यालयीन वापरासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line वापरणेबाबत विचार करणेत यावा, असे नमुद करणेत आलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी BSNL यांनी याकामी सादर केलेल्या सुधारीत दरांनुसार रक्कम रुपये ३,६४,०००/- + कर या वार्षिक दराप्रमाणे दोन वर्षाकरिता रुपये ७,२८,०००/- + कर (One time installation charges वगळता) याप्रमाणे त्यांना कार्यादेश देणेस मा.तदर्थ समितीची मान्यता घेणेत यावी, असे निर्देश देणेत आलेले आहेत.

मागणी :- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा. तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३० अन्वये, 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Maxtech यांनी देऊ केलेल्या दराबाबत (एकुण रक्कम रुपये ४,४७,०००/-) त्यांचेबरोबर चर्चा होऊन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव, मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता मिळणेकामी सादर करणेत आलेल्या दि.१५.१०.२०२० रोजीचे

टिपणीवर दिलेल्या निर्देशाप्रमाणे, सदर विषयी दि.२१.१०.२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो., उपमुख्य कार्यकारी अधिकारी सो. व प्रशासकीय अधिकारी सो., माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे उपस्थितीत सविस्तर चर्चा करणेत आली.

सविस्तर चर्चेअंती देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे, BSNL हि केंद्र सरकारी कंपनी असल्याने सुरक्षितता व कार्यक्षमतेच्या दृष्टीने त्यांचेमार्फत 50 Mbps Internet Link उपलब्ध करुन घेणे हितावह ठरेल. तसेच दुरसंचार विभाग, केंद्रीय दळणवळण मंत्रालय यांचेमार्फत सरकारी कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line चा वापराबाबत दि.१२.१०.२०२० रोजी कार्यालय निवेदन प्रसिद्ध केलेले आहे. सदर निवेदनामध्ये राज्य सरकारचे सर्व कार्यालये, संस्था व सार्वजनिक कार्यालयांमध्ये कार्यालयीन वापरासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line वापरणेबाबत विचार करणेत यावा, असे नमुद करणेत आलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस व BSNL यांनी याकामी सादर केलेल्या सुधारीत दरांनुसार रक्कम रुपये ३,६४,०००/- + कर या वार्षिक दराप्रमाणे दोन वर्षाकरिता रुपये ७,२८,०००/- + कर (One time installation charges वगळता) याप्रमाणे त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :- साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत “online.sai.org.in” या वेबसाईटसाठी तसेच संस्थानअंतर्गत Internet वापरासाठी 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी मा. तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे निर्णय क्रं.३३० अन्वये राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत एकूण ०३ निविदाकारांनी याकामी ई-निविदा सादर केलेल्या होत्या. प्राप्त झालेल्या पात्र ई-निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.२९.०९.२०२० रोजी उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

Sr. No	**Supply, Installation, Integration & Commissioning of 50 MBPS (1:1) With OFC as backbone from BTS to Sansthan Data Center For two years.**	**Qty**	**M/s Maxtech Broadband Ltd, Kopargaon**	**M/s Vilite Multimedia Pvt Ltd, Baramati**	**M/s BSNL, New Delhi**
1.	One time installation charges (if applicable)	1	**15,000**	10,000	10,000
2.	Annual Recurring charges of link for 1st Year	1	**2,16,000**	3,00,000	4,01,200
3.	Annual Recurring charges of link for 2nd Year	1	**2,16,000**	5,00,000	4,01,200
Total			**4,47,000**	**8,10,000**	**8,12,400**

तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे M/s Maxtech, Kopargaon यांनी 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेसाठी देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकूण रक्कम रुपये ४,४७,०००/- + कर मात्र हि निम्नत्तम आहे. सबब, M/s Maxtech यांनी देऊ केलेल्या दराबाबत त्यांचेबरोबर चर्चा होऊन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव, मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता मिळणेकामी सादर करणेत आलेल्या दि.१५.१०.२०२० रोजीचे टिपणीवर दिलेल्या निर्देशाप्रमाणे, सदर विषयी दि.२१.१०.२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो., उपमुख्य कार्यकारी अधिकारी सो. व प्रशासकीय अधिकारी सो., माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे उपस्थितीत पुढीलप्रमाणे सविस्तर चर्चा करणेत आली.

संस्थानने 50 Mbps Internet Link हि भारत संचार निगम लि. (BSNL) यांचेमार्फत घेणेस प्राधान्य द्यावे अशी विनंती BSNL यांचे प्रतिनीधींनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांची प्रत्यक्ष भेटून केलेली

आहे. तसेच, याकामी ई-निविदेअंतर्गत त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये अधिकची सुट देण्याची तयारी दर्शविलेली आहे. सबब, BSNL यांचेमार्फत 50 Mbps Internet Link घ्यावयाची झाल्यास सदरची लिंक व सध्या कार्यान्वीत असलेल्या दोन 10 Mbps Internet Lease Link यांचा तुलनात्मक आढावा घेतला असता, पुढील बाबी निदर्शनास येतात. सद्यस्थितीत संस्थानमध्ये कार्यान्वीत असलेल्या इंटरनेट लिंकची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे.

Sr. No.	**Link Details**	**Period**	**Amount**	**Use**
01	M/s Bharti Airtel Ltd - 10 Mbps - Primary Link	14.03.2018 to 13.03.2020	3,80,000	IT Department
02	M/s Swiftmail –50Mbps – Secondary Link	July-2017 to July-2022	Donation	IT Department
03	Maxtech Broadband Pvt Ltd-10 Mbps	05.07.2019 to 04.07.2022	3,50,000	Saibaba Hospital

उपरोक्त नमुद अ.नं.०१ व ०२ ह्या इंटरनेट लिंक साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत online.sai.org.in ह्या वेबसाईटकरीता व संस्थानअंतर्गत इंटरनेट वापराकरीता Primary व Secondary Link या स्वरुपात कार्यान्वीत आहेत. अ.नं.०१ चा कालावधी दि.१३.०३.२०२० अखेर संपुष्टात आल्याने मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३०६ (१) अन्वये सदर लिंक पुरविणेकामी पुरवठाधारकास नविन पुरवठाधारकाची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

BSNL यांनी याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत 50 Mbps Internet Link साठी दोन वर्षाकरिता रक्कम रुपये ८,१२,४००/- + कर इतके दर देऊ केलेले आहेत. परंतु, दि.१४.१०.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे याकामी सादर केलेल्या सुधारीत दरांनुसार 50 Mbps Internet Link साठी ३,६४,०००/- + कर या वार्षिक दराप्रमाणे दोन वर्षाकरिता रक्कम रुपये ७,२८,०००/- + कर (One time installation charges वगळता) इतके दर देऊ केलेले आहेत. सदर प्रस्तावामध्ये BSNL च्या Lease Line चे फायदेही नमुद करणेत आलेले असून त्यामध्ये प्रामुख्याने लिंकचा पुर्ण क्षमतेने पुरवठा, आर्थिक बचत व सुरक्षीतता यांचा समावेश आहे.

M/s Bharti Airtel Ltd व M/s Maxtech यांचे मार्फत कार्यान्वीत प्रत्येकी 10 Mbps Internet Link व BSNL यांनी 50 Mbps Internet Link करिता देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे-

Sr. No.	**Link Details**	**Period**	**Amount**	**Annual Amount**	**Total**
01	M/s Bharti Airtel Ltd- 10 Mbps Internet Link	14.03.2018 to 13.03.2020	3,80,000	1,90,000	2,88,870 (for 20Mbps)
02	Maxtech Broadband Pvt 10 Mbps Internet Link	05.07.2019 to 04.07.2022	2,96,610	98,870	
03	BSNL 50 Mbps Internet Link	Two Year	7,28,000	3,64,000	3,64,000 (for 50Mbps)

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे M/s Bharti Airtel Ltd व M/s Maxtech यांचे मार्फत कार्यान्वीत प्रत्येकी 10 Mbps Internet Link म्हणजेच 20 Mbps Internet Link साठी संस्थानला वार्षिक रक्कम रुपये २,८८,८७०/- + कर इतकी रक्कम अदा करावी लागते. सदर रकमेप्रमाणे 50 Mbps Internet Link साठी अपेक्षीत वार्षिक खर्च रक्कम रुपये ७,२२,१७५/- + कर इतका आहे. तर, BSNL दि.१४.१०.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावानुसार 50 Mbps Internet Link साठी एका वर्षाकरिता रक्कम रुपये ३,६४,०००/- + कर (One time installation charges वगळता) याप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

BSNL यांनी सुधारीत प्रस्तावानुसार देऊ केलेले वार्षिक दर रक्कम रुपये ३,६४,०००/- + कर (One time installation charges वगळता) मात्र हि रक्कम याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत

प्राप्त झालेल्या निम्नत्तम दर रक्कम रु. २,१६,०००+ कर (One time installation charges वगळता) यापेक्षा जास्त आहेत, परंतु पुढील बाबींचा विचार करता BSNL यांचेमार्फत 50 Mbps Internet Link कार्यान्वीत करणे हितावह ठरेल.

BSNL हि Class 'A' प्रकारची सरकारी कंपनी आहे. सबब, BSNL यांचेमार्फत सदरची 50 Mbps Internet Link हि संस्थानला थेट प्राप्त होणार आहे. परंतु, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Maxtech हि Class 'B' प्रकारची खाजगी कंपनी आहे. सबब, M/s Maxtech हे 50 Mbps Internet Link हि Class 'A' प्रकारचे पुरवठाधारकाकडून घेऊन संस्थानला पुरविणार आहेत.

M/s Maxtech हे 50 Mbps Internet Link हि Class 'A' प्रकारचे पुरवठाधारकाकडून घेऊन संस्थानला पुरविणार असूनही त्यांनी देऊ केलेले दर हे निम्मत्तम असल्याने त्यांचेमार्फत सदरची Link पुर्ण क्षमतेने पुरविणेबाबत तसेच Link ची अखंडता व सुरक्षितता या बाबींबाबत स्वयंस्पष्टता दिसुन येत नाही.

BSNL यांचेमार्फत 50 Mbps Internet Link हि संस्थानला उपलब्ध झालेनंतर सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान विभागात M/s Bharti Airtel Ltd यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या 10 Mbps Internet Link सह श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय विभागासाठी कार्यान्वीत असलेल्या 10 Mbps Internet Link चीही गरज सदरचे Link मध्ये पुर्ण होऊ शकते. सबब, संस्थानअंतर्गत सर्व विभागांकरिता एकच Internet Link चा वापर होऊ शकतो. पर्यायाने श्री साईबाबा रुग्णालय येथे कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link हि बंद करता येईल व त्यामुळे संस्थानचा आर्थिक फायदा होईल.

BSNL यांचे शिर्डी कार्यालय यांनी दुरसंचार विभाग, केंद्रीय दळणवळण मंत्रालय यांचेमार्फत सरकारी कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line चे वापराबाबतचे दि.१२.१०.२०२० रोजीचे कार्यालयीन निवेदनाबाबत अवगत केले असून सदर निवेदनाची प्रत सादर केलेली आहे.

सदर निवेदनामध्ये नमुद केलेप्रमाणे केंद्र सरकारने नुकतेच केंद्र सरकारचे सर्व मंत्रालये व कार्यालयामध्ये कार्यालयीन वापरासाठी BSNL व MTNL यांचे internet/ broadband, landline and leased line वापरणेस सक्ती केलेली असून याबाबत आदेश पारीत केलेला आहे. त्यास अनुसरुन राज्य सरकारचे सर्व कार्यालये, संस्था व सार्वजनिक कार्यालयांमध्ये कार्यालयीन वापरासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line वापरणेबाबत विचार करणेत यावा, असे नमुद करणेत आलेले आहे. सदर परिपत्रकाची प्रत सर्व राज्यांचे मा.मुख्य सचिवांना अग्रेषित करणेत आली आहे.

सविस्तर चर्चेअंती देणेत आलेल्या निर्देशानुसार BSNL हि केंद्र सरकारी कंपनी असल्याने सुरक्षितता व कार्यक्षमतेच्या दृष्टीने त्यांचेमार्फत 50 Mbps Internet Link उपलब्ध करुन घेणे हितावह ठरेल. तसेच दुरसंचार विभाग, केंद्रीय दळणवळण मंत्रालय यांचेमार्फत सरकारी कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line चा वापराबाबत दि.१२.१०.२०२० रोजी कार्यालय निवेदन प्रसिद्ध केलेले आहे. सदर निवेदनामध्ये राज्य सरकारचे सर्व कार्यालये, संस्था व सार्वजनिक कार्यालयांमध्ये कार्यालयीन वापरासाठी BSNL व MTNL यांचे Internet / Broadband, landline and leased line वापरणेबाबत विचार करणेत यावा, असे नमुद करणेत आलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस व BSNL यांनी याकामी सादर केलेल्या सुधारीत दरांनुसार रक्कम रुपये ३,६४,०००/- + कर या वार्षिक दराप्रमाणे दोन वर्षाकरिता रुपये ७,२८,०००/- + कर (One time installation charges वगळता) याप्रमाणे त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.५१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या वेबसाईटचे तसेच संस्थानअंतर्गत Internet वापरासाठी 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस व BSNL यांनी याकामी सादर केलेल्या सुधारीत दरांनुसार रक्कम रुपये ३,६४,०००/-+कर या वार्षिक दराप्रमाणे दोन वर्षाकरिता रुपये ७,२८,०००/-+कर (One time installation charges वगळता) याप्रमाणे त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)

विषय नं.६४ **मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५x२) क्षमतेच्या पवनचक्की यंत्रणेचे वीज विक्रीचे उत्पन्नात आर्थिक हित साधण्याच्या दृष्टीने पॅनलवरील ॲडव्होकेट श्री.संजय आर.चौकीदार यांचेकडील प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार कन्सल्टंट यांची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) याठिकाणी सन २००७ मध्ये अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतापासून विद्युत निर्मिती करणेकरीता मे.सुझलॉन एनर्जी लि., पुणे यांचेमार्फत २.५ मेगावॅट (१.२५ वॅट x २) क्षमतेचा पवनचक्की प्रकल्प उभारलेला आहे. साईबाबा संस्थान व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमध्ये वीज विक्रीबाबत दि.१९-०४-२००८ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. हा करारनामा दि.१४-०८-२००७ या तारखेपासून पुढे १३ वर्षे होता. त्यानुसार करारनाम्याची मुदत ही दि.१३-०८-२०२० रोजी संपली आहे.

त्यानुसार ०३ महिनेकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारणेस व त्याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेतस्थळावर जाऊन ऑलाईन ॲप्लिकेशन करणेस व सध्याचा दर हा २.५२ इतका असून तो स्विकारणेस तसेच २.५ मेगावॅट (१.२५ वॅट x २) पवनचक्की यंत्रणेचा वीज विक्रीचा (पीपीए) करारनामा करणेचे प्रस्तावास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळालेली आहे. सदरचा चक्रीय पध्दतीचा ठराव दि.१०-०८-२०२० रोजी विद्युत विभागास प्राप्त झालेला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

DECISION :

1. The concerned head of the department shall supply the entire record in this regard to the Advocate on Panel of sansthan within 15 days form today for his opinion to achieve financial interest of the Sansthan, Conceerned head of the department of the Sansthan shall report the compliance to the committee.

2. The Sansthan is allowed to the into contract with MSEDCL for a period of three months as proposed in the office note.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०२ नुसार दि.१२-०८-२०२० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने करारनामा करण्यात आला आहे. सदर करारनामा करतेवेळेस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेतस्थळावर पुढील प्रत्येक महिन्याची १ तारीख स्विकारत असल्यामुळे करारनामा दि.०१-०९-२०२० ते दि.३०-११-२०२० असा तीन महिने करण्यात आला आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०१ नुसार संस्थान पॅनेल वरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांना वीज विक्रीचे उत्पन्नात संस्थानचे आर्थिक हित साधण्याच्या दृष्टीने दि.२०-०८-२०२० रोजी वींडमिल संबंधीचे कागदपत्र ई-मेल व पत्राव्दारे अवलोकनार्थ पाठविण्यात येऊन त्याबाबतचा अभिप्राय कळविणेबाबत सांगण्यात आलेला होता. त्यानुसार ॲडव्होकेट-श्री.संजय आर.चौकीदार यांनी संस्थानला दि.२८-०८-२०२० रोजी ई-मेल पाठवून पुढीलप्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे.

I HAVE GONE THROUGH THE PAPERS MADE AVAILABLE TO ME VIA E-MAIL. IN MY OPINION, SANSTHAN SHOULD ACCEPT THE RECOMMENDATION OF SUZLON COMPANY STATED IN OPINION DATED MAY 4 2020 WHICH READS THUS

"" 2. CAPTIVE; IT IS HIGHLY RECOMMENDED THAT GENERATOR HAVING POWER CONSUMPTION REQUIREMENTS WITH CONTRACT DEMAND OF 1 MW AND ABOVE SHOULD CONSIDER SWITCHING TO SELF -USE OF THE GENERATED POWER.""

IT IS ADVISABLE TO APPOINT CONSULTANT TO EXERCISE THE ABOVE OPTION WHICH WOULD SAVE LOT OF REVENUE AS SANSTHAN IN NEWLY EXECUTED AGREEMENT SELLING POWER AT RATE LESS THAN 2.50 PAISE PER UNIT WHEREAS PURCHASING POWER AT A RATE OF RS 11 PER UNIT. CONSIDERING ABOVE, IT IS RECOMMENDED TO EXPLORE THE POSSIBILITY

OF SELF USE IF IT IS ECONOMICALLY VIABLE BY SOLICITING OPINION OF TECHNICAL EXPERT IN THE FIELD.

AS REGARDS RECOVERY OF OUTSTANDING DUES,AN AGREEMENT OR PROPOSAL SHOULD BE SUBMITTED TO MSEDL FOR ADJUSTMENT OF DUES PAYABLE TO SANSTHAN AS AGAINST BILLS RAISED BY MSEDL. IN THE EVENT IN A SPECIFIED TIME , PROPOSAL SUBMITTED IS EITHER NOT RESPONDED OR REJECTED THEN FURTHER COURSE OF RECOVERY MAY BE RESORTED THROUGH COURT PROCESS

मा.ॲडव्होकेट, श्री. संजय आर.चौकीदार यांचे ई-मेलचे मराठी भाषांतर खालीलप्रमाणे.

मला ई-मेलद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रानुसार माझ्या मते, संस्थानने दिनांक ०४-०५-२०२० रोजीचे सुझलॉन कंपनीचे पत्रानुसार सुझलॉन कंपनीची शिफारस मान्य करावी.

"" 2. कॅप्टिव्ह; पध्दतीने संस्थानने १ मेगा वॅट आणि त्यापेक्षा जास्त कराराच्या मागणीसह वीज वापराची आवश्यकता असलेल्या वीजनिर्मितीचा वीज वापरासाठी वापर करावा, अशी अत्यंत शिफारस केली जाते. "

वरील पर्याय वापरण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यास सूचविले जाते ज्यामुळे संस्थानला नव्याने अंमलात आलेल्या करारामध्ये प्रति युनिट २.५० पैसे पेक्षा कमी दराने विक्री करण्यात येते तर संस्थानला रु. 11 प्रति युनिट आकारली जाते. या बाबींचा विचार केल्यास, या क्षेत्रातील तांत्रिक तज्ञांच्या मताद्वारे शक्य असल्यास आर्थिकदृष्टया व्यवहार्य असल्यास स्वतः करीता वापराची शक्यता पडताळून पाहणे गरजेचे आहे.

संस्थान वापरत असलेल्या वीज बीलात थकबाकी किंवा योग्य समायोजन करण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीशी पुन्हा पत्रव्यवहार केल्यानंतर जर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून प्रतिसाद मिळाला नाही किंवा प्रस्ताव नाकारला गेला तर आपण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीशी केलेल्या कराराची अंमलबजाबवणी करण्यासाठी न्यायालयीन यंत्रणेव्दारे पुढील मार्ग स्विकारला पाहिजे असे मत आहे. उपरोक्तप्रमाणे संस्थानचे पॅनेलवरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला आहे.

नविन करारनाम्यानुसार वींडमील वीज विक्रीचा दर हा आधीच्या करारनाम्याच्या तुलनेत फारच कमी आहे. आधीच्या करारनाम्यातील दर रु. ५.३० इतका होता व नविन करारनाम्यातील सध्याचा वीज विक्रीचा दर हा रु.२.५२ इतका आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी रु.१०/- प्रति युनिट यापेक्षा जास्त आकाराने वीज बील आकारणी करते याकरीता वींडमील पासून निर्माण होणा-या वीजेचे युनिट संस्थानच्या वीज वापराच्या युनिट मधून वजा होऊन राहिलेल्या युनिटचे बील संस्थानला आकारण्यात येते अशा Open Acces पध्दतीचा वापर करावयाचा झाल्यास संस्थानचे एका ठिकाणाच्या कनेक्शनचा वीजभार हा 1MW इतका असणे आवश्यक आहे. परंतू संस्थानच्या विविध ९ ठिकाणचे उच्चदाब वीज कनेक्शन पैकी कोणत्याही एका ठिकाणचा वीजभार 1MW इतका नाही. सर्व ९ ठिकाणे मिळून एकुण वीजभार हा साधारण 3.6MW इतका होत आहे. Open Acces व्दारे वीज विक्री करणे झाल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी Transmission Charges, Wheeling Charges इ.चार्जेसची आकारणी करते. संस्थानचे ॲडव्होकेट, श्री.संजय चौकीदार यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुपालनाचा अहवालानुसार वींडमील पासून निर्माण होणारी वीज Open Acces पध्दतीने संस्थान वापराकरीता सदर क्षेत्रातील सल्लागाराची नेमणूक करावी असे मत असल्याने कन्सल्टंट नेमणेकरीता जादा खपाच्या मुंबई येथील इंग्रजीतील एका वर्तमानपत्रात, पुणे येथील मराठीतील एका वर्तमानपत्रात तसेच स्थानिक मराठीतील एका वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी सादर करावा लागणार आहे.

मागणी :- श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ वॅट x २) क्षमतेच्या पवनचक्की यंत्रणेचे वीज विक्रीचे उत्पन्नात आर्थिक हित साधण्याच्या दृष्टीने पॅनेलवरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांचेकडील प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार सदर क्षेत्रातील सल्लागार यांची नेमणूक करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

निर्णय क्र.५१७ सदरचे विषयास चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली असल्याने आजचे सभेत सदरचा विषय मागे घेण्यात आला. (कार्यवाही-विद्युत विभाग)

विषय नं.६५ **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०२०-२१ या वर्षासाठी देणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदामधील निम्नतम दर निविदाधारकाशी वाटाघाटी / चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे विद्युत विभागाकरीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

०१	खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल	श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ या वर्षासाठी देणे.
०२	मागणी	-
०३	ई-निविदा प्रसिध्दी	०१). दि.२३-०३-२०२० ते दि.१५-०६-२०२०
०४	वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ?	www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, वर्तमानपत्रात व पुरवठाधारकांना ई-मेल व्दारे.
०५	तर तसे, कोणाला पाठविले ?	०१). दि.२०-०३-२०२० रोजी ४७ पुरवठाधारकांना ई-मेलव्दारे कळविले.
०६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	दि.२३-०३-२०२०, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून टेक्निकल बीड दि.१५-०७-२०२० कमर्शियल बीड दि.०७-०९-२०२०
०७	प्राप्त निविदाकारांची संख्या.	०३
०८	पात्र निविदाकारांची संख्या.	०३
०९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का.	नमुने मागविण्यात आले नाही.
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का.	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे.
११	जर नमुने दिले नाही, तर का.	ई-निविदेत नमूद केले आहे.
१२	निविदाकारांनी सादर केलेले दर-	

अ.क्र.	निविदाधारकाचे नांव	ई-निविदा रक्कम रुपये
१	मे.कर्म सेल्स ॲण्ड सर्व्हिस, रायपूर	रु. ४६,००,०००/-
२	मे.ट्रायडेन्ट सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे	रु. ४४,४३,०००/-
३	**मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद**	**रु. ४३,५३,७४९/-**

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर

अ.क्र.	वर्ष	परिमाण	दर प्रती सेट रु.
-	-	-	-

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल-

अ.क्र.	तपशिल	वर्ष	खर्च परिमाण
-	-	-	-

१५	सध्याची शिल्लक स्थिती	-
१६	मागील वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टची रक्कम	रु. ४०,५०,०००/-
१७	मागील ठेकेदाराचे नाव	मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद
१८	सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर	उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखील केलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस,औरंगाबाद यांचे न्युनतम दर रक्कम रु. ४३,५३,७४९/- इतके येतात.
१९	सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव	मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद
२०	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का.	होय.
२१	सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे.	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारीअधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) तथा प्र.कार्यकारी

		अभियंता, आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत)
२२	इस्टिमेट कॉस्ट	०१). रु. ४१,००,०००/-

२३). **संक्षिप्त टिप :-** विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०३ निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यात तीन निविदाधारक पात्र झालेले आहे. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या तीन निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.०७-०९-२०२० रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे न्युनतम दर रक्कम रु. ४३,५३,७४९/- इतके येत आहे.

तरी न्युनतम दरधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचेशी ई-निविदेत दिलेल्या दराबाबत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५१८ **प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक यांचे प्रतिनिधी श्री.किशोर चौधरी, औरंगाबाद हे समितीसमोर चर्चा/ वाटाघाटीकरीता उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी ई-निविदेमध्ये नमुद केलेले दर रक्कम रु.४३,५३,७४९/-ऐवजी रक्कम रु.४२,००,०००/-मात्र दर देऊ केले.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट दि. ०१ जानेवारी, २०२१ ते दि. ३१.१२.२०२१ या कालावधी करीता देणेकामी निम्नतम दरधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु.४२,००,०००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

विषय नं.६६ **नविन पाणीपुरवठा साठवण तलाव याठिकाणी वीजजोडणी करुन घेणकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरणाचे काम करणेसाठी येणा-या खर्चास तसेच दरपत्रके मागविणे, संस्थानचे वेबसाईटवर दरपत्रक नोटीस प्रसारीत करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठीचा अध्यादेश दि.१३ जुलै, २०१७ अन्वये **अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.०५ (घ)** मुख्य कार्यकारी अधिका-यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरीता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलेली नसेल आणि ते त्या विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानला भेट देणा-या यात्रेकरुंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्याच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्यासाठी किंवा कोणतेही कार्य करण्याचा निर्देश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम,त्या विश्वस्त व्यवस्थेच्या निधीतून चुकती करता येईल.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे निमगांव (को-हाळे) शिवारातील गट नं.२४५/ १, २२१/१ व २२९ मध्ये साईभक्तांची दैनंदिन पाण्याची गरज भागविण्यासाठी साईभक्तांचे देणगी सहयोगातून साठवण तलावाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

सदर साठवण तलावावर पाणीपुरवठा विभागामार्फत मोटार पंपसेट बसविण्यात येणार असून याकामी ३ फेज वीज कनेक्शन जोडून मिळावे म्हणून मागणी करण्यात आली होती. त्यानुसार विद्युत विभागामार्फत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीज जोडणी करुन घेणेकरीता पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. वीज जोडणी करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने कळविलेल्या १.३ % सुपरव्हिजन चार्जेसची रक्कम

भरण्यात आली आहे. आता आपणास पाणीपुरवठा तलाव याठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे पत्रानुसार नविन साठवण तलावाचे ठिकाणी २५ केव्हीए ३ फेज ट्रान्सफॉर्मर बसूवन पोल उभे करणे, ओव्हरहेड कंडक्टर टाकणे इ.कामे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे इस्टिमेट प्रमाणे करावी लागणार आहेत. सोबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे इस्टिमेट जोडले आहे. इस्टिमेटनुसार आपणास काम करुन घ्यावयाचे असल्याने इस्टिमेट मध्ये नमूद केलेली १.३ % सुपरव्हिजन चार्जेसची रक्कम रुपये २,४४७.३८ वजा जाता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे इस्टिमेट नुसार सदरील कामास रु. १,८८,२६०.२३ इतका खर्च येणे अपेक्षित आहे. सदरील काम बाहेरील ठेकेदार यांचेकडून दरपत्रक मागवून करुन घ्यावे लागणार आहे.

मागणी :- नविन पाणीपुरवठा साठवण तलाव याठिकाणी वीजजोडणी करुन घेणेकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरणाचे काम करुन घेणेकामी येणा-या रक्कम रुपये १,८८,२६०.२३ + रु. २,४४७.३८ = रु. १,९०,७०७.६१ इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरचे काम करणेकरीता बाहेरील ठेकेदार यांना पोस्टाव्दारे कोटेशन पत्र पाठविणेस तसेच ई-मेलव्दारे कळविणेस व लाईन उभारणीचे कामाबाबत नोटीस संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामीचा व दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर दरपत्रके खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५१९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन पाणीपुरवठा साठवण तलाव याठिकाणी वीजजोडणी करुन घेणकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरणाचे काम करणेसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.१,९०,७०७.६१मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग)

विषय नं.६७ **श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत प्रस्तावीत असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पास अनिश्चीत कालावधीसाठी विलंब होत असल्याने त्याबाबतची सद्यस्थिती अवगत होणेकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय, मुंबई यांना तसेच संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग यांना Maha IT विभागाशी केलेल्या पत्रव्यवहाराबाबतचा प्रस्ताव अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील पुष्ठ क्र.३५५ वरील १४-२(घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) दि.०२/०५/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.१६, निर्णय क्र.३४५.

२) दि.०१/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.३३, निर्णय क्र.३७९.

३) दि.२६/०२/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२६, निर्णय क्र.१२१.

४) दि.०४/०७/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.१९, निर्णय क्र.३३१.

प्रास्ताविक - श्रीं चे मंदिर परिसरात सद्यस्थितीत कार्यान्वित असलेली सीसीटीव्ही यंत्रणा ही तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेली असल्याने तसेच संस्थानचे विविध विभाग व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणे आवश्यक असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये Smart Shirdi City Project कार्यान्वित होणेकामी महाराष्ट्र शासनाचे महाआयटी विभागाकडुन सुरु असलेल्या कार्यवाहीकरीता महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाने प्राईस वॉटर कूपर्स, (PwC) मुंबई या कंपनीची सल्लागार म्हणुन नियुक्ती केलेली आहे. Shirdi Smart City प्रकल्पाचे खर्चाबाबत प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केलेल्या प्रस्तावावर दि.०२/०५/२०२० रोजी सविस्तर चर्चा होवुन, " *प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या रक्कम रु.७२.५८ कोटी मात्रचे खर्चास व प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस*" मान्यता देण्यात आली आहे. सदर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, PwC यांनी सादर केलेल्या प्रस्तावास व त्यासाठी येणारे रक्कम रु.७२.५८ कोटी मात्रचे खर्चास महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मुंबई यांची मान्यता घेणेकामी दि.१७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

तसेच, Hon.Chairman & Managing Director, Maharashtra Information & Technology Corpn., महाराष्ट्र शासन यांनी Shirdi Smart City Project कार्यान्वित करणेसाठी रक्कम रु.७२.५८ कोटी

मात्र खर्चाची रक्कम त्यांचे विभागाकडे वर्ग करणेबाबत (Transfer of Funds to Maha IT Corporation Ltd.) दि.०७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविलेले होते.

त्यानुसार सदरचे खर्चाची रक्कम रु.७२.५८ कोटी महाआयटी विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करणेकामी सादर केलेल्या प्रस्तावावर दि.०१/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होवुन, "*Shirdi Smart City Project कार्यान्वित करणेसाठी खर्चाची रक्कम रु.७२.५८ कोटी महाआयटी विभाग, मुंबई यांचेकडे शासनाची मान्यता मिळाल्यानंतर कामाशी निगडीत टप्प्या-टप्प्याने वर्ग करण्यास*" *मान्यता देण्यात आली.*

सदर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.१७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरुन, महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाने दि.१७/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये "*श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम, २००४ च्या कलम २१(१) (क) व (ग) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थानमध्ये व शिर्डी शहरामध्ये सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत कार्यान्वित करण्यासाठी प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या रक्कम रु.७२.५८ कोटी मात्रचे खर्चास " मान्यता दिली आहे.*

सद्यस्थितीत Shirdi Smart City Project बाबत महाराष्ट्र शासनाकडुन निवीदा प्रक्रीयेद्वारे पुरवठाधारकाची निवड करणेबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. त्याबाबत Maharashtra Information Technology Corporation Ltd.(Maha IT) यांचे दि.०८/०७/२०१९ अन्वये संस्थानला पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्राद्वारे "*I therefore invite you to be a part of the TEC for the above tender evaluation planned in this week at Mantralaya, Mumbai*" असे कळविलेले होते. त्यास अनुसरुन, तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सोहब व प्र.सीसीटीव्ही विभागप्रमुख तसेच माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख हे सदर TEC मिटींगकामी (Technical Evaluation) दि.०४/०९/२०१९ रोजी मंत्रालय, मुंबई येथे समक्ष उपस्थित होते. सदर सभेमध्ये महाराष्ट्र शासनामार्फत राबविणेत येणा-या Shirdi Smart City Project करीता येणारे ७२.५८ कोटी मात्रचे खर्चास व सदरची खर्चाची रक्कम विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे वर्ग करणेकामी मा.मुबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत सुचित केलेले आहे.

त्यास अनुसरुन, Shirdi Smart City Project करीता येणारे खर्चास तसेच सदरची खर्चाची रक्कम महाराष्ट्र शासनाकडे वर्ग करणेस मा.मुबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी Civil Application मसुदा तयार करुन मिळणेबाबत संस्थान पॅनेलवरील ॲडव्होकेट श्री नितीन भवर यांना दि.२८/०९/२०१९ रोजीचे पत्रान्वये संस्थानचे विधी विभागामार्फत कळविण्यात आलेले असुन त्याबाबत आवश्यक असलेली कागदपत्रे महाआयटी विभागातील PwC कन्सलटंट यांचेकडुन घेवुन त्यांना देण्यात आलेली आहे.

तसेच, दि.२६/०२/२०१९ व दि.०४/०७/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन, श्री साईप्रसादालय, साईबाबा भक्तनिवास विभागात तसेच दि.१८/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरुन लाडु प्रसाद निर्मिती विभाग व इतर विभागाचे मागणीनुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेची कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत प्रस्तावीत असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पाअंतर्गत करण्यात येणार असलेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सादर करणेकामी दि.१८/११/२०१९ रोजीचे टिपणीन्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर "*अद्याप वाणिज्यीक निविदा उघडण्यात आलेली नाही. वाणिज्यीक निविदेत L1 जो ठेकेदार येईल त्याचा ठराव Ad-hoc समितीसमोर मांडुन मंजुर केल्यानंतर विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करावा व तदनंतरच मा.कोर्टात Civil Application दाखल करणे योग्य राहील, असे नम्र मत आहे तसेच या संदर्भात पुर्वी मा.उच्च न्यायालयाचे दाखल petition मधील निर्णयाचे अवलोकन करुन कार्यवाही करावी*" असे निर्देश देण्यात आलेले आहे.

सदर निर्देशास अनुसरुन, महाराष्ट्र शासनाअंतर्गत शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये प्रस्तावित असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पाची वाणिज्यीक निविदाबाबतची व प्रकल्प कार्यान्वित होणेबाबतचे कार्यवाहीस विलंब होत असल्याने श्री साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने श्रींचे समाधी मंदिर व संस्थान परीसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी दि.०६/०६/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सल्लागार नेमणुकीबाबतचे निर्णयाची प्रत तसेच पेंटागॉन ऑटोमेशन कन्सेप्ट यांनी दाखल केलेला अर्ज व सीसीटीव्ही खरेदीचे प्रक्रियेकामी

संस्थानने सल्लागार नेमणुकीबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दि.०७/०८/२०१५ अन्वये खालीलप्रमाणे आदेश केलेला आहे.

1.We have heard Mr. Jadhav, the learned counsel for the applicant. Mr.Choukidar, the learned counsel submits that, the application has become infructuous as the CCTV contract for surveillance temple is cancelled.

2. Mr. Choukidar, the learnded counsel submits that the " Sansthan would appoint an expert for evaluation of entire project. "

3. In view of the said statement made, the civil application dose not require any adjudication. The civil application is disposed of.

दि.२४/०७/२०१९ रोजीचे पत्रासोबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांना अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सादर करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, दि.१८/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाने "शासनाचे माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सदर प्रकल्प राबविण्याकरीता सल्लागाराची नेमणुक करुन निविदा प्रसिध्द केलेली आहे. सदर निविदा प्रक्रीया अंतीम टप्प्यावर असून सदर प्रकल्प माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत राबविण्यात येणार आहे. यासाठी माहिती तंत्रज्ञान महामंडळास निधी उपलब्ध करुन द्यावा"

" स्मार्ट शिर्डी प्रकल्पअंतर्गत श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये Security Surveillance यंत्रणा लवकरात-लवकर कार्यान्वित होण्यासाठी आपल्या स्तरावर माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठपुरावा करण्यात यावा" असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच संस्थानचे विधी विभागाने "*मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टातील पी.आय.एल.नं.१२०/२०१९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०९/१०/२०१९ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेकामी तदर्थ समितीची (Ad-hoc) समितीची नेमणुक केलेली आहे. सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे (Ad-hoc) सभेपुढे सादर करुन त्यास मा.तदर्थ समितीने (Ad-hoc) मान्यता दिल्यानंतर सिव्हील अर्ज मा.उच्च न्यायालयात दाखल करता येईल. तरी, सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे (Ad-hoc) सभेपुढे सादर करुन निर्णय घेणेत यावा, जेणेकरुन प्रकरणी सिव्हील अर्ज तयार करुन दाखल करणेची कार्यवाही करता येईल* " असे दि.२५/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेले होते. तसेच मा.नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील, महाराष्ट्र विधानसभा यांनी "*तिर्थस्थानाचे आंतरराष्ट्रीय महत्व विचारात घेवुन शिर्डी, ता.राहाता येथे संपुर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, सिक्युरीटी सर्व्हिलंस यंत्रणा स्थापित करणे, स्मार्ट सिटी प्रोजेक्ट कार्यान्वित करणे इत्यादी बाबतच्या संयुक्त प्रस्तावास तातडीने मंजुरी देणेबाबत उचीत कार्यवाही करणेबाबत* " दि.०५/०३/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेले होते.

सबब, दि.२८/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाने तसेच दि.२५/०२/२०२० अन्वये संस्थानचे विधी विभागाचे व दि.०५/०३/२०२० रोजीचे पत्रान्वये मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कळविलेनुसार Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती संस्थानला अवगत होणेकरीता महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मुंबई, माहिती तंत्रसंचनालय विभाग, महाआयटी विभाग यांना दि.२९/०४/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले असुन सदर पत्र ई-मेलद्वारे देखील त्यांना पाठविण्यात आलेले आहे.

श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा व तद्अनुषंगीक तांत्रिक साहित्य लवकरात-लवकर अद्यावत होणे आवश्यक व गरजेचे असल्याने प्रस्तावित Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती संस्थानला अवगत होणेबाबतचे पत्रावर माहिती तंत्रज्ञान विभागाचे मा.प्रधान सचिव सो. यांनी दि.३०/०४/२०२० रोजीचे ई-मेल अन्वये महाआयटी विभागाचे संचालक यांना "Please give status of Shirdi Project asap as per trailing mail.Thx." असे निर्देश दिलेले आहे. परंतु, महाआयटी विभागाकडुन अद्यापपर्यंत कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांना पुनःश्च संस्थानने दि.२९/०४/२०२० रोजीचे पत्राचे व माहिती तंत्रज्ञान विभागाचे मा.प्रधान सचिव यांनी निर्देशित केलेनुसार दि.०१/०६/२०२० रोजीचे ई-मेल द्वारे महाआयटी विभागास प्रस्तावित Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती संस्थानला अवगत होणेकामी कळविण्यात आलेले आहे.

परंतु, महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मुंबई व महाआयटी विभागाकडुन Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती संस्थानला अद्यापपर्यंत अवगत झालेली नाही. तसेच महाराष्ट्र शासनामार्फत सुरु असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पास अनिश्चत कालावधीसाठी विलंब होत आहे. श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने

श्रींचे समाधी मंदिर व संस्थान परीसरात सीसीटीव्ही यंत्रणा व तद्अनुषंगीक तांत्रिक साहित्य लवकरात-लवकर अद्यावत होणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेशात नमुद केलेनुसार संस्थानमार्फत सल्लागार नेमणुकीच्या प्रस्तावावर दि.२८/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाने ***"शासनाचे माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सदर प्रकल्प राबविण्याकरीता सल्लागाराची नेमणुक करुन निविदा प्रसिध्द केलेली आहे. सदर निविदा प्रक्रीया अंतीम टप्प्यावर असून सदर प्रकल्प माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत राबविण्यात येणार आहे. यासाठी माहिती तंत्रज्ञान महामंडळास निधी उपलब्ध करुन द्यावा"***

" स्मार्ट शिर्डी प्रकल्पअंतर्गत श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये Security Surveillance यंत्रणा लवकरात-लवकर कार्यान्वित होण्यासाठी आपल्या स्तरावर माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठपुरावा करण्यात यावा" असे निर्देश दिलेले आहेत.

सबब, महाराष्ट्र शासनामार्फत सुरु असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पास अनिश्चत कालावधीसाठी होत असलेला विलंब विचारात घेता तसेच संस्थानला श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने श्रींचे समाधी मंदिर व संस्थान परीसरात सीसीटीव्ही यंत्रणा व तद्अनुषंगीक तांत्रिक साहित्य लवकरात-लवकर अद्यावत होणे आवश्यक व गरजेचे असल्याने सदरकामी तांत्रिक सल्लागार यांची नेमणुक होवुन कार्यवाही होणे अत्यंत आवश्यक व अपेक्षित आहे.

सबब, उपरोक्त विवेचनास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत प्रस्तावित असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पास अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने त्याबाबतची सद्यस्थिती मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे अवलोकनार्थ सादर करता येईल, असे इकडील विभागाचे नम्र मत होते. त्यानुसार, दि.१७/०७/२०२० रोजीचे टिपणीन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु, सदर प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहे.

१) IT विभागास पत्र पाठवुन सद्यस्थिती मागवा.

२) TCS चे Expert यांनी MHIT विभागाशी संपर्क साधावा.

३) शासनाकडुन माहिती प्राप्त झाल्यानंतर योग्य तो निर्णय प्रशासन स्तरावर घेण्यात यईल.

असे निर्देश देणेत आलेले आहे.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत प्रस्तावित असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पास अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने Shirdi Smart City प्रकल्पाबाबत सद्यस्थिती संस्थानला अवगत होणेकरीता महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभाग, मुबई, Maha IT विभाग यांना **तसेच** प्रकल्पाचा पाठपुरावा TCS यांचे Expert यांचेमार्फत Maha IT विभागाशी समन्वय साधुन होणेकामी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागास पत्राद्वारे कळविता येईल. तसेच सदर पत्राची प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांना माहितीस्तव देता येईल.

सबब, महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत सुरु असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पाची उपरोक्त सुरु असलेली कार्यवाही मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सादर करणे उचित ठरेल.

विभागाचा अभिप्राय – उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेनुसार, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत प्रस्तावित असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पास अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने Shirdi Smart City प्रकल्पाबाबत सद्यस्थिती संस्थानला अवगत होणेकरीता महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभाग, मुबई, Maha IT विभाग यांना **तसेच** प्रकल्पाचा पाठपुरावा TCS यांचे Expert यांचेमार्फत Maha IT विभागाशी समन्वय साधुन होणेकामी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागास पत्राद्वारे कळविता येईल. तसेच सदर पत्राची प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांना माहितीस्तव देता येईल.

सबब, महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत सुरु असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पाची उपरोक्त सुरु असलेली कार्यवाही मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सादर करणे उचित ठरेल, असे इकडील विभागाचे नम्र मत आहे.

विभागाचा प्रस्ताव - उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत प्रस्तावित असलेल्या Shirdi Smart

City प्रकल्पास अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने Shirdi Smart City प्रकल्पाबाबत सद्यस्थिती संस्थानला अवगत होणेकरीता महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभाग, मुबई, Maha IT विभाग यांना **तसेच** प्रकल्पाचा पाठपुरावा TCS यांचे Expert यांचेमार्फत Maha IT विभागाशी समन्वय साधुन होणेकामी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागास पत्राद्वारे कळविता येईल. तसेच सदर पत्राची प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांना माहितीस्तव देता येईल.

सबब, महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत सुरु असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पाची उपरोक्त सुरु असलेली कार्यवाही मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.५२० यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागामार्फत प्रस्तावीत असलेल्या Shirdi Smart City प्रकल्पास अनिश्चीत कालावधीसाठी विलंब होत असल्याने व सदर प्रकल्पाची सद्यस्थिती संस्थानला अवगत नसल्याने तिरुपतीच्या धर्तीवर श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये Security Surveillance यंत्रणा कार्यान्वीत करणेसाठी अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमारे सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)

विषय नं.६८ श्रींचे मंदिर परिसरात सुरक्षीततेच्या दृष्टीने तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेले सीसीटीव्ही कॅमेरे व तदनुषंगीक बदलुन नव्याने सीसीटीव्ही कॅमेरे व तदनुषंगीक आवश्यक ते साहित्य खरेदी करणेस व आवश्यक त्या कॅमे-यांचा Backup कालावधी एक वर्षाचा करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

प्रस्ताव- श्रीं चे मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली सीसीटीव्ही यंत्रणा संरक्षण विभागामार्फत व्हेन्टेज इंटीग्रेटेड सेक्युरीटी सोल्युशन प्रा.लि., नोएडा कंपनीकडुन सन २०११ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेली होती. सदर सीसीटीव्ही यंत्रणेस ०९ वर्षाचा कालावधी उलटुन गेलेला आहे. तसेच सदर यंत्रणेतील बरेचसे कॅमेरे, तांत्रिक साहित्य सध्या वारंवार बंद पडत असुन सदर यंत्रणा ही तांत्रिक दृष्टया कालबाहय झाल्याने तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर यंत्रणा दुरुस्तीकामी सीसीटीव्ही यंत्रणेतील तज्ञ श्री वज्रेश गुजराथी (आय टॅलेंन्ट मेडीया), अहमदनगर यांना तसेच श्री मंदार मुळे, अहमदनगर यांना आमंत्रित केले होते.

परंतु, सदर यंत्रणेतील सीसीटीव्ही कॅमेरे व तांत्रिक साहित्य हे तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेले असल्या कारणाने त्यांना देखील सदर यंत्रणा दुरुस्त करता आलेती नाही. तसेच सदरहु यंत्रणा ही जुनी झालेली असल्या कारणाने ती कधी व केव्हा बंद पडेल याची शास्वती देता येत नाही. तसेच सदरकामी यंत्रणा कार्यान्वित केलेल्या व्हेन्टेज इंटीग्रेटेड सेक्युरीटी सोल्युशन प्रा.लि., नोएडा या कंपनीचे प्रतिनीधींना सदर यंत्रणा दुरुस्तीकामी आमंत्रित करण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी शिर्डी येथे येवुन सदर यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी केली असुन, सदर तांत्रिक दृष्टया कालबाहय व नादुरुस्त झालेली सीसीटीव्ही कॅमेरे व तांत्रिक साहित्य दुरुस्तीकामी रक्कम रु.२८,०४,२६०/- मात्र (सर्व करांसहीत) व त्याची वार्षिक दुरुस्ती व देखभालकामी (AMC) रक्कम रु.४६,९६,९९०/- मात्र (सर्वकरांसहीत) असे एकत्रित रक्कम रु.७५,०१,२५०/- मात्र (सर्वकरांसहीत) (अक्षरी रक्कम रुपये पंच्याहत्तर लाख एक हजार दोनशे पन्नास) इतका दि.१८/१२/२०१८ रोजीचे प्रस्तावाद्वारे खर्च कळविलेला होता.

तथापी, व्हेन्टेज इंटीग्रेटेड सेक्युरीटी सोल्युशन प्रा.लि., नोएडा यांनी कळविलेल्या खर्चाचा सारासार विचार करता, सदर खर्चात सध्याची सीसीटीव्ही कॅमेरे व तांत्रिक साहित्य दुरुस्त करुन त्याचे वार्षिक दुरुस्ती व देखभालकामी होणा-या एकत्रित रक्कम रु.७५,०१,२५०/- मात्र (सर्वकरांसहीत) (अक्षरी रक्कम रुपये पंच्याहत्तर लाख एक हजार दोनशे पन्नास) रक्कमेत संस्थानला नविन अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित होवु शकते. त्यामुळे जुन्या यंत्रणेवर दुरुस्ती व देखभालीकामी रक्कम रु.७५,०१,२५०/- मात्र (सर्वकरांसहीत) खर्च करणे संस्थानला उचित व हितावह होणार नाही.

तसेच शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत Shirdi Smart City Project बाबत सुरु असलेल्या कार्यवाहीस अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने सदर कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेऐवजी सदरकामी संस्थानमार्फत तज्ञ सल्लागाराची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे नेमणुक करुन नियुक्त सल्लागाराचे मार्गदर्शनानुसार ई-निवीदा प्रक्रीया राबवुन संस्थानचे सर्व विभागात त्यांचे मागणीनुसार अद्यावत सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक तांत्रिक साहित्य उभारणीबाबतची कार्यवाही तातडीने पुर्ण करणेस व सल्लागार नेमणुकीकामी येणारे अंदाजे

रक्कम रु.११,५०,०००/- + Tax मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव दि.०४/०१/२०१९ रोजीचे मंजुर टिपणीन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर तत्कालीन उपजिल्हाधिकारी सो. यांनी " प्रथम शासन स्तवरावरील याबाबतची निवीदा प्रक्रिया रद्द करणे आवश्यक राहील. यासाठी मा.व्यवस्थापन समितीत धोरणात्मक निर्णय घेणे योग्य राहील " असे निर्देशीत करुन त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी "Already धोरणात्मक निर्णय झालेला आहे आणि शासन स्तरावर Tender सुरु आहे. प्रस्ताव नामंजुर" असे लिखीत आदेश दिलेले आहे.

सबब, शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मार्फत Shirdi Smart City Project बाबत सुरु असलेल्या कार्यवाहीस अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने सदर कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेऐवजी सदरकामी संस्थानमार्फत तातडीने सीसीटीव्ही क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे नेमणुक करुन नियुक्त सल्लागाराचे मार्गदर्शनानुसार सदरकामी निवीदा प्रक्रीया राबवुन संस्थानचे सर्व विभागात अद्यावत सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक तांत्रिक साहित्य उभारणीकामी कार्यवाही होणे अत्यंत आवश्यक असल्याने पुनःश्च दि.०३/०५/२०१९ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर दि.०६/०६/२०१९ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होवुन, "संस्थानचे सर्व विभागात अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीकामी सीसीटीव्ही क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची नेमणुक करणेकामी विहीत पद्धतीने ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१५,५०,०००/-+Tax मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे माहिती तत्रज्ञान आणि विधी व न्याय विभाग यांचेकडे पाठविण्यात यावा" असे ठरले.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सदर निर्णयाबाबतचे प्रस्तावित कार्यवाहीची प्रत दि.२४/०७/२०१९ रोजीचे पत्रान्वये मा.प्रधान सचिव सो., महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविण्यात आली होती. सदर पत्रास अनुसरुन **महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२८/११/२०१९ राजीचे पत्रान्वये *"शासनाचे माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सदर प्रकल्प राबविण्याकरीता सल्लागाराची नेमणुक करुन निविदा प्रसिध्द केलेली आहे. सदर निविदा प्रक्रीया अंतीम टप्प्यावर असून सदर प्रकल्प माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत राबविण्यात येणार आहे. यासाठी माहिती तंत्रज्ञान महामंडळास निधी उपलब्ध करुन द्यावा"***

" ***स्मार्ट शिर्डी प्रकल्पाअंतर्गत श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये*** *Security Surveillance* ***यंत्रणा लवकरात-लवकर कार्यान्वित होण्यासाठी आपल्या स्तरावर माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठपुरावा करण्यात यावा***" असे निर्देश दिलेले आहेत.

सदर महाराष्ट्र शासनाचे निर्देशास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये कार्यान्वित होणा-या Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती अवगत होणेकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागास तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.२९/०४/२०२० रोजीचे पत्रान्वये तसेच दि.३०/०४/२०२० रोजीचे ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते.

उपरोक्त संस्थानचे पत्रावर मा.प्रधान सचिव सो., माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाचे महाआयटी विभागाचे संचालक सो. यांना दि.३०/०४/२०२० रोजीचे ई-मेलद्वारे " Please give status of Shirdi project asap as per trailing mail.Thx" असे कळविले आहे. तथापी, अद्याप देखील संस्थानला सदर प्रकल्पाची सद्यस्थिती महाराष्ट्र शासनाचे महाआयटी व विधी व न्याय विभाग, मुंबई तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांचेकडुन अवगत झालेली नाही. सदर Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती कार्यवाहीबाबतचा अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेचे मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडुन Shirdi Smart City Project बाबत उपरोक्त सरु असलेल्या कार्यवाहीबाबत एकंदरीत सर्वेसर्वा अवलोकन करता, सदर प्रकल्प त्यांचेकडुन केव्हा पुर्ण होईल याबाबत अनिश्चितता दिसुन येत आहे. त्याकरीता नव्याने सीसीटीव्ही यंत्रणे संबंधीत साहित्य खरेदी करणेपुर्वी प्रथम शासन स्तवरावरील याबाबतची सुरु असलेली निवीदा प्रक्रिया रद्द करणे आवश्यक राहील. त्याकरीता मा.व्यवस्थापन समितीत धोरणात्मक निर्णय घेवुन सदरकामी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दि.०७/०८/२०१५ रोजीचे आदेशात नमुद केलेनुसार संस्थानमार्फत तज्ञ सल्लागाराची नेमणुक करुन कार्यवाही करणेत यावी व त्याबाबत महाराष्ट्र शासनास कळविणे योग्य राहील, असे नम्र मत आहे.

तथापी, दि.०९/०९/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी श्रीं चे मंदिर परिसरातील आवश्यक त्या सीसीटीव्ही कॅमे-यांचा Backup चा कालावधी आवश्यकतेनुसार ३० दिवस ते एक वर्ष करणेच्या दृष्टीने प्रस्ताव दोन दिवसाचे आत सादर करणेबाबत प्र.माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख व सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख यांना निर्देश दिलेले होते. सदर निर्देशास अनुसरुन, माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख व सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख यांनी समक्ष मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो.यांचेशी चर्चा केली असता, चर्चेअंती उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेनुसार कार्यवाही विशद करुन, सद्यस्थितीतील कार्यरत श्रीं चे मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेले असल्याने नव्याने सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य खरेदी करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

सदर निर्देशास अनुसरुन, नव्याने सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य खरेदी करणेकामी अपेक्षीत अंदाजे खर्चाबाबत या क्षेत्रातील पुरवठाधारक मे. संजय टेलिकॉम, मुंबई यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी दि.१२/०९/२०२० रोजीचे प्रस्तावाद्वारे पुढीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

Sr.No.	Description of Goods	Make	Qty	Unit	Price	Amount
1.	IP dome fix lens camera 8MP	UNV/BOSCH/AXIS	15	Pcs.	15,000.00	2,25,000.00
2.	IP Bullet fix lens camera 8MP	UNV/BOSCH/AXIS	55	Pcs.	15,300.00	8,41,500.00
3.	NVR 32 channel with 16 HDD 10TB	UNV/BOSCH/AXIS	2	Pcs.	1,15,000.00	2,30,000.00
4.	Hard Disk 10TB	WESTERN DIGITAL/SEGATE/TOSHIBA	4	Pcs.	25,000.00	1,00,000.00
5.	Outdoor Enclosure for fix bullet camera IP65	HENSEL/REPUTED	1	Pcs	2,500.00	2,500.00
6.	Indoor Junction Box 5x5	STANDARD/REPUTED	1	Pcs.	70.00	70.00
7.	24 Port Managed POE + L2 10/100/1000 Giga Switch with 4SEP Giga ports	NETGEAR	1	Pcs.	25,000.00	25,000.00
8.	8 Port POE +L2 10/100/1000 Giga Switch with 1 SPF Giga ports 120W 220M POE support	XPIA	1	Pcs.	7,000.00	7,000.00
9.	RJ45 connectors CAT6	D-LINK/ DIGISOL	1	Pcs.	7.00	7.00
10.	SC-LC/SC OFC SM Patch cord 3 Meter	D-LINK/DGLINK	1	Pcs.	250.00	250.00
11.	SC-LC/SC OFC SM Patch cord 5 Meter	D-LINK/DGLINK	1	Pcs.	300.00	300.00
12.	HDMI cable 15Mtr.	STANDARD/REPUTED	1	Pcs.	1,000.00	1,000.00
13.	CAT6 cable UTP	D-LINK	1	Meter	23.00	23.00
14.	12 CORE SM OFC cable	STANDARD/REPUTED	1	Meter	27.00	27.00
15.	6 CORE SM OFC cable	STANDARD/REPUTED	1	Meter	19.00	19.00
16.	OFC Media Converter	D-LINK	1	Pcs.	4,500.00	4,500.00
17.	24 Port LIU Fully Loaded	D-LINK	1	Pcs.	12,000.00	12,000.00
18.	HDMI OFC Converter	STANDARD/REPUTED	1	Pcs.	25,000.00	25,000.00
19.	22 U Server Rack(800*1000mm)	D-LINK/ VALLRACK/REPUTED	1	Pcs.	55,000.00	55,000.00

	with 4 fan, cabel manager PDU					
20.	2KV Online UPS	APC/POWER SAFE/MICROTEK	1	Pcs.	31,000.00	31,000.00
21.	Cable Line charges along with pipe/ patti and all accessories.	SERVICE	1	Meter	70.00	70.00
22.	Installation of Cameras and Configuring the same in network	SERVICE	1	Pcs.	650.00	650.00
23.	Installation of NVR, Rack	SERVICE	1	Pcs.	25,000.00	25,000.00

--	TOTAL	1,585,916.00
--	CGST 9%	1,42,732.44
--	SGST 9%	1,42,732.44
--	G.TOTAL	1,871,380.88

तरी, उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे श्रीं चे मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांचा Backup कालावधी ३० दिवस ते एक वर्ष करणेच्या दृष्टीने तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेले सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य बदलुन नव्याने सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य खरेदी करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१८,७१,३८१/- मात्रचे खर्चास तसेच अ.नं.४ ते २२ मधील नमुद साहित्य आवश्यकतेनुसार (At Actual) ई-निवीदेतील प्राप्त दरानुसार निम्नत्तम पुरवठाधारकाकडुन खरेदी करणेस व त्यानुसार त्याची रक्कम पुरवठाधारकास आदा करणेस तसेच सदरकामी प्रचलित पद्धतीने ई-निवीदा मागविणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ दि.१५/०९/२०२० रोजीचे टिपणीन्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी " प्रस्तावात दाखविलेला खर्च OK परंतु सदर CC Surveillance बाबत विभागाची योजना काय आहे ? त्याबाबत स्पष्टपणे प्रस्तावात उल्लेख आवश्यक आहे" असे निर्देश दिलेले आहे.सदर निर्देशास अनुसरुन, CC Surveillance बाबत विभागाची योजना खालीलप्रमाणे -

श्री साईबाबा संस्थानचे CCTV Surveillance अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारावर अद्यावत होणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. मा.मुंबई उच्च न्यायालायाचे औरंगाबाद खंडीपीठाचे आदेशात नमुद कलेनुसार सदरकामी तज्ञ सल्लागाराची नेमणुक करुन श्री साईबाबा संस्थानची व्याप्ती व श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करता, CCTV Surveillance यंत्रणेचे अद्यावतीकरण होणे हितावह व उचित ठरेल, असे विभागाचे नम्र मत आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार व उपरोक्त संदर्भ क्र.४ चे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार CCTV Surveillance यंत्रणेकामी संस्थानचे विहीत पद्धतीने तज्ञ सल्लागाराची नेमणुक करुन खालीलप्रमाणे Scope of Work मध्ये नमुद केलेली कामे तांत्रिक दृष्टया नियुक्त केलेल्या सल्लागाराकडुन करुन घेणे योग्य व संस्थानचे हितावह राहील, असे इकडील विभागाचे स्पष्ट मत आहे.

1. Current As-Is assessment of existing Sansthan CCTV Surveillance System Setup of all Locations
2. Study in detailed requirements suggestion to Sansthan for an entire new & latest technology in CCTV Surveillance System, if necessary.
3. Checking & Marking of existing cable networks of CCTV Surveillance System in details and create schematic layout diagram.
4. Determine zones and fixture of locations for deployment of CCTV Surveillance Camera.
5. Design two way Network Infrastructure at all locations.

6. Create DPR and present a power point presentation demo to Senior Management of SSST.

7. On the basis of review of presentation & demo, create a detail tender documents (RFP) Bid Formulation, for a New CCTV Surveillance System as per Sansthan rules (online etc.,).

8. After floating E-tender, attending pre-bid meet and preparing responses to pre-bid queries to proposed works in Bidder meeting in presence of SSST officials.

9. Submission of Technical bid evaluation report to SSST.

10. Evaluation of commercial bids.

11. After selection of final vendor, creating LOI & agreement for work schedule & AMC.

12. Technical verification and checking of goods supplied by successful bidder.

13. Monitoring & evaluation of each stage of the projects and till the final successful implementation of the project including technical discussion if required with the vendor or any issue raised during the project.

14. At each stages of project, the consultant should verify and approve the payment of the bill of SI.

15. Consultant should submit a list of clients where similar work has been implemented and should be familiar with the best global brands of the industry.

16. Works completion Certificate must be issued to SSST to handovers the entire system to SSST by bidder after completion of the project.

तथापी, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशात नमुद केलेनुसार संस्थानचे विहीत पद्धतीने तज्ञ सल्लागाराची नेमणुक करणेकामी दि.०६/०६/२०१९ मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाची प्रत दि.२४/०७/२०१९ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनास विधी व न्याय विभाग यांना तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना देखील अवगत करण्यात आली आहे.

सदर पत्रास अनुसरुन **महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२८/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये *"शासनाचे माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सदर प्रकल्प राबविण्याकरीता सल्लागाराची नेमणुक करुन निविदा प्रसिध्द केलेली आहे. सदर निविदा प्रक्रीया अंतीम टप्प्यावर असून सदर प्रकल्प माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत राबविण्यात येणार आहे. यासाठी माहिती तंत्रज्ञान महामंडळास निधी उपलब्ध करुन द्यावा"***

" ***स्मार्ट शिर्डी प्रकल्पाअंतर्गत श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये*** *Security Surveillance* ***यंत्रणा लवकरात-लवकर कार्यान्वित होण्यासाठी आपल्या स्तरावर माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठपुरावा करण्यात यावा***" असे निर्देश दिलेले आहेत.

सदर महाराष्ट्र शासनाचे निर्देशास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहरामध्ये कार्यान्वित होणा-या Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती अवगत होणेकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागास तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.२९/०४/२०२० रोजीचे पत्रान्वये तसेच दि.३०/०४/२०२० रोजीचे ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते.

उपरोक्त संस्थानचे पत्रावर मा.प्रधान सचिव सो., माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाचे महाआयटी विभागाचे संचालक सो. यांना दि.३०/०४/२०२० रोजीचे ई-मेलद्वारे " Please give status of Shirdi project asap as per trailing mail.Thx" असे कळविले आहे.

तसेच सदर प्रकल्पाची सद्यस्थिती संस्थानला अवगत होणेकामी पुनःश्च दि.१४/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान तसेच विधी व न्याय विभागास कळविण्यात आलेले आहे. तथापी, अद्याप देखील संस्थानला सदर प्रकल्पाची सद्यस्थिती महाराष्ट्र शासनाचे महाआयटी व विधी व न्याय विभाग, मुंबई तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांचेकडुन अवगत झालेली नाही.

महाराष्ट्र शासनाचे दि.२८/११/२०१९ रोजीचे पत्रास अनुसरुन, संस्थानमार्फत वेळवेळी Shirdi Smart City प्रकल्पाची सद्यस्थिती अवगत होणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना पाठपुरावा करण्यात

आला असुन त्यानुसार Shirdi Smart City प्रकल्पाबाबत संस्थानमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची सद्यस्थितीबाबतचा प्रस्ताव अवलोकनार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेकामी सभा कामकाज विभागाकडे देण्यात आला आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रस्तावित महाराष्ट्र Shirdi Smart City प्रकल्प महाराष्ट्र शासनाकडुन केव्हा पुर्ण होईल याबाबत पुर्णतः अनभिज्ञता असल्याचे दिसुन येत असुन इकडील विभागाची याबाबत द्विधा अवस्था तसेच संदिग्धता निर्माण झालेली आहे. त्याकरीता मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सदरहु विषयावर धोरणात्मक निर्णय तातडीने होणे आवश्यक असुन सदर निर्णय महाराष्ट्र शासनास अवगत करुन पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित होणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा संस्थान परिसरात काही अनुचित प्रकार घडल्यास त्यापासुन संस्थानचे नावलौकीकास बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी, संस्थानचे सर्व विभागात अद्यावत CCTV Surveillance कामी होणारा खर्च हा कोटयावधी रुपयांचा असल्याकरणाने सर्व बाबींचा विचार करता, संस्थानचे सर्व विभागात CCTV Surveillance कार्यान्वित करुन सर्व विभागाचे नियंत्रणाकामी एकाच ठिकाणी मुख्य कंट्रोल रुमची स्थापना करुन सर्व विभागात CCTV Surveillance यंत्रणा अद्यावत होणेकामी मा.मुबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार संस्थानचे विहीत पद्धतीने तज्ञ सल्लगाराची नेमणुक करुन कार्यवाही करणे तांत्रिक दृष्टया योग्य राहील, असे नम्र मत आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार CCTV Surveillance बाबत विभागाची योजना उपरोक्त नमुद केलेली असुन त्याकरीता मा.मुंबई उच्च न्यायालायाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार CCTV Surveillance यंत्रणेकामी संस्थानचे विहीत पद्धतीने तज्ञ सल्लागाराची नेमणुक करुन संस्थानची CCTV Surveillance यंत्रणा लवकरात-लवकर अद्यावत करणे हितावह व उचित ठरेल असे नम्र मत आहे.

तरी, महाराष्ट्र Shirdi Smart City प्रकल्प महाराष्ट्र शासनाकडुन केव्हा पुर्ण होईल याबाबत पुर्णतः अनभिज्ञता असल्याचे दिसुन येत असुन इकडील विभागाची याबाबत द्विधा अवस्था तसेच संदिग्धता निर्माण झालेली आहे. त्याकरीता मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सदरहु विषयावर धोरणात्मक निर्णय तातडीने होणे आवश्यक असुन सदर निर्णय महाराष्ट्र शासनास अवगत करुन पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच तरी, श्रीं चे मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांचा Backup कालावधी ३० दिवस ते एक वर्ष करणेच्या दृष्टीने तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेले सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य बदलुन नव्याने सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य खरेदी करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१८,७१,३८१/- मात्रचे खर्चास तसेच अ.नं.४ ते २२ मधील नमुद साहित्य आवश्यकतेनुसार (At Actual) ई-निवीदेतील प्राप्त दरानुसार निम्नत्तम पुरवठाधारकाकडुन खरेदी करणेस व त्यानुसार त्याची रक्कम पुरवठाधारकास आदा करणेस तसेच सदरकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निवीदा मागविणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

<u>विभागाचा अभिप्राय</u> –उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेनुसार प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करत आहे.

<u>विभागाचा प्रस्ताव</u> - उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार, महाराष्ट्र Shirdi Smart City प्रकल्प महाराष्ट्र शासनाकडुन केव्हा पुर्ण होईल याबाबत पुर्णतः अनभिज्ञता असल्याचे दिसुन येत असुन इकडील विभागाची याबाबत द्विधा अवस्था तसेच संदिग्धता निर्माण झालेली आहे. त्याकरीता मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सदरहु विषयावर धोरणात्मक निर्णय तातडीने होणे आवश्यक असुन सदर निर्णय महाराष्ट्र शासनास अवगत करुन पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच श्रीं चे मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांचा Backup कालावधी ३० दिवस ते एक वर्ष करणेच्या दृष्टीने तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेले सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य बदलुन नव्याने सीसीटीव्ही कॅमेरे व तदअनुशंगीक साहित्य खरेदी करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१८,७१,३८१/- मात्रचे खर्चास तसेच अ.नं.४ ते २२ मधील नमुद साहित्य आवश्यकतेनुसार (At Actual) ई-निवीदेतील प्राप्त दरानुसार निम्नत्तम पुरवठाधारकाकडुन खरेदी करणेस व त्यानुसार त्याची रक्कम पुरवठाधारकास आदा करणेस तसेच सदरकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निवीदा मागविणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.५२१ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)

विषय नं.६९ **मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०३ मध्ये बदल करणेबाबत.**

प्रस्ताव- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत साईभक्तांना निवासाकरीता साईआश्रम भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा, द्वारावती भक्तनिवास, साईप्रसाद निवासस्थान असे चार विभाग सुरु असुन या भक्तनिवासचे साईआश्रम भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवासमध्ये वारंवार चो-यांचे प्रमाण वाढल्याने त्यास प्रतिबंध करणेसाठी दि.११/०८/२०१७ व दि.१३/०८/२०१७ रोजी साईआश्रम भक्तनिवास इमारतीमध्ये तसेच दि.१३/०८/२०१७ रोजी साईबाबा भक्तनिवासस्थान या भक्तनिवासमध्ये झालेल्या चो-यांबाबत सविस्तर अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ चे सभेपुढे सादर करण्यात आला होता. सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७०३ पुढीलप्रमाणे झाला आहे.

संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवास या ठिकाणी रुमचे कुलूपे तोडून वारंवार चो-या होत आहेत, यावरुन तेथे कार्यरत असणा-या सुरक्षा एजन्सी व सफाई कामाची एजन्सी निष्काळजीपणे काम करत आहेत, असे समितीचे मत आहे. याकरीता सदरहू एजन्सींना दंड म्हणून त्यांचेकडून चोरी झालेल्या रक्कमेच्या दुप्पट रक्कम वसलू करणेत यावी व या रक्कमेतुन साईभक्तांची चोरी गेलेली रक्कम, जी पोलीस स्टेशनने तपासणी करुन / पडताळणी करुन मंजूर केलेली आहे, ती परत करणेत यावी. चोरी झालेल्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना तात्काळ कमी करण्यात यावे. दुस-यांदा चोरी झाल्यास संबंधीत एजन्सीकडून दंड म्हणून चारपट रक्कम वसूल करावी व तरीही तिस-यांदा चोरी झाल्यास संबंधीत एजन्सीचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करुन, सदरहू एजन्सीचा काळया यादीत समावेश करणेत यावा, असे ठरलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार ठरावाची अंमलबजावणी करणेकामी खालीलप्रमाणे अडचणी येत आहेत.

१) साईभक्तांची चोरी झालेली रक्कम किंवा वस्तु (ज्यामध्ये दागीने, मोबाईल, कॅमेरे किंवा इत्यादी मौल्यवान वस्तु) यांची रक्कम पोलीस विभागाकडून तपासणी करुन / पडताळणी करुन मंजूर करणेकामी अडचण निर्माण होत आहे.

२) चोरी झालेली रक्कम एजन्सीकडून दंड म्हणून कपात करुन साईभक्ताना देणे सुरु केल्यास साईभक्त जादा रक्कमेची चोरी झाल्याची तक्रार देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) तसेच काही साईभक्त चोरी झाल्यास संस्थानकडून पैसे मिळतात म्हणून चोरीच्या खोटया तक्रारी दाखल करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करीता मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०८/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०३ मधील **व या रक्कमेमधून साईभक्तांची चोरी गेलेली रक्कम, जी पोलीस स्टेशनने तपासणी करुन / पडताळणी करुन मंजूर केलेली आहे, ती परत करणेत यावी,** हे वाक्य वगळण्यात यावे, याकरीता तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी शासनास प्रस्ताव सादर करावा असे निर्देश दिले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयामध्ये बदल करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असुन शासन अधिनियम २००४ व सन २०१७ चा सुधारणा अध्यादेश खालीलप्रमाणे.

१) **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २८(१) ची तरतुद पुढीलप्रमाणे:-** कार्यकारी अधिकारी किंवा समिती यांच्या कोणत्याही निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख हे, अशा कार्यवाहीचा कायदेशीरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचूकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वतःची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्यांची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे, असे राज्य शासनास वाटल्यास तसेच करता येईल आणि कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल विलोपन किंवा प्रत्यावर्तन केले पाहिजे किंवा फेरविचारार्थ पाठविला पाहिजे, असे राज्य शासनास आढळून आले तर, राज्य शासनास, त्याप्रमाणे आदेश

२) **सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१२ – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठीचा अध्यादेश १३ जुलै २०१७ १२(ख) ची तरतुद पुढील प्रमाणे :-** पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :- ''परंतु, मुख्य कार्यकारी अधिका-यास, जे ठराव शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे, असे त्याला वाटत असेल, असे समितीचे ठराव शासनाकडे पाठवता येतील.'' अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०८/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०३ नुसार चोरी झालेली रक्कम एजन्सीकडून दंड म्हणून कपात करुन साईभक्ताना देणे सुरु केल्यास साईभक्त जादा रक्कमेची चोरी झाल्याची तक्रार देण्याची शक्यता असल्याने तसेच काही साईभक्त चोरी झाल्यास संस्थानकडून पैसे मिळतात म्हणून

चोरीच्या खोटया तक्रारी दाखल करण्याची शक्यता असल्याने येणा-या अडचणीचा विचार करता मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०३ मध्ये फेरबदल करुन सदर ठरावातील ''**व या रक्कमेतुन साईभक्तांची चोरी गेलेली रक्कम, जी पोलीस स्टेशनने तपासणी करुन / पडताळणी करुन मंजूर केलेली आहे, ती परत करणेत यावी.**'' हा मजकूर वगळणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/वशि/संरक्षण /४१२४/२०१७ दि.०७/११/२०१७ चे पत्राने मा.प्रधान सिचव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाने क्र.सासंवि-१०१७/१८७९/प्र.क्र.२०४/का.१६ दि.१४/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये परिच्छेद ३ मधील बाब विचारात घेता व्यवस्थापन समितीच्या दि.२०/०८/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.७०३ बाबत व्यवस्थापन समितीचे म्हणणे / अभिप्राय कृपया पाठविण्यात यावेत, असे कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०८/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०३ नुसार कार्यवाही करणेस अडचण निर्माण होण्याची शक्यता (साईभक्त जादा रक्कमेची चोरी झाल्याची तक्रार देण्याची शक्यता असलेने तसेच काही साईभक्त चोरी झाल्यास संस्थानकडून पैसे मिळातात म्हणून चोरीच्या खोटया तक्रारी दखल करण्याची शक्यता असल्याने) असल्याने वरील निर्णय क्र.७०३ मध्ये ''व या रक्कमेतुन साईभक्तांची चोरी गेलेली रक्कम, जी पोलीस स्टेशनने तपासणी करुन / पडताळणी करुन मंजूर केलेली आहे, ती परत करणेत यावी.'' हा मजकूर वगळणेकामी सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.५२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०३ मधील "व या रक्कमेतून साईभक्तांची चोरीला गेलेली रक्कम , जी पोलीस स्टेशनने तपासणी करुन / पडताळणी करुन मंजूर केलेली आहे, ती परत करणेत यावी" या मजकुरामुळे सदर निर्णयावर कार्यवाही करतांना येणा-या अडचणी विचारात घेता सदरचा मजकुर वगळण्यास मान्यता देण्यात आली. तसेच कामी समिती गठीत करण्यात येऊन निश्चीत धोरण ठरविण्यात यावे व याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- संरक्षण विभाग)

विषय नं.७० **श्रींचे चावडी मंदिरातील देवी-देवतांचे खराब, जीर्ण झालेले फोटो बदलणेबाबत.**

प्रस्ताव- उपरोक्त विषयांकीत शिरडी ग्रामस्थ यांनी दि.२९/०६/२०२० रोजीचे निवेदन पत्रान्वये " श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्रींचे चावडी मंदिरात साईभक्तांचे दर्शनाकरीता देवी-देवतांचे फोटो लावण्यात आलेले आहे. सदरहू फोटो बसवून जास्त कालावधी झालेला असल्याने, बरेच फोटो खराब, जिर्ण झालेले आहे. त्यांचे पावित्र जोपासण्यासाठी सदरहू फोटो अत्याधुनिक पध्दतीने नुतनीकरण करुन बसविणे आवश्यक वाटते.

तसेच सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मंदिर दर्शनार्थ दि.१७/०३/२०२० पासून बंद ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नसलेने मंदिर मोकळे असलेने सदरहू ठिकाणचे फोटो नुतनीकरण करुन नव्याने बसविणे शक्य होईल, " अशी विनंती केलेली आहे.

इकडील विभागामार्फत दि.११/०७/२०२० रोजी सदरहू प्रस्ताव सादर केला असता त्यावर तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी " मान्य, परंतु तदर्थ समिती समक्ष प्रस्तावात अधिचे फोटो कोणत्या देवी-देवतांचे, येणारा खर्च किती ? इत्यादीसह " सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

साईभक्त श्री. विनोद जाधव, मुंबई यांनी सदरचे चावडी मंदिरातील मुळ फोटोंची कलर प्रिंट फोटो नव्याने आधुनिक पध्दतीने वॉटरप्रुफ सनबोर्ड मध्ये तयार करुन / नुतनीकरण करुन देणगी स्वरुपात देणेस सहमती दर्शविली आहे. देणगीदार यांनी वॉटरप्रुफ सनबोर्ड मध्ये तयार करुन दिलेले फोटोंबाबत मान्यता मिळालेनंतर, सर्व फोटोंना ते टिकाऊ व नक्षिदार फ्रेम बसवून देणेबाबतही त्यांनी सहमती दर्शविलेली आहे. सदरहू कामी साधारण अंदाजे ३५ ते ४० हजार मात्र खर्च अपेक्षित आहे.

अभिप्राय – श्रीचावडी मंदिरात लावण्यात आलेले श्रींचे देवी-देवतांचे फोटोस २१ वर्षाचा कालावधी झालेला असल्याने, तसेच सदरचे बरेच फोटो खराब, जिर्ण झालेले आहे. शिरडी ग्रामस्थ यांनी निवेदनात केलेल्या विनंतीनुसार सदरचे मुळ फोटोंचेचे कलर झेरॉक्स प्रिंट फोटोंचे वॉटरप्रुफ सनबोर्डमध्ये देणगीदार साईभक्त श्री.विनोद जाधव, मुंबई हे आधुनिक पध्दतीने फोटोफ्रेम करुन देण्यास तयार आहेत. त्यानुसार श्रीचावडी मंदिरातील खराब झालेले जुने फोटो काढून त्याठिकाणी देणगीदार यांनी देणगी स्वरुपात नव्याने दिलेले फोटो

संस्थानचे संबंधीत बांधकाम व मॅकेनिकल विभागामार्फत बसविता येईल, तसेच देणगीदार साईभक्त श्री.विनोद जाधव, मुंबई यांना आभार पत्र देता येईल, असे नम्र मत आहे.

चावडी मंदिरातील असलेल्या फोटोंचा तपशिल खालीलप्रमाणे –

अ.नं.	फोटोचे नाव	अ.नं.	फोटोचे नाव	अ.नं.	फोटोचे नाव
०१	सुर्यदेव भगवान	१२	श्रीकृष्ण अवतार फोटो	२३	वामन अवतार – बलिराजा
०२	सिता, लव, कुश	१३	श्रीकृष्ण, सुदामा- गोकुळनगरी	२४	शंकर, पार्वती, गणपती, नंदी
०३	श्रीगणपती, शिवलिंगासह	१४	भगवान शिव, पार्वती, गणपती	२५	सिता माता पेंटींग
०४	श्रीदत्त भगवान (तीनमुखी)	१५	राधा – कृष्ण	२६	कृष्ण (कालिया मर्दनी नाग)
०५	नृरसिंह	१६	काशि-पाण्यातील मंदिराचा फोटो	२७	शंकर भगवान
०६	सरस्वती देवी	१७	शंकर भगवान – पार्वती	२८	वामन अवतार फोटो
०७	म्हैशासुर मर्दनि देवी	१८	सिता – पेंटींग फोटो	२९	लंकादहन –हनुमान फोटो
०८	शंकर भगवान	१९	सिता अग्निपरीक्षा फोटो	३०	खंडेराव-म्हाळसा घोडयावर
०९	महालक्ष्मी	२०	शंकर महादेव (भैरवनाथ अवतार)	३१	राघोबादादा-आनंदीबाई
१०	अधिपतीरावण , ऋषीमुनी	२१	भिम गदासह	३२	श्रीकृष्ण –सुदामा फोटो
११	श्रीकृष्ण – सुदामा भेट	२२	श्रीकृष्ण वासुदेव – नागदेवता		

प्रस्ताव– तरी साईभक्त श्री. विनोद जाधव, मुंबई यांनी श्रीचावडी मंदिरातील खराब, जीर्ण झालेले देवी-देवतांचे फोटोंची कलर प्रिंट काढून वॉटरप्रुफ सनबोर्डवर आधुनिक पध्दतीने फोटो फ्रेम करुन ते देणगी स्वरुपात देण्यास तयार आहेत. सदर देवी-देवतांचे फोटो फ्रेम देणगी स्वरुपात स्विकारणेस व देणगीदार यांना आभारपत्र देणेस तसेच देणगीदार यांनी नव्याने आधुनिक पध्दतीने तयार केलेले देणगी स्वरुपात दिलेले देवी-देवतांचे फोटो श्रीचावडी मंदिरात बसविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री. विनोद जाधव, मुंबई यांनी श्रींचे चावडी मंदिरातील खराब, जीर्ण झालेले देवी-देवतांचे फोटोंची कलर प्रिंट काढून वॉटरप्रुफ सनबोर्डवर आधुनिक पध्दतीने फोटो फ्रेम करुन ते देणगी स्वरुपात देण्यास तयारी दर्शविलेली असल्याने सदर देवी-देवतांचे फोटो फ्रेम त्यांचेकडून देणगी स्वरुपात स्विकारणेस व देणगीदार यांना आभारपत्र देणेस तसेच देणगीदार यांनी नव्याने आधुनिक पध्दतीने तयार करुन देणगी स्वरुपात दिलेले देवी-देवतांचे फोटो श्रींचे चावडी मंदिरात बसविणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मंदिर विभाग)

विषय नं.७१ संस्थानचे उपलब्ध अग्निशमन वाहन (मिनी टेंडर) रेस्क्यु टेंडर बनविणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर.

विषय नं.७२ मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे साईबाबा संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी प्राप्त झालेले अर्जाबाबत.

प्रस्ताव-

निर्णय क्र.५२४ विषय नं.७१ व ७२ या विषयांवरील चर्चा सायंकाळी ४.०० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही- विधी विभाग)

विषय नं.७३ सन २०२०-२१ या कालावधीसाठी साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने निम्नतम दरधारकांकडून करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.स्वच्छता दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

१	करावयाचे कामाचा तपशील	सन २०२०-२१ या कालावधीसाठी साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणे.
२	मागणी	विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामेकरीता GST वगळून दर
३	ई-निविदा प्रसिध्दी	दि.०५/०९/२०२०
४	वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते?	महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in व संस्थानचे संकेतस्थळावरुन तसेच पुरवठाधारकांना दुरध्वनी व ई-मेलव्दारे
५	तर तसे कोणाला पाठविले.	-
६	निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ	०७/०९/२०२० वेळ – सकाळी ११.०० वाजेपासून
७	प्राप्त निविदाधारकांची संख्या	०६
८	पात्र निविदाधारकांची संख्या	०६
९	सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ?	नाही
१०	सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का?	होय
११	जर नमुने दिले नाही तर का ?	हाऊसकिपींग काम असल्याने नमुने मागणी केली नाही.

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर

अ) **सन २०२०-२१ साठीचे मनुष्यबळ संख्या निश्चित करुन हाऊसकिपींग कामाचे दर**

अ नं	निविदाधारकाचे नाव	GST वगळून दरमहा रक्कम रु.	१८ % GST	GST सह दरमहा एकूण रक्कम रु.	GST वगळून वार्षिक रक्कम रु.	१८ % GST	GST सह वार्षिक एकूण रक्कम रु.
1	SUMEET FACILITIES LIMITED., Pune.	३१,७४,०४५.०१	५,७१,३२८.१०	३७,४५,३७३.११	३,८०,८८,५४०.१२	६८,५५,९३७.२२	४,४९,४४,४७७.
2	Focus Facility & Security Services., Andheri (E)Mumbai	३५,९४,४२६.००	६,४६,९९६.६८	४२,४१,४२२.६८	४,३१,३३,११२.००	७७,६३,९६०.००	५,०८,९७,०७२.
3	Peyush Traders. Thane	३९,५०,०००.००	७,११,०००.००	४६,६१,०००.००	४,७४,००,०००.००	८५,३२,०००.००	५,५९,३२,०००.
4	Spick-N-Span Services. Malad (P) Mumbai.	४१,२८,५६०.००	७,४३,१४०.८०	४८,७१,७००.८०	४,९५,४२,७२०.००	८९,१७,६८९.००	५,८४,६०,४०९.
५	BVG India Ltd., Pune	४१,७१,६२१.०२	७,५०,८९१.७८	४९,२२,५१२.८०	५,००,५९,४५२.२४	९०,१०,७०१.४०	५,९०,७०,१५३.
६	Eximius Management Pvt.,Ltd.Thane	४२,३४,९९४.३५	७,६२,२९८.९८	४९,९७,२९३.३३	५,०८,१९,९३२.२०	९१,४७,५८७.७९	५,९९,६७,५१९.

१३ **सन २०१९-२० साठीचे हाऊसकिपींग कामाच्या स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांचे दर**

अ नं	निविदाधारकाचे नाव	GST वगळून दरमहा रक्कम रु.	१८ % GST	GST सह दरमहा एकूण रक्कम रु.	GST वगळून वार्षिक रक्कम रु.	१८ % GST	GST सह वार्षिक एकूण रक्कम रु.
1	BVG INDIA LTD,PUNE	२८,०१,०००	५,०४,१८०	**३३,०५,१८०**	३,३६,१२,०००	६०,५०,१६०	**३,९६,६२,१६०**

सन २०१८-१९ साठीचे मनुष्यबळ संख्या निश्चित करुन बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांचे दर

अ	निविदाधारका	GST वगळून	१८ % GST	GST सह	GST वगळून	१८ % GST	GST सह वार्षिक

नं	चे नाव	दरमहा रक्कम रु.		दरमहा एकूण रक्कम रु.	वार्षिक रक्कम रु.		एकूण रक्कम रु.
1	BVG INDIA LTD,PUNE	३४,७१,१७०	६,२४,८१०.६०	४०,९५,९८०.६०	४,१६,५४,०४०	७४,९७,७२७.२०	४,९१,५१,७६७.२०

मनुष्यबळ संख्या निश्चित करुन राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रकियेमध्ये सन २०१८-१९ व सन २०२०-२१ करीता दरांबाबत निकष काढला असता खालीलप्रमाणे फायदा होत आहे.

निविदाधारकाचे नाव	वर्ष	दरमहा GST वगळून रक्कम रु	फरक
BVG INDIA LTD,PUNE	२०१८-१९	३४,७१,१७०	२,९७,१२५
SUMEET FACILITIES LTD, PUNE	२०२०-२१	३१,७४,०४५	दरमहा फायदा होत आहे.

१४	मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशील	साई धर्मशाळा विभागाकडील भक्तांचे निवास क्षमता व वापरात असलेल्या हॉलच्या प्रमाणानुसार काम समाधानकारक आहे.
१५	सध्याची शिल्ल्क स्थिती	दि.२९/०२/२०२० रोजी कार्यादेश संपुष्टात आला असून, जा.नं.एसएसएस/वशी- साई धर्मशाळा भक्तनिवास /४५७४/२०२० दि.१८/०२/२०२० रोजी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
१६	मागील खरेदी दर	अ.नं.१३ मध्ये दर्शविले प्रमाणे
१७	मागील पुरवठादार	बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे
१८	सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर	अ.नं.१२ मध्ये दर्शविले प्रमाणे अ.क्र. ०१ आहे.
१९	सन २०२०-२१ साठीचे न्युनतम निविदाकाराचे नाव	सुमित फॅसिलिटीज् लि, चिंचवड, पुणे
२०	सदर कामाचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का?	होय.
२१	सदर कामाचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे	मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, संबंधीत प्रभारी अधिक्षक.
२२	घाऊक व किरकोळ दर यांचे तपशील - मागविण्यात आलेला नाही.	

२३

निविदाधारकाचे नाव	सन २०१८-१९ चे **दरमहा GST वगळून रक्कम रु**	सन २०१९-२० चे **दरमहा GST वगळून रक्कम रु**	सन २०२०-२१ चे प्राप्त **दरमहा GST वगळून रक्कम रु**	फरक
BVG INDIA LTD, PUNE	३४,७१,१७० मनुष्यबळानुसार	२८,०१,००० ठोक स्वरुपानुसार	--	२,९७,१२५ **दरमहा संस्थानचा फायदा होत आहे**
SUMEET FACILITIES LTD, PUNE	--	--	३१,७४,०४५ मनुष्यबळानुसार	

संक्षिप्त टिप- साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती त्यामध्ये सहा निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यांपैकी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या सहा निविदाधारकांचे वाणिज्यिक निविदा दि.०३/११/२०२० रोजी मा.स्थानिक खरेदी समिती समक्ष उघण्यात येऊन खालीलप्रमाणे दर निम्नतम दर प्राप्त झाले आहेत.

अनं	निविदाधारकाचे नाव	GST वगळून दरमहा रक्कम रु.	१८ % GST	GST सह दरमहा एकूण रक्कम रु.	GST वगळून वार्षिक रक्कम रु.	१८ % GST	GST सह वार्षिक एकूण रक्कम रु.
1	SUMEET FACILITIES LIMITED.Pune	३१,७४,०४५.०१	५,७१,३२८.१०	३७,४५,३७३.११	३,८०,८८,५४०.१२	६८,५५,९३७.२२	४,४९,४४,४७७.३४
2	Focus Facility & Security Services.Andheri Mumbai	३५,९४,४२६.००	६,४६,९९६.६८	४२,४१,४२२.६८	४,३१,३३,११२.००	७७,६३,९६०.००	५,०८,९७,०७२.००
3	Peyush Traders.	३९,५०,०००.००	७,११,०००.००	४६,६१,०००.००	४,७४,००,०००.००	८५,३२,०००.००	५,५९,३२,०००.००

	Thane						
4	Spick-N-Span Services. Malad (P) Mumbai.	४१,२८,५६०.००	७,४३,१४०.८०	४८,७१,७००.८०	४,९५,४२,७२०.००	८९,१७,६८९.००	५,८४,६०,४०९.६०
५	BVG India Ltd., Pune	४१,७१,६२१.०२	७,५०,८९१.७८	४९,२२,५१२.८०	५,००,५९,४५२.२४	९०,१०,७०१.४०	५,९०,७०,१५३.६४
६	Eximius Management Pvt., Ltd. Thane	४२,३४,९९४.३५	७,६२,२९८.९८	४९,९७,२९३.३३	५,०८,१९,९३२.२०	९१,४७,५८७.७९	५,९९,६७,५१९.९९

उपरोक्त प्रमाणे सहा निविदाधारकांचे साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी **अ.क्र. ०१ चे सुमित फॅसिलिटीज्, पुणे याचे निम्नतम दर प्राप्त झाले असुन,**

१) कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनामार्फत पारीत करणेत आलेल्या आदेशान्वये कार्यवाही चालू आहे त्याचा एक भाग म्हणून दि.२३/०३/२०२० पासून संस्थानचे साईभक्तांचे निवासासाठी देण्यात येणारे निवासस्थाने बंद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये साई धर्मशाळा विभाग तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्यात आलेले आहे. सदर कालावधीत संपुष्टात येत असलेल्या हाऊसकिपींग कामाची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, साई धर्मशाळा विभागाकडील सन २०२०-२१ या एक वर्ष कालावधीकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी प्राप्त झालेल्या निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज्, पुणे यांना जेव्हा साई धर्मशाळा विभाग साईभक्तांचे निवासासाठी सुरु करणेत येईल त्या तारखेपासून एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देता येईल.

विषय नं.१०३ संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील विकसीत एकूण ११ रस्त्यांपैकी भुसंपादनाचे ०९ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०९/२००७ निवाडा घोषीत दि.३०.११.२००९ एलएक्यु/एसआर/२१/२००३ निवाडा घोषीत दि.२५.११.२००३ व एलएक्यु/एसआर/०३/२००७ निवाडा घोषित दि.०४.११.२०१० चे भुसंपादन प्रकरणी संबधीत जमीन मालक यांनी भूसंपादन कायदा कलम १८ खाली दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्यांमध्ये वाढीव मोबदला रक्कम मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना आदा करणेबाबत.

विषय नं.१०४ मौजे पांढुर्ली, ता.सिन्नर येथील पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य, सामाजिक व धार्मिक कार्यासाठी देतांना आकारण्यात येणा-या रकमेमध्ये वाढ करणेबाबत.

विषय नं.१०५ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाची मालमत्ता करावरील दंडनीय व्याजाची रक्कम शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करणेबाबत.

विषय नं.१०६ संस्थान आस्थापनेवरील मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वीत करणेबाबतच्या मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८६ मध्ये अशत: दुरुस्ती करणेबाबत.

विषय नं.१०७ मालमत्ता विभागात कार्यरत असलेले कंत्राटी सल्लागार श्री.सुरेश सुधाकर भालेराव (सेवानिवृत्त नायब तहसीलदार) यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.१९/०८/२०२० रोजीचा अर्ज.

विषय नं.१०८ मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसीलदार) यांचे मुदतवाढीबाबत.

विषय नं.१०९ स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत व बॅंकेच कार्यालय व ए.टी.एम. स्थलातंराबाबत मा.शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचे दि.०८.०७.२०२० व तत्सम आशयाचे दि.२१.०९.२०२० रोजीचे पत्र.

विषय नं.११० दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांना त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील वापरास दिलेल्या खोल्यांचे वापरास मुदतवाढ देणेबाबत.

विषय नं.१११ श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्राकरीता जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.५१/२०२०, दि.११.०२.२०२०.

विषय नं.११२ श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना ऐतिहासिक वस्तू, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील वापरास दिलेल्या जागेचे कोव्हीड-१९ या संसर्गाचे कालावधीतील भाडे माफ होऊन मिळणेबाबत श्री.अभिजित देविदास शिंदे यांचा दि.०७.०८.२०२० रोजीचा अर्ज.

विषय नं.११३ प्र.विधी अधिकारी, विधी विभाग यांनी मा.तदर्थ समितीचे दि.१३ जुलै,२०२० रोजीचे सभेतील निर्णयानुसार देण्यात आलेल्या नोटीसीचा खुलासा.

विषय नं.११४ संस्थानचे सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री.सुर्यभान गमे यांचे बाबत श्री.सोमनाथ बनकर, शिर्डी बन यांचे दिनांक २२.०७.२०२० रोजीचे अर्जाबाबत.

विषय नं.११५ श्री. संजय रामदास राऊत, वर्ग-४ कर्मचारी, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग, यांचे दि.०७/०९/२०२० रोजीचे अर्जान्वये सेवा निलंबन रद्द करुन कामावर हजर करुन घेण्याचे विनंती अर्जाबाबत.

विषय नं.११६ श्री.रंगनाथ बन्सी सोनवणे, सफाई कामगार, आरोग्य विभाग, यांचे दि.०५/०९/२०२० रोजीचे अर्जान्वये सेवा निलंबन रद्द करुन कामावर हजर करुन घेण्याचे विनंती अर्जाबाबत.

विषय नं.११७ श्री. भारत एकनाथ सोनवणे, वर्ग-४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग, यांचे दि.०७/०७/२०२० व दि.०७/०९/२०२० रोजीचे अर्जान्वये सेवा निलंबन रद्द करुन कामावर हजर करुन घेण्याचे विनंती अर्जाबाबत.

विषय नं.११८ श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवण्यात आलेला ठपका रद्द करणेकरीता मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडेस केलेल्या दि.१५/०६/२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.

विषय नं.११९ श्री. बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचा खाते निहाय चौकशी दरम्यान न मिळालेल्या (वंचित) वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढ, लाभ व भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळणेस तसेच मला सन २०१२ व २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सेवा निलंबन शिक्षा रद्द करुन त्या कालावधीतील लाभ पुर्ववत मिळणेबाबतचा अपिल अर्ज.

विषय नं.१२० कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत चावडी मंदिर दर्शनासाठी बंद केले असतांना महिला साईभक्ताने चावडी मंदिरामध्ये दर्शनास जाऊन केकसह सेल्फी घेतले बाबत दि.२५ जून,२०२० रोजीचे व्हिडीओ क्लीप सोशल मिडीयावर व्हायरल झालेबाबत.

विषय नं.१२१ कोते मिनिनाथ भाऊसाहेब व आंबेकर विलास अशोक यांचे दि.१६.०७.२०२० चे ई-मेलने प्राप्त झालेले "मा.उच्च न्यायालयात मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश पालन न करण्याबाबत" असा विषय असलेले पत्र.

विषय नं.१२२ श्री.अशोक कोते, शिर्डी यांचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा, शिर्डी येथील अनागोंदी कारभाराबाबत विना दिनांकाचे पत्र.

विषय नं.१२३ सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दि.०१.०७.२०२० चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा ट्रस्ट शिर्डी यांना दिलेले तसेच सामान्य प्रशासनाकडे दि.१४.०७.२०२० रोजी प्राप्त पत्र.

विषय नं.१२४ श्री.राजु जोंधळे, शिर्डी यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक सुनिल तांबे यांनी पदाचा गैरफायदा घेऊन मोठया रकमेचे वैद्यकीय बिल संस्थानकडून परतावा मिळणेबाबत सादर केलेबाबत विना दिनांकाचे पत्र.

विषय नं.१२५ श्री.राजेंद्र कोते, शिर्डी यांचे श्री साईबाबा संस्थानमधील बदल्या व नेमणूका व भ्रष्टाचाराचे विना दिनांकाचे पत्र.

विषय नं.१२६ संस्थानचे जुन्या सेवाधाम इमारतीचे बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या/रुम विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थाना त्यांचे कार्यालयासाठी भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेकामी सदर जागेचे भाडे निश्चित होणेबाबत.

विषय नं.१२७ श्री साईबाबा महाविद्यालयातील विद्यार्थींनीसाठी बससेवा उपलब्ध करणेबाबत.

विषय नं.१२८ **जुन्या वाहनांचा फेर लिलाव तसेच निरुपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहिर लिलावाने विक्री करणेबाबत.**

निर्णय क्र.५३१ **उपरोक्त विषय नं.७९ व १२८ विषयावरील चर्चा सायंकाळी ४.०० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

विषय नं.१२९ **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

अ) **सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबत.**

प्रस्ताव- दि.२२-२३/०९/२००१ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र. ४१८ अन्वये, दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ पासुन संस्थान कायम कर्मचाऱ्यासांठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युईटी योजना (Policy No.635692), The Payment of Gratuity Act 1972 च्या कायद्यानुसार लागु करण्यात आलेली आहे. तदनंतर दि.१२/०३/२०१५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र. ९३ अन्वये, दिनांक ०१ एप्रिल, २०१५ पासुन IRDA च्या नियमानुसार नवीन कर्मचाऱ्यांसाठी नवीन ग्रुप ग्रॅच्युईटी योजना (Policy No.709002248), ही The Payment of Gratuity Act 1972 च्या कायद्यानुसार लागु करण्यात आलेली आहे.

सदर दोन्हीही योजनेंचे नुतनीकरण दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात करण्यात येत असते. नुतनीकरण करताना त्या वर्षाच्या अंशदानाची रक्कम व लाईफ कव्हर प्रिमीयमची रक्कम आदा करण्यात येते. त्या अनुषंगाने मागिल वर्षी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.४९४, दि.४.१२.२०१९ अन्वये, The Payment of Gratuity Act 1972 कायद्यातील तरतुदी अन्वये रक्कम रु.१३,६२,९५,०८३/-मात्र एल.आय.सी.पुणे यांचेकडे डिपॉझीट व प्रिमीयम म्हणून भरण्यास मान्यता मिळाली होती. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली होती.

अ) The Payment of Gratuity Act 1972 नुसार सन २०२०-२१ या वर्षासाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांनी दि.०३.१०.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचेकडे सध्या असलेल्या उपदान रक्कम रु.२० लाख मात्र मर्यादा गृहीत धरुन त्याप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युईटी योजनेत डिपॉझिट करणेबाबत कळविले आहे, त्याचा तपशील पुढीलप्रमाणेः

Policy No:GGCA/635692			Policy No:NGGCA/709002248		
Sr	**Premium Detail**	**Amount**	**Sr**	**Premium Detail**	**Amount**
1	Current Year Contribution	3,41,86,069.00	1	Current Year Contribution	16,23,748.00
2	Life Cover Premium	21,75,179.00	2	Life Cover Premium	1,16,593.00
3	GST	3,91,532.00	3	GST	20,987.00
4	Additional Contribution to Gratuity Fund	3,09,18,313.00	4	Additional Contribution to Gratuity Fund	14,14,286.00
	Total Amount Payable	**6,76,71,093.00**		**Total Amount Payable**	**31,75,614.00**
	Total Amount Payable for both Policies				**7,08,46,707.00**

ब) शासन निर्णय- मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून दि.०९/०७/२०२० रोजी आलेल्या पत्रात संस्थान कर्मचा-यांना रक्कम रु.१४ लक्ष मात्र मर्यादेत ग्रॅच्युईटी आदा करणेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन इकडील जा.क्र.एसएसएस/लेखा-पगारबील/१८०२/२०२०दि.१२/१०/२०२० रोजी एल.आय.सी. पुणे यांना ग्रॅच्युईटी मर्यादा रु.१४ लाख मात्र प्रमाणे Premium ची रक्कम देणेबाबत कळविले असता, त्यांनी दि.१३.१०.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे रक्कम रु.१४ लाख मात्र मर्यादेपर्यंत Premium ची रक्कम कळविलेली आहे, त्याचा तपशील पुढीलप्रमाणेः

Policy No:GGCA/635692			Policy No:NGGCA/709002248		
Sr	**Premium Detail**	**Amount**	**Sr**	**Premium Detail**	**Amount**
1	Current Year Contribution	1,83,51,750.00	1	Current Year Contribution	13,09,618.00
2	Life Cover Premium	20,20,365.00	2	Life Cover Premium	1,13,504.00
3	GST	3,63,666.00	3	GST	20,431.00
4	Additional Contribution to Gratuity Fund	0.00	4	Additional Contribution to Gratuity Fund	4,71,045.00
	Total Amount Payable	**2,07,35,781.00**		**Total Amount Payable**	**19,14,598.00**
	Total Amount Payable for both Policies				**2,26,50,379.00**

संस्थान, कर्मचा-यांकरीता १ ऑक्टोबर, २००१ पासुन The Payment of Gratuity Act, 1972 नुसार ग्रॅच्युईटीची रक्कम आदा करत आहे. त्यानुसार सध्या ग्रॅच्युईटीची मर्यादा २० लक्ष इतकी झालेली असुन त्याअनुषंगाने एल.आय.सी., पुणे यांनी Premium कळविलेला आहे. सदर तपशील उपरोक्त तक्ता 'अ' मध्ये नमुद केलेला आहे.

तथापि, शासनाचे निर्णयानुसार रक्कम १४ लक्ष मर्यादेत ग्रॅच्युईटी रक्कम आदा करणेबाबत कार्यवाही करावी असे कळविलेले आहे. त्यानुसार सदर तपशील उपरोक्त तक्ता 'ब' मध्ये नमुद केलेला आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन एल.आय.सी.पुणे यांना तुर्त शासन निर्णयानुसार रक्कम रु.१४ लाख मात्र मर्यादेपर्यंत रक्कम रु.२,२६,५०,३७९/-मात्र LIC Group Gratuity Fund मध्ये गुंतविणेस, तसेच शासनाने The Payment of Gratuity Act, 1972 मधील तरतुदीनुसार जर उपदानाची मर्यादा रक्कम रु.२० लाख मात्र करण्यास मान्यता दिल्यास, त्यानुसार भरावयाच्या अतिरिक्त रकमेबाबत पुनःश्च मान्यता घेऊन सदर रक्कम आदा करणेच्या प्रस्तावास, दि.२७/१०/२०२० रोजी मा.तदर्थ समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे.

तरी, सन २०२०-२१ या वर्षाकरीता तुर्त शासन निर्णयानुसार LIC Group Gratuity Fund मध्ये रक्कम रु.२,२६,५०,३७९/-मात्र *(अक्षरी रु.दोन कोटी, सव्वीस लाख, पन्नास हजार, तीनशे एकोणऐंशी मात्र)* LIC of India, Pune यांना R.T.G.S.द्वारे आदा करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.५३२/अ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लेखाशाखा)

ब) मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे मुदतवाढीबाबत.

प्रस्ताव- अधिनियमातील तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना- संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व आस्थापना विभागाकडील दि.१९/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणे कामकाज केले जाते.

संस्थानचे मिळकत रजिस्टर अद्ययावत ठेवणे.

२) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी खरेदी करणेकामी तसेच आरक्षणा व्यतिरिक्त खाजगी जमीनी खरेदी करणेकामी संस्थानकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणे,जागेची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

३) देणगी स्वरुपात मिळकती स्विकारणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे,मिळकतीची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

४) खरेदी केलेल्या मिळकतींच्या व दान स्वरुपात प्राप्त झालेल्या मिळकतींच्या नोंदी महसुल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.

५) खरेदी घेतलेल्या व दान स्विकारलेल्या मिळकतींची शासकीय मोजणी करुन हद्दी निशाण्या ठरवून घेणे.

६) संस्थान मालकीच्या कृषीक जमीनी आवश्यकतेनुसार अकृषीक करणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व सक्षम अधिकारी यांचेकडेस सादर करुन उचित कार्यवाही करणे.

७) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतचे प्रकरणी समन्वय साधून उचित कार्यवाही करणे.

८) विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेसबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

९) संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर दिलेल्या अथवा द्यावयाच्या मिळकतींचे करारनामे करुन घेणे.

१०) संस्थानचे मालमत्तेबाबतचे शासकीय कर,नगरपंचायत कर व ग्रामपंचायत कर इ.भरणेबाबत कार्यवाही करणे.

११) संस्थानने भाडेपट्टयाने घेतलेल्या मिळकतींचे भाडे व स्थानिक कर भरणा करणे.

१२) संस्थानच्या मिळकती भाडेकराराने देणेकामी प्रस्ताव सादर करणे,भाडेकराराने दिलेल्या मिळकतींच्या वापराची मुदत वाढवून देणे व भाडेकरारनामे करुन घेणे.

१३) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पालखी थांब्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा उपलब्ध करणे,जागेची निश्चिती करणे व पुढील उचित कार्यवाही करणे.

१४) सर्व राज्यातील मुख्य शहरात संस्थानचे माहीती केंद्र उभारणेकामी जागा उपलब्ध करणे.

१५) वर्षातील उत्सवांचे नियोजनासाठी आवश्यकतेप्रमाणे जमीनी अधिग्रहीत करणेबाबतची कार्यवाही करणे.

१६) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमीनी कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचे प्रस्ताव व तद्रुषंगाने कार्यवाही करणे.

१७) संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणी दूर करणे,वरिष्ठांना अहवाल सादर करणे.

सदर कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्दतीने मासिक रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर प्रथमत: दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६६ प्रमाणे दि.१९/१०/२०१६ ते दि.१८/१०/२०१७ या एक वर्ष कालावधीसाठी मासिक रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर, तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८९९ प्रमाणे दि.१९/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७२४ प्रमाणे दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/०९/२०१९ आणि मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४४० प्रमाणे दि.१९/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कं.कर्मचारी म्हणून प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आलेली आहे. तसेच मा.तदर्थ समितीचे

दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६५ प्रमाणे त्यांचे पूर्वीचे एकत्रित मासिक मानधनात रक्कम रु.५,०००/- इतकी वाढ करुन त्यांना एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.३०,०००/- इतके दि.०१/०२/२०२० पासून अदा करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार), कं.सल्लागार यांनी त्यांचे कार्यकालात मालमत्ता विभागाकडे खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत.

१) मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवरील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाचे कालावधीसाठी ग्रामपंचायतीने आकारलेली कराची रक्कम प्रति वर्ष रु.१२,७८,०००/- प्रमाणे दोन वर्षांची रक्कम रु.२५,५६,०००/- इतकी ग्रामपंचायतीकडून माफ करुन घेतली असून उर्वरित सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षांसाठी ग्रामपंचायत कराची प्रतिवर्ष रक्कम रु.१२,७८,०००/- ऐवजी प्रतिवर्ष रक्कम रु.६,३९,०००/- इतकी किमान दराने आकारणी करणेकामी ग्रामपंचायतीस भाग पाडलेले आहे.

२) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क मा.मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निश्चित करुन घेणेकामीचे प्रकरणी कामकाज केलेले आहे.

३) मौजे घारी,ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन २००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामीचे प्रकरण करुन सदरची रक्कम मिळणेकामी दिवाणी न्यायालयात प्रकरण करणेत आलेले आहे.

४) मौजे निघोज येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी यांनी त्यांचे मालकीच्या साई पालखी निवारा येथील शासकीय मुल्यांकन रक्कम रु.३२,२७,१३,५००/- इतक्या किंमतीच्या इमारत बी व डी दान केल्या संबंधातील कागदपत्र प्राप्त करुन तपासून मा.मुद्रांक जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडून मुल्यांकन निश्चित करुन घेवून नोंदणीकृत दानपत्र करुन घेणेबाबतची कार्यवाही पूर्ण केली असून त्याप्रमाणे संस्थानच्या नावाने महसुल दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

५) शिर्डी येथील द्वारावती भक्तनिवास चे सर्वे नं.१४८/१,१४८/२/१,१४८/२/२,१४८/२/३ चा अकृषिक सारा माफी अनुज्ञेय असताना कामगार तलाठी यांनी सन २०१६-१७ या वर्षासाठी सदर क्षेत्राचा अकृषिक सारा मागणी नोटीस दिलेली होती. सदर बाब कामगार तलाठी,शिर्डी यांचे निदर्शनास आणून देवून त्यासाठीची अकृषिक सारा मागणी नोटीस रद्द करुन घेतली.

६) मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर या अकृषिक जमीनीचा आकार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(३) चे तरतुदीनुसार माफ होणेबाबतचे प्रकरण तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडेस सादर करण्यात आले आहे व पाठपुरावा करीत आहे.

७) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनींपैकी काही जमीन खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

८) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानच्या नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

९) मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जमीनीपैकी भुसंपादनाद्वारे संस्थानला प्राप्त झालेल्या स.नं.८७ व ८८ मधील क्षेत्रात प्रस्तावित लाडू इमारत व वाणिज्य प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस सादर करणेत आला असून परवानगीसाठी पाठपुरावा करणेत येत येवून आदेश प्राप्त करुन घेतला आहे.

१०) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केलेला आहे. त्यात आरक्षण क्रं.३४ ची भुसंपादन कार्यवाही यापूर्वीच दि.२९/०४/२०१५ रोजी पूर्ण झालेली होती. मात्र भुसंपादित क्षेत्राचा ताबा संस्थानला मिळणेस ऊशिर होत होता. त्याकामी पाठपुरावा करुन भुसंपादन क्षेत्र ६९०३ चौमी.चा ताबा संस्थानला दि.०७/०३/२०१८ रोजी मिळविलेला आहे व त्याप्रमाणे महसुल दपत्री रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानचे नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

११) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी "जमीन खरेदी धोरण" निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन पाठविलेला आहे.

१२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत येवून त्यात वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करणेचे कामकाज चालू आहे.

१३) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली श्री.भंडारी व श्री.भनसाळी यांची जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छानणी करणे,मोजणी

करुन घेणे व त्या संबंधीत कोर्ट प्रकरणी कामकाज पूर्ण करणेत येवून शासन निर्णयाप्रमाणे व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे सदर जमीन संस्थानला खरेदी करणेसाठीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे व सदर खरेदी जमीनींची महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानच्या नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

१४) श्रीं चे शताब्दी उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार खाजगी व शेती महामंडळाची जमीन वेळोवेळी अधिग्रहण करणेची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

१५) सध्यस्थितीत मा.उच्च न्यायालयात मयत साखरबाई हरीभाऊ शेळके यांची जमीन संस्थानला भुसंपादनाद्वारे खरेदी करणेचे प्रकरण चालू आहे. या प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेचे कामकाज चालू आहे.

१६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय, व.स्तर, कोपरगाव, सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय,औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या सुमारे ३२ केसेसमध्ये नियमाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मार्गदर्शन करीत आहे.

१७) संस्थानच्या ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पैकीचे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज चालू आहे.

१८) संस्थानसाठी आरक्षित असलेले आरक्षण क्रं.३९ हे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील आदेशाप्रमाणे रद्द करणेची कार्यवाही करणेत आली असून शासनाकडे भुसंपादनापोटी जमा करणेत आलेली अनामत रक्कम परत मिळणेकामी व इतर भुसंपादन प्रकरणी शासनाकडे जमा असलेल्या रकमा परत मिळणेकामी पाठपुरावा करुन रक्कम रु.२०,७९,००,०००/- इतकी संस्थानकडे जमा करुन घेण्यात आलेली आहे.

१९) मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सर्वे नं.५७/९५ क्षेत्र ०.०१ आर ही कै.महतछत्री यांचे मालकीची स्वकष्टार्जित मिळकत त्यांचे मृत्यूनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना देण्याची त्यांची इच्छा असल्याचे त्यांचे दि.०७/०९/२००५ रोजीच्या अर्जावरुन स्पष्टपणे दिसून आलेने सदरचा अर्ज हेच त्यांचे इच्छापत्र (मृत्युपत्र) संबोधून ते दिवाणी न्यायालयात दाखल करुन मे.कोर्टाकडून प्रोबेट करुन घेणेकामीचे प्रकरण तयार करुन संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के. गोंदकर यांना त्याप्रमाणे मे.कोर्टात उक्त मिळकतीस संस्थानचे नाव लावणेकामीचे आदेश प्राप्त करुन घेणेकामी सुचित केलेले आहे.

२०) मयत हंसाबेन त्रिवेदी यांचे शिर्डी येथील साई समर्पण इमारतीतील उर्वरित क्षेत्र संस्थानला दान करणेबाबतचे मृत्यपत्राप्रमाणे मिळकत कायदेशीररित्या संस्थानचे नावावर करुन घेणेकामीची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

२१) सौ.मंजु दिलीप सुलाखे यांचे मालकीचे मौजे रुई शिवारातील ०.४० आर इतके क्षेत्र संस्थानला दानपत्र करुन देणेबाबतचे अर्जाप्रमाणे संस्थानला सदरची जमीन दान स्विकारणेकामीची कार्यवाही चालू करणेत आलेली आहे.

२२) मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे शिर्डी विकास योजना आरक्षण व प्रारुप विकास आराखडा (सुधारीत) मधील संस्थानसाठी प्रस्तावित असलेली आरक्षणे रद्द करणेकामी संबंधीत कार्यालयांकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

२३) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे अद्ययावत करणेत आलेले आहेत.

२४) संस्थान मालमत्तेची देखभाल करणेकामी वेळोवेळी मिळकतींना भेटी देणेत आलेल्या आहेत व अडचणींचे निराकरण करणेत आलेले आहे. त्यात विशेषत: कनकुरी येथील संस्थान मालकीच्या तळयाकडे जाण्यासाठीच्या रस्त्याबाबत संबंधीत जमीन मालक यांनी हरकत घेतलेने त्याकामी सदर जमीनीचे मुळ खरेदीखत पडताळून सदर रस्त्या संबंधात बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग यांना मार्गदर्शन करणेत आलेले आहे.

२५) कार्यालयाचे दैनंदिन कामकाजात कार्यालयीन टिपण्या,मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावयाच्या टिपण्या व इतर पत्रव्यवहार नियमितपणे सादर करणेकामी मार्गदर्शन करणेत आलेले आहे.

भविष्यात मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणेची कामे करावयाची आहेत.

१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कायमस्वरुपी खरेदी करणे.

२) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय, व.स्तर, कोपरगाव,सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय, औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या ३२ केसेमध्ये उचित कार्यवाही करणे.

३) मौजे येसगाव येथील पालखी थांब्याची जागा संस्थानचे नावावर करुन घेणेकामी कार्यवाही करणे.

४) मुंबई ते शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे ते शिर्डी,अहमदनगर ते शिर्डी, भंडारदरा ते शिर्डी या मार्गांवर संस्थानचे पालखी थांबे उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा दानपत्र घेणे, जागा खरेदी घेणे याबाबतची प्रकरणांची छाननी करणे.

५) सर्व राज्यांच्या महत्वाच्या ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागा निश्चिती करणे, जागा उपलब्ध करणे व तत्संबंधी कामकाज करणे.

६) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीची यापूर्वीची आरक्षणे रद्द करणे व संस्थानच्या मिळकतींवर टाकलेली आरक्षणे रद्द करणेकामीची कार्यवाही करणे.

७) संस्थानचे ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पै. चे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज पाहणे.

८) मोफत सर्वे नं.१ च्या क्षेत्राचा ताळमेळ घेणेचे प्रकरणी कार्यवाही करणे.

९) संस्थान मालकीच्या जमीनींच्या पोटहिश्श्यांचे सामीलीकरण करणेचे प्रस्ताव तयार करणे.

१०) अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छाननी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणे.

११) मिळकत रजिस्टर नव्याने करुन ते अद्ययावत करणे. इ.कामे करावयाची आहेत.

विभागाचा अभिप्राय - श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची नेमणुकीची मुदत दि.१८/०९/२०२० रोजी संपत आहे. त्यांनी उपरोक्तप्रमाणे समाधानकारक कामे केलेली असून मालमत्ता विभागाचे दैनंदिन कामकाजात देखील त्यांचे मार्गदर्शन होत आहे. मालमत्ता विभागामार्फत भविष्यात उपरोक्तप्रमाणे कामे प्रस्तावित आहेत. उपरोक्त कामांच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टिने यापुढेही श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांच्या सेवेची मालमत्ता विभागास आवश्यकता आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी यापूर्वी त्यांना रजा व शासकीय सुट्टया सवलत नसलेने काही अडचणीचे वेळेस अथवा आजारपणाच्या वेळेस त्यांनी सुटी घेतली तर त्या सुटीच्या दिवसाचे त्यांचे मानधनातून रक्कम कपात केली जाते. परिणामी त्यांना एकत्रित मासिक मानधनाची परिपूर्ण रक्कम मिळत नाही. यास्तव त्यांनी महाराष्ट्र शासनाचे कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या सुट्टया त्यांना अनुज्ञेय करणेकामी विनंती केलेली आहे.

तरी कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे नेमणुकीची पुढील मुदत दि.१९/०९/२०२० ते दि.१८/०९/२०२१ या एक वर्षे कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पूर्वीचेच एकत्रित रक्कम रु.३०,०००/- मात्र (अक्षरी रु.तीस हजार मात्र) इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देता येईल व त्यांना रजा सवलत मिळत नसलेने महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय सुट्टया अनुज्ञेय करता येतील.

प्रस्ताव - कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे नेमणुकीची पुढील मुदत दि.१९/०९/२०२० ते दि.१८/०९/२०२१ या एक वर्षे कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पूर्वीचेच एकत्रित रक्कम रु.३०,०००/- मात्र (अक्षरी रु.तीस हजार मात्र) इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देणेच्या व त्यांना रजा सवलत मिळत नसलेने महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय सुट्टया अनुज्ञेय करणेच्या मान्यतेसाठी चक्रीय पध्दतीने सादर.

निर्णय क्र.५३२/ब **यावर सविस्तर चर्चा होऊन, मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेला होता. सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

क) मालमत्ता विभागात कार्यरत असलेले कंत्राटी सल्लागार श्री.सुरेश सुधाकर भालेराव, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.१९.०८.२०२० रोजीचा अर्ज.

प्रस्ताव- अधिनियमातील तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना - संस्थानचे मालमत्ता विभागाकडील दिवसेंदिवस वाढत असलेल्या कामांची व्याप्ती विचारात घेवून व भविष्यात

१) मुंबई ते शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे ते शिर्डी,अहमदनगर ते शिर्डी, भंडारदरा ते शिर्डी या मार्गांवर संस्थानचे पालखी थांबे उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा दानपत्र घेणे, जागा खरेदी घेणे याबाबतची प्रकरणांची छाननी करणे इ.

२) सर्व राज्यांच्या महत्वाच्या ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागा निश्चिती करणे, जागा उपलब्ध करणे व तत्संबंधी कामकाज करणे.

३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कायमस्वरुपी खरेदी करणे.

४) मौजे रुई, ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छाननी करणे,मोजणी करुन घेणे व त्यासंबंधीत कामकाज करणे.

५) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीची यापूर्वीची आरक्षणे रद्द करणे व संस्थानच्या मिळकतींवर टाकलेली आरक्षणे रद्द करणेकामीची कार्यवाही करणे.

६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता,कोपरगाव,दिवाणी न्यायालय, व.स्तर,कोपरगाव,सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय, औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या ३८ केसेसमध्ये उचित कार्यवाही करणे.

७) संस्थानचे ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पै. चे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज पाहणे

८) मोफत सर्वे नं.१ च्या क्षेत्राचा ताळमेळ घेणेचे प्रकरणी कार्यवाही करणे

९) यापूर्वीचे भुसंपादन प्रकरणात शासनाकडे संस्थानने भरलेली अनामत रक्कम परत मिळणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व पाठपुरावा करणे

१०) मौजे येसगाव येथील पालखी थांब्याची जागा संस्थानचे नावावर करुन घेणेकामी कार्यवाही करणे. ११) संस्थान मालकीच्या जमीनींच्या पोटहिश्श्यांचे सामीलीकरण करणेचे प्रस्ताव तयार करणे, अशा प्रकारची महत्वाची कामे करावयाची आहेत.

१२) अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छाननी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणे.१३) मिळकत रजिस्टर नव्याने करुन ते अद्ययावत करणे. इ.कामे करावयाची आहेत.

याशिवाय यापूर्वी मालमत्ता विभागाचे कोर्ट केसेसचे सर्व कामकाज विधी विभागामार्फत करणेत येत होते. ते सर्व कामकाज विधी विभागाकडून मालमत्ता विभागाकडेस वर्ग करणेत आलेले आहे. त्यात दिवाणी न्यायालय,क.स्तर,व.स्तर,जिल्हा व सत्र न्यायालय,उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय इ. कोर्टामध्ये सर्व मिळून मालमत्ता विभागाच्या सुमारे ३० ते ३५ केसेस चालू आहेत. त्यांचे कामकाज पाहणेसाठी आणि उपरोक्त दर्शविलेले कामकाजाची व्याप्ती,विविधता व महत्व विचारात घेता मालमत्ता विभागासाठी आणखी एका सेवानिवृत्त नायब तहसिलदाराची आवश्यकता असलेने श्री.सुरेश सुधाकर भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची एकत्रित मानधन तत्वावर दरमहा रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या रकमेवर कंत्राटदारामार्फत ११ महिन्यांचे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सल्लागार म्हणून नियुक्त करणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात आयत्या वेळचा विषय नं.३५ निर्णय क्रं.२९२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.सुरेश सुधाकर भालेराव,सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची एकत्रित मानधन तत्वावर दरमहा रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या रकमेवर कंत्राटदारामार्फत ११ महिन्यांचे कालावधीसाठी मालमत्ता विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली."

दरम्यानचे काळात श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांची संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील जा.क्रं.एसएसएस /साप्रशा/आस्था/२०७४/२०१९ दि.२९/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवरील मालमत्ता विभागाकडील जमीन महसुल व भुसंपादन विषयक अनुषंगिक कामकाजासाठी सेवाकरार पध्दतीने ३ महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आली. तदनुषंगाने श्री.सुरेश सुधाकर भालेराव हे दि.०५/०९/२०१९ रोजी संस्थानचे मालमत्ता विभागाकडे कार्यरत झाले. तदनंतर संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५९ च्या अनुषंगाने संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१२/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांना सहा महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तदनंतर संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१४ चे

अनुषंगाने संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०१/०८/२०२० रोजीच्या आदेशान्वये श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांचे नियुक्तीस दि.०५/०६/२०२० पासून पुढील तीन महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदत

दि.०४/०९/२०२० रोजी संपुष्टात येत असलेने पुढील कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेकामी श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांनी त्यांचेकडील दि.१९/०८/२०२० रोजीच्या अर्जान्वये संस्थानकडे विनंती केलेली आहे.

उपरोक्त कालावधीत श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांनी मालमत्ता विभागात खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत.

१) संस्थान मालकीच्या मौजे पांगरी,ता.सिन्नर येथील ग.नं.५१९ पै.चे क्षेत्र रस्ते विकास महामंडळाचे रस्त्याचे भुसंपादन नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त करुन घेणेकामी आवश्यक ती कार्यवाही करणेत आली.

२) संस्थान मालकीच्या मौजे पांगरी,ता.सिन्नर येथील जमीन ग.नं.५१९ पै.चे क्षेत्र दुरुस्तीकामी प्रस्ताव तयार करुन मा.तहसिल कार्यालय,सिन्नर यांचे आदेश प्राप्त करुन घेवून त्यानुसार दुरुस्त फेरफार घेण्यात आला असून प्रस्तुत नोंद निर्णयासाठी प्रलंबित आहे.

३) संस्थान मालकीच्या मौजे पांढुर्ली, ता.सिन्नर येथे असलेल्या "साई पालखी थांबा" या अकृषीक प्रयोजनासाठी होत असलेला वापर हा धार्मिक प्रयोजनासाठी होत असल्याने या क्षेत्रास केलेली अकृषीक आकारणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ११७ नुसार अकृषीक आकारणी (सारा) माफ होणेसाठी सादर करणेत आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणेत येत आहे.

४) संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील शेतजमीन/अकृषीक जमीनीचे जमीन महसूल/अकृषीक कर इ. करांच्या रकमा शासनास अदा करणेकामी निश्चित केलेल्या आकारणीची पडताळणी करुन शासनास देय असलेल्या महसुल कराची रक्कम शासनास जमा करणेची कार्यवाही करणेत आली.

५) संस्थानचे नवीन पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईन टाकणेसाठी परवानगी मिळणेकामी तहसिल कार्यालय,राहाता यांचेकडेस संस्थानचे पाणीपुरवठा विभागामार्फत सादर करणेत आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करुन अंतिम आदेश प्राप्त करुन घेतले आहेत.

६) प्रस्तावित नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी बांधावयाच्या पाण्याच्या टाक्यांसाठी संस्थानचे पाणीपुरवठा विभागामार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी व सहायक संचालक,नगररचना,अहमदनगर यांचेकडेस बांधकाम परवानगी मिळणेसाठी सादर केलेल्या आराखडयास मंजुरी मिळणेकामी पाठपुरावा करुन परवानगी प्राप्त करुन घेतली आहे.

७) संस्थान मालकीच्या मालमत्तेची विहीत नमुन्यात ठेवणेत आलेली नोंदवही अद्ययावत करणेकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार विहीत नमुन्यातील इंग्रजी व मराठी भाषेतील नोंदवहया नव्याने छपाई करुन घेण्यात आलेल्या आहेत.

८) शिर्डी विकास योजनेअंतर्गत असलेल्या रस्त्याचे भुसंपादन प्रकरणातील जमीन मालकांनी भुसंपादन कायदा कलम १८ खाली वाढीव नुकसान भरपाईसाठी न्यायालयात भुसंदर्भ दाखल केले होते. त्या दाव्यात न्यायालयाचे निर्णयानुसार जमीन मालक यांना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेसाठीच्या ०६ प्रकरणात आवश्यक ती माहिती मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी यांचे कार्यालयात समक्ष जावून प्राप्त करुन घेवून जमीन मालकांना वाढीव नुकसान भरपाई संदर्भात सदर रक्कम अदा करणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

९) संस्थान मालकीच्या जमीनींचे ईआरपी प्रणालीत माहिती भरणेकामी लेखाशाखेत समक्ष हजर राहून बुक व्हॅल्यूच्या मुल्याबाबत असलेल्या तफावतीचा मेळ घेण्यात आलेला आहे.

१०) संस्थान मालकीच्या मौजे निघोज येथील साईपालखी निवारा या मिळकतीवर इमारत कराच्या ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेल्या बीलाच्या रकमेत सकृतदर्शनी तफावत दिसून येत असलेने त्यात दुरुस्ती करुन ग्रामपंचायत कार्यालयाशी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

११) संस्थान मालकीच्या मौजे निमगांव-को-हाळे,कनकुरी,को-हाळे,ता.राहाता,पांगरी,पांढुर्ली आणि मुसळगांव,ता.सिन्नर, भोयरेपठार, ता.नगर येथील मिळकतींवरील श्री साईबाबा संस्थान,शिर्डी या नावाऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (अधिनियम २००४ प्रमाणे) याप्रमाणे नावात दुरुस्ती करणेकामी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

१२) मौजे शिर्डी,ता.राहाता येथे संस्थानने धारण केलेल्या शेतजमीन/अकृषिक जमीनीचे शेतसा-यासंबंधातील आकारणीची गांव नमुना ८ अ व ७/१२ चा मेळ घेवून आवश्यक ती दुरुस्ती करणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

१३) शिर्डी नगरपंचायत हद्दीतील संस्थान मालकीच्या जमीनींच्या कराच्या सन २०२०-२१ या वर्षाच्या नगरपंचायत,शिर्डी कडून प्राप्त झालेल्या मागणी बीलाची तपासणी करुन सदर मालमत्ता कराची रक्कम शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अदा करणेकामी कार्यवाही चालू आहे.

१४) भुसंपादन प्रकरणात शासनाकडे संस्थानने भरलेल्या अनामत रकमेपैकी अखर्चित राहीलेली रक्कम रु.२० कोटी संस्थानकडे जमा होणेकामीची कार्यवाही करणेत आली.

१५) संस्थान मालकीच्या मौजे निमगांव-को-हाळे येथील मिळकतींच्या सन २०१८-१९ या वर्षाच्या मिळकत कराच्या मागणी बीलाची तपासणी केली असता त्यात सुमारे रु.२,३१,१४८/- इतकी रक्कम जास्त आकारलेचे निदर्शनास आलेने ती रक्कम कमी करुन दुरुस्त मागणी बील प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करणेत

१६) मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची शेतजमीन/अकृषीक जमीनीचे महसूल व इतर कराची सन २०१९-२० या वर्षाच्या मागणी बीलाची तपासणी केली असता त्यात जमीन महसूल कराच्या रकमेत सुमारे रु.२४,७५१/- इतकी रक्कम जास्त आकारणेत आलेली असलेचे कामगार तलाठी यांचे निदर्शनास आणून देवून दुरुस्त मागणी बील प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करणेत आली.

विभागाचा अभिप्राय - संस्थानचे मालमत्ता विभागाकडील अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छानणी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणेचे कामकाज सुरु करणेत आले असून नव्याने छपाई करुन घेतलेले मराठी व इंग्रजी भाषेतील मिळकत रजिस्टर जुन्या मिळकत रजिस्टरवरुन अद्ययावत करणेचे काम अलाहिदा चालू करणेत येत आहे.

तसेच मालमत्ता विभागात संस्थान मालकीच्या विविध ठिकाणी असलेल्या प्रत्येक मालमत्तेची स्वतंत्र संचिका तयार करण्याचे काम चालू करणेत आले आहे. सदर संचिकेत संबंधीत मिळकतीचा ७/१२ उतारा/सिटी सर्वे उतारा (मिळकत उतारा), सदरची मिळकत संस्थानकडे ज्या अधिकाराने प्राप्त झाली त्यासंबंधीचे दस्तऐवज, ७/१२ उता-यावरील/मिळकत उता-यावरील सर्व फेरफार उतारे, अकृषीक जमीन संबंधात सक्षम अधिकारी यांचेकडील अकृषीक परवानगी आदेश/मंजूर रेखांकन आराखडा, मंजूर बांधकाम रेखांकन आराखडा, संबंधीत बांधकाम परवानगी आदेश, संबंधीत मिळकतीचा नगरपंचायत/ग्रामपंचायत असेसमेंट उतारा व इतर अनुषंगिक दस्तऐवज लावून नोट शीट तयार करावे लागणार आहे. सदरची उपरोक्त सर्व कागदपत्रे संकलित करणेत येत आहेत.

सदरचे काम हे मोठया स्वरुपाचे असून संस्थान मालकीचे प्रत्येक मालमत्तेची स्वतंत्र अद्ययावत संचिका तयार होणार आहे. त्यामुळे संस्थान मालकीच्या प्रत्येक मिळकतीचा पुर्वइतिहासासह सर्वांगीण परिपूर्ण माहिती सदर संचिकेतून दृष्टिक्षेपात उपलब्ध होणार आहे.

मालमत्ता विभागाकडील उपरोक्त सर्व कामांचा व्याप विचारात घेता व श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांचा महसुल खात्यातील अनुभव विचारात घेता या सर्व कामांसाठी संस्थानला श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांचे सेवेची आवश्यकता आहे.

यास्तव श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांना दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीकरीता संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे यापूर्वीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२९२ प्रमाणे कंत्राटी सल्लागार म्हणून संस्थानचे कर्मचारी कंत्राटदारामार्फत एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.२५,०००/- इतकी अदा करता येईल व दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल.

प्रस्ताव- श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांना दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीकरीता संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे यापूर्वीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२९२ प्रमाणे कंत्राटी सल्लागार म्हणून संस्थानचे कर्मचारी कंत्राटदारामार्फत एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.२५,०००/- इतकी अदा करणेकामी व दि.०५/०९/२०२० पासून ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेकामीच्या मान्यतेसाठी चक्रीय पध्दतीने सादर.

निर्णय क्र.५३२/क **यावर सविस्तर चर्चा होऊन, मालमत्ता विभागात कार्यरत असलेले कंत्राटी सल्लागार श्री.सुरेश सुधाकर भालेराव, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेला होता. सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.१३० सन २०२०-२१ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५३३ उपरोक्त विषय नं.१३० याविषयावरील चर्चा सायंकाळी ४.०० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.

विषय नं.१३१ संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि.पुणे यांचेशी चर्चा करुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव-

०१.	कामाचे नाव	संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट
०२.	प्रशासकीय मान्यता	मा.तदर्थ समिती दि.१३/०७/२०२० निर्णय क्र.४०९
०३.	अंदाजे खर्च	रु.६,१३,६००/-
०४.	प्रस्तावाची थोडक्यात माहीती	संरक्षण विभागामार्फत श्री साई मंदिराचे प्रवेशद्वार व दर्शन रांगेचे प्रवेशद्वारावर बसविणेत आलेले बॅगेज स्कॅनर मशिनचे दुरुस्ती देखभालकामी CAMC कंत्राट देणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०९ अन्वये ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी असे ठरले आहे.
०५.	ई-निविदा तपशिल	प्रथम ई-निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in प्रसिध्द केलेनंतर मुदतीत (२८/०९/२०२० अखेर) एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने खरेदी नियमावलीतील तदतुद क्र.४.४.३.१ नुसार, निविदा स्पर्धात्मक होणेसाठी कमीत कमी तीन निविदा असणे आवश्यक असल्याने ई-निविदेस दि.२९/०९/२०२० ते दि.०६/१०/२०२० अखेर सायं.०५.०० वाजेपर्यंत प्रथम मुदवाढ देण्यात आली होती. सदरची मुदतवाढ देवूनही दि.०६/१०/२०२० रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत फक्त एकच ई-निविदा प्राप्त झालेली असल्याने पुन्हा ई-निविदेस दि.०७/१०/२०२० ते दि.१४/१०/२०२० अखेर सायं.०५.०० वाजेपर्यंत दुस-यांदा मुदवाढ देणेत आली. मुदतवाढीअंती ई-निविदेस (ID.2020_SAI_609717-1) दि.१४/१०/२०२० अखेर एकच निविदा प्राप्त आहे.
	i. कामाची मुदत	०१ वर्षे
	ii. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ	०३/११/२०२०
	iii. प्राप्त ई-निविदा	०१
	iv. प्राप्त ई-निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का?	होय
	v. सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का?	होय
	vi. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु.	---
	vii. मागील निम्नत्तम दरधारक	---

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिक दृष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल.

अ.नं.	निवीदाधारकाचे नाव	नग	ई निवीदेतील प्रति बॅगेज स्कॅनर करीता दर रक्कम रु.	एकुण रक्कम	शेरा
०१.	मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे	०४	१,३०,०००/- + टॅक्स	५,२०,०००/- + टॅक्स	L1

सध्या श्री साई मंदिर भाविकांना दर्शनाकरीता खुले करण्यात आलेले असल्याने मंदिराचे प्रवेशद्वारावर बसविण्यात आलेले बॅगेज स्कॅनर भाविकांचे सुरक्षेचे दृष्टीने सुस्थितीत सुरु असणे गरजेचे आहे. सदरील ई-निवीदा दिनांक १५.९.२०२० ते २८.९.२०२० या कालावधी करीता महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईडवर अपलोड करणेत आलेली होती. सदर कालावधी मध्ये एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने दिनांक ०६.१०.२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर कालावधीमध्ये ही एकच निविदा असल्याने दिनांक १४.१०.२०२० पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देणेत आलेली आहे. खरेदी नियमावलीतील तरतुद क्रं. ४.४.३.१. मध्ये- *"रुपये दहा (१०) लाखापेक्षा कमी रक्कमेची निविदा असल्यास दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील ३ निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी, किमंतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल"*. असे नमुद आहे.

खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार खरेदी समितीचे मान्यतेने प्राप्त एक ई-निवीदेचे कमर्शियल बीड उघडणेत आलेले आहेत. प्राप्त निवीदाधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे हे सदरील बॅगेज स्कॅनर मशिनचे उत्पादक व पुरवठादार आहेत.

उपरोक्त तपशिलानुसार संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे यांचे रक्कम रु.५,२०,०००/- (अक्षरी रु. पाच लाख वीस हजार मात्र) + टॅक्स या दराबाबत चर्चा करुन त्यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.५३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संबधीत विभागाचे प्रमुख यांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक यांचेशी दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन संबधीतांना कार्यादेश देण्यास मान्यता आली. व त्याबाबतचा अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले. असे ठरले.

(कार्यवाही- संरक्षण विभाग)

विषय नं.१३२ **माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे नोव्हेंबर-२०२० चे वेतन अदा करणेबाबत.**

विषय नं.१३३ **स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणेबाबत.**

विषय नं.१३४ **श्री.मिनीनाथ भाऊसाहेब कोते व श्री.विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

विषय नं.१३५ **श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजुकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी येणारे अंदाजे रु.१९,३८,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.**

विषय नं.१३६ **श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सीव्हीटीएस ओटी, जनरल ओटी व न्युरो ओटीमध्ये ग्रेनाईट प्लोअरींग बसविणेस तसेच रंगकाम करणेसाठी येणारे अपेक्षीत रु.११,१९,३२३/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.**

विषय नं.१३७ **श्री साईबाबा हॉस्पिटलचे दक्षिण बाजुस असलेले साईनगर कर्मचारी वसाहत येथील मैदानास वाहन पार्किंगकरीता चेनलिंक फेसींगचे कंपाऊंड तयार करणेस व त्याकामी येणारे अपेक्षित रु.२८,१९,४६२/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.**

विषय नं.१३८ **मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा.सोन्याबापू गंगाधर शेळके यांना देण्यात आलेल्या कामाचा ठेका रद्द करुन त्यांना काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

विषय नं.१३९ **कोरोना विषाणूंचे (Covid-19) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील शिल्लक असलेल्या बेसन आटयाची स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, व्यापारी / बेसन आटा मिलधारक यांचेकडून कोटेशन मागुवन त्याची उच्चतम दराने विक्री करुन विल्हेवाट (Dispose) लावणेबाबत.**

विषय नं.१४०	**शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.०० मी.रुंदीकरण भूसंपादन एलएक्युअसआर २१/२००३ दि.२५.११.२००३ यामध्ये दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर राहाता यांचे कोर्टात लॅन्ड रेफरन्स नं.(भूसंपादन निर्देश अर्ज) २/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम आदा करणेबाबत.**
विषय नं.१४१	**श्री साईबाबा मंदिर परिसरात चित्रीकरण, छायाचित्रण व वार्तांकन करणारे प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांचेसाठी तयार करण्यात आलेली नियमावली मा.तदर्थ समितीसमोर मान्यतेसाठी सादर.**
विषय नं.१४२	**स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**
विषय नं.१४३	**श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑक्टोंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३४,३०,४७९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**
निर्णय क्र.५३५	**उपरोक्त विषय नं.१३० ते १४३ विषयावरील चर्चा सायंकाळी ४.०० नंतर उशीर झाल्याने पुढे ढकलण्यात आली.**

वरील निर्णय क्र.४५४ ते ५३५ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं. ०४.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(श्रीमती गिता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(गितांजली बाविस्कर)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक. तथा
तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.